DECEMBER 31 – 2014.

पुण्यासारख्या मोठमोठ्या शहरांतही विजेचा लपंडाव चालू असतो -- इथे एखादे सविस्तर स्टेटस वा कॉमेंट देताना मधेच सगळे उडू शकते -- यासाठी खरे तर एफबीवर टाईप केलेले सेव्ह करत जायची सोय असायला हवी. की आहे यावर काही मार्ग ?

मतमतांतरे असणार पण त्यांत रुतून बसणे आणि त्यांतून येणारा कट्टरपणा
कमीत कमी राहो, हीच सदिच्छा !
December 2014
DECEMBER 31

मुळीच शरण न जाण्याच्या निश्चयाने
गच्च भरलेली खोकी दरीत लोटून दिली
ते झाडांच्या काही पानांना दिसले
त्यांनी ते लगेच एका कवीला सांगितले
कवी घाबरला, काही धोक्याचे असणार
असे वाटून त्याने दारे-खिडक्या बंद केल्या
आता त्याच्या हातात काहीच नव्हते
परिणामांची वाट पाहणेच फक्त शक्य होते
पक्ष्यांचा कलकलाट ऐकू आला, काय
घडले असेल ? खूप वाहने क्रूरपणे
वेगात गेल्याचे ऐकू आले – या क्षणी
नेमकी काय घडायला हवी कवितेची कृती ?
हाच प्रश्न प्रमुख झाला – अनुभवाचे
शहाणपण ? की एक रंजक डिझाईन ?
झाडांची पाने कुजबुजत असणार
असे का वागला कवी ? कळतच नाहीय काही
करावे तरी काय ?

कवीला ती माणसे ठाऊक होती
गुन्हे लपवणारी – आता त्याने स्वतःकडे पाहिले
त्याचे मन घाबरलेले होते, हे नक्की –

त्याने कविताच लिहिली –
मी जर घाबरलो नसतो तर मी
झाडांच्या पानांशी बोललो असतो
माणसांना, दरीला, खोक्यांना
दोष देताना मीही जखमी होतोय --
याच प्रश्नावर असायला हवी
प्रत्येक कविता – हळुवार –
--- ००० ---

DECEMBER 30

माझे वय ६८. माझे काहीच म्हणणे नाही. पण, इथे, माझ्या असलेल्या मैत्रिणींपैकी किमान पन्नास तरी जणींवर मी भरपूर प्रेम करू शकलो असतो ! पण, आता, हेही बोलू शकत नाही !

सांगण्यासारखे म्हणजे, या माध्यमाने मला एक मुलगी मिळवून दिली, जिच्या जगण्यातल्या प्रश्नांत मी सामील असणार आणि एक नात मिळवून दिली जिच्या ब्रेकपच्या काळातही मी तिच्याबरोबर होतो आणि त्याच वेळी तिची परीक्षाही होती ! शिवाय मी स्खललनशील आहेच, चुकाही होतातच --

DECEMBER 29

आज रात्री ०९-०० वा भरत, पुणे --
कामगार कल्याण स्पर्धा --
माझे नाटक --
' गोळ्या काढलेलं पिस्तूल ' --

-- कशाला जाताय थंडीत कुडकुडत ? !

' तेवर ' या येऊ घातलेल्या हिंदी चित्रपटात
मनोज वाजपेयीने
प्रेमात पडलेल्या तिरसट खलनायकाची
आव्हानात्मक भूमिका वठवलेली आहे !
एकूणच मानवजातीला आत्मप्रत्ययाचा
आनंद मिळेल, असा हा चित्रपट असणार !
उत्सुकता खूपच ताणली गेलेली आहे !

नैतिक वागण्याचे दोन प्रकार --
मनात आलेले अनैतिक विचार दडपून टाकून वागता येणे
आणि
मनात अनैतिक विचारच न येणे.
-- हे दोन्ही प्रकार शक्य आहेत का ?
उत्तर ' हो ' असेल तर
या दोन्हींतला अधिक चांगला कोणता ?

पीके वरून संघ आणि बीजेपीत मतभेद !
अडवाणींची शिफारस !
डॉ. आनंद नाडकर्णींचीही शिफारस !

-- यावरून -- पीके, संघ, अडवाणी आणि नाडकर्णी
यांच्या भूमिका स्पष्ट करा !
मला पीके जो समजला त्यावरून तो बावळट, पोरकट वाटला !
पण, हे बाहेरचे समजणे अवघड जातेय !

DECEMBER 28

प्रेम आणि त्यामुळे जे होईल ते चालेल, असा प्रश्न येतो तेव्हा स्त्री ही पुरुषापेक्षा खूपच अधिक शूर असते - असे बऱ्याचदा दिसते ! पुरुष तुलनेने भित्रा असतो !

२.

वय, दिसणे, परिस्थिती, रोग
अनेकांना कदाचित छळणारा स्वभाव
रंग, फॅशन्स कोणत्या आवडतात
कवी, लेखक कोणते आवडतात
प्रेमाची व्यक्ती
नेमकी कशी हवी आहे
का हवी आहे, प्रॉब्लेम काय
रोजचे जगणे हाताळण्याची पद्धत
राग-संताप कितपत येतो
चेहरा भरकटलेला तर नाही ?
दिलासा हवाय की सहारा
की प्रेम आणि समजूत
की नुसतेच मानसिक थोपटणे ?
चैन कोणती हवीय, खायला काय
आवडते ? आणि हो
सेक्सची काय परिस्थिती ?
हे प्युअर शक्यतांचे जग
ना जाणे ना येणे, ना प्रत्यक्ष मिठी
ना खरी क्रीडा ना खुला संभोग
खूप गुंते
विश्वास, घाबरटपणा, घडी
न बिघडवता सर्व जगणे
मनातल्या मनात

कुणालाही न कळता

विश्वासाच्या बळावर !

मन तर शरीरच ! आणि मन

तर खोटे ! विध्वंस, हिंसा, तुरुंग, खून

बदनामी -- हे मात्र खरे असणार !

--- ००० ---

आता दोन पोस्टस देतोय -- खरे तर त्या दोन्ही एकत्र आहेत --

१.

माझ्या स्पर्शाने मोहोर नाही फुटत

प्रतिसादाच्या सुरांनी मी उत्तेजित नाही होत

शब्दांनी खूप काही द्यावेसे नाही वाटत

मनातले सर्व कप्पे खोलावेसे नाही वाटत

कोणतेही उल्लेख, शरीराचे भाग

निःसंकोच नाही होत

धोक्यांची भीतीच जावी

इतका विश्वास नाही वाटत

घड्याळाकडे कधी दुर्लक्ष नाही होत

जाता जाता पुन्हा येणे नाही होत

दिवसभराचे निरर्थकही

सांगणे-ऐकणे कुठे होते ?

जगण्यात न मिळालेले बोलणे कुठे होते ?

अचानक झालेल्या भेटीची आठवण नाही निघत

नकळतच जुळलेल्या गाठीची याद नाही होत

माहिती नाही, व्यक्तिगत प्रश्न नाहीत

आवडीही नाही सांगितल्या जात

रोजच अस्पर्श, रोजच दुरावा

मीलन कसले विरहच नवा

अमुक कर, तमुक नको

वाट पाहीन, काळजी नको

यांचे कुठले हक्क ?

अदृश्यच सगळे

कामे, कर्तव्ये फक्त चालू

व्यापताप टेन्शन्स यांतून

इथे कुठे विसावा ? वाटणेच असते नुसते

मिठीत काळ जावा -- तरीही

वाटते -- जीव असा रोजच फसावा --

--- ००० ---

साडेतीन हजार फ्रेंडस आहेत ! यांतल्या एका तरी फ्रेंडने ' नातं ' पाहिली का, कशी वाटली, काही कळले नाही. आज रविवार आहे -- इतर खूप गोष्टी असतात, मी समजू शकतो -- यावर काहीच अवलंबून नाही -- त्यामुळे, पुढील पोस्टस देतोय --

आठवणीसाठी पुन्हा --

आज रविवार दिनांक २८-१२-१४ ला दुपारी १ ते ४ या वेळात
झी मराठी वर पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत गाजलेल्या तीन मराठी एकांकिका
दाखवल्या जाणार आहेत -- कार्यक्रमाचे नाव ' नक्षत्र ' --
त्यात माझी ' नातं ' ही एकांकिका दाखवली जाणार आहे --
या एकांकिकेसाठी फर्ग्युसन कॉलेजला १९९२ साली पुरुषोत्तम करंडक मिळाला होता.
जमेल त्यांनी आठवणीने पाहा.

DECEMBER 26

होय, आहोत आम्ही एकनिष्ठावादी, होय आहोत आम्ही नीतिवादी, --- धर्मवादी, राष्ट्रवादी, प्रांत, भाषा, जात, वर्ण, विचारसरणी, वगैरे वगैरे वादी ! आहोत ! सगळेच असे ना तसे आहेत -- आहेत ना ? मग, आम्ही का नसावे ? सगळे

संकुचितच असतात, आम्ही का नसावे ? सर्वसमावेशक काही असू शकत नाही, याचा अर्थच -- विषमता, अन्याय, हिंसा अटळ आहेत ! हेच जगणे ?

DECEMBER 25

येत्या रविवारी दिनांक २८-१२-१४ ला दुपारी १ ते ४ या वेळात
झी मराठी वर पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत गाजलेल्या तीन मराठी एकांकिका
दाखवल्या जाणार आहेत -- कार्यक्रमाचे नाव ' नक्षत्र ' --
त्यात माझी ' नातं ' ही एकांकिका दाखवली जाणार आहे --
या एकांकिकेसाठी फर्ग्युसन कॉलेजला १९९२ साली पुरुषोत्तम करंडक मिळाला होता.
जमेल त्यांनी आठवणीने पाहा.

DECEMBER 24

सध्याचा आपल्या जगण्याचा सार्वत्रिक हलकट माहोल पाहता एक डाऊट असा येतो की हिंदू आणि हिंदूविरोधी एकमेकांना सामील तर नसतील ?

संघटित धर्म खोटे असतात ------- JK.
आणि आता
तेच ------------------------------- PK.

पुरेशा बावळटपणाने आणि पोरकटपणाने पीकेने सांगितलेले आहे !
आता तरी समजावे !

DECEMBER 23

काल एक फ्रेश, छान, सुंदर, मजेदार, गंभीर, ऐब्सर्ड, पोस्टमॉडर्न नाटक पाहिले. ‘ एफ वन – वन झीरो फाईव्ह ‘ या नावाचे. हा अर्थातच एका शहरातल्या गृहरचना संस्थेतला फ्लॅट नंबर आहे. आशुतोष पोतदार या आपल्या फ्रेंडची उत्तम संहिता आणि मोहित टाकळकर या आपल्या फ्रेंडचे तगडे दिग्दर्शन ! पूर्ण टीम आणि तंत्रज्ञ यांची बिनचूक, दर्जेदार साथ ! ८५

मिनिटांचा सलग खेळ ! खूपच मजा आली ! यातल्या नायकाच्या स्वयंपाक करण्याच्या आवडीपासून नाटक सुरू होते. स्वयंपाक ही त्यांच्या घराण्याची परंपराच असल्याचे तो सांगतो. त्यातून हळूहळू माणसाच्या मनाचे परिणामबद्ध असणे, कंडिशन्ड असणे हे दिसत जाते. मग येतो फ्लॅट रंगवण्याचा विषय ! पेंटर आणि नायिका ( नायक-नायिका या जुन्या शब्दांना खरे तर इथे काही अर्थ नाही. ) यांच्या संवादात, न उच्चारले गेलेले पण परिणामबद्धतेमुळे डोक्यात असलेले असे काही येते आणि पुढचे महानाट्य उभे राहते ! लोकांना गॉसिप आणि सेन्सेशनची हाव असल्याने त्यातून काहीच्या काहीच निघत जाते ! निसर्गात रंग हे खरे तर ‘ असतात ‘ – माणूस त्यांना अर्थबद्ध करत जातो आणि त्यातून सगळ्या समस्या, हिंसा वगैरे घडत राहतात – याचे आपल्याला भान येत जाते. अर्थमुक्त करून रंगांना साधे, छान जीवनदान देणारे हे नाटक आहे ! बाकी सगळे तर उत्तमच पण राजकुमार तांगडेचा पेंटर केवळ अविस्मरणीय !

मी म्हणेन, जरूर बघा हे नाटक ! आज आणि उद्या सुदर्शनला आहेत प्रयोग.

पूर्ण टीमचे अभिनंदन आणि एक अत्युत्तम नाटक पेश केल्याबद्दल धन्यवाद !

DECEMBER 22

स्वप्नात माझ्या
एक बसलेला पक्षी
मी एक गंमत
एक ट्रायल म्हणून
दगडाने नेम धरून
मारला, तर आले तीन
वाघबछडे, जणू
माझ्याच शोधात --
त्यांना कसे कळले असेल ?
-- जाणवला असेल
त्यांना माझ्यातला
अपराधभाव --
तो घालवणार कसा
आता ? कळे ना –
वाघ वाघ म्हणत
पळत सुटलो

स्त्रीपुरुषमुले यांची
धावपळ झाली
घरोघरी इकडेतिकडे
पळाले सगळे -- मीही गेलो
कुणाच्या तरी झटकन
घरात – दार लावून घेतले --
तिथे एक वृद्ध गृहस्थ होते
ते म्हणाले, वाचली
तुमची निसर्गकविता
छान आहे --
मी खूपच घाबरलो !
यांनाही माहीत तर नसेल ?
वाघ नाहीयत आता बाहेर
खुशाल जा तुम्ही –
ते सस्मित म्हणाले --
माझा धीरच होई ना –
यांना असेल का
मला माफ करायचा
अधिकार ?
काही कळेच ना --
--- ००० ---

" धर्म म्हणजे एक्सपायरी डेट उलटून गेलेले औषध आहे " -- असे एक वाक्य सध्या सगळीकडे चमकत आहे. ठीक. पण मुळात हे कोणत्या वा कोणकोणत्या रोगांवरचे औषध होते ? त्या रोगांची सध्या परिस्थिती काय आहे ? त्यांवर दुसरे कोणते नवे इलाज उपलब्ध आहेत ? -- या मुद्यांवर कुणीच काहीच बोलताना दिसत नाहीय !

DECEMBER 21

काही एका प्रमाणात सत्य
कळले तर
केळीची पाने खुलू शकतात ...
जेलला जायचे संकट
येईल की काय
अशा चिंतेतला
अपराधीही आता
उलट
हवासा होऊ शकतो
एक विश्वास, एक निर्धोकता
यांचे सत्य
जमिनीत मुरल्याने ...

व्यक्तित्वांच्या मर्यादा
ओलांडल्या जाऊ शकतात ...
--- ००० ---

जागतिक अर्थव्यवस्थेचा तोल संभाळायला जर शस्त्रास्त्रांचा बाजार महत्त्वाचा असेल तर शांततेचे करार करून उपयोग काय ? यावर एक ग्रेट परिवर्तनवादी कविता कुणितरी लिहायला हवी !

DECEMBER 20

गौतम बुद्धाने सांगितलेला धर्म पूर्ण इहवादी आहे का ? तो धर्म आणि डॉ. आंबेडकरांनी सांगितलेला बौद्ध धर्म यांत असलेल्या फरकाबद्दल मी काही वर्षांपूर्वी मे. पुं. रेगे यांची तीन व्याख्याने ऐकली होती. पण त्या वेळी मला ती नीट समजली होती असे वाटत नाही. यावरही थोडक्यात काय सांगता येईल ?

‘ अभिनय ‘, कल्याण निर्मित, संजय कृष्णाजी पाटील लिखित आणि अभिजित झुंजारराव दिग्दर्शित आणि बहुचर्चित आणि अनेक पारितोषिकांनी सन्मानित झालेले ‘ लेझिम खेळणारी पोरं ‘ हे दोन अंकी नाटक आज पाहिले. पूर्ण टीमने अत्यंत परिश्रमपूर्वक बसवलेला चोख, बिनचूक प्रयोग ! ( माझी नेहमीची तक्रार – नटनट्यांनी वाक्यांचे शेवटचे भाग पाडल्याने नीट ऐकू न येणे – हिला इथेही अनेकदा वाव आहेच. ) संवाद तसे सोपे नाहीत – हे कवितांना दिलेले नाट्यरूप आहे. अर्थासह या ओळी, काही वेळी खूप अवघड असणाऱ्याही, शिताफीने म्हणणे, हे नक्कीच दाद देण्यासारखे आहे. आक्रमकांचे – बेफिकीर असणाऱ्यांचे जग आणि त्याचे परिणाम भोगणाऱ्यांचे – पीडितांचे जग – असे दोन प्रकार मानले तर हे नाटक पीडितांच्या जगाचे नाटक आहे. ( हे काही ठळकपणे असे विभागता येत नसते – काही माणसे कधी इकडे, कधी तिकडे असतात. ) ही सगळी अन्यायित, पिडली जाणारी, दुःखे भोगणारी, सहन करणारी, पिचलेली, तुटलेली, फाटलेली, चिंध्या झालेली, रडणारी, ओरडणारी, नाइलाजाने जगणारी, नाइलाजाने मरणारी – अशी माणसे आहेत. पात्रांचे पोषाख रंगीबेरंगी ठेवल्याने, नाचगाणी आणि भरपूर प्रकाशयोजना ठेवल्याने ते रटाळ होत नाही. हा नक्कीच एक सुविहित प्रयोग होतो. त्याबद्दल पूर्ण टीमचे अभिनंदन !

आता मला एका वेगळ्याच प्रश्नाबद्दल बोलायचे आहे. हे पीडितांचे जग दाखवून-पाहून काय होत असावे ? प्रेक्षकांची संवेदनशीलता वाढणे, काहींनी असे अन्याय करण्यापासून परावृत्त होणे, संपूर्ण राजकीय-सामाजिक-मानसिक रचनाच बदलायला समाजाने उद्युक्त होणे, या पृथ्वीचा स्वर्ग होण्याच्या मार्गात एक पाऊल पुढे पडणे, असे अन्याय होण्याच्या शक्यता कमी होणे, माणसे समंजस – कमी हिंसक होणे, आपल्या मतांनी आपले रेटत जगायचे बंद पडणे, आत्मकेंद्रितता, भीती, स्वहिताची आणि स्वसुखाची हाव कमी होणे – यांतले काय घडत असेल ? घडत असेल का यांतले काही ? आणि नसेलच असे काही घडत तर अशा कलाकृतीचे जीवितकार्य काय ?

हा प्रश्न अर्थात त्या नाट्यप्रयोगाशी संबंधित नसेल पण कला क्षेत्रातला वा नाट्यक्षेत्रातला एक प्रश्न म्हणून याकडे पाहिले जायला हवे, असे वाटते.

DECEMBER 18

एक लघुतम कथा –
त्यांचे प्रेम खरे होते, त्याच्या अनेक रंगच्छटा खऱ्या होत्या, त्यातली मौजमजा, आनंदही खरे होते, त्यातले समज-गैरसमज, वाद, भांडणेही खरी होती, ताटातूटही खरी होती – पण संपर्क तुटले नव्हते. शेवटी त्यांनी त्यांच्या या रिच आयुष्याची एक स्टोरी लिहून तिचे स्मारक तयार करायचे ठरवले – आणि त्यांचे पुन्हा मीलन झाले !

थोडक्यात बोला
संक्षेप करा
असे म्हणत म्हणत
या मनातून त्या मनात
कॉपीपेस्ट
करायचा शोध लागेल !

DECEMBER 17

डोळे उघडताच
विश्वाच्या आभासाची नक्षी --
जीतून तरंगत जाता येते
मधेच धारदार खडकांच्या टक्करी
सहत जणू आपले सगळे बरोबर
असून इतरांच्या वेगळेपणामुळे

त्यांचीही असते एक नक्षी
जीत आपण असतो
संतापजनक

कपडे, वागणे, कायदे
सगळे कसे हवे
ते त्यांना पूर्ण माहीत असते
त्यांना विरोध चालतच नाही
ते शूर आणि तत्त्वशील असतात

ते थोडे असले तरी
बांधील असतात

जगाचे भले व्हायलाच हवे
हा त्यांचा आग्रह असतो

बाकी बहुसंख्य जगणारे
तुलनेने अनाग्रही असतात
चुकतमाकतही असतात
स्वतःच्याही समजुतींनी

संघर्ष, हिंसा अट्ळ बनतात –
--- ००० ---

Champra Deshpande shared Pravin Kamble Mayuri Theaters's album.
या ग्रुपने ' स्टालिन ' चे बरेच प्रयोग केले !

DECEMBER 16

आपण एखाद्या रोगामुळे मरू का यापेक्षा एखाद्याच्या रागामुळे मरू का, हेच अधिक महत्त्वाचे झाले आहे !

कुणाकुणाला नष्ट करणे योग्य होईल याचे विचार एकूणच खूप जणांच्या डोक्यांत असतात, हे नाकारण्यात अर्थ नाही -- कुणाच्या तरी धोरणामुळे एखाद्या देशात हजारो मुले मेली -- हेही घडू शकते -- प्रत्यक्ष गोळ्याच घालाव्या लागतात, असे काही नाही -- एखाद्या जातीतली नवजात अर्भकेही मारून टाकावीत असे वाटणारे तालिबान इथेही आहेतच -- हे सार्वत्रिक आहे -- तर एकूणच असे का होत असेल ? की हे अटळ समजून जगत राहणे भाग आहे ?

माणसांमधलीच काही माणसे इतकी भयानक वेडी का होतात --

तात्कालिक कारणे कळली की आपल्याला वाटते, सगळे कळले !

ही बातमी वर्तमानपत्रांची शीर्ष बातमी होते याचा अर्थच आपण अजून मागासलेले आहोत -- अशी बातमी मागे जात जात -- आत कुठेतरी छोट्या स्वरूपात आली पाहिजे -- अमुक इतक्या मुलांची हत्या ! -- कशामुळे वगैरे कारणांतही इंटरेस्ट राहू नये -- त्याच दिशेने चाललाय सांस्कृतिक विकास !

माणसांच्या मनांत निर्माण होणारे हे क्रौर्य
कसे नष्ट होऊ शकेल ? -- दिङ्मूढ अवस्था !

DECEMBER 15

आपण रोज जगतो, अनुभव घेतो, ताणतणावांतून-सुखदुःखांतून जातो, बरेच वाचतो, बोलतो, चर्चा करतो, वगैरे घडत असूनही आमूलाग्र काही घडत नाही. अनुभवांत भर पडत सुखदुःखयुक्त जगणे तसेच चालू राहते. मग समजणे वा आकलन होणे म्हणजे काय ?

DECEMBER 14

माझ्यातूनच उद्भवणारी
माझ्यातच विलीन होणारी
कुणालाच उघड न होणारी
लख्ख सूर्यप्रकाशातही
अंधाराचा मुलायम अनुभव देणारी
माझ्या हिंस्त्र नखांच्या जखमाही
क्षणात बऱ्या करून घेणारी
पाण्यातून पोटात जाणारी
हवेतून जगण्यात पसरणारी
उत्कटतेने वेढून असणारी
माझ्या डोळ्यांची स्वामिनी
माझी मादक द्रव्ये
माझे चोरटे व्यवहार
सर्व व्यापून

मलाही सामावून घेणारी
चेतवणारी, भिडवणारी
उत्कलन ऊर्जा देत
जगणे वाढवणारी
मृत्युमर्दिनी
पूर्ण पारदर्शी
सगुण, साकार
खेचून घेणारी
स्वतः अथांग राहून
माझेही असणे गूढ करणारी
जिच्या एका क्षणस्पर्शासाठी
करावे आयुष्य न्योछावर संपूर्ण
अशी ...
--- ००० ---

आपण ज्याला प्रेम म्हणतो ते मर्यादितच असते.
तरीही त्याला असंख्य आयाम असतात.
हजार प्रकारच्या अपेक्षांची त्यात देवघेव असते.
रजोनिवृत्तीनंतर स्त्रीचे वा अमुक वयानंतर पुरुषाचे
प्रेम संपत नाही.
प्रेम म्हणजे पुनरुत्पादन असे समजणाऱ्यांना
ना मानवी मनाची समज असते ना त्याबाबतच्या शास्त्राची.
निसर्गाने मर्यादित प्रेमालाही मर्यादा ठेवलेली नाहीय --
हे न समजणारे, न्यूनगंडालाच अहंगंड म्हणून सादर करत असतात !

निखळून पडलेला तारा
स्वेच्छेने पडतो
आकाश सोडतो

म्हणतो
कुणीच नसते कुणाचे

तो कुठे आहे
हेही त्याला कळत नाही
अंधार की उजेड
हाही संभ्रम असतो

सगळेच तारे
निखळून परागंदा झालेले
प्रेमाने राहू
जग सुंदर आहे
म्हणणारे
आपण एकमेकांचा
मान राखत जगू
म्हणणारे

आहे या स्थितीत
ते कितीही प्रयत्न करायला
तयार असतात

मधेच एखाद्याला
विश्वाचा, एकत्र जगण्याचा
अर्थ कळावासे वाटते
इतरांना वाटते – तो पुन्हा निखळतोय –
--- ००० ---

DECEMBER 13

फ्रेंडस, आता हे आजचे शेवटचे --
समजा माझे इथले एकूण फ्रेंडस झालेयत साडेतीन हजार ! -- हे एखाद्या प्रायोगिक म्हटल्या जाणाऱ्या लेखकाला लाजिरवाणे आहे ! ( मला तसे मुळीच वाटत नाही, हे वेगळे ! ) आपण इथे भेटलो, बोललो, जगणे एकत्रितपणे समजून घ्यायचा प्रयत्न केला, मजाही केली, चुकाही केल्या, क्षमाही केल्या, विशेषतः नैतिक कल्पनांमध्ये तफावती असूनही एकमेकांना नष्ट करायचा प्रयत्न केला नाही -- एवढे खूप झाले ना ! अमर व्हायची काय गरज आहे ?

अगदीच प्राथमिक प्रश्नांना तोंड देण्यात मानवी आयुष्य संपू नये -- तसे ज्यांचे नाही होत त्यांनी तरी हसावे-बागडावे, विनोद ऐकावे-सांगावे -- आणि मुख्य म्हणजे आपल्याला पडणाऱ्या मूलभूत प्रश्नांकडे लक्ष द्यावे. मूलभूत प्रश्न ? -- अहो, दुःख का होते ? -- हाच घेऊ ना --

Champra Deshpande shared a link.

Osho Comics - Wisdom of Folly: 200 Jokes of Mulla Nasruddin
otoons.de
Mulla Nasrudin and his wife were arguing. "I was a fool when I married you," said the wife. "I GUESS YOU WERE," replied Nasrudin, "BUT I WAS SO INFATUATED AT THE TIME, I DIDN'T NOTICE IT." -

Osho Jokes

What do you call a man who has never lost an argument against a woman?
..
?
A virgin !!

बेबनाव भोगत
बाहेर जाते नजर तर
दुकाने सगळी बंद
दिसतात बंद घरे
चिटपाखरूहीन
रस्ता फक्त घुमता
कडक उन्हाचा आवाज

यापूर्वी ऐकलेले सर्व आवाज
आता विस्मृतीत जातील

याहून वेगळे दुःख
नसेल
नसेल काहीच
कृतीची अपेक्षा करणारे

असणेच हळूहळू
सूक्ष्म होत जाईल अधिकाधिक ...
--- ००० ---

वॉलमोरच्या ‘ लव्ह ‘ या फ्रेंच कवितेतल्या शेवटच्या ओळी –

एकदा आले प्रेम आयुष्यात की त्याचे नसणे
हा छळ असतो आणि ते परतताच
हरघडी थरथरायला होते.
बऱ्याचदा प्रेमात असते मृत्यूचे असणे
आणि तरीही प्रेम आनंदी करतेच.
--- ००० ---

फेलिक्स आर्व्हरच्या एका कवितेतल्या ओळी –

मी तिच्या जवळूनच चालत असेन
तरीही असेन बेदखल
सतत तिच्या बाजूलाच असूनही
एकाकी असणारा
याप्रमाणे मी माझा व्यतीत करेन
काळ या पृथ्वीवरचा
असा थकलेला
काहीच मागण्याचे साहस न करता
आणि स्वीकारायलाही
काहीच नसलेला ...
--- ००० ---

DECEMBER 12

अनेक ठिकाणांचे पाहून-ऐकून एक दिसतेय -- सहकारी गृहरचना संस्था ही एक अजब चीज आहे. इथल्या कार्यकारिणीत काम करणे म्हणजे लष्करच्या भाकरी भाजणे, असेच समजतात लोक. फुकट स्वतःचा वेळ आणि शक्ती द्यावी लागते. एवढे करूनही काही राहिले, चुकले तर इतर सभासद, मालक असल्याप्रमाणे झापणार ! आणि मुख्य म्हणजे वेळच नाहीय कुणाला – नकोच ते झंझट, असाच प्रकार आहे ! बरे, जबाबदारीप्रमाणे पगार ठरवावेत तरी अवघडच ! काही राहिले, चुकले तर लोक म्हणणार, फुकटचा पगार खाताय नुसता ! -- ही गोष्ट वेळेत व्हायला नको होती ? करता काय इथे खुर्चीवर बसून नुसते ? – या सगळ्यावर उपाय एकच दिसतो – बिनपगारीच करायची कामे पण भ्रष्टाचारातून हाणायचे पैसे ! आणि थोडा निर्लज्जपणा बाणवायचा अंगी !
आणखी काही सुचतायत का उपाय ?

माणसाला त्याच्या सवयीच्या कोशातून बाहेर काढून अधिक संवेदनशील बनवणारी, त्याचे भान अधिक व्यापक करणारी कला ही माणूस बांधिलकीची कला असते. माणूस बांधिलकीची कला ही सामाजिक बांधिलकीचीही असतेच.

DECEMBER 11

कालांतराने फेसबुकही सवयीचे, रटाळ होईल का ? की नव्या नव्या मैत्र्यांमुळे ते सदा सतेजच आणि सदा हरितच राहील ?

कठडा नसता तर भीतीच्या मुंग्या
तळपायांतून सरसरत कण्यात गेल्या असत्या

वाऱ्यापेक्षा गाणे सुमधुर वाटायची वेळ होती
आठवणींच्या नशिल्या कंपनांमुळे

सगळे ठीक असले तरी
प्रदर्शन टाळायचे होते

हेच मन चष्म्याची काच तडकल्याने
दुःखी होऊ शकले असते

हेच मन कठडा नसल्यासारखे
भयभीत होऊ शकले असते

खरे तर ही सहज गाण्याची वेळ होती
भयामुळे भुताटकीची झाली होती ...
--- ००० ---

DECEMBER 10

लेखक हा उत्साही आणि आशावादीच असला पाहिजे आणि त्याने समाजाची घडी नीट बसवण्याचा / ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे -- ही एक जुनी अपेक्षा असतेच -- पण, लेखक हा निराशावादी आणि जवळ जवळ वेडाच असला पाहिजे -- हीही ठाम अपेक्षा ? काय असेल या दोन्हींच्या मागे ?

DECEMBER 9

बऱ्याचदा सुरुवातच टाळली जाते -- एखादे काम करायचे असेल तर ते करायला सुरुवात होणे हेच अत्यंत महत्त्वाचे !

DECEMBER 8

धर्मग्रंथ, ग्रंथ, विचारसरणी, आदर्श, ध्येय यांचा पगडा मान्य केला की अडकलेच जगणे !

हळूहळू माणसे स्वतःच्याच घरात रमेनाशी होत जातात --

आयला, किती लिहितो हा -- लेखन पाडत असतो नुसता ! -- असे काहींबद्दल काहींना, लिहिणाऱ्यांच्या लेखनाचे प्रमाण पाहून वाटते ! आता मुद्दा असा आहे -- त्यातले काही तुम्हाला चांगले वाटत असेल तर ते तसे म्हणा -- आणि सगळेच फालतू वाटत असेल तर त्याची कारणे सांगा -- आणि ती सांगता येत नसतील तर ते वाचू नका -- कोण किती लिहितो वा लिहिते हा काही अर्थपूर्ण मुद्दा आहे का ?

DECEMBER 6

कधी समोरच्या क्षणाचा पूर्ण क्लोजप
कधी संपण्यापूर्वीचा बिंदू
कधी नुसतीच एक मानसिक वस्तुस्थिती
कधी घडली न घडलेली घटना
स्वप्नाचे सत्य सांगणारी तिरीप
खऱ्याचे खोटेपण दाखवणारा झोत
हे सांगताना दुसरेच काही सांगणारी
प्रतिमांतून झिरपणारी
कधी रुक्ष कधी काहीशी ओली
कधी मदमस्त कधी नाजुक तार छेडणारी
भावनेला बाहेरून पाहणारी
विचाराचे बोट सोडणारी

कोण काय म्हणेल याची चिंता नसलेली
भूतकाळाचे अंजन वर्तमानाच्या डोळ्यांत घालणारी
वरवरचे भेद भेदून एकच समान स्थिरता वेधणारी
अनुभवाचे सत्य पुसणारी
आकर्षणाचा क्षण टिपणारी
रचनेचे स्थापत्य उभारणारी
कधी तपशीलमय, कधी चित्रहीन
तुटपुंज्या सामग्रीची
कधी सुबत्तेची
फसणारी, रस्ता चुकणारी
भलतेच काही करून बसणारी
टाकलेली, सोडलेली, फालतूही
वाहवा की लाथ की टाळ्या की हेटाळणी
हे पाहायला न थांबणारी
शब्दांना बाहेरचे अमर्याद अर्थ बहाल करणारी
माझी प्रिया – माझी कविता –
--- ००० ---

आपण धर्म, विचारसरणी, कुठलीही अस्मिता सोडू शकतो ? कुणाच्याही विरोधात नाही, असे जगू शकतो ?

गेली काही वर्षे मी या गावात होतो.
आता मी इथे परत येणार नाही.
आठवणी काढण्याचा माझा स्वभाव नाही.
काय होईल आता माझ्या मनातल्या या गावाचे ?
गंजून, झिजून ते हळूहळू नष्ट होईल ?
मला नकळत ? की मृत पडून राहील ? की ते
कधीतरी स्वप्नातली सावली होईल माझीच ? क्षीण ?
--- ००० ---

DECEMBER 5

तुम्ही काही सांगत आहात -- अशा वेळी समोरची व्यक्ती मोबाईलमध्ये व्यग्र असेल आणि तरीही तुम्हाला संताप येत नसेल तर तुम्ही मयत आहात ! तुमच्या आत्म्याला शांती लाभो !

माणुसकीची न्यूनतम लेव्हल -- आपण एकमेकांशी बोलत आहोत तोवर आपले एकमेकांकडे लक्ष हवे !

आपण काहीही बोललो, कोणताही विचार मांडला, कोणतीही भूमिका घेतली तरीही त्याला अनेकांचा विरोध असणार आहे -- हे समजून एकमेकांबाबतच्या सहानुभूतीने सुरुवात करता येईल का ? की शत्रुत्व अटळच आहे ?

आरशामधून पलीकडचे
दिसू लागताच
भूतकाळ नष्टच झाला
पाठीलाही फुटले डोळे
काळ एकवटणारे

निमित्त असे घडले
सूर्यप्रकाशावर आलेले ढग
मनातल्या संघर्षाने उडाले

आधी वाटायचे कशाला संघर्ष
-- आता दिसतेय
नष्ट होऊनच आधीचा क्षण
घडणार उष्टे नसलेले जगणे

वेळच अशी आली की
पणाला लावावेच लागले
अनुभवांचे सगळे खजिने
होईल ते होईल

असे म्हणत.

--- ००० ---

DECEMBER 4

मी -- काय रे, काय झालं ?

तरुण -- मी दुःखात आहे --

मी -- का ?

तरुण -- आज मी माझ्या एका मैत्रिणीला माझ्या आयुष्यातून हाकलून दिलं --

मी -- तुझं तर लग्न झालंय -- मुलंही आहेत --

तरुण -- मग काय झालं ? होती --

मी -- कधी कुठं दिसली तर नाही --

तरुण -- फेसबुकवर हो --

मी -- अच्छा -- म्हणजे व्हर्च्युअल -- काचेचा पडदा नुसता --

तरुण -- अहो, खऱ्याहून खरं -- बायको खोटी वाटायची मला -- इतकी ती खरी वाटायची --

मी -- मग, झालं काय ?

तरुण -- अनेक लफडी होती तिची -- क्ष असला की ती माझ्याकडं दुर्लक्ष करायची -- असं काय काय समजत गेलं --

मी -- हं -- मग ?

तरुण -- असं व्हायला नको होतं --

मी -- आणि तुझ्या बायकोला काहीच माहीत नसेल -- तू का मूड ऑफ ते --

तरुण -- वेडे काय ! तिला कसं माहीत असणार ! जसं जग तसे आपण !

मी -- हं --

तरुण -- पण ती माझ्याशी प्रामाणिक असायला हवी होती --

मी -- खरं आहे -- पण मला काही कळतच नाहीय --

--- ००० ---

अरे, झाला ना घटस्फोट ?

आता मनानेही घे ना त्या माजी पार्टनरशी घटस्फोट !

तुझे तू जग --

DECEMBER 3

मुख्यतः जेकेंच्या बोलण्यात इंटरेस्ट असलेल्यांसाठी --

जेके म्हणत की नुसते बौद्धिक, अकादेमिक प्रश्न विचारू नका -- तुम्हाला स्वतःला पडलेला -- तुमचा स्वतःचा प्रश्न विचारा -
- त्यावर बोलू.
-- काय असेल याचा अर्थ ?

साहित्यातल्या पात्रांनी स्त्रीवाचक शिव्यांचा वापर करणे आणि लेखकांनी स्वतः त्यांचा वापर करणे यांत फरक आहे.

मानसशास्त्र, जनुकशास्त्र यांचा ओझरताही स्पर्श नसलेले नैतिक कर्मठ खूप असतात, जे पुरोगामी म्हणून हिंडत असतात !
शिव्यांचा मुबलक वापर आणि आपण खूप बोल्ड असल्याचे सारखे प्रदर्शन करणे -- हेच त्यांचे पुरोगामित्व असते !

वरून पुरोगामी -- आतून कर्मठ !
आतून कर्मठ -- वरून पुरोगामी !

DECEMBER 2

प्रत्येक हवासा किनारा हा मनाने स्वतःच तयार केलेला असतो.
( गाव, व्यक्ती, घर, वस्तू, फर्निचर वा एखादे झाड. काहीही.)
तो काही बाहेरून मिळालेला आधार नसतो.
तरीही मन कोणताही किनारा सोडायला घाबरते.
' स्वतंत्र मन ' !

स्वतःचे मन समजत जाणे म्हणजेच माणसाचे मन समजत जाणे. प्रुरुषाच्या बाबतीत, त्यात थोड्याफार फरकाने स्त्री-मनही येते. पण, तपशील, सदर्भ आणि बारकावे यांसह समजणे हे एक वेगळे असते. आमच्या पिढीत स्त्रियांशी संवाद अवघड होता -- आता म्हातारचळ म्हणतील म्हणून अवघड आहे -- तरीही, इथे फेसबुकवर, अनेक स्त्रिया अनेक प्रकारे व्यक्त होत असतात -- ते इथे पाहता आणि समजून घेता येते. आमच्या पिढीच्या लोकांचे तरी बरेच अज्ञान दूर होत जाते ! जय एफबी !

DECEMBER 1

काळाचा महिमाच म्हणायचा ! वेळ नाहीय ! आयुष्य एकदाच जगायचेय ! अधिक आकर्षक, अधिक सुखावह वाटणारे काही मिळत असल्यास तिकडे पाय वळतातच ! आहे त्याच संबंधांना, आदर्शांना चिकटून बसणे मूर्खपणाचे आहे ! आपले जगणे फारसे न विस्कटता वा विस्कटूनही, तसे जमेल ते मिळवणे हे समर्थनीयच आहे ! यातूनच ब्रेकप्स, घटस्फोटही संभवतात ! उलथापालथही होऊ शकते ! अशा प्रसंगी चालणारे जगणे खूपदा क्लेषकारकच असणार ! अशा एकूण मानवी जगण्याबाबतचे शिक्षण कोणत्याही शाळा-कॉलेजात उपलब्ध नसते ! २५ ते ३० व्या वर्षी माणूस वेडा च्या वेडाच बाहेर पडतो ! यावर काय उपाय सुचतो ?

November 2014

NOVEMBER 30

प्रामाणिकपणा महत्त्वाचा, असे मानणारी आणि न मानणारी, सगळी माणसे अप्रामाणिकच असतात, ही माणसाच्या जगण्यातली गोची आहे !

प्रत्येक व्यक्तिमत्व हे वंशिक / शारीरिक पासून असंख्य प्रभावांनी युक्त असते. एकासारखे दुसरे नसते. धार्मिक, नैतिक, वैचारिक असे एकमेकांचे कोणतेच ग्रह मिळतेजुळते असू शकत नाहीत. म्हणजेच यात अमुकच सत्य, असे काही असू शकत नाही. तरीही, आपापल्या ग्रहांना / भ्रमांना सत्य समजून माणसे एकमेकांना जाळणे, देशोधडीला लावणे, हातपाय तोडणे, बलात्कार करणे, खून करणे, तुकडे करणे, वगैरे कृती करत राहतात आणि त्यात फुशारकीही मानतात ! आणि या ना त्या प्रकारे याचे अनुसरण सगळेच करत राहतात ! इतरांना क्रूर, अमानुष म्हणणेही चालू ठेवतात !

आपली कुणाचीही काही स्टेटस स्वमताविषयीचा आग्रह मांडणारीच असतात -- ओपन नसतात. तिथे वेगळे काही बोलायला वावच नसतो. याबद्दल हरकत कुणाचीच नसते -- पण तिथे वेगळे काही सुचूनही ते मांडले न जाण्याची शक्यताच जास्त असते, हे मात्र मान्यच करावे लागते.

Due to the fact that Facebook has chosen to involve software that will allow the theft of my personal information, I do declare the following: on this day, November 29, 2014, in response to the new Facebook guidelines and under articles L.111, 112 and 113 of the code of intellectual property, I declare that my rights are attached to all my personal

data, drawings, paintings, photos, texts etc... published on my profile. For commercial use of the foregoing my written consent is required at all times.
Those reading this text can copy it and paste it on their Facebook wall. This will allow them to place themselves under the protection of copyright.
By this release, I tell Facebook that it is strictly forbidden to disclose, copy, distribute, broadcast, or to take any other action against me on the basis of this profile and/or its contents. The actions mentioned above apply equally to employees, students, agents and/or other staff under the direction of Facebook.
The contents of my profile include private information. The violation of my privacy is punished by the law (UCC 1 1-308 - 308 1 -103 and the Rome Statute). Facebook is now an open capital entity.

-- All members are invited to post a notice of this kind, or if you prefer, you can copy and paste this version.
If you have not published this statement at least once, you will tacitly allow the use of elements such as your photos as well as the information contained in your profile update.
NOVEMBER 29

या आधीच्या पोस्टमध्ये उल्लेखलेली प्रकाश बाळ जोशी या आपल्या चित्रकार मित्रवर्यांची मुलाखत पाहिली. प्रकाश यांच्या बोलण्यातली सहजता, साधेपणा, शांतता आणि सखोलता जाणवली. इतर अनेक मुलाखतींप्रमाणेच यातही माहिती विचारणारे प्रश्न जास्त आणि आशयानुगामी प्रश्न कमी झाल्याचे जाणवले. तरीही, त्यांच्या निसर्गचित्रांत मानवी आकृती दिसली नाही तरी त्यात माणूस असणे, याबद्दलचे त्यांचे बोलणे महत्त्वाचे वाटले. एकरेषा-चित्र याबद्दल बोलताना ते म्हणाले की रेषेची सुरुवात आणि शेवट हे दृश्य असतात पण त्या आधी आणि नंतरही रेषेचा प्रवास चालूच असतो. प्रत्यक्ष अकादेमिक, तांत्रिक शिक्षण न घेता असे जबरदस्त काम करणारा -- जगणे आणि कला एकत्रितपणे समजून घेणारा हा कलावंत आपल्याबरोबर ( मित्र म्हणूनही ) जगत असणे, हे आपले भाग्य आहे ! धन्यवाद, Prakash Bal Joshi !

फ्रेंडस, कालच आपल्या प्रयोग परिनिरीक्षण मंडळावर लिहिले आणि कालच त्यांनी माझ्या दिशेने एक अगदी सोपा कॅच दिलेला आहे ! यावर नंतर लिहीनच !

माझ्याप्रमाणेच कालचे प्रक्षेपण पाहायचे हुकलेले काहीजण असणार --
त्यांच्यासाठी ही आठवण --
आपले मित्र, प्रख्यात चित्रकार प्रकाश बाळ जोशी
यांची दीर्घ मुलाखत अवश्य पाहा --
आज रविवार ३०-११-१४ रोजी सकाळी ११-३० वाजता
झी २४ तास -- या टीव्ही चॅनेलवर.
Prakash Bal Joshi --

NOVEMBER 28

बिंदूमाधव खिरे या लेखकाची ‘ पुरुषोत्तम ‘ ही एकांकिका आपल्या परिनिरीक्षण मंडळाने अडवलेली आहे. त्याबद्दलची बातमी आणि काही मते आजच्या ‘ पुणे मिरर ‘ च्या प्रथमपृष्ठ स्थानावर आहेत. सदर एकांकिका समसंभोग आणि त्यातले नातेसंबंध आणि त्यातून निर्माण होणारी गुंतागुंत, हा विषय हाताळते. त्या एकांकिकेतल्या संवादांत काही शिव्या व स्त्रियांना अवमानकारक आणि प्रेक्षकांना अस्वस्थ करणारे वाटू शकते, असे शब्द व वाक्ये आहेत, असा आक्षेप आहे. या बाबतीत माझे मत विचारण्यात आले होते – ते मी असे दिले आहे – The use of language reflects the conditioning of characters in which they flourish. If they use sophisticated language just for the sake of it, it will be deemed fake.To ask playwrights or authors to omit certain portions, just because it does not match with the standards of few, needs to be strongly objected to. Language is an indispensable part of that artwork so it cannot be compromised. शक्य असेल त्यांनी ही पूर्ण बातमी जरूर वाचा.

फ्रेंडस, थोडे घरगुती शेयर करतोय --
१ माझी थोरली नात पूजा देशपांडे हिने, तिची मैत्रीण-पार्टनर रेवती श्रीखंडे हिच्यासह खेळून त्यांच्या वयाच्या मुलींमधली आंतरशालेय बॅडमिंटनमधली डबल्स-फायनल जिंकली आणि त्यांच्या शाळेला सुवर्णपदक मिळवून दिले ! ( कालच्या ' पुणे सकाळ ' मध्ये बातमी व फोटो आहे. )
२ माझी धाकटी नात श्रेया देशपांडे, तिच्या शाळेच्या प्राथमिक विभागात सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनी म्हणून निवडली गेली !

मन ठरवते की मनात माकड आणायचे नाही --

आता मनात सतत हमखास माकडच !

-- काय असेल ही भानगड ?

" मला खरे तर अमिताभ बच्चन व्हायचे होते -- "

" तसेच तर झालेय -- तुम्हीच तो झालाय आणि तो तुम्ही -- दोघेही आता ते विसरलाय, एवढेच ! "

NOVEMBER 27

कामे वाढली आहेत.

वेळेची बचत करायला हवी.

पंधरा मिनिटांच्या ऐवजी साडेतेरा मिनिटांतच विश्रांती पूर्ण व्हायला हवी !

आजारपण, शरीरव्यंग, वाढते वय

अज्ञान, अपयश, कमकुवत

यांचे उल्लेख करत माणसे

विद्ध करत राहतात एकमेकांना

-- आताचे ‘ मोठे ‘ गेल्यावर

यावा स्वतःचाच काळ या भावनेतून --

उकरत राहतात स्वतःच्याच मनाची

रक्तमाती – निष्कारण –

तुझे काम नाही हे – बाजूला हो

-- हा मंत्र सगळेच ऐकवतात

एकमेकांना अधिकच हतबल करण्यासाठी

-- असलेच हे सर्व ओलांडून जे जगले

त्या ‘ मोठ्यां ‘ ची उदाहरणे फेकतात

तोंडांवर एकमेकांच्या एकमेकांवर

क्षुद्रपणा लादण्यासाठी --

चिंतत -- आपल्यातलेच कुणी आता
या चक्राबाहेर जाऊन आपली स्वतःची
कमकुवत अधोरेखित नको व्हायला --

हे नामोहरमीकरण आणि हरामीकरण
ओलांडून जाणारेच
झाले ‘ मोठे ‘ !

आपल्यातलेच कुणी व्हावे ‘ मोठे ‘
या सदहेतूनेच तर ही आवश्यक
आव्हाने उभी करत राहतात
सगळे – एकमेकांसाठी --
--- ००० ---

दोन कविता

१
त्या शब्दाऐवजी अर्थ
तोच सूचित होईल असे
इतरच दहा शब्द वापरले
ज्यांमुळे त्या शब्दाचा अर्थ
दसपट तीव्र झाला
दोन्ही बाजूंनी
आक्षेपार्ह काहीच न घडता
मने तीव्र
प्रेममय झाली
आणि
त्या शब्दाच्या अर्थाचीच
घटना घडली

पॅशनेट !

--- ००० ---

२

मनात असते

त्याचे तरंग

कसे पोचत राहतात

कळत नाही

तेच तरंग

प्रतिसादत येतात

तेव्हा होते

जगच तरंगमय

तीव्र पंखांचे युग्म

मग्न पक्षी होतात

योग्यायोग्यनष्ट

मनस्वी !

--- ००० ---

NOVEMBER 26

आपले मित्र सतीश तांबे यांच्या ' मॉलमध्ये मंगोल ' या कथासंग्रहाला राज्य शासनाचा पुरस्कार जाहीर झालेला आहे ! ( आजचा मटा पाहा ). त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन !

फ्रेंडस, एका विवाद्य मुद्यावर लिहितोय. माझ्या आयुष्यात असे काही प्रसंग आले की मी स्वतःच सुमारे साताठ वर्षे हस्तरेषाशास्त्राचा अभ्यास केला. जगातले अनेक महत्त्वाचे पामिस्ट वाचले. ( हे चोवीस तास त्यात गढून राहण्याचे शास्त्र आहे -- मी तसा काठावरूनच फिरलो, असे म्हणावे लागेल. ) माझ्या अभ्यासाच्या काळात मला हे निश्चितपणे दिसून आले की यात तथ्य आहे. स्वतःच्या आणि अनेकांच्या बाबतीत मी हा अनुभव घेतलेला आहे. रेषांची सरासरी पूर्ण लांबी ही सुमारे सत्तर वर्षांची धरल्याने दोनतीन वर्षे इकडेतिकडे होऊ शकतात पण रेषा दाखवतात, ते घडतेच ! आजारपण, अपघात,

घरापासून लांब जावे लागणे, चांगला काळ, यशाचा काळ, अशा बऱ्याच गोष्टी कळतात. पण कोणतीही चांगली चिन्हे पाहून अमुक व्यक्ती राष्ट्रपती होईल, असे सांगता येणार नाही, असे मला दिसते. हात पाहून नेमका रोग सांगणारी मेडिकल पामिस्ट्री, कार्यक्षेत्र निवडायला मदत करणारी कलदर्शक पामिस्ट्री -- असे अनेक प्रकार प्रगत झालेले आहेत. हे सगळे अंधश्रद्धा म्हणून फेटाळण्यासारखे नाही. जगात यावर खूप संशोधन झालेले आहे. आपल्याकडे जयपूरला नारायणदत्त श्रीमाली हे तज्ञ हात पाहून जन्मतारीख व जन्मवेळ सांगू शकत ! यावर नीट विचार होण्याची गरज आहे. नुसतेच फेटाळून पुरोगामी होण्यात अर्थ नाही.

NOVEMBER 25

एखादा माणूस, तो किती शूर आहे आणि बाकीचे कसे भित्रे आहेत, हे सारखे दाखवत / सांगत का फिरत असतो ? त्याला कुणाकडून स्वीकृती ( रेकग्निशन ) हवी असते ? इतर शूरांकडून की भित्र्यांकडून ?

सगळीच माणसे काही ना काही मिळवण्याच्या प्रयत्नात असतात. कुणाला काय, किती मिळाले हे सर्वांना माहीत असतेच, असे नाही. थोडेफार मिळाले असेल पण महत्त्वाकांक्षेइतके तर मिळालेले दिसत नाहीय -- असे मात्र असंख्य ठिकाणी असू शकते. अशा केसेसमध्ये, संपत्तीची हाव असलेल्याला प्रसिद्ध माणसाने हसणे वा प्रसिद्धीची हाव असलेल्याला एखाद्या श्रीमंताने हसणे, हे निरर्थक असते. सामान्यतः अनेक प्रकारची हाव असल्याने एखाद्या क्षेत्रात यशस्वी झालेला माणूस त्याच क्षेत्रात फारसे यश न मिळालेल्याला कमी लेखतो आणि अनेकदा ते व्यक्तही करतो ! तसे करण्यात फुशारकी मानतो ! हे एकूणच माणसातल्या सार्वत्रिक भिकारडेपणाचे लक्षण आहे !

NOVEMBER 24

वाघांची जोपासना समजा पर्यावरण रक्षणात येते -- त्याचप्रमाणे भटक्या कुत्र्यांची जोपासना कशात येते ? त्यांच्या २०-२० सभासदांच्या टोळ्या अनेक रस्त्यांवर फिरत असतात. रात्रीच्या वेळी दुचाक्यांचा पाठलाग करून अपघात घडवतात आणि मुख्य म्हणजे रेबीजसारख्या घातक रोगाला अनेक बळी पाडतात. दयातत्त्व हवेच पण तेच तत्त्व नागरिकांच्या बाबतीतही लागू असायला हवे. हवे तर लोक ' भटकी कुत्री संगोपन कर ' देतील पण हा प्रश्न टोटली निकालात काढला गेला पाहिजे. यात काय असे मोठे प्रॉब्लेम्स आहेत की ज्यांमुळे हा प्रश्न मिटवणे अशक्य बनावे ? लोकांच्या जिवांवर उदार असणारे हे धोरण एकीकडे आणि लोकांची काळजी घेण्यासाठी हेल्मेट-सक्ती एकीकडे -- या सगळ्यातले काय असेल गूढ ?

खरे तरुण, फक्त वयाने तरुण, वृद्ध, आणि कुणीही -- एक सांगा -- प्रेमकविता कोणत्या वयात लिहिणे योग्य आहे ? मुळात प्रेम अमुक वयातच शक्य असते का ? प्रेमात वयाचे कोणते नियम अबाधित असतात ? आपले फ्रेंडस या बाबतीत फारच घट्ट जुनाट मतांचे असल्याचे दिसून येते ! यात मानवी मन नामक एक प्रकार असतो की नसतो ? त्याचे नियम कोणते ?

घरातल्या घरातसुद्धा आत्महत्येच्या, निघून जाण्याच्या धमक्या देणाऱ्या व्यक्ती दिसून येतात -- इतर व्यक्ती घाबरून जुळवून घेतात ! एक तर, त्या माथेफिरू व्यक्तीचे नाते महत्त्वाचे वाटणे आणि बदनामीची भीती -- ही कारणे असतात ! इतर व्यक्तींनी घाबरणे सोडूनच द्यावे का ?

कावळा काळा पडला होता
अपराधी भाव आणि भय यांनी --
तो मनात मूक निर्ढावत राही –
मधेच त्याला शाळेचे दिवस आठवत
नंतरचे गरिबीतून वर येण्याचेही –
त्या काळात त्याचा आवाज ठीक होता
नॉर्मल म्हणून तो दुर्लक्षिला जाई –
जरा स्थिरता आल्यावर कधीतरी
दबवलेले फोड तरारून आले -- फुटले
आवाज फाटला, रंग काळा झाला
आतल्या आत –
हे फारच थोड्यांना जाणवलेले असले
तरी तो स्वतः नीट जाणून होता –
हून हून काय होईल – कावळा म्हणून
मरावे लागेल ! – असे तो मनात म्हणे --
या व्यक्तिमत्वातून सुटका तर शक्यच नाही --
सापडल्यास व्हायचे ते होणारच –
त्या धक्क्याची शिक्षा निर्दोष भलत्यांनाच
होणार -- याचेच आता भय होते ... टिकाऊ ...
--- ००० ---

“But your solitude will be a support and a home for you, even in the midst of very unfamiliar circumstances, and from it you will find all your paths.”
— Rainer Maria Rilke, Letters to a Young Poet

NOVEMBER 23

स्वतःच्या घराण्याचे नावबीव होण्यासाठी उगीच धडपडू नकोस. काही मोठ्या राजकीय पुढाऱ्यांची घराणी सोडता इथे कुठल्याच घराण्याचे कुणाला काही पडलेले नाहीय. स्वतःच्या कुवतीने, मस्त जग -- त्यातून झालेच नाव, तर होऊ दे !

स्वतःच्या जगण्यातून आलेली कविता कदाचित इतरांनाही मौल्यवान ठरू शकते.
तशी नसलेली ' दुसऱ्याची ' आणि ' केलेली ' कविता कधीच मौल्यवान ठरत नाही.

NOVEMBER 22

‘ वाहन दुरुस्ती पथका ‘ तले चारजण
किंग असल्यासारखे
जात असतात त्यांच्या सुसज्ज वाहनातून --
त्यांना माहीत असते
ते एक संकट निवारणार आहेत – अनेकांना
सुटकेचा निःश्वास देणार आहेत –
पगार इतरांपेक्षा तुलनेने कमी असला तरीही –
तसेच एका टँकरच्या केबिनला लागते आग --
परिणामतः वाहतूक थांबल्याने
हायवेवर हजारो गाड्या अडकतात –
प्रत्येक माणसाचे वेगवेगळे आयुष्य रखडते
काही लाख ठिकाणी त्याचे परिणाम होतात –
अग्निशामक दल आणि क्रेन्स दल
तसेच किंग असतात – पगार पुरेसा असो नसो –

त्यांना अभिमान असतो – त्यांच्या कामाचा --
त्यांचे बॉस त्यांचा खास उल्लेख करतात याचा !
ते घरीही आपापल्या बायकांना त्यांच्या कामाची
उदात्तता सांगतात – त्याही फुलतात –
ट्रॅफिक जॅम कसा सोडवला ते
ट्रॅफिक पोलीस सांगतात आपापल्या पत्नींना –
त्याही खुश होतात –
झालेल्या उशिरावर मार्ग कसे काढले ते
प्रवासी सांगतात आपापल्या पत्नींना –
त्याही फुलतात –
एखाद्याची वाट पाहणे अशक्य होऊन
कुणी प्राण सोडते किंवा आपल्या मुलाच्या
वाढदिवसाला तो जागा असताना पोचणे
जमले नाही – तरीही सर्व संबंधित लोक
वडिलांच्या भावनांचा आदर करतात –
संकटांमुळे वाईट खूप घडत असले
तरीही चांगलेही घडत असतेच –
ते कसे नाकारणार ?
हेटाळता वा टाळता येणारे नसतेच हे –
उलट स्वीकारणेच बरे हे आनंदाने --

घटनांच्या आयुष्यात
मश्गूल राहायचे
याला पर्यायच दिसत नसल्याने --
--- ००० ---

मनाची एकात्मता हेच ध्यान -- हा एकच शक्य धर्म --
सर्व माणसांसाठी --
इतके धर्म हवेयत कशाला ?

NOVEMBER 20

चांगले-वाईट, सदगुण-दुर्गुण यांबद्दल प्रत्येक समाजाच्या काही कल्पना असतात. पूर्ण सदगुणी अशी व्यक्ती कुठेच नसते. प्रत्येक व्यक्ती ही त्या भल्याबुऱ्याच्या कल्पनांचे मिश्रण असते. तरीही, चांगले म्हणजे काय, हे आपल्यालाच समजलेले आहे, असे प्रत्येक व्यक्ती समजते. स्वतःप्रमाणे नसलेल्यांना वाईटही म्हणते.यात, प्रसंगी, एकमेकांच्या व्यक्तिमत्वांची मोडतोडही होते. तरीही, सामान्यतः, हिंसा वाईट, हे मात्र बहुतेकांना पटते ! शांतता चांगली, हे निर्विवाद असते !

मित्रवर्य सतीश तांबे यांच्यासाठी --

अलिकडे मी फेसबुकवर करत असलेले ‘ कविता ‘ वा ‘ कवितासदृश ‘ लेखन तांब्यांना काही कारणांनी आवडत असल्याचे त्यांनी सांगितले आहे. त्या संदर्भात काही सांगतो. याची मुळे माझे विशिष्ट प्रकारे गेलेले आयुष्य, त्यातून घडत गेलेला स्वभाव, आवडी -- यांत तर आहेतच, शिवाय त्यात आणखी एका गोष्टीचे योगदान आहे. मला बीएला इंग्लिश स्पेशल घ्यायचे होते आणि मुंबई विद्यापीठातल्या, त्या काळातल्या इंग्लिशच्या ग्रेट प्राध्यापिका मिस होमाई जे. श्रॉफ या इस्माईल युसुफ कॉलेजमध्ये इंग्लिशच्या विभागप्रमुख होत्या, म्हणून मी तिथे प्रवेश घेतला होता. ( इंग्लिशवर माझे फारसे प्रभुत्व वगैरे येऊ शकले नाही – पण मी पास झालो, हे ठीक. ) ( त्याच कॉलेजात एके काळी बा. सी. मर्ढेकर शिकवायला होते. त्या कॉलेजच्या वार्षिकाला ‘The Palms ‘ हे नाव त्यांनीच दिलेले होते. ) त्या बाई ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या एमए होत्या. पूर्ण आयुष्य वाङमयाला वाहिलेले. धिप्पाडच होत्या. तपस्या दांडगी ! एखाद्या गुंड मुलाच्याही पाठीत गुद्दा घालायची हिंमत ! बीएला आम्ही तीनच विद्यार्थी एका टेबलाभोवती बसून त्यांच्याकडून शिकत असू. या गोष्टीमुळे कॉलेजात आमच्याबद्दल खूप आदर असे. इतर प्राध्यापकही त्या बाईंना घाबरत ! तर अशा त्या महान बाईकडून मी शेक्सपियरचे ‘ मॅक्बेथ ‘ आणि चॉसरच्या ‘ कँटरबरी टेल्स ‘ शिकलो, हे माझे महद्भाग्य ! चॉसर म्हणजे, आपल्याकडे ज्ञानेश्वरांचे मराठी कसे समजून घेत जावे लागते, तसा प्रकार ! तर तो चॉसर – दगड फोडून शिकावा लागला पण महाग्रेट ! त्याची भाषा म्युझिकल वगैरे होती पण निवेदन सरळ साधे होते. तो मुख्यतः सामाजिक टीका, उपरोध, भ्रष्टाचार उघडा पाडणे – हे करत होता. पण पद्धत फार भारी ! इब्लीसच ! तो एखादे वाक्य म्हणे पण समजणारा त्याचा अर्थ समजून जाई. उदाहरणार्थ एखाद्या धार्मिक क्षेत्रातल्या व्यक्तीने कपाळ उघडे टाकणे समजा निषिद्ध होते तर तो फक्त जाता जाता म्हणे – त्या व्यक्तीचे कपाळ खूप सुंदर होते ! असा भरपूर चावटपणा ! आता त्यातले ते सगळे माझ्या लक्षात नाहीय, पण नक्कीच त्याचा माझ्यावर एक खोल संस्कार आहे. मी कविता त्याच्यासारख्या कारणांसाठी लिहीत नाही, पण त्याची मला आवडलेली काही वैशिष्ट्ये माझ्या मांडणीच्या पद्धतीत काही प्रमाणात येत असणार. आता ती इमारतवाली कविताच बघा – लोकांची माणुसकी कशावर अवलंबून तर नियमबाह्य बांधकाम नियमीत होण्यावर ! त्यात कुणाला काही वाटत नाहीय – असे होणे अंगवळणीही पडलेले आहे ! या प्रकारे, वर सहज, साध्या दिसणाऱ्या वाक्यांचे आणखीही अर्थ आहेत. ते सगळे मीच सांगत बसणे योग्य नाही. मी, मुख्यतः, गृहीत

धरलेल्या गोष्टींतली ऍब्सर्डिटी व्यक्त करणे आणि शेवटी, जगण्यातले मूलभूत प्रश्न सूचित करणे, यांसाठी लिहितो. यात इतर अनेक संस्कारांबरोबरव, अलेक्झांडर पोप, मेटॅफिझिकल कविता आणि मुख्य म्हणजे माननीय बाप चॉसर यांचे संस्कार असणार, असे मला वाटते ! अर्थात अशा सगळ्या गोष्टींतून आपले आपल्यालाही काही सापडत जाते, हेही खरेच आहे !

NOVEMBER 19

हे झाल्यावर ते करू आणि
ते झाल्यावर मग शेवटची स्टेप घेऊ
तोवर यांना इथले आवरून घेऊ दे आणि
त्यांना तिकडच्या कामांना पाठवू –
कालचे सगळे अर्धवट झाले --
सॉरी, आता नाही असे होऊ देणार –
तीन वर्षांत हे पूर्ण करून
मग पुढचे पाहता येईल --
तसे म्हटले तर ही नुसती सुरुवात आहे
एका अत्युच्च शिखरावर
पोचता यायला हवे –
असंख्य अडथळ्यांतून पुढे
प्रगती करत गेलेले
थोडे का आहेत ?
गेली काही वर्षे नाही जमले
न जमो – हार मानायची नाही –
आज मात्र थकवा आलाय जरा
एक दोन पेग जरा जास्तच लागतील
रात्री – एकत्र बसल्यावर विसरायलाच होते
तरीही पाहणाऱ्याच्या लक्षात असते
तिथून इथे पोचलेला तो हाच !
कष्टाने आदर मिळतोच ! जरी थकवाही !
--- ००० ---

कायदा क्षेत्रातील एका माहितीची गरज आहे --

Export आणि Sea-shipping या शेत्रांतील कायद्यांची माहिती असलेला व त्या संबंधांतल्या केसेस हाताळणारा वकील हवा आहे. पुणे वा मुंबई इथे असणारे माहितीतले कुणी असे वकील असल्यास त्यांच्या कॉंटॅक्ट तपशीलांसह माझ्या मेसेजबॉक्समध्ये कळवावे, ही विनंती.

NOVEMBER 18

जो एक हाय कमांड नेता असतो त्याच्या जवळ नेहमीच त्याचे एकदोन अति-विश्वासातले पुढारी असतात. हाय कमांडबरोबर त्यांतला कुणीही बोलताना पाहा -- हाय कमांड तिसरीकडेच बघत असतो हवेत आणि छोटा पुढारी हाय कमांडकडेच बघत बोलत असतो -- दोघे मिळून काहीतरी मोठे कारस्थान रचताहेत, असे दिसते ! की ते बिचारे साधे काही बोलत असतील आणि ' आपण नेहमी फसवले जातो ', असे वाटणाऱ्या जनतेला नुसते तसे वाटत असेल ?

त्या नव्या इमारतीमुळे आपला व्ह्यू गेला
असे या इमारतीतल्या रहिवाश्यांना वाटे
-- नव्या इमारतीतले खुश असत
त्यांचा व्ह्यू अबाधित असल्याने –
त्यांच्या एकमेकांशी ओळखीही झाल्या होत्या
ते बोलत, हास्यविनोद करत, प्रसंगी एकमेकांना
मदतही करत – या रहिवाश्यांचा त्या रहिवाश्यांवर
राग थोडाच होता ? मुद्दाम थोडेच कुणी काही
केले होते ? ते नसते आले तिथे तरी दुसरे कुणी
आलेच असते ना ! जणू फक्त
या इमारतीचा त्या इमारतीवरच
होता राग – पण मने इथल्या
रहिवाश्यांचीच तर वापरली जात होती
त्या नाराजीसाठी आणि खुश राहणारीही
तिथल्यांची मनेच तर होती !
इथे फ्लॅट घेताना खरे तर हा व्ह्यू
पाहूनच आपण खुश झालो होतो

चार पैसे जास्त गेले तरी चालतील – ती या
व्ह्यूची किंमत समजू – असे आपण
म्हणालो होतो, ते इथल्यांना आठवे
म्हणजे नकळत तिथल्यांनी आपले
आर्थिक नुकसानही केलेले आहे, हे जाणवे !
निसर्ग काय करणार ? तो त्या
नव्या इमारतीला जास्त प्रकाश आणि हवा
देत राही – या गोष्टींच्या किंमतीचा तर
हिशोबच नव्हता केला आपण
असे इथल्यांना वाटे ...
अलिकडे मात्र
नव्या इमारतीचे काही मजले नियमबाह्य
असल्याची कुणकुण येत होती खरी ...
नवे भीतीत आणि इथले आशेत असत – तरीही
जाऊ दे, व्हावे ते काम नियमित –
अगदी पाडण्यापर्यंत नको यायला –
असेही इथल्यांच्या मनांत येत असे ...
--- ००० ---

NOVEMBER 17

असा आला एक क्षण जेव्हा दिसले
खूप क्षीण झाली आपली बाजू
आपण नक्कीच वाईट ठरलो
तरीही – तसे नसून उलट
आपण हवेच आहोत तिथे
असेही दिसू लागले वा
वाटू लागले – असेही आले
काही क्षण – पण आता नकोच ते

असे म्हणून आपण निघून गेलो
सौम्यपणे सांगून की आपल्या मनात
काहीच किल्मिष नाहीय – पुन्हा कधीही
हे काहीच न घडल्यासारखे
होऊ शकते – यानंतर मात्र
अवघड झाले – निघून तर गेलो
आपण असे आणि समोरच्या बाजूला
यू-टर्न अवघड झाला ! करावे काय ?
इतक्या थोडक्या काळात जर
इतके उलटेपालटे घडते
आपले अंदाज चुकवणारे
तर – सगळे आपणच घडवायचेय
हे तरी कितपत खरे असेल ?
दोन्ही बाजूंना घडतील काही
मानसिक हालचाली – आपापल्या
अंदाजांनी – आणि न जाणो
पुन्हा येईल जुळून सगळे -- जणू हे
काहीच न घडल्यासारखे – पण नक्कीच
अधिकच सलगीचे – म्हणजे हा एक
सुप्त वरच होता जणू – असे होईल ...
--- ००० ---

समजा, मी स्वतःला बुद्धिमान, नैतिक, धार्मिक, वगैरे काहीच म्हणू शकत नसेन तर माझी या जगात जगण्याची लायकी कितपत आहे ? आणि असे असंख्य असतील तर ? सगळ्यांना फाशी ?

शौर्य हा एक सदगुण आहे, हे आपल्यावर इतके बिंबवण्यात आलेले आहे की ते एकमुखाने सर्वांना मान्यच आहे ! समजा, सगळ्याच माणसांनी हा सदगुण अंगी बाणवला, तर सगळ्यांचे भले होईल ?

तू साम्यवादी असलास तर राजकीय शक्तीने तू कमकुवतांना लुटणार, भांडवलशाहीवादी असलास तर पैशाने आणि धर्मवादी असलास तर धर्माने -- मग चांगले जगणे म्हणजे काय ?

स्वतःची मते ५०-५० वर्षे चाटत बसायचा माणसाला कंटाळा का येत नसावा ?

आपण खूप ठाम मते मांडतो म्हणजे आपण शहाणे आहोत ? की आपल्यातली जगण्यातल्या बौद्धिक ' अनिश्चिततेची ' जाणच संपलेली असल्याने आपण गधडे आहोत ?

आपला एक स्वभाव असतो -- आपल्या काही मान्यता असतात ( वागणे तसे असते का, हा भाग वेगळा ) -- या, आपली समज अंतिम समजण्याच्या, पार्श्वभूमीवर -- आपण अनेकांवर टीका करतो, अनेकांना वाईट म्हणतो, अनेकांना दुष्टही म्हणतो -- हे जर प्रत्येकाचेच चालत असेल तर एकूणच या असल्या प्रतिक्रियांना / बोलण्याला कितपत मोल आहे, असे समजावे ? की नुसते आपापल्या मान्यतांप्रमाणे याला / त्याला पाठिंबा देत बसावे ? -- आपल्या मान्यता जोरात हॅमर करत राहण्यात आपल्याला सुरक्षितता वाटत असावी, असे दिसते !

NOVEMBER 15

आनंदाच्या वेळीही काही ना काही
पोळत असण्याच्या जगातून दोन्ही पाय
उचलून तरंगत जगता येते – ‘ सतत ‘
या शब्दाला अर्थ न राहता – पण येते –
तेव्हा पाया नसतो – आपली पूर्ण रचना
आपोआप नीट जुळत नॉर्मल झालेली असते
काही घडण्याची भीती वा काळजी वा आशा
काही घडल्याचा पश्चात्ताप वा समाधान
हे काहीच नसते – हलके असते सर्व
उत्फुल्ल असते – ते कुणाला हे नसते
सांगता येणारे – आपण असण्याचा रोग
समजल्यामुळे आता आपले जगणे
छान निरर्थक झालेले असते –

काहीच नसण्याचा माहोल
रोमांचित करतो सर्व कण
आकाश वाहते चौफेर
-- मनाचा अर्थच बदलतो --
आता ते नियंत्रण केंद्र नाही राहात --
-- ते रोगकेंद्र नष्ट झालेले हे क्षण
सैल ... शांत ...
जगाला आकाशात विलीन करून
स्वस्थ झालेले ...
यावरही नियंत्रण आणण्याचे जुने
मनाचे तेच प्रयत्न
पुन्हा सुरू होईपर्यंत ...

-- दोन्ही वेगवेगळे
अर्थहीन --
--- ००० ---

यापुढच्या काळात मानसोपचारांची प्रचंड गरज लागणार आहे -- त्यातले तज्ञ तयार करण्याचे नियोजन कुणाच्याही भविष्यवेधी जाहीरनाम्यात नाहीय !

NOVEMBER 14

" यांची एक खासियत अशी आहे की यांच्या जागे असण्याच्या काळातही हे मधून मधून फोनवर नसतात ! "

स्वामी रामदास हा एक महाग्रेट मराठी माणूस होऊन गेला यात शंकाच नाही – कुणाचेही काहीही मतभेद असोत ! ' दासबोध ' आणि ' आत्माराम ' लिहिणे हे लुंग्यासुंग्याचे कामच नाही. पण, याचा अर्थ, त्यांच्या एखाद्या बोधाबाबत कुणाला वेगळे काही सुचूच नये, असे नाही. तर, ' मरावे परी कीर्तिरूपे उरावे ' याबद्दल जरा वेगळे विचार देतोय. एक तर हा संदेश पूर्ण मानवजातीला आहे, पण ते सोडा, सर्व मराठी लोकांना तरी आहेच. आज लोकसंख्या आहे नऊ कोटी ! आधीचे बरेच लोक कीर्तिरूपे उरलेत ते वेगळेच ! तर एवढे लोक जर कीर्तिरूपे उरायला लागले तर या सगळ्यांची थडगी आणि समाध्या

यांनीच पुढे येणाऱ्या पिढ्यांची मने भरून जातील ! त्यांनाही कीर्तिरूपे उरायला, त्यांच्या कामासाठी त्यांना कितपत शक्ती उरेल ? एक मोठे दिग्दर्शक म्हणाले की नाटक इतके चांगले हवे की ते संपल्यावर आपल्या डोक्यांतून प्रेक्षकांनी ते बरोबर नेले पाहिजे ! माझे उलट आहे म्हणणे – नाटक जर जगणे समजून घेण्याची प्रक्रिया व्यक्त करत असेल तर ती प्रक्रिया प्रेक्षकांची स्वतःचीच होते – विषय संपला ! नाटक हे एक निमित्त होते – ते बरोबर न्यायची आवश्यकता नाही ! याला कपाट म्हणतात असा भाषेत शब्द लागतो, त्याप्रमाणे हे अमुक काम तमुकने केले, इतपत ठीक आहे. पण, भावनिकपणे काही लक्षात ठेवायची गरज नाही. मी आज जो असतो तो हजारोंच्या कामांमुळे असतो – त्या सगळ्यांची नावे कृतज्ञतापूर्वक मी लक्षात ठेवायची काय गरज आहे ? शक्य तरी आहे का ? स्त्रियांसाठी काम करून गेलेल्या स्त्री-पुरुषांची नावे, त्यांची चरित्रे समजा आजच्या स्त्रियांना, मुलींना माहीत नसतील तरी काय बिघडते ? त्यांच्यामुळे तुम्ही इथे आहात, तरी तुम्हाला त्यांची माहिती नाही – म्हणजेच तुम्ही कृतघ्न आहात – असे म्हणणे मला योग्य वाटत नाही. अमुक औषध, तमुक ऑपरेशनची पद्धत, शिक्षण, घर बांधण्याची पद्धत, वीज, संगणक – अशा हजारो गोष्टींमुळे मी आहे – त्या सगळ्याचे कर्ते लक्षात ठेवणे मला शक्य नाही. कीर्तिरूपे उरण्याचे झंझट कुणी डोक्यात ठेवूच नये – आपापले काम उत्तम करत राहावे – बास ! नीट पाहिले तर भूतकाळातली, आजची आणि भविष्यातलीही सगळी माणसे एकत्रच जगतात ! सगळ्यांचे एकमेकांवर परिणाम होतात. त्यामुळे, सारखे स्वतःला कमी समजत दुसऱ्यांची कीर्ती लक्षात ठेवत बसायची मुळीच गरज नाही. उलट, निनावी जगणेच सर्जक असेल, असे दिसते !

सगळ्यांच्या स्वार्थांच्या प्रभावांतून परिस्थितीचा रेटा तयार होतो -- तोच सगळ्यांना एका मार्गाने ढकलत नेतो -- सगळ्यांनाच वाटते, आपण हुशार आहोत -- जनतेला वाटते, सगळेच एकजात हलकट आहेत ! मतदान करणारी जनता शहाणी आहे, हे सगळेच मानतात -- पण ती परिपक्व नसते हो -- व्यापक हित तिला कळतेच असे नाही -- म्हणूनच आतून समझोते ! झालेले वा न झालेले ! सत्यबित्य असे काही नसते -- धूर्तपणा, पुढील यशाची खात्री आणि शिवाय विकास तर व्हावाच ना -- हे महत्त्वाचे ! धूर्तपणा, डावपेच, राजकारण म्हणजे तरी काय ? प्रत्येकजण आपापल्या अकलेप्रमाणे जे तुलनेने छोट्या प्रमाणावर करतो -- तेच मोठ्या प्रमाणावर करणे ! सारांश -- हलकट फक्त तेच नसतात --

बारीकसारीक चुका माफच करतात मित्र
माफ केल्याचेही विसरत – मला तर ते दुप्पट
महत्त्वाचे ठरते – मैत्री तुटणार तर नाही, ही माझी भीती
घालवून वर ते नुसते नॉर्मल राहतात – याने माझ्या मनातले
प्रेम वाढते – कशामुळे काय हे त्यांना न कळताही
आमची मैत्री अधिकच दृढ होते – त्यामुळे मित्र अधिकच
क्षमाशील होतात – वर, मला त्याचे ओझे वाटू नये

याची काळजीही घेतात –

अडचणी, त्रास सोसूनही

ते माझी काही कामे करतात – मी म्हणतो –

अशाच प्रकारे मी किती करेन तुमची कामे

असे मी स्वतःला विचारतो तेव्हा शरमतो !

-- यानेही मैत्री घट्ट होते – ते म्हणतात –

कामाच्या बदल्यात काम, असेच असायची काय गरज –

तू प्रामाणिकही किती आहेस ! तू बुद्धिमानही किती आहेस !

आताही माझ्यात फार काही फरक पडला आहे

असे नाही पण मला माझ्या चुकाही चुका

वाटूच नयेत, असे सगळे समजुतदारपण आहे --

आम्ही एकत्र असतो, एकमेकांची

दुःखे हलकी करतो, सुखे सेलिब्रेट करतो

जेवतो, खातो, खेळतो आणि शत्रूंना नमवतोहो

एकत्र – व्यसनेही एकत्रच करतो -- भेटतोच एकदा तरी

दिवसातून – भेटी न झाल्यास

आम्ही अस्वस्थ होतो --

-- मैत्रीने मैत्री वाढते – हे आहेच ! पण याचबरोबर --

हे अवलंबित्वाचे व्यसनही आहे – आपल्यात कमकुवतपणा

वाढवणारे आहे -- हेही जाणवून अलिकडे – आतूनच या मैत्रीशीच

समजुतदार शत्रुत्वच सुरू झाले आहे ! --

--- ००० ---

NOVEMBER 13

ऐहिक जगालाही मर्यादा नाही

एखाद्या छोट्या वस्तूचेही

पूर्ण वर्णन अशक्य !

मन मर्यादित म्हटले तरी

विचाराच्या आवाक्यात
मावत नाही !
विचार तरी सापडेल का
विचाराला ?

सगळेच असे हाताबाहेर असेल
तर ‘ पूर्णत्व ‘ म्हणजे काय ?
‘ अमर्याद ‘ असणे म्हणजे ?
--- ००० ---

NOVEMBER 12

स्वतःच्या वैशिष्ट्यांविरुद्ध तो
एका रोमँटिक स्त्रीच्या प्रेमात पडला
तेव्हा त्याला कळले की त्याची
पत्नी काहीही म्हणत असली तरी तो
दुराग्रही, हट्टाग्रही वा सारखे स्वतःचेच
चालवणारा नव्हता – स्वतःला बदलत
त्याला रोमँटिकपणाही आवडत होता –
किंबहुना त्याचे प्रेमाने ओतप्रोत असणे
हे रोमँटिक असणेच तर होते --
त्या प्रेमपरिप्लुत स्त्रीला तर तो
समानधर्माच वाटला तीव्र – तरीही
तीच एकदा त्याला म्हणाली –
“ रोमँटिक नको होऊस इतका !
मी तशी असले तरी !
सवय बरीच गेलीय माझी नवऱ्यामुळे ! “
--- ००० ---

NOVEMBER 11

फेसबुकच्या चांगल्या गोष्टींपैकी मला अत्यंत महत्त्वाची वाटणारी एक म्हणजे इथे आपल्याला जगातल्या आणि आपल्या अनेक मास्टर्सची उत्तमोत्तम, ग्रेट चित्रे सहज पाहायला मिळतात. काही उत्तम चित्रकार इथे आपले फ्रेंडसही आहेत ! यामुळे नक्कीच आपली कला जाणीव समृद्ध होत राहते ! याचा माझ्यावर एक परिणाम असा झाला आहे की ' माझी ' म्हणावीत अशी काही चित्रे मला स्वप्नांतून दिसू लागली आहेत ! एक तर मला या माध्यमाचे तंत्र मुळीच अवगत नाही, दुसरे म्हणजे शालेय जीवनात मी चित्रकलेत काठावर पास होणारा विद्यार्थी होतो, तिसरे म्हणजे माझे अक्षरही खराब म्हणावे असेच आहे ! करावे काय ? सगळ्याच गोष्टी आल्या पाहिजेत, असे थोडेच आहे -- हा विचार सध्या सुभाषित म्हणून घेतोय !

मुलींना वाचनालयांत प्रवेश दिला तर मुलांची उपस्थिती चौपट होईल पण त्यांच्या मनांची चलबिचल झाल्याने त्यांचे अभ्यासात लक्ष लागणार नाही -- असे एक वक्तव्य समोर आले आहे ! जगातल्या हजारो वाचनालयांत असे मुक्त प्रवेश असूनही तिथे मुलेमुली, स्त्री-पुरुष आपापले अभ्यास करत नाहीत ? जगात इतक्या स्त्रिया आहेत म्हणून पुरुषांचे कला, शास्त्र, व्यवसाय, नोकरी, इत्यादींतले काम थांबलेले आहे ? -- यावर आम्ही बोलत असताना एकजण म्हणाला की स्त्रियांच्या उपस्थितीने उलट उत्साह वाढेल -- आपले काम अधिक चांगले करून दाखवावे, असे पुरुषांना वाटेल ! -- या अशा मांडणीची तरी काय गरज आहे ?

काही छोट्या कविता ------

एखाद्या कावळ्याचा आवाज
पानांची सळसळ, झाडाची सावली
दूरवर ऊन ...
ही शांतता इथे आहे असेही नाही
नाही असेही नाही ...
मनाची एक अवस्था नुसती ...
--- ००० ---
कधी काळी काही घडले होते
कुणीच काही बोलले नव्हते
कावळ्याची कृती बेदखल

गेली होती

तरीही अजून त्याचा

आवाज नॉर्मल होत नव्हता ...

--- ००० ---

कृतीशिवाय मिळणे अशक्य होते

कृतीत धोका होताच

कृतीहीन जगणेही

कृतीच ठरणार होते ...

पुढचा क्षण

माहीत नसणे ...

--- ००० ---

एका निर्णयात किती

प्रभाव, गुंते असतात

ते पाहिलेत ना --

त्यातूनच जगणे --

ते उत्तर नव्हे --

एक पर्याय फक्त ...

--- ००० ---

NOVEMBER 10

अवकाश कलामंच, पुणे सादर करत आहे

' गोळ्या काढलेलं पिस्तूल '

५४ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा २०१४-१५

उद्या बुधवार दिनांक १२ नोव्हेंबर २०१४ रोजी

संध्याकाळी ०७ वाजता

भरत नाट्यमंदिर, पुणे इथे.

लेखक – चं. प्र. देशपांडे

दिग्दर्शक – सुनील चौधरी

नेपथ्य – कौस्तुभ कापरे, प्रकाश – ऋशिकेष सांब

नृत्य – रश्मी जोशी, स्लाईड – आदित्य खरे

रंगमंच व्यवस्था –नितीन बनकर, विशेष साहाय्य – नंदकुमार कान्हेरे, राजेंद्र लिमये

कलाकार – रणजित मोहिते, प्रणिता दामले, मनोज देशपांडे, चंद्रशेखर आफळे

मुक्ता चिटणीस, अश्विनी भांडारी, नितीन बनकर

--- ००० ---

अंधार खंडित असतो
हे तेव्हाच समजते जेव्हा
आतल्या आत टकरा होऊन
भळभळते काळे रक्त
अदृश्य ...
हाच नेईल तरून
हा विश्वास डळमळतो ...
जगताना त्याला
अजिबात धक्का लागू नये
असे तर होऊ शकत नाही ...
त्याचीच रूपे असतात सुहृद
मित्र, नातेवाईक अन शत्रूही ...
न दिसण्याची सवय अटळ
अंतिम बनलेली असते ...
तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक
मोठमोठी पुस्तके काखोटीत
घेऊन सत्य शिकवत राहतात ...
त्यांच्याबरोबर विद्यार्थीही

प्राशन करतात मादक अंधार ...

सर्वांचे चेहरे जखमा झालेले

कवट्या फुटलेल्या, हात तुटलेले

बोटे झिजलेली, पण अदृश्य ...

खंडाने पूर्ण अंधार टाकावा कसा

हाच प्रश्न ... भेडसावत राहतो ...

--- ००० ---

NOVEMBER 9

मधेच एक काही साधे --

अस्वस्थतेचा पाया असतो

समोर नसलेला क्षण

जो गिळंकृत करतो

समोरचा क्षण

भीती जगते कल्पनेवर

जी अडवते मार्ग

अस्तित्वाच्या असणाऱ्या

सत्याचा

सूडभावना नेते

जाळत भूतकाळात

करत शीतलता

आज दुरापास्त

सुखाची आठवण

पुनरावृत्त होत

करत राहते शक्तिनाश

प्रत्ययहीन

कोणतीही व्यक्ती

भेटते फक्त

प्रतिमेसह

गोठणाऱ्या

आहे का काही शक्य

जे असू शकेल

प्रत्यक्ष जगण्यात

या क्षणी प्रवाही ?

--- ००० ---

कोणतीही व्यक्ती, घटना वा एकूणच जगणे हे, विचाराने पाहिले तर, निर्दोष वा परिपूर्ण असू शकत नाही. तसेच कोणत्याही कलाकृतीचे असते. तिच्यात काही ना काही दोष दिसू वा जाणवू शकतात. चमत्कार हा असतो की अशा सदोष वा अपुऱ्या साधनांतून एखादी कलाकृती आशय मात्र परिपूर्ण देऊ शकते ! असा चमत्कार असलेल्या कलाकृतीचे फक्त दोषच हायलाईट करत बसणे हे त्या कलाकृतीवर फार मोठा अन्याय करणारे असते.

NOVEMBER 8

प्रत्येक कलाक्षेत्रात नव्यांचा / हौशी लोकांचा / छंद जोपासणाऱ्यांचा उत्साहभंग करणारे, त्यांना नाउमेद करणारे, स्वतः वैफल्यग्रस्त असलेले लोक असणारच ! त्यांना ओलांडून जे आपले काम करत राहतील ते नक्कीच कलावंत ! त्यांचे मूल्य ठरायचे तेव्हा ठरो !

NOVEMBER 7

मनच झाले तंग

तसेच खुलेही

तुझ्याकडे पाहून

तुझे पंख
तू विस्तारलेस
माझ्या डोळ्यांवर

आता माझे लक्ष
तुझ्या लाल
चोचीकडे होते

तुझ्या विस्तीर्ण पापण्यांनी
माझ्या या आगळिकीला
तू फटकारलेस

की आव्हानलेस ? – तू
माझ्याकडे पाहणे
टाळत का होतीस ? ...

... असे काही ना काही
घडताना मी मधेच
पंख सैल सोडले --

-- त्याच क्षणी ताणहीन
तुझ्या दृष्टिक्षेपात
मी तूच झालो – पूर्ण ! ...
--- ००० ---

उद्या रविवार दि ०९ नोव्हेंबर दुपारी ०१ आणि संध्याकाळी ०५ वाजता
असे दोन प्रयोग -- भरत नाट्य मंदिर, पुणे इथे --

' प्रतिबिंब ', पुणे निर्मित, डॉ. वरदा जाधव प्रस्तुत --

सामसूम ( दोन अंकी नाटक ) -- एक सामाजिक काल्पनिका

ले -- चं प्र देशपांडे, दिग्द --दिलीप वेंगुर्लेकर

सदर दोन्ही प्रयोग भरतच्या सभासदांसाठी असल्याने
उपलब्ध तिकिटे कमी असतील.
ति वि -- स ९ ते ११ व सं ५ ते ८ -- भरतवर.

Champra Deshpande shared Pravin Kamble Mayuri Theaters's photo.
जोरदार होऊ द्या प्रयोग !

समजा तुम्ही सुखाची खूप कारणे जमा करू शकताय ! वेडे व्हाल ! मापात राहा !

उपरोधिक, कुत्सित, लागट, जखमी करणारे
बोलणाऱ्याला ' चांगले जगणे ' म्हणजे काय
हे समजत असते की त्याला त्याचे सुख हवे असते ?
एकूण गटागटांचे जगणे पाहता सगळीच माणसे
उपरोधविषयच दिसतात !
' उपरोधविषय नसलेला ' माणूस जर
असूच शकत नसेल तर
उपरोध कितपत अर्थपूर्ण ?

“ झाडे, फुले, पाने, पक्षी वगळा
नदी, समुद्र, आकाश वगळा
चांदण्या, चंद्र-सूर्य, नक्षत्रे वगळा --
आता घ्या संगणक, मोबाईल, व्हाटस-अप

मॉल, मल्टिप्लेक्स, रेलचेल हॉटेल्स
कपडे, पर्फ्यूम्स, कॉर्पोरेशन्स ...
तेच तेच किती लिहिणार ?
आजचे काही नवे लिहा !
लिव्ह-इन, ब्रेक-अप वर लिहा ! “

“ मानवी भावभावना
क्रियाप्रतिक्रिया, सुखदुःखे
हाव, छळ, डावपेच
वाट लावणे, नष्ट करणे
खिन्न राहणे, व्यसनी होणे
-- हे सगळे चालेल ना ?
हेही जुनेच तर आहे ! “

“ पण तेच सगळे नवीन
आजच्या माहोलात लिहा
म्हणजे ते नवे होईल !
करणार काय दुसरे ? “

“ आजचा माहोल खूप फास्ट
बदलतोय – सापडणारच नाही तो --
कोणताही माहोल नाहीच सापडू शकत
स्थिर राहू पाहणाऱ्या मनाला !
-- या प्रश्नाचे काय करावे ? --
असे का होते ? यावर लिहितो ! “

“ हां – हे चालेल ! हे तर
नवेच नवे होईल ! “
--- ००० ---

NOVEMBER 6

" संवेदनशील मनाचा काय उपयोग आहे ?
कट्टर मनानेच टक्कर देता येते ! "

राज्य नाट्यस्पर्धा २०१४ -- दिनांक १२-११-१४ रोजी संध्या. ०७ वाजता
भरत नाट्य मंदिर, पुणे इथे

" गोळ्या काढलेलं पिस्तूल '

ले -- चं प्र देशपांडे, दिग्द -- सुनील चौधरी
निर्मिती -- अवकाश कलामंच, पुणे

जरूर पाहा.

हेच नाटक जळगाव केंद्रात दिनांक २३-११-१४ रोजी
भुसावळच्या ग्रुपची निर्मिती असलेले.

पान न पान उधाणलेले
असते तेव्हा
खोडावरची कळशी
हिंदकळत असते
चालीबरोबर

मागे वळून पाहणे
नसले तरी समजतात
मागे मागे उडत येणारे
नजरांचे पक्षी
फडफडते

मन असते शुद्ध जणू
आपल्याच नादात
इतर मनांची जणू
शुद्धच नसलेले
हरेक पाऊल

जणू कुणाचेच कुणाकडे
लक्षच नाहीय
असे विश्व
साधे असून
तीव्रही

एका घटनेचे
वैश्विक असणे --
मने गच्च
पण जणू पूर्ण
शुद्ध असणे ...
--- ००० ---

माझे फायरफॉक्सचे जुने व्हर्शन होते -- ते चालत नव्हते -- म्हणून ते अपडेट करून घेतले तर आता ते मराठी घेत नाहीय -- हे टाईपिंग मी गुगल क्रोममधून इथे येऊन केले आहे. काय मार्ग यावर ?

NOVEMBER 5

ना. मा. निराळे ( कथा )
लेखक – सतीश तांबे.

ही एक अद्वितीय महत्त्वाची, बहुआयामी कथा आहे. साधी, कुणालाही कळेल अशी ‘ कथा ‘ असलेली ही एक कथा आहे. तरीही ही नुसतीच एक कथा राहात नाही. वाचक साधा, सहज म्हणून वाचणारा असो की एखादा समीक्षक असो, मानवी जगण्याचे अनपेक्षित दर्शन तर त्याला घडेलच पण तो थोडा अधिक संवेदनशील असेल आणि मानवी जगण्याबाबत काही स्वतःचे चिंतन मनात आले तरी चालेल, असा असेल तर निश्चितपणे जगण्यातल्या अनेक प्रश्नांचे भान वाढवेल, अशी ही कथा आहे.

अलिकडेच इथे फेसबुकवर एक पोस्ट फिरत होती जीत ‘ माणसाला खरोखर विचारस्वातंत्र्य असते का ‘ या विषयावरच्या शास्त्रीय संशोधनाची माहिती होती. या कथेतही अनुषंगाने हा विषय आहे. जगण्याच्या ओघात माणसे आस्तिक वा नास्तिक असे साचे स्वीकारत जातात पण जगणे सगळ्यांचे साधारणतः तसेच सुखदुःखयुक्त असते – हे भान ही कथा देते. दुसरा एक खूप महत्वाचा प्रश्न या कथेमुळे पुन्हा समोर येतो – तो म्हणजे – हे सगळे नियतिबद्ध आहे का – हा. कुण्या एका गावात कधी काळी एक रोगाची साथ पसरणे, एकाने कुठेतरी कर्जाचा दुरुपयोग केलेला असल्याने त्याच्यावर आलेल्या संकटातून कुणी त्याला सोडवलेले असणे आणि श्री. आस्तिक यांच्या जावयाने आत्महत्या करणे – या अर्थाअर्थी काहीही संबंध नसलेल्या गोष्टी / घटना एकमेकींशी अभेद्यपणे एकमेकींत गुंतलेल्या -- एकत्र असल्याचे इथे जाणवते ! जरा विचार करता ही कथा असे सुचवते की हे विश्व पूर्णपणे एकत्र जगते आहे – सगळ्याच गोष्टी एकमेकींवर अवलंबून आणि एकमेकींमुळे आहेत – स्वतंत्र / अलग असे काहीच नाही. हे भान आल्यास नियतीचा मुद्दा निकालातच निघतो ! एकरेषीय घटनाक्रम ही जगण्याची कल्पनाच खोटी पडते ! अमुक अमुक माणसे अशी अशी का वागतात याची तात्कालिक कारणेही ही कथा निवेदन करत जाते आणि त्याच वेळी हे सगळे त्या व्यापक पटातले, स्वतंत्र/अलग अस्तित्व नसलेले असे आहे, याचे भानही ही कथा देत जाते.

एखाद्या विचारसरणीचे महत्त्व मांडणे, एखादी भूमिका अभिव्यक्त करणे, अमुक अशा प्रकारचे परिवर्तन अपेक्षिणे – असले काहीही ही कथा करत नाही. तिचा आवाका त्याहून खूपच मोठा आहे. जगण्याच्या समग्रतेचे भान देणे – हे कलेचे अत्यंत मौल्यवान काम ही कथा करते.

कोणताही तात्विक/ आध्यात्मिक आव न आणता साधेपणाने केलेल्या निवेदनातून ही कथा अशी अत्युच्च उंची गाठते. या कथेच्या अनेक भागांवर विश्लेषणात्मक लिहायचे तर खूपच लिहावे लागेल. कुणी समीक्षक अर्थातच माझ्यापेक्षा खूपच बारकाईने आणि संपन्नतेने ते करू शकेल. मला या कथेने, एका अत्युच्च दर्जाच्या कलाकृतीच्या संपर्कात आल्याचे समाधान लाभले, हे मी सांगू शकतो. सतीश तांब्यांची आणि माझी प्रत्यक्ष भेट अजून झालेली नसली तरी ते माझे एक उत्तम मित्र आहेत. परंतु, हा प्रतिसाद एका मित्राने दुसऱ्या मित्राला दिलेला नसून – कलेच्या माध्यमातून जगणे समजून घेण्याची साधना करणाऱ्या एका साधकाने दुसऱ्या साधकाला दिलेला प्रतिसाद आहे. आपल्या सर्वांच्या या मित्राची ही ग्रेट कामगिरी सर्वांनी जरूर वाचावी, असे मी म्हणेन !

NOVEMBER 4

अमुक वेळ आली की गांड फाटणे, तमुक वेळी आई घालणे, षंढ असणे, वगैरे पद्धतीने बोलून आपण विद्रोही असल्याचे शाबीत करता येते, ही कल्पना अजून रूढ आहे ? अजूनही या भाषेला घाबरून लोक सलाम ठोकतील ? नंगे को खुदा भी डरता है -- याचा, विचारात, कलाक्षेत्रात, जगणे समजून घेण्यात कितपत उपयोग आहे ? शिव्यांचा वापर करून, घाण बोलून, आपल्या नादी कुणी लागले तर आपण असेच गलिच्छ बोलून त्याची वाट लावू, असे दाखवून आपल्या आकलनाचे महत्त्व वाढू शकते ? नुसता तिरसटपणा, चिडखोरपणा, आपल्या मतांव्यतिरिक्त बाकी सगळे हीन मानणे -- याला आता फार कुणी घाबरत असेल, असे वाटत नाही ! मग आता आकलन वगळून स्वतःचे महत्त्व वाढवण्यासाठी दुसरे काय करता येईल ?

माहिती आणि अनुभववैचित्र्य या गोष्टी माध्यमांमुळे रोज ढिगाने समोर येत आहेत -- साहित्यात आता यांचे कितपत अप्रूप आहे ? ते कमी झाले असेल किंवा उरले नसेल तर आता काय महत्त्वाचे ठरेल ?

NOVEMBER 3

मी एक
एक साधी नोकरी करत आलेला
एक साधा माणूस होतो
काहीच नसलेला – नगण्य !
जगण्याच्या ओघात
मी एका स्त्रीवर प्रेम केले –
त्या स्त्रीला मी
आकाशाइतका उत्तुंग
अनुभवाला आलो --
तो मीच होतो ?
की तिचे तिने वेगळेच
काही घडवले होते ?
माझ्या निमित्ताने तिने
तिच्या अमर्याद कुवतीचा

प्रियकर निर्माण केला होता !
मला ती तशी देत होती
वागणूक ! तिचा भ्रम
मोडूच नये, असेच मी ठरवले
प्रेमामुळे ! पण आता
तिला खरे वाटणारे
ते असणे आले !
यावर एक लक्षात आले --
प्रेमामुळे मी तिच्याशी
एकात्मच तर झालो होतो !
त्यामुळे ‘ तिचा मी ‘ मला
खरा मानणे सहज शक्य झाले !
मला तिच्या मनात
जी एवढा अमर्याद अवकाश
देत होती – तिची माझ्याही
मनाने मनात कल्पना केली --
तीही तशीच उत्कट उत्तुंग झाली !
तिने जसे मला तसेच मी तिला
ते सांगितले ! तिला ते खरे
वाटले असेल ना ? तीही स्वतःला
नगण्यच तर समजत नसेल ?
-- तिने ते सहज
समजून घेतलेले दिसले !
माझ्यासाठी निर्माण झालेल्या
अवकाशासह होतीच ती
तितकी अमर्याद – ती म्हणाली !
म्हणजे प्रेमामुळे दोघेही
अनपेक्षितपणे अमर्याद झालो होतो !
म्हणजे जिवंतपणे विलीन असणे !

आधीचे नगण्य आणि हे
स्वतःचे नसणे
यांत जमीन-अस्मानाचा फरक होता –
खरे काय होते ?
‘ मर्यादित खरे ‘ खरे की ‘ अमर्याद
खरे ‘ खरे ?
आकर्षण – आसक्तीतून
सुरू झालेले हे प्रकरण
तिच्यामाझ्या इच्छेबाहेर
ताबाहीन
काहीच नसणे झाले !
तिच्या चेहऱ्यावरच्या
समाधानाने माझाही चेहरा
समाधानी झाला !
--- ००० ---

NOVEMBER 2

आपण बदलत असतो हे ज्याला समजते त्यालाच हेही समजते की दुसरेही बदलत असतात ! सर्वांनी एकमेकांना ठरलेल्या साच्यांत बंदिस्त करून जगणे हे नुसते प्रेतांचे असणे म्हणायला हवे !

" अमुक जातीच्या लोकांची अशी इच्छा आहे की तमुक जातीचे लोक या देशाचे नागरीकच नाहीत, असे व्हायला हवे ! "

OCTOBER 31

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च ( आयसर – IISER ) या शिक्षणसंस्थेत काल गेलो होतो. माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणेने भारतात पाच ठिकाणी हे शिक्षण उपलब्ध झालेले आहे – पुणे, भोपाळ, कोलकाता, मोहाली आणि तिरुवनंतपुरम, ही ती ठिकाणे. इथे, भारतातली, अशा शिक्षणात आणि विशेषतः संशोधनाच्या कामात इंटरेस्ट असलेली निवडक रत्ने घेतली जातात. प्रवेश-परीक्षा खूप अवघड असते. मी तिथे जाण्याचे कारण माझी

नात ( मुलीची मुलगी ) तिथे शिकते आहे. ते सगळे आम्ही पाहायला यावे, असा तिचा आग्रह होता. महा-प्रचंड आवार, स्वच्छता आणि उत्तमोत्तम रंगीबेरंगी झाडांनी वाढवलेले, जोपासलेले सौंदर्य पाहून थक्क झालो ! तिथे त्या विद्यार्थ्यांना तर भारताचे भावी ' ग्रेट ' या सन्मानाने वागवले जातेच पण त्यांच्याकडे येणाऱ्या वा कुणाही तिथे येणाऱ्याला तोच सन्मान दिला जातो ! कला, खेळ, इतर अनेक सांस्कृतिक कृतींसाठी सोयी – यांचीही पूर्ण काळजी या अत्यंत महत्त्वपूर्ण शिक्षणक्रमाबरोबर घेण्यात आलेली आहे ! मोठमोठ्या प्रयोगशाळा आणि वाचनालये तर आहेतच. क्लासरूम्सही अत्यंत आधुनिक साधनांनी युक्त आहेत. जगात काय काय चालू असते याचे फारच किरकोळ ज्ञान आपल्याला असते, याची मला जाणीव झाली ! माझी नात तिथे शिकतेय याचा अर्थातच अभिमान वाटला !

--- ००० ---

October 2014

OCTOBER 31

' एंटरटेनमेंट ' या नावाचा, भरपूर मूर्ख कल्पनाविलासाने भरलेला, उत्तमोत्तम शाब्दिक कोट्या असलेला, मस्त हसवणारा सिनेमा हिंदीत आहे, हे मला माहीतच नव्हते ! आत्ता थोडा भाग पाहिला ! मस्त ! मला खूप मजा वाटली ! उद्या पूर्ण पाहणार, हे नक्की ! कोण म्हणावा याचा शिल्पकार ? उद्या कळेलच !

खोल काही जाणवतच नाही
तर बोलणार काय आणि पोचणार काय
वुई आर नॉट इंटरेस्टेड – आता
चंद्रतारे रोमँटिक नाहीत – इतर सर्व
वस्तूंपैकीच आहेत – गेला तो तुमचा काळ
खोल तीव्र भावनांत तासंतास आणि दीर्घकाळ
डुंबत बसण्याचा – सो बोअरिंग ! यू सी !
साद, प्रतिसाद हे शब्दही आम्हाला जुने वाटतात
प्रेम इज ओके – पण नेसेसरिली ते खूप
टिकायला हवे, असे काही नाही – लाईफ हे
घटनांनी भरगच्च असायला हवे – स्पीड हाच
मूलमंत्र हवा ! मंत्रा इज गुड ! वुई वाँट
सम ट्रॅडिशन आल्सो ! मन म्हणजे एक ॲक्शन

फिक्र हवा ! भराभर सुखदुःखे, भराभर प्रेम
एकदोन मुले, त्यांचे प्रवेश, सुखसोयी, दर्जा
यांत तडजोड न करता ! फर्गेट युअर मेलडी !
नो टाईम ! अँबिशन, कृती, पॉझिटिव्ह थिंकिंग
योग्य तेवढे टेन्शन आणि थोडा कंट्रोल ! बास !
विकत घेता आले पाहिजे – स्वास्थ्यच काय --
एनिथिंग फॉर दॅट मॅटर ! मजा करा ना !
जगात हवे तिथे जा ! पण इंडिया इज ग्रेट !
माईंड, बॉडी थोडे ड्युरेबल असले की बास
जुने तर होतच जाणार वापरून वापरून !
हेच सेम सगळे माझ्या ऐवजी दुसऱ्या कुणाच्या
मनातून घडत गेले तरी चालेल ! हो सकता है !
जादा सोचनेका नै ! पॉलिटिक्स सुधारावे आणि
पॉव्हर्टी-इनेक्वॅलिटी जावी – बास ! चला ! मी जरा
सीरियस झालो का ? बोअर केले का ?
--- ००० ---

OCTOBER 30

निरनिराळ्या वयोगटांतले लोक माझ्याशी बोलतात, हे एक बरेच आहे ! एका तरुणाचा एक गंभीर प्रश्न असा -- " माझी एक प्रेयसी आहे -- एकतर्फी नव्हे -- मीही तिचा प्रियकर आहे. हल्ली, आमच्यापैकीच एकजण तिच्याभोवती सारखा गोंडा घोळताना दिसतो -- तीही ते चालवून घेते किंवा एंजॉयही करत असावी, असे वाटते ! तिचा शिफ्ट होण्याचा तर विचार नसेल ? -- आणि यावर तिच्याशी बोलणे म्हणजे माझा क्षुद्रपणा आणि बावळटपणा नाही ठरणार ? " -- आता खरे काय असेल ते असेल, पण याचे डोके चालले ना कामातून !

कुणीच मूलतः स्थिर अमुक असे नसते
कुणीच कुणाला जाणू शकत नाही
तरीही एकमेकांना स्थिर अमुक समजूनच
चालते सगळे जणू जाणून --

क्षकडून काही व्यक्ती स्थिर मानल्या जातात

त्यांनाही नकळत – क्षला तरी कुठे स्थिरता असते ?

खूप पक्षी आभासात संघर्ष करत, जखमी होत

उडत राहतात आकाशात अनभिज्ञ

हक्क मानले जातात, मोडले जातात

कधी स्वीकृत, कधी अस्वीकृत --

आपली मानलेली व्यक्ती

मुद्दाम, नाइलाजाने वा नकळत

दुसऱ्याची झाल्याने

दुखावले जाणे घडत राहते -- अनेकदा

सगळे दडवले जात वा कधी

अतिदुःखाच्या अनावरतेने व्यक्त होत

कुणाचे पंख पडतात, कुणाच्या चोची

कुणाचे रक्त पडते, कुणाचे कलेवर --

एकमेकांना भरभरून सुख देऊ शकणाऱ्या

सर्व व्यक्ती अशा ना तशा कष्टी दिसतात

क्षला, जमून आल्या जोड्या तर अत्यानंदी

दिसतात ( जसा क्षचाही गतानुभव ), अजूनही

मागत आणखी काही हक्कांचे भावबंध

स्थिरतेचा आभास सर्वच पक्ष्यांना खोट्या

संघर्षात खतम मात्र खरेच करत राहतो ...

--- ००० ---

OCTOBER 29

आवडली -- केला अनुवाद -- दिला इथे --

राणी

-- पाब्लो नेरुदा.

मी तुला म्हणतो राणी
तुझ्याहून उंच नाहीत ? आहेत उंच.
तुझ्याहून शुद्ध नाहीत ? आहेत शुद्ध.
तुझ्याहून मोहकही आहेत -- मोहक.

पण राणी तूच आहेस.

तू रस्त्यांवरून जातेस तेव्हा
तुला कुणी ओळखत नाही.
कुणाचेही लक्ष नाही जात
तुझ्या स्फटिक मुकुटाकडे,
कुणीही नाही पाहात
तुझ्या लाल सोनेरी गालिच्याकडे
ज्यावरून तुझी पावले पडतात
तू जाताना.
तो अस्तित्वहीन गालिचा.

आणि जेव्हा तू प्रकटतेस
तेव्हा सर्व नद्या ध्वनित होतात
माझ्या शरीरात,
निनादत घंटा आकाश हलवतात आणि
एक स्तोत्र व्यापून टाकते पूर्ण जग.

फक्त तू आणि मी,

फक्त तू आणि मीच, प्रिये,

ते लक्षपूर्वक ऐकतो.

--- ००० ---

माझ्यासाठी या शहरात

आता फारसे काही नाहीय

नकोसेच आहे सगळे

इथले लोक तरी

का घेतील माझी दखल

त्यांची सर्व इंटरेस्ट नाकारणाऱ्या

मला माहीत असले तरी

त्यांना माहीतही नाही

की हे असे आहे

त्यांच्या अज्ञानात

माझ्याबद्दलच्या

मी जगत राहीन

मृत्यूनंतरही माझ्या

काहीच फरक नसेल

ते अज्ञान अमर राहील

--- ००० ---

OCTOBER 27

सनसनाटी बातम्यांचे व्यसन !

OCTOBER 26

मला आवडलेल्या एका इटालियन कवितेचा अनुवाद –

प्रतिबिंबन

-- इटालियन कवी –अलेस्सिओ झानेली.

आपण सगळे इतर सगळे आहोत

आपल्यापैकी प्रत्येकजण

आपण जे काही आहोत वा जगण्यात

जिथे पोचतो

तेही इतर सगळ्यांमुळेच घडते

प्रत्येकजण -- एकेकटा -- कुणीच नाहीय.

आपण इतर प्रत्येकाचे

यश आणि अपयश आहोत

आपण इतर प्रत्येकाचे

सुख आणि दुःख आहोत

आपल्याव्यतिरिक्त

इतर प्रत्येकाच्याही जगण्याचा

आपण परिणाम आहोत

आपल्या प्रत्येकात

इतर सगळेही प्रतिबिंबित आहेत

आपण प्रत्येकजण

इतर सर्वांची बेरीज आहोत.

निरपवादपणे
आपण प्रत्येकजण.

दुसऱ्या कुणाचीच
आपल्याला साक्ष नसेल
तर आपण कुणीच नसू

आणि काहीच नसू.

--- ००० ---

आधी आपला दुसऱ्या व्यक्तीला उपद्रव होतो
ती व्यक्ती त्याला प्रतिक्रिया देते
मग त्याचा आपल्याला उपद्रव होतो
हे ओळखून त्याने त्याचा एकूणच उपद्रव
बंदच करायचे ठरवले
परिणामतः
तो अदृश्यच झाला !

--- ००० ---

कोणत्याही व्यक्तीच्या मनात सहजच असणारा चावटपणा, त्या व्यक्तीच्या वाढत्या वयाबरोबर समाजाकडून ठेचला जातो -- त्यामुळेच खरे तर माणूस मनानेही म्हातारा होत जातो आणि लौकर मरतो ! पण समाजावर दफा ३०२ करणे शक्य नसते !

विश्वाला केंद्र नाही
त्याचा भाग माणूस
मात्र केंद्रयुक्त

करतात उद्युक्त

झाडे, पाणी, ढग
त्याच उन्मुक्ततेला

पण माणसे
जगू नाही देत
एकमेकांना

उन्मुक्त विश्वाला
ना खेद ना खंत
अराजकाची

माणसाला वाटणाऱ्या
उत्क्रांतीत शोधणाऱ्या
जखमांची कारणे

बेचिराख पृथ्वीही
फिरत राहील
ऊनपाऊस घेत

माणसाचे पुरावे
राहतीलच इथे
पाहील कोण ?

--- ००० ---

OCTOBER 25

तर्क हे तरी मानवी जगणे समजून घेण्याचे इहवादी साधन आहे ना ?
एकूण सवयीचे अलगतावादी / आत्मकेंद्री जगणे हीच जगण्याची एकमेव शक्यता मानायची आणि समता हे मूल्य मानायचे -- यात आपण निव्वळ तर्कदुष्ट बडबड करतो आहोत, हे तर्कानेही न समजण्याची कारणे कोणती असावीत ? की हा खोटा आशावाद हा सकारात्मक जगणे म्हणावा ?

सामान्यतः, प्रत्येकाला आपला स्वभाव, आवडीनिवडी, नैतिक कल्पना यांची समर्थनेच फक्त करायची असतात असे नव्हे तर तीच खरे तर मूल्यव्यवस्था आहे, असे म्हणायचे / मानायचे असते ! मग, तरीही, मान्यताप्राप्त असा कायदा घडतो ! यात सत्यबित्य कसले असणार ? सापेक्षताच असणार !

OCTOBER 24

स्वतःचे मनोविश्लेषण
मी स्वतः भावनिक टाईप नाहीय. मी लेखक-कवी असलो तरी तिथेही फारसे भावनिक काही लिहीत नाही. भावनोद्रेकी कलाही मला फारशी आवडत नाही. तरीही, कलेतल्या एखाद्या क्षणी माझे डोळे पाणावतात. मी अश्रू ओघळू देत नाही, पण माणसाचे केविलवाणेपण, अन्याय गृहीत धरून – स्वीकारून जगावे लागणे, जवळच्या नात्यात निर्माण होणारी काळजी – असे काही क्षण समोर आले की माझे मन एकदम नाजुक, भावुक होते ! या, म्हटले तर आंतरविरोधासह, मी एकात्म जगतो !

... in every human being throughout the world there is the story of mankind; in us is the anxiety of mankind and the fears, loneliness, despair, sorrow and pain; all this complex history is in us. If you know how to read that book then you do not have to read any other book -- except, for example, books on technology.
-------- JK. ( page 23 -- The Flame Of Attention. )

" घड्याळाकडे नका बघू
कामे होणे महत्त्वाचे
प्रगती व्हायला हवी "

माणसाचे शरीर
एका ठिकाणी तासंतास
बसण्यासाठी घडलेलेच नाहीय

तुम्ही ॲब्नॉर्मल जगताय
तिथे आहे तुमच्या
भरभराटीचा स्रोत

इतके रोग, औषधे
प्रदूषण, रोग
मने सदोदित व्यग्र

लाखो पुस्तके आता
आपोआप जातील
तुमच्या मेंदूत

तो परस्पर करत
राहील कामे
मधेच चैनही करेल

तुम्ही आळशी आहात
बाजूला व्हा
मेंदूला जगू द्या ...
--- ००० ---

OCTOBER 23

आरोग्याच्या तक्रारींचे ८५ टक्के मूळ मनातच

-- डॉ. ह. वि. सरदेसाई. ( आजचा पुणे सकाळ पृ. ६ ).

-- ही पूर्ण बातमी तर वाचाच – तीतले हे पाहा –

कुठल्याही दोन व्यक्तींमधील संवाद माणसाचे मन व्यथित करत असतो. त्यामुळे रक्तदाब, शरीरातील साखरेचे प्रमाण, कोलेस्टेरॉल वाढतात. परिणामी, वेगवेगळ्या आजारांना निमंत्रण मिळते. म्हणूनच, मनाची चिडचिड होणाऱ्या गोष्टी टाळाव्यात.

-- सारांश, मन ही गोष्ट, ‘ चालेल तसे चालेल ‘ असे म्हणून सोडून देण्यासारखी नाही.

--- ००० ---

उत्सवी मूडमध्ये दिवाळी अंकातली एक गंभीर कथा वाचून तो उत्सवी-गंभीर झाला !

OCTOBER 22

केतकी थत्ते आणि दीप्ती भागवत यांचे एक सुंदर गाणे सह्याद्री वाहिनीवर पाहिले !

काही वर्षांपूर्वी केतकीने माझ्या एका नाटकात प्रमुख भूमिका केली होती !

त्या दोघींना मनःपूर्वक शुभेच्छा !

OCTOBER 21

तुम्हाला सणांचे खूप कौतुक वाटणे

मला ते मुळीच न वाटणे

यांत फारसा फरक नाही

-- वाटणेच सगळे

आपल्या संख्येत मात्र प्रचंड

तफावत – तुम्ही असंख्य

मी नगण्य – त्यामुळेच मीही

तुमच्याबरोबर कौतुकमग्न

माझ्यामुळे उलट

उत्साह वाढेल तुमचा

तुमचा जरा कमीच वाटल्याने

तुम्हीच उलट खट्टू व्हाल

सगळ्या धर्मांच्या

सगळ्या सणांत

मी धूमधडाक्यात

असतो सर्वांबरोबर

त्यामुळे सर्वांनाच

मी त्यांचा वाटतो

ते मला अत्तर लावतात

हसतात, शुभेच्छा देतात

हळूहळू माझे हे सगळे

खरेच होत जातेय -- मलाही

नकळत मी सगळे सण

साजरे करत राहतोय ...

--- ००० ---

एक सिंपल कविता --

आपण समजून-उमजून नुकसान करून घेतो आहोत – हे त्याला

हल्ली जाणवे -- आताच असे का होतेय, असा प्रश्नही पडे –

वय होत चालल्यामुळे ?

आयुष्य नीट उपयोगात आणण्याबाबत तो जागरूक असे
कमाई व्हावी, स्किल वाढावे, प्रसिद्धी व्हावी – तसेच मौजमजा

निसर्गसान्निध्य, देवदर्शन आणि हवेसे-पुरेसे अनैतिकही
मिळत राहावे याबाबत तो दक्ष असे – सर्व साधत राही –
बदलत्या फॅशन्सचे कपडे वापरे – वाहने, मोबाईल्स वापरे
त्याचे सगळेच अद्ययावत, भारी असे – यासाठी, बऱ्यापैकी कष्ट पडत
त्यांना तो उपयुक्त जगणेच माने – तेही एंजॉय करी – वाकबगार राही –
ऑफिसातलेच सामान वापरून तिथली खूप कामे करावीत
समृद्धी वाढवून द्यावी आणि त्याचा पगार मिळावा
तसेच त्याला जगाचे वाटे – इथलेच सामान, माणसे वापरून
सुखासमाधानाचा पगार ! – असे वाटे ! प्रत्यक्ष पगाराचा
समाधान मिळवायला उपयोग होई पण या सुखासमाधानाचा
कशासाठी उपयोग होईल ? – असा एक विचित्र प्रश्न त्याला पडे
पगार घरी आणता येई – हे कुठे नेणार – असा तो फावल्या वेळात
विचार करे – इथेच कमवा, इथेच खा – असे तो म्हणे !
जास्त खोलात न जाता शक्य तितके मजेत जगावे
हेच त्याचे तत्त्व होते
त्याचे पालन करणे हेच तो उपयुक्त जगणे समजे !
( बाह्य घटना त्याला मधेच विचलित करत, ते वेगळे )
वाढत चाललेल्या वयामुळे वा काही बाह्य घटनांमुळे या तत्त्वाचरणातच
कुठेतरी खोट येत असावी आणि म्हणूनच
उपयुक्ततेचे प्रश्न पडत असावेत – हे लक्षात येऊन
हल्ली तो व्यथित होई – असे व्यथित होणे, हीही त्याला
तत्त्वच्युती वाटत राही ...
--- ००० ---

Champra Deshpande shared Pravin Kamble Mayuri Theaters's album.
प्रयोग चांगलाच होत असणार !

OCTOBER 20

चांगले जमून आलेय टायमिंग !

राजकीय घडामोडींतून करमणुकीचा रस निघणे सध्या तरी थांबलेय !!

लोक दिवाळीकडे वळताहेत !!!

आपले प्रतिनिधी एकूणात गोंधळलेले असून एकमेकांचे अंदाज घेत सत्तास्थपनेसाठी निरनिराळे डाव खेळताना दिसताहेत ! एकूण निकाल महाराष्ट्राची दिङ्मूढ अवस्था व्यक्त करणारा आहे, असे आता म्हणता येते ! आहे या निकालात काही नाही जमले तर पुन्हा निवडणुका घेण्याचा एक पर्याय बोलला जातोय ! तसे झाल्यास पुन्हा सगळे पक्ष तडफदार भाषणे करून निर्विवाद बहुमताची मागणी करतील ! आणि पुन्हा, वेगळा, पण असाच गोंधळ निर्माण करणारा निकाल आला तर ?

मुख्यमंत्री हे राज्यातले सर्वोच्च पद भूषवायला आणि त्याची जबाबदारी घ्यायला इतके दावेदार असावेत हे राज्याचा गरिमा वाढवणारे आहे की त्या पदाचा गरिमा कमी करणारे आहे ?

OCTOBER 19

" अहो, निवडणुकीच्या प्रचाराच्या भाषणांमधून असे काहीबाही बोलले जातेच -- त्या वेळी, सर्वांनी ते अत्यंत गांभीर्याने घ्यावे अशीच इच्छा असली तरी निकालानंतर तेच धरून बसायचे नसते ! "

वाघाला नम्रपणाही गुरगुरतच दाखवावा लागणार -- त्याला इलाज नाही ! विदर्भाचा मुद्दा, महाराष्ट्राच्या हितासाठी ' भिजत घोंगडे ' या सदरात टाकणे आणि कामाला लागणे, हा एकच मार्ग आहे ! अन्यथा जनतेचा संताप वाढेल आणि त्यातून बसणाऱ्या लाथा वाट लावतील ! त्यांचा पाठिंबा घेणाऱ्याची, तशी वेळ आणणाऱ्याची आणि महाराष्ट्राच्या हिताच्या नावाखाली स्वार्थाचा शेवटचा प्रयत्न करणाऱ्याची ! स्वतःच्या हितासाठी शहाणे होणेच बरे !

जात, धर्म, भाषा, पैसा आणि दहशत यांचा निवडणुकीत होणारा वापर मान्य असल्यावर जाहिरातबाजीवर आक्षेप घेण्यात कितपत तथ्य आहे ?

याहूनही अधिक गुंताड्याचे असू शकेल पण एका साध्या नागरिकाला दिसणारे --

१ – एकदम फेटाळून नका लावू – नीट विचार करा. ‘ शत्रू ‘, ‘ मित्र ‘ -- या जुन्या कल्पना विसरा. पाच वर्षांचा प्रश्न आहे. अजिबात कुरबुरी, मानापमान, अग्रलेख वगैरे काहीही न होता निवांतपणे तुमचे सरकार चालू देऊ. आम्ही हे खरोखरच का करू हे आम्हालाही माहीत आहे आणि तुम्हालाही ! कोणती खाती कुणाला, मुख्यमंत्रिपद वाटून घ्यायचे का – या भानगडीच होणार नाहीत. आता आमचे सहकार्य घेतल्याने तुमचा जुना मित्र खवळेल, हे बरोबर आहे – पण, त्यांच्यासारखेच राडावाले आपल्याकडेही आहेत आणि पोलीस आपल्या बाजूला असणार ! त्यांना आपण सहज मापात ठेवू शकतो. एवढेच नव्हे तर त्यांचे एकेक नख काढणे, एकेक दात पाडणे, हेही करू शकतो. आता मनातून आपण शत्रूच आहोत आणि असणारच, हे आपण दोघेही जाणून आहोतच ! तुमची अशी एखादी मोठी चूक सापडण्यासाठी आम्ही दबा धरून असणार आणि तसे घडले तर तुमची वाट लावायचा प्रयत्न करणार, हे आहेच ! तुम्ही तसे घडू न देण्याची काळजी घ्या म्हणजे झाले ! ओके ? घ्या आमचा पाठिंबा – महाराष्ट्राच्या हितासाठी !

२ – च्यायला ! दिसतेय तर मोहक पण विचार केला पाहिजे. ज्या गोष्टींच्या संतापामुळे महाराष्ट्राने आपल्याला भरभरून मते दिली तिकडेच काणाडोळा करावा लागेल ! म्हणजे सुरुवातच जनतेच्या विश्वासघाताने होणार ! पण चांगली कामे करण्यासाठीही आहेच की हा जनादेश – त्या बाबतीत आपण विश्वासपात्र ठरू शकतो ! आणि आपला नैसर्गिक मित्र गप्प बसेल ? आपल्याला चांगुलपणामुळे ज्या गोष्टी सोडून द्याव्याशा वाटतील त्याच नेमक्या तो उकरत बसला तर ? की, होई ना का थोडा आतल्या आत त्रास पण आपल्या त्या जुन्या मित्रालाच घ्यावे बरोबर ? मुख्यमंत्रिपद वाटून घ्यायचा प्रस्ताव आला तर, इतक्या जागा मिळूनही झुकायचे ? पण एकूण महाराष्ट्राच्या हितासाठी समजा घेतला बाहेरून पाठिंबा तर दोघांचीही विश्वासार्हता मातीत जाऊ शकते – त्यांना सध्या काही फरक पडत नाही पण आपण का गमवावी विश्वासार्हता ? शिवाय आपले कायमचे आधार काय म्हणताहेत ते कसे डावलणार ?

३ – थोडे नमते घ्यावे, हेच बरे ! ज्यांना सत्ता मिळू नये म्हणून जिवाचे रान केले त्यांच्याच सावलीत सत्ता येऊ द्यायची ? आणि मुख्यमंत्रिपद आता मागत राहणे, हे जनतेला तरी पटेल का ? बरे ती एक निर्विवाद पॉवर अशी तयार होणार की विरोधी पक्ष म्हणून तरी आपल्याला कितपत प्रभाव पाडता येईल ? आणि दिसणार काय – एका कॉमन शत्रूबरोबर ते निवांत सत्तेत आणि दुसऱ्या कॉमन शत्रूबरोबर आपण विरोधात ! हे टाळायला हवे – हीच वेळ आहे ! नाही तर नंतर त्यांना सुखेनैव सत्ता उपभोगत असलेले पाहात राहणे, हेच येईल नशीबात ! त्यापेक्षा आत्ता काही मंत्रिपदे तरी पदरात पाडून घेता येतील ! शिवाय केंद्रातले संबंधही नीट राहतील ! पण च्यायला, आपला माज उतरला, असे मात्र दिसणार ! पण महाराष्ट्राचे हित लक्षात घेऊन सध्या मानापमान द्यावे सोडून ! आपल्या इमेजला ते शोभत नसले तरी ती इमेज पुन्हा कमावूच – संधी मिळेलच ना !

--- ००० ---

' विचारसरणीचा अंत ' वगैरे कल्पना परदेशी लोकांकडून चोरणारे आपण नाही -- आपल्या मातीतून स्वतंत्र निर्मिती करून दाखवणारे आहोत आपण !

माणसाचे मन कसे चालते हे समजण्याचा उत्तम मार्ग म्हणजे स्वतःचे मन समजून घेणे !
आत्मज्ञानी माणूसच उत्तम राजकारणी बनू शकतो !

आपल्या जुन्या सहकाऱ्यावर दबाव आणण्यासाठी आपल्या कट्टर शत्रूचे सहकार्य न मागता मिळत असेल तर काय हरकत आहे ? ये आदमीका माइंड है -- ऐसेही काम करेगा !

मी किंवा माझा पक्ष यांचा हा पराभव नसून हा महाराष्ट्रातल्या जनतेचा पराभव आहे, असेच आम्ही मानतो !

OCTOBER 18

उद्या वेड्यांचा दिवस ! जिंकलो असे वाटणाऱ्या आणि हरलो असे वाटणाऱ्या !
या वेड्यांचे डावपेचच आपल्या जगण्याचा यापुढील माहोल ठरवतील !

तो भुयारी रस्ता आम्ही बांधलाय
चुकीचा आहे – अपघात होऊ शकतात
त्यावरचा रस्ता नका वापरू – घरात त्याने
सर्वांना सांगितले होते – तेही ऐकत
तो रस्ता टाळत – पण गावात इतरत्र
कुठे कुठे असे आहे—अपघातप्रवण
ते त्यांना कुणी सांगितले नव्हते –
व्हायचे तेच झाले ! पण दुसरीकडे !
त्याच्यामुळे नाही झाले –
--- ००० ---

एवढ्याशा टपरीतला कारभार
तिथेच पिंजरे, अंड्यांचे क्रेटस
मोठा लाकडी ठोकळा आणि कोयता
पुसले तरी कुठे कुठे लाल रक्त –
फावल्या वेळात बसण्यापुरते
त्याच्यासाठी एक स्टूल –
दिवसभर हे असे झाले की
संध्याकाळी मालक येऊन
गल्ला घेऊन जाई –

टेंपो आला की जाऊन
एकेका हातात दोनदोन
अशा कोंबड्या घेऊन तो त्या
टपरीतल्या पिंजऱ्यात टाके
जणू भाजीपाला वा काही
निर्जीव सामान – आपण
त्यांना असे उचलणे
असे कोंबणे, यांमुळे त्यांना
दुखत असेल – अजून त्या
जिवंत आहेत – असा विचारही
त्याला शिवत नसे –
पिंजऱ्यात टाकल्यावर
त्याही गुमान राहात –
एकदा मात्र भयानक घडले
गिऱ्हाईक नसताना त्याचे
एका कोंबडीकडे लक्ष गेले
बापरे ! अडकलीच तिथे नजर !
दोघांच्याही नजरेत एकच भाव !
तो जणू संमोहित झाला – कोंबडी

खूप मोठी होत बाहेर आली
त्यालाच तिने पिंजऱ्यात कोंबले
बाप रे ! म्हणजे आता आपलाच
नंबर की काय ? – तो भयभीत झाला
गिऱ्हाईक येताच तिने त्याला
गचांडी धरून बाहेर काढले
ठोकळ्यावर ठेवले
कोयता उचलला –

खरे तर त्यानेच तिला
ठोकळ्यावर घेतले होते
तिला जास्त वेळ जिवंत ठेवण्यात
अर्थच नव्हता – ती त्याचीच
लायकी काढत होती –
त्याच्या मनाला तिचे मन
भिडवत होती ! च्यायला !
-- विचार झटकून त्याने
कोयता उचलला --
--- ००० ---

OCTOBER 17

शहरांना शहारे तेव्हा येतात जेव्हा
हारीने हार येतात
हरलेली हुशारी जिंकल्याचे समजून --
ती हरवणारच वाईटाला --
समजतात रहिवासी !
राहून राहून हुरळत राहतात
वाईट टळण्याच्या खात्रीने –

लागून राहते तरीही एक

हळूच हरकामी

हुरहुर !

--- ००० ---

' नीलकमल ' या सिनेमाच्या आरंभी एक वाक्य पडद्यावर येते -- ' ज्यांचा पुनर्जन्मावर विश्वास आहे त्यांना पुनर्जन्माच्या पुराव्याची गरज नाही आणि ज्यांचा विश्वास नाही त्यांना कोणताही पुरावा पुरेसा नाही. ' मार्क्सच्या विचारांचेही काहीसे असेच झाले आहे.

-- किशोर बेडकीहाळ, पृष्ठ १२, ' आपले वाङमयवृत्त ', सप्टेंबर २०१४.

OCTOBER 16

पायाभूत जगणारे गोंधळतात

पायाच नसणे त्यांच्या ओळखीचे नसते

ते स्वीकारणे नाकारतात

-- यावरून हेच दिसून येते –

नसणे हेच असणे असले तरी

असण्याला पर्याय नाही

असल्याशिवाय स्वीकार नाही –

स्वीकारही हवा आणि नसणेही

-- असे होऊ शकत नाही

नसणे हेच असणे असले तरी ...

नसताना खरे तर

स्वीकाराची गरजच नसते – पण

पायाचा अभाव घाबरतो पायारूप

अवतरत

स्वीकाराच्या अभावाला

स्वीकार हेच

असणे समजून ...

--- ००० ---

कुठला कुठे जातो याचे फलक नसलेले खूप भुयारी मार्ग
एकमेकांत गुंतलेले – कोलाहल -- अचानक
दगड-विटा-माती-सिमेंट यांचे ढीग पडून
त्यांत गाडले जातील सगळे -- असे नक्कीच
क्वचितच घडू शकेल -- पण मानसिक शक्यता
तर सतत आहे – नाइलाज – असे जगणे ...
--- ००० ---

OCTOBER 15

ज्यांनी मतदानाला अंगठा दाखवलेला नाही तेच मतदानाचे बोट दाखवू शकतात !

OCTOBER 14

इतर सणांचा आपण मान राखतो -- मग या सणाने काय घोडे मारलेय?
मतदान दिनाच्या सर्वांना शुभेच्छा !

अबकला नेहमी चॅलेंज करणारा त्याचा एक मित्र
निरुद्योगी बसलेला असे -- कधी तंगड्यावर तंगडे टाकून
कधी आरामशीर चहा पीत तर कधी काही गुणगुणत ...
कशासाठी प्रसिद्ध वा अमर होत बसतोस ? आधीच हजारो आहेत,
तो म्हणे. अबक म्हणे अमर होणे वेगळे, त्याची नाही चिंता – प्रसिद्धीमुळे
जिवंत असताना लोक आदराने पाहतात, हवेनको बघतात, ते मला आवडते.
त्यासाठी दर्जेदार, खूप सर्जकच काही करावे लागते, असे काही नाही. चीपही चालते.
तेवढे तर आपल्या संबंधित लोकांत दोन शब्द गोड बोलून, नीट वागूनही होऊ शकते
– तो म्हणे. होय, पण नाव थोडे गाजणे, अनोळखी लोकांनीही आपल्याला ओळखणे
-- याचे थ्रिलही मला आवडते, अबक म्हणे. नुसती आपुलकी वेगळी --

आपले कुटुंबीय, नातेवाईक, मित्र यांना आपण थोडे वेगळे, स्पेशल, मुख्य म्हणजे
जरा मोठेच वाटलो पाहिजे. यासाठी आपल्याला किती कष्ट पडले --
आपण कसे एक वेळ जेवून तासंतास काम केले, झोपेशिवाय
दोन दोन दिवस कसे राहिलो – ते सांगता आले पाहिजे --
असे अबक म्हणे. त्यापेक्षा मस्त जगणे बरे – अमर होण्यात
आपला काहीच फायदा नसतो आणि प्रसिद्धीसाठी
त्रास खूप घ्यावा लागतो – त्याचा मित्र म्हणे.
दुसरे लोकही क्षणभर आपल्याला मोठे मानून नंतर आपापल्या व्यापांत
व्यग्र होतात – तो म्हणे. तसे तर कोणत्याही श्रीमंत माणसाकडे
लोक तसेच आदरानेच बघतात ! – तो म्हणे.
कुणाला पैसे मिळवणे जमते, कुणाला प्रसिद्धी, कुणाला दोन्ही – अबक म्हणे.
सगळेच मेंदू शेवटी मातीतच जातात – कशाला
एकमेकांच्या मेंदूंत आपली चित्रे काढत बसायचा त्रास घ्यायचा ?
साधे छान जगावे – मी तेच करतो – तो मित्र म्हणे.
तुझ्यात नसेल ती प्रेरणा – माझ्यात आहे – वेगळे, प्रसिद्ध होणे --
अबक म्हणे. यावर तो म्हणे, अरे प्रसिद्धी म्हणजे दुसऱ्यांच्या मेंदूत
साकळणारी काही रसायने – जी न्यूनगंडयुक्त असतात – ज्यांचा
त्यांच्या तब्येतींवर वाईट परिणाम होतो – तुझ्या सुखाच्या इच्छेसाठी तू
लोकांचे का नुकसान करतोस ? यावर अबक म्हणे, अरे, लोकांनाही
आवडतेच ना ते – कुणीतरी मोठे असणे आणि त्यांनी छोटे असणे !
होय रे होय ! – तो म्हणे – चालू दे – आणि तुझ्या कामातून हे
आपोआपच घडू शकते – तू वेगळाच असल्यामुळे ! तू काही
मुद्दाम, जाणूनबुजूनच ते करतोस, असे म्हणता येणार नाही --
लोकांना न्यूनगंड येत असेल तर तो त्यांचा दोष आहे, तुझा नाही !
की तुझ्यातच आहे न्यूनगंड जी आहे तुझी मोठे होण्याची प्रेरणा ?
तुझे मोठे असणे तू एंजॉय केलेस आणि ते पाहून, त्यामुळे लोकांच्यात
असूया निर्माण झाली तर मात्र तो तुझाही दोष ठरेल !
-- हे माझे मान्य कर, तुझे मला मान्य ! – तो म्हणे !
यावर अबक म्हणे, मान्य, चल – पण माझ्यात कोणताच दोष

असू नये आणि असल्यास त्याचा कुणालाही त्रास होऊ नये, असे माझे
तत्त्वज्ञानच नाहीय ना जगण्याचे ! मग कुठे प्रश्न येतोय ? ! --
ते काहीही असले तरी --
तू माझा एक आळशी मित्र आहेस, असेच मला वाटते !
– असे म्हणून अबक पटकन निघून जाई --
--- ००० ---

OCTOBER 13

१ -- उमेदवार वाईटच वाटत असेल तर प्रश्नच मिटतो -- पण, तो कितीही चांगला असला तरी त्याच्या पक्षाचे नेतृत्व, कार्यकर्तृत्व आणि कार्यशैली यांच्या फार बाहेर ( वा विरुद्ध ) तो जाऊ शकत नाही !
२ -- सत्तेचा माज आणि दहशत तिरस्करणीयच असतात पण power corrupts असे सूत्रबद्ध शहाणपण सांगते ! ( सध्या तरी, माज नसलेला उमेदवार बघावा, झाले ! )
३ -- एखादी विचारसरणीच आवडत असेल तर बाकीचे प्रश्न गौण होतात -- तरीही, एखाद्या विचारसरणीप्रमाणे चालण्याचे राहिलेत का दिवस, या प्रश्नालाही स्थान आहेच !
४ -- पक्षनिष्ठा वगैरे ठीक आहे -- कामे व्हायला हवी असतील तर इतर पक्षांतही मैत्रीसंबंध आणि ऊठबस असलेला असाच लागणार उमेदवार !
५ -- आता विधानसभेचा चाललाय विषय तर विधानसभा कशी चालते, त्याबाबतच्या नियमांचे काही पुस्तक असणार -- समोरचा उमेदवार ते वाचेल / समजून घेईल, असे वाटतेय का -- हा एक विचार लागेल !

-- ही पंचसूत्री विचारात घेऊन, माझे मत कुणाला, हे ठरवायच्या अघोरी प्रयत्नात मी आहे !

आता विधानसभेचा चाललाय विषय तर विधानसभा कशी चालते, त्याबाबतच्या नियमांचे काही पुस्तक असणार -- ते समोरचा उमेदवार ते वाचेल / समजून घेईल, असे वाटतेय का -- हा एक विचार लागेल !

पक्षनिष्ठा वगैरे ठीक आहे -- कामे व्हायला हवी असतील तर इतर पक्षांतही मैत्रीसंबंध आणि ऊठबस असलेला असाच लागणार उमेदवार !

एखादी विचारसरणीच आवडत असेल तर बाकीचे प्रश्न गौण होतात -- तरीही, एखाद्या विचारसरणीप्रमाणे चालण्याचे राहिलेत का दिवस, या प्रश्नालाही स्थान आहेच !

सत्तेचा माज आणि दहशत तिरस्करणीयच असतात पण power corrupts असे सूत्रबद्ध शहाणपण सांगते ! ( सध्या तरी, माज नसलेला उमेदवार बघावा, झाले ! )

उमेदवार वाईटच वाटत असेल तर प्रश्नच मिटतो -- पण, तो कितीही चांगला असला तरी त्याच्या पक्षाचे नेतृत्व, कार्यकर्तृत्व आणि कार्यशैली यांच्या फार बाहेर ( वा विरुद्ध ) तो जाऊ शकत नाही !

OCTOBER 12

“ आदिवासी संगीत हे कुणाची करमणूक करण्यासाठी, कुणाला खुश करण्यासाठी वा धंदा करण्यासाठी नसते – तो असतो मानवी जगण्याने निसर्गाला दिलेला प्रतिसाद ! ते आदिवासींच्या अंतर्यामात नांदणारे संगीत असते ! ते आणखी कुणाला आवडते की नाही आवडत, याची त्यांना मुळीच चिंता नसते ! “ आपली फ्रेंड **प्राची दुबळे** काल तिच्या एका दीड तासाच्या कार्यक्रमात, तिच्या त्या संगीताच्या अभ्यासाची थोडी झलक दाखवताना सांगत होती. ते मूळ संगीत ऐकवणे, काही क्लिप्स दाखवणे आणि स्वतः गाऊन काही गोष्टी समजावून सांगणे – असा भरगच्च कार्यक्रम होता. पहाडी प्रदेशातल्या आदिवासींचे संगीत वरच्या सप्तकात असते कारण त्याशिवाय ते ऐकू येणेच तिथे अवघड असते, उलट जंगल भागातले आदिवासी संगीत मंद्र सप्तकात असते कारण तिथल्या शांततेत तेच सुसंगत असते ! – अशी खूप माहिती देत, प्राचीने, एकूण आदिवासी जगणेच कसे निसर्गाबरोबर एकात्मतेने गुंफलेले असते ते दाखवले. तिने भारतातल्या अनेक आदिवासी भागांत जाऊन त्या त्या संगीताचा अभ्यास केलेला आहे – गेली पाच वर्षे ती हे काम करते आहे – आणि अजूनही तिचे ते काम चालू आहे. या सर्व आदिवासी संगीताचा आत्मा मुळात एक आहे, असे तिचे विवेचन होते. किंबहुना इतर देशांतल्या अशा संगीताशीही या संगीताचे सखोल नाते आहे, असे तिने सांगितले. हे पाहिल्यावर, राष्ट्रांच्या सीमा निरर्थक ठरतात, असे एक अत्यंत महत्त्वाचे सत्य ती सांगून गेली ! अनेक संकटांशी सामना करत, ४७-४८ तापमानासारख्या हाल-अपेष्टा भोगत तिने हा मौल्यवान खजिना जमवलेला आहे. तिने आणखी एक मजेदार गोष्ट सांगितली -- एक गाणे पाच मात्रांचे होते – ते सतत त्या पाच मात्रांची शिस्त पाळेल, असे नाही – मधेच ते तीन वा सहा मात्रांचेही होते ! एक उत्स्फूर्त, सहज नैसर्गिक आविष्कार, अशा एकूण आदिवासी संगीताची अशी अनेक वैशिष्ट्ये तिने उलगडून दाखवली ! मानवी जगण्यातली एकात्मता जाणवून देणारा हा कार्यक्रम खरोखर ग्रेट आहे ! प्राची दुबळे म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जगण्यातला एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. तिला तिचे जगणे सापडलेले आहे. किमान पंचवीस वर्षे करण्याचे हे काम आहे, मी तर फक्त गेली पाचच वर्षे यात आहे – हे ती सहज सांगून जाते ! या संगीताचा अभ्यास करताना त्याबाबत येणारे नैतिक प्रश्न आणि त्यांकडे ती कसे

पाहते, हेही ती प्रेक्षकांशी शेयर करते ! प्राचीला तिच्या या चाललेल्या कामाबद्दल आणि कालच्या तिच्या कार्यक्रमाबद्दल आदरयुक्त सलाम !
हा कार्यक्रम पुण्यातल्या ' आसक्त ' या संस्थेने आयोजित केला होता.

माझी धाकटी नात नऊ वर्षांची आहे. कार सजवण्याचा विषय चालला होता. मी म्हणालो, लग्न झाल्यावर नवराबायको जेव्हा पहिल्यांदाच घरी जातात तेव्हा त्यांची कार सजवलेली असते. नात म्हणाली -- का ? -- अगं, म्हटले पहिल्यांदाच एकत्र घरी येत असतात ना ते ! -- यावर ती म्हणाली -- कित्ती बोअर ! मी गप्पच झालो ! आणि दिङ्मूढ !

निळू फुले हा अलिकडच्या काळातला मराठीतला खराखुरा नटसम्राट होऊन गेला ! त्यांचे ' लवंगी मिरची कोल्हापूरची ' या नावाचे एक वगनाट्य होते. त्यात त्यांची एंट्रीच फुल टाईट कंडिशनमध्ये -- कसाबसा तोल सावरत -- होई ! पहिले वाक्य -- " साला, प्येनं लई वाईट ! " -- असे असे ! टाळ्या-शिट्ट्यांनी थियेटर दणाणून जाई ! तसे आता -- " साला, चॅटिंग लई वाईट ! " म्हणावे काय ?

OCTOBER 11

आपल्या एका व्यक्तीच्या मनालाही फाटे फुटत असतात, म्हणून तर निवड करत जावे लागते. तसेच पूर्ण देशाच्या ( वा जगाच्याही ) मनाचे आहे. तेही निवड करत जाते. देशाचे मन कोणत्याही एखाद्या फाट्याला फाट्यावर मारू शकते !

गणेशोत्सव, दिवाळी, क्रिकेट मॅचेस आणि निवडणुका यांच्या काळांत नवे पिक्चर, नवी नाटके प्रथम प्रदर्शित करू नयेत ! फुकट करमणूक उपलब्ध असताना पैसे कोण खर्च करेल ?

तो ना लेखक ना टीकाकार ना अभ्यासक ना विद्वान होता.
तो फक्त एक वाचन-व्यसनी होता. त्याच्या घरात पुस्तकांचा खच असे.
त्याला या बाबतीत विरोध केल्यास तो चवताळून उठे –
त्यामुळे कुणी फारसे बोलत नसे. तो एकलकोंडा आणि काहीसा
माणूसघाणाही होत गेला होता. त्याच्या बायको-मुलांना
वाचनाचा तिरस्कार निर्माण झालेला होता. नोकरीतही तो
धड नसे – कामात फारसा समाधानकारक नसे – तरीही
तिथे कधी कधी त्याच्या हुशारीचा उपयोग होई --

शिवाय, तो उपद्रवी वा भांडखोर नव्हता – अबोल होता
एवढेच. लोक संभाळून घेत. पण नोकरीचा त्याला खूप त्रास वाटे.
शेवटी मोठा मुलगा कमावू लागल्यावर, त्याने नोकरी सोडून द्यावी
असाच कौटुंबिक निर्णय झाला. त्याने पूर्ण वेडे होण्यापेक्षा
हे परवडणार होते. आलेगेले, नातेवाईक यांच्याशीही तो
फारसा बोलत नसे. शक्यतो पुस्तकांनी भरलेल्या त्याच्या
खोलीत बसून राहणेच तो पसंत करी. खोली अंधारी होती –
वाचताना तो दिवा लावे. लोक जरा त्याला टरकूनच असत --
त्याचा चेहरा भरकटल्यासारखा दिसे. खरेच डोके भरकटे.
बऱ्याचदा तो न वाचता बसून असे. एकदा थोरल्याला राहवले नाही
-- " काय केलेत इतके वाचून ? कथा, कादंबऱ्या, कविता,
तत्त्वज्ञान, इतिहास, मानसशास्त्र – असे काहीबाही वाचत आलात
-- काय वेगळे जगलात आमच्यापेक्षा ? काय अधिक कळले ?
तुम्ही फक्त दर्जेदार तेच वाचता, असे म्हणत आलात – त्यामुळे
काय झाले ? आमचे मन समजा क्षुद्र आहे – तुमचे काय
वेगळे झाले ? आता तर पुस्तकांच्या ढिगांत नुसते
बसून असता तुम्ही ! एवढा खर्च ! पुस्तकांवर केलात !
काय मिळवलेत ? " – असा त्याने भडिमारच केला !
धाकटा काही बोलला नाही – बायकोला रिलीफ वाटला !
" तुम्ही आनंदात – समाधानात दिसला असतात
तर वेगळे होते – " असेही थोरला शेवटी म्हणाला !
" जागा कमी पडतेय ! समजले मला ! " तो म्हणाला.
दुसऱ्या दिवशी सगळी पुस्तके रद्दीत दिली ! पण चेहरा मात्र
अधिकाधिक भरकटतच राहिला ...

--- ००० ---

*****************************************************

OCTOBER 10

आपले मित्र श्री. मुरली खैरनार यांचे नाव नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदासाठी विचारात आहे, असे वाचनात आले -- त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा !

खरे तर खरा वाघही इतका मोठा नसतो
माझ्या उंच मजल्याच्या खिडकीच्या काचेतून
समोरच्या बंगल्याच्या गच्चीत मला तो दिसतोय
निरखून पाहिल्यावर समजतेय – खरे तर
ते वाळत घातलेले कपडे आणि चादरी आहेत
तरीही गच्चीत उभा असलेला तो भलाथोरला वाघच
मला अधिक पटतोय ...
निर्णायक का काही घडत नाही ? – हा प्रश्न मी
असंख्य ठिकाणी विचारतो – तसाच इथेही –
अत्यंत जीनियस लोकांच्या मनांच्या मी
संपर्कात आलो – खूप वाचले – आदर वाटला
भीतीही वाटली – हे जाणून घेतल्यास मरण्याची ...

त्या वाघाच्या बंगल्यात राहतात आणखीही काही स्त्री-पुरुष
अनोळखी – त्या वाघाने त्यांना टचही केलेले नाहीय
हे मात्र खरे – तो नरभक्षक मुळीच नसणार ... पाऊस आला
तर तो भिजेल – भिजलेले कोकरू होईल एक ...

एक मध्यमवयीन स्त्री करते त्या वाघाची निर्मिती आणि त्याचा
विनाशही – ती भीत नाही – ती समाधानी वा रागावलेली वा
सूडभावनेतली वा काळजीत असलेली – अशी नाही दिसत
दिसते फक्त एक सुडौल, बांधेसूद स्त्री – शुद्ध – तरीही
निर्णायक काही घडत नाही ... तीही असू शकते
एक जीनियस – तिच्याही मनाच्या संपर्कात यायला

घडपडतेय माझे मन – पण वाघ आडवा येतोय ...

निर्णायक घडणे म्हणजे – या क्षणी जाणवणारे – कल्पना वा
भ्रम नसून प्रत्यक्ष सत्य आहे -- हे समजणे ... का नाही घडत ?
--- ००० ---

सगळे कायद्याने थोडेच चालते ? -- बरे, नाही चालत --
मग काय, वरच्याने खालच्याला फोनवरून बेकायदेशीर आदेश द्यावे,
ऐकले नाहीत तर बदली वा इतर त्रास द्यावा आणि ऐकल्यास --
आक्षेपार्ह ठरल्यास त्या खालच्याला बळीचा बकरा बनवावे ?
अरे च्युत्त्या, सगळे कायद्याने चालत नाही, हे समजणारा
परिपक्व आहेस ना तू ? ! लेखी आदेश देऊन तू घे ना धोका !
भोसडीच्या !

सर्व काही बदलत असते
काहीच अविनाशी नसते
हे समजून प्रेम करावे --
शंभर टक्के करावे ...
हे स्वगत म्हणजे
उपदेश वा निर्णय नसून
प्रेमाची एकच परिपक्व
शक्यता आहे ...

OCTOBER 9

' सामान्य माणूस ' ही संज्ञा अतिवापराने फारच गुळगुळीत -- परिणामी निरर्थक झालेली आहे. तिचा अर्थ लावायची गरज वाटते. आपल्याला सुचणाऱ्या ' सामान्य ' आणि ' असामान्य ' माणसाच्या व्याख्या करायचे प्रयत्न करू. मी सुरुवात करतो -- ज्याला आर्थिक भ्रष्टाचार करायची संधी मिळते आणि जो ती बिनदिक्कतपणे वापरतो, तो असामान्य आणि अशी संधी न मिळणारे ते सामान्य. आणखी काही सुचत असेल तर सांगत चला --

भूमिका घ्या आणि ती बदलत राहा !

जागतिक मानसिक आरोग्य दिन -- एकमेकांना एकमेकांचे जगणे एकत्र वाटण्याचा आणि मुख्यतः आपापला तोल संभाळण्याची आठवण होण्याचा दिवस ! सर्वांना ताणविहीन क्षण मिळत राहोत, हीच शुभेच्छा !

साफसफाई / स्वच्छता करण्याची महासंधी -- १५ ऑक्टोबर !

दोन मोठ्या गाड्यांचा रस्ता आणि दोन्ही बाजूंना आणखी एकेक गाडी
थांबू शकेल अशी जागा -- एका बाजूला दोन गाड्यांची रांग आणि एका बाजूला
एकीमागे एक -- असा रस्ता भरलेला असे – सतत – दिवसपाळीच्या गाड्या
वेगळ्या असत आणि रात्रपाळीच्या वेगळ्या –
दिवसा खाली मस्त कुत्री खाऊनपिऊन झोपलेली असत –
असे मालक सगळे मोठे असतात, त्यांच्या ओळखी असतात,
त्यांच्याकडे गुंड असतात – त्यांना राग आवरत नाही –
जाऊ दे, मरू दे – लोक म्हणत ! एवढ्यातेवढ्याला
चिडत बसलो तर आपलेच बीपी वाढेल, मधुमेह होईल –
झोपतायत बिचारी कुत्री – झोपू देत – म्हणत !
--- ००० ---

OCTOBER 8

चाली डोक्यात बसल्यामुळे कुठल्याही पक्षाची जाहिरात-गाणी कुणीही गुणगुणतोय ! अशी खेळीमेळीची लोकशाही जगात कुठेही असणे शक्य नाही ! आज, एकाला मत द्यायचे असे ठरवलेला मतदार, ऐनवेळी कुणाला मत देऊन येईल, सांगता येत नाही ! आपले तज्ञ ( आता हा शब्द तज्ज्ञ असा लिहिण्याची गरज नाहीय ) विश्लेषकसुद्धा ' काय घडेल ते सांगता येत नाही ' म्हणताहेत, म्हणजे त्यांचाही किती प्रचंड सूक्ष्म अभ्यास आहे, पाहा ना ! भेदभाव ते मावळले ! आलेच समतेचे राज्य ! आणि हो -- गळून पडल्या की पडून गेल्या -- भिंती !

OCTOBER 7

इतकी ग्लानी त्याला कधीच आली नव्हती – बोलणे नाही,
हालचाल नाही – अशी. त्याच्या पत्नीने डॉक्टरांना घरी बोलावले.
तपासून ते म्हणाले, व्हेरी अर्जंट – लगेच ॲडमिट करायला हवे !
त्यांनी इस्पितळात फोन करून, दाराशी स्ट्रेचर तयार ठेवायला सांगितले.
त्याच्या इच्छेविरुद्ध दोघातिघांनी त्याला चालवले – शेजाऱ्याने त्याची
कार काढली होती – आपण तर च्यायला याच्यावर सोसायटीचे पैसे
खाल्ल्याचा आरोप केला होता – आता याच्याच गाडीने जावे लागतेय !
तरीही या त्याच्या सहकार्याला त्याचा चांगुलपणा म्हणायला त्याचे मन
तयार झाले. जाताना सगळे अंधुक दिसत होते – माहितीचे रस्ते, दुकाने, बँका
-- हे शांतीनगर – च्यायला, आपण हे सगळे शेवटचे तर पाहात नाहीय ?
येऊ का आपण परत ?

भराभर तपासण्या झाल्या. अचानक झालेले लो बीपी. ( ते अव्यक्त
न्यूमोनियामुळे झाले होते, हे नंतर ठरले ! ) डायरेक्ट आयसीयूत नेले
-- सलाईन-औषधे सुरू केली. ज्यांना कधी पाहिलेही नव्हते असे दोन
स्पेशालिस्ट – मेडिसीनवाले आणि हार्टवाले – पाहात होते. हार्टवाले
सांगून निघून गेले. इतर डॉक्टर्स, नर्सेस – भरपूर लगबग झाली.

बाहेर खूप लोक – शेजारी, नातेवाईक, मित्र, ओळखीचे, सहकारी
त्याच्या पत्नीला भेटून जात. एकदा लघवी होईपर्यंत काहीच खात्री नव्हती
-- तेच ती डोळ्यांत पाणी येत सगळ्यांना सांगे – ते काळजीत घरी जात.
कधी पत्नी, कधी आई आलटूनपालटून आत आणि बाहेर थांबत.
दोन मुले बारा-चौदा वर्षांची होती. इथे आणली नव्हती. वडील गेले तेव्हा
रक्षाविसर्जनालाही आपण याच गाडीने गेलो होतो, हे त्याला
ग्लानीत आठवले ! तरीही काही महिन्यांनी आपण त्याच्यावर
आरोप केला होता – तरीही त्याने आता, पुन्हा सहकार्य दिले आहे --

तो मधेच विव्हळे, ओरडेही – जोरात हालचालही करी –
इतर पेशंटना त्रास होऊ नये आणि सलाईन लावलेली सुई हलू नये
म्हणून त्याचे हातपाय बेडला बांधलेले होते आणि तोंडाला पट्टी लावलेली होती.
एका सलाईन औषधाने त्याला खूप थंडी वाजू लागली, थरथर होऊ लागली
-- पण इलाज नव्हता – सांगता येई ना ! आपण या औषधांनीच मरणार
असे त्याला वाटू लागले. तोंड बंद होते. या थंडीने नाक चोंदले तर ? श्वास कसा घेणार ?
त्याची धडपड पाहून, तोंडाची पट्टी काढून, काय होतेय ते त्याला विचारले गेले.
मग डॉक्टरी सल्ल्याने योग्य ते बदल केले गेले.
पहाटे तीनपर्यंत असे चालले. मग लघवी झाली ! संकट टळले !
तोरणे लावा, गुढ्या उभारा, फटाके उडवा, उटणे लावून अंघोळी करा, नवे कपडे
घाला, अत्तर लावा, पक्वान्ने खा !!! होय ! इतके महत्त्वाचे आहेच, लघवी होणे !
निसर्गाच्या कृपेमुळे आपल्याला ते कळत नाही !

दोन दिवसांनी आयसीयूतून स्पेशल खोलीत नेले. खूप लोक
भेटायला येत. त्यांतले काही नोकरीमुळे संपर्कात आलेले
खूप मोठे लोक असत. इतर तर खूप येत. आपण बिल देणार असलो तरीही
इतके डॉक्टर्स, नर्सेस, इतर कर्मचारी – इतके सगळे !
आपली लायकी ती काय बोंबलायला ! आणि इतके सगळे ! आपल्यासाठी !
खरे तर आपण केवळ एक नगण्य आहोत – असे त्याला वाटत राहिले –

मग विचार आला – हे विचारही एक प्रकारे आपल्या अहंकाराचा
सन्मान करून घेण्यासाठीच तर येत नसतील ? तसे असल्यास, आपले हे
असे वाटणे ढोंगीपणाचेच असणार आहे --

खरे तर काहीच वाटायला नको आहे ...

--- ००० ---

जेव्हा आपद्धर्मच महत्त्वाचा होतो आणि मुख्य ( ' शाश्वत ' हा शब्द टाळतोय ) धर्म सगळेच विसरायला तयार होतात तेव्हा लोकशाही नीट रुजली आहे, असे समजावे !

पुढाऱ्यांच्या दृष्टीने माध्यमांचा एक फार मोठा तोटा आहे -- इथल्या लोकांना हवे ते इथे बोलावे, तिथल्या लोकांना हवे ते तिकडे बोलावे -- असे करता येत नाही -- सगळे एकत्र पसरवतात भोसडीचे !

विचार, भाषा, धोरण, व्हिजन -- हे सगळे जुळवत-ॲडजस्ट करत राहा, बदलतही राहा -- शेवटच्या क्षणापर्यंत -- जास्तीत जास्त मते मिळवण्याचे सर्व प्रयत्न करा -- शेवटी ही लोकशाही आहे ! ( हे दिसणारे मार्ग -- न दिसणारे वेगळे ! लोकांना हवेनको बघा -- त्यांच्या इच्छा पूर्ण करा. )

Champra Deshpande shared Pravin Kamble Mayuri Theaters's photo.
समर्पक फोटो !

उन्मत्तपणा, माजोरीपणा, मग्रुरी आणि हो, मस्तवालपणाही -- हे प्रकार लोकप्रिय तर होऊ शकतच नाहीत, उलट, अप्रिय आणि हेटाळण्यायोग्य होतात -- हे भान जर ही निवडणूक प्रक्रिया आणत असेल तर हे लोकशाहीचे सांस्कृतिक कार्यच म्हणायला हवे !

OCTOBER 6

सुमारे दहा तरी नातेवाईकांचे त्याच्याकडे नेहमी
येणेजाणे होते. कुणी आले की प्रत्येक वेळी त्याचे
नवीन काही असे – हे बघा, बंगल्याला कुंपण केले --
हे बघा, पूर्ण फिटिंग नवे केले -- ही बघा, बागेची
रचना बदलली, वगैरे. त्याची पत्नीही त्याच्याइतक्याच
उत्साहाने या संवादात सामील असे, पण त्याची दोन
लहान मुले मात्र कंटाळत – काय तेच ते, असा भाव
त्यांच्या चेहऱ्यांवर असे. नातेवाईकही कंटाळत – तुम्ही
एकदाच सगळेच एकाच वेळी का नाही करून घेत,
असे विचारत. -- इतके एकदम नसतात हो पैसे,

म्हणून असे एकेक करावे लागते, तो म्हणे.
त्याच्या घरी जायचे म्हणजे हा एक वैतागच असे.

शेवटी त्या दहा नातेवाईकांनी एकत्र येऊन त्याला हव्या
असणाऱ्या सर्व सुधारणांचा हिशोब केला आणि तेवढी
सगळी रक्कम सर्वांनी मिळून त्याला बिनव्याजी –
सोयीच्या मुदतीने द्यायची तयारी दर्शवली. तो खुश
झाला, त्याची पत्नीही खुश झाली – मुलांनी
दुर्लक्ष केले. आता थांबू नका, नातेवाईक म्हणाले.

त्याने एक चूक केली. रंगाचे काम झाल्यावर
तडक त्याने पन्नास हजारांचे झुंबरच आणले !
ते लावायला इलेक्ट्रिशियन आणला – तोही एक छोटा कामगार
-- हीही एक चूकच होती ! त्या इलेक्ट्रिशियनच्या हातून लावताना ते झुंबर
खाली पडून फुटले ! तुकडेच झाले त्याचे ! तो इलेक्ट्रिशियन म्हणाला,
काम करताना होऊ शकते अशी तूटफूट – मुद्दाम तर
काही केलेले नाही. ग्राहक न्यायालयात जाऊन तरी काय होणार होते ?
खटला जिंकला तरीही त्या गरिबाकडून भरपाई मिळणे शक्यच नव्हते.

आता नातेवाईक आले की तो हीच रडकथा सांगू लागला.
तरीही मी पैसे फेडेनच असे म्हणू लागला. तो काही फार
श्रीमंत वगैरे नव्हता – बँकेच्या स्टाफ-लोनमुळे
त्याचा बंगला झालेला होता.
शेवटी ते म्हणाले, जाऊ द्या, आम्ही पैसे परत नाही मागत --
तुम्हीही आता ते झुंबराचे तुकडे संभाळत बसू नका --
द्या फेकून.

तरीही त्याला अपराधी वाटे – आपण नीट काळजी
घ्यायला हवी होती, असे वाटे. कुणीही आले की तो

खंत व्यक्त करत राही – त्याची पत्नीही तसाच चेहरा करे --
मुले मात्र कंटाळत – सरळ खेळायला
बाहेर निघून जात ...

त्या दहांतल्या एका हुशार नातेवाईकापुढे एकदा तो
मनातले बोलून गेला – हे असे एकातून एक निघत जाणे आणि त्याच
साखळीत आपण त्रस्तपणे गुंतलेले राहणे, यालाच
लाईफ म्हणायचे की काय ? यावर तो हुशार म्हणाला,
एवढ्यात नकोत असले आध्यात्मिक प्रश्न – मुले
मोठी होऊ द्यात – मग करा विचार ...
यावर तो कन्फ्यूज झाला, त्याच्या पत्नीला ते पटले,
मुलांना ते काही समजलेच नाही – ती नुसतीच वैतागली ...
--- ००० ---

OCTOBER 5

फ्रेंडस, आत्ताच ताजा लिहिलेला मजकूर -- तुम्हाला लगेच दाखवावासा वाटला -- कदाचित काही एडिटिंग होत राहील --
( यातला उपरोध लक्षात घेऊन वाचावे, ही विनंती ! )

या स्पोर्टस मॉलमधला माल म्हणाल तर सगळा फ्रान्समध्ये
तयार झालेला आहे – आणखी कोणकोणत्या देशांचे
असे मॉल आहेत, हे सर्वांनाच माहीत असते, असे नाही –
दर्जा आणि किंमत यांचा तौलनिक विचार करून कोणत्या
खेळासाठी कोणत्या देशाचा माल योग्य हे ठरवणे हे फारच
किचकट आहे --

असंख्य खेळ – स्केटस, सायकली, बूट, पोषाख, चष्मे, फुटबॉल, तंबू, रॅकेटस –
रॅकेटला लवचिक रबरी दोरीने बांधलेला चेंडू – मारा – तोच पलटून
परत येईल – पुन्हा मारा – खेळून पाहा, चालवून पाहा, वापरून पाहा –

इथली साधने खेळाडूंच्या हातात, अंगात गेली की जिवंतच होतात ! त्यांच्या शरीरांचे भागच होतात ! त्या जिवंत होण्यातली कुवतही खूप महत्त्वाची असते ! आपापल्या मुलांसह आलेले आधुनिक, फ्रेश, आकर्षक पालक – खूपच रंगीबेरंगी, आटोपशीर आणि टाचक्या कपड्यांतलेही ! छानच ! पैसे आहेत – मुलांना दर्जेदार साधने उपलब्ध करून द्यायलाच हवीत !

तरीही विचार येतोच – आत्ताच पाच हजाराची कशाला रॅकेट, सुरुवातीला एक हजाराची बास – मुलांना हे नेमके काही कळत नाही – ती थोडी खट्टू होतात -- काही पालक म्हणतात, सुरुवातीपासून सगळे दर्जेदारच हवे ! पण बहुसंख्य पालक काही वेगळ्याच कारणांनी खट्टू असतात – खरे तर स्पोर्टस मेडिसीन सेंटरमध्ये जाऊन आपल्या मुलाच्या / मुलीच्या बॉडीला योग्य खेळ कोणता, ते आधी ठरवायला हवे होते – त्यातले चांगले कोच कुठे आहेत, चांगल्या सोयीसुविधांची मैदाने कुठे आहेत – हे पाहायला हवे होते -- यात आपण गेलोच नाहीय अजून !

बाहेर प्रचंड मस्त आवार ! मुलगा, सून, नातवंडे यांच्याबरोबर आलेले काही आजोबा मस्त वारा खात बसलेले ! एका बाजूला फुटबॉलचे मैदान, इकडे कारंजे, मस्त स्वच्छ, पांढरे, गोंडस रस्ते – आणि वा ! त्यांवरून चाललेल्या ब्यूटिफुल तरुणी, स्त्रिया ! हे पाहण्याला, आंबटशौकीनपणा म्हणणारे, म्हातारचळ म्हणणारे -- असे गधडे, निर्बुद्ध तरुण जगात इतरत्र कुठेच नसतील ! कधी सुधारणार आपला देश, कोण जाणे ! इथले तरुण न्यूनगंडाने पछाडलेले आहेत – त्यांना वाटते, हे म्हातारेच पटकावून बसतील सगळे सौंदर्य ! – असले हे तरुण ! खेळणार काय च्युत्ते !

सायना नेहवाल इथूनच घेते म्हणे सगळे ! तिचे फोटो आहेत ! ग्रेट ! प्रचंड मेहनत घेतलीय तिने ! खाऊ नाहीय !

पोर जन्माला आले की पाण्यात टाका, पोहायला शिकवा – जिद्द बाळगा ! त्या मुलाला / मुलीला काय कळतेय – तुम्ही – पालकांनी बाळगायला हवी जिद्द ! क्लासेस लावा, न्या, आणा, पोचवा, शालेय, स्टेट लेव्हल, मग नॅशनल ! करना पडेगा ! यश मिळाले तर आंतरराष्ट्रीयसुद्धा सुवर्णपदक शक्य आहे !

कुणीही आक्षेप घेणार नाही ! तो मुलगा वा ती मुलगीही नाही ! कारण हेच
हासिल करायचे, हे ठरलेले असेल !

मुलांच्या आधी पालकांना सुधारा ! पालक जिद्दी व्हायला हवेत
महत्त्वाकांक्षी आणि फायटिंग स्पिरिटवाले व्हायला हवेत !
चायना बघा, रशिया बघा, अमेरिका बघा –

युद्धांत मरतातच ना मुले ! दंगलींत नाहीत मरत ? मग
मरू द्यात ना काही अशीही -- स्वतःसाठी आणि देशासाठी
सुवर्णपदक मिळवत ! आणि पैसेही प्रचंड मिळतील ! डोंट फरगेट !

आणि नुसती खेळाचीच क्षेत्रे, असे नव्हे – नीट पाहा –
‘ जीवन हाच एक खेळ आहे ! ‘
-- आवडले ना सुभाषित ?
--- ००० ---

OCTOBER 4

पोपटाच्या आवाजात नवी नवी भजने रेकॉर्ड करून
लोकांना ऐकवण्याचा त्याचा धंदा होता
तो, त्याची पत्नी आणि शाळेत जाणारी दोन मुले
असा त्याचा संसार मस्त चाले – दुपारी स्त्रिया येत
संध्याकाळी आणि विशेषतः गुरुवारी पुरुष येत
खूप दक्षिणा जमे

लोकांना मधेच शंका येई – पोपटाच्या आवाजात
माणूसच तर हे रेकॉर्ड करत नसेल – हे ओळखून
तो त्याच्या पोपटाला प्रत्येक वेळी

त्यातल्या दोन ओळी तरी प्रत्यक्ष म्हणायला लावे
मग लोक पोपटालाही मिरच्या, पेरू देऊन जात

पोपट आजारी पडला तेव्हा प्रॉब्लेम झाला
तो भजने म्हणे ना – मरतोच, म्हणू लागला –
तोवर त्या धंदेवाल्याने पोपटाच्या आवाजाचे तंत्र
आत्मसात केले होते – पोपटाचे रेकॉर्डिंग
मग तोच करू लागला – मुळाबरहुकूम

नंतर पोपट खरोखरच मेला तेव्हा पिंजऱ्यात
त्याने खेळण्यातला पोपट आणून ठेवला –
तरीही लोक त्याला मिरच्या, पेरू टाकत
इकडे भजनांना डोलत
आता सगळ्यांनाच सवय झाली होती
तीतून बाहेर कशासाठी पडायचे ? --
ते छान वाटत असताना ? – असू दे – चालू दे –
असे झाले होते ...

दोन ओळी पोपटाने प्रत्यक्ष म्हणणे तेवढे
बंद झाले होते – आता तो विषयच नको –
जुना काळ वेगळा होता – असे लोक म्हणत ...
--- ००० ---

रस्त्यावरच्या भटक्या कुत्र्यांना तो मध्यमवयीन माणूस
बिस्किटे खाऊ घाले -- हे त्याला आनंदाचे वाटे
कुत्री चेकाळत, त्यांची पैदास वाढे, रेबीजचा धोका वाढे,
लोक भडकत पण तो कुणाचे ऐकत नसे – कोणतेही
सरकारी ऑफीस या समस्येत लक्ष घालत नसे
एकाही कुत्र्याचा प्राण घेतला तर मृत्युदंडाची शिक्षा होती --

रोज त्या कुत्र्यांचे उदंड प्रेम घेऊन तो घरी परत जाई --
त्याच्या घराच्या आत जायचे नाही, हे कुत्र्यांना कळे
तो बाहेर आल्यावरच ती त्याच्यावर प्रेम करत --

लोकांना कळे ना – बिस्किट कारखानदारांकडे तक्रार
करावी की बिस्किटे विकणेच बंद व्हावे दुकानांतून --
तरीही, खायचे इतर अनेक पदार्थ मिळतच राहणार --
हा प्रॉब्लेम होता – माणसांचे खाणे तर बंद होऊन चालणार नव्हते

शेवटी त्यांना उपाय सापडला – जरा कमी किंमतीत
सगळ्यांनी आपापली घरे विकून टाकली -- डोक्याचा ताप गेला
असे म्हणत ते सगळे दुसरीकडे राहायला गेले

मग तिथे नवीन माणसे राहायला आली
त्या हसतमुख मध्यमवयीनाच्या सुखाचे रहस्य
आता त्यांच्या वाट्याला आले – कुणाला ना कुणाला
होणारा आपला प्रॉब्लेम चालू राहिल्याने
कुत्री खुश झाली – आनंदाने उड्या मारत
हवेतल्या हवेत बिस्किटे झेलण्यात अधिकच तरबेज झाली

रस्ते घाण होत राहिले ... मने त्रस्त होत राहिली –
तो मध्यमवयीन तरी बिनत्रस्त असेल का --
या समस्येवर वेळ घालवत, चर्चा करत, लोक जगत राहिले --
--- ००० ---

OCTOBER 3

सौंदर्य, आराम आणि सुख निर्माण करणारे असे ते एक
फर्निचरचे दुकान सदोदित उघडेच असे, ग्राहकांच्या प्रतीक्षेत

स्वच्छता असे, काचा चकाकत, पॉलिश सुहास्यवदनाने
वाट पाही, नक्ष्या सुंदर दिसत राहात, पण तिथे
कधीही एकही ग्राहक येत नसे – त्या शहरातल्या लोकांना
फर्निचर हवे असे पण ते ठरवत, उद्या घेऊ – पुढल्या
महिन्यात नक्कीच घेऊ – बहुधा त्यांना वेळच नसे
ते, तसेच, त्यांचे आहे ते जुनेपाने फर्निचर वापरत राहात –
हे दुकान त्यांची वाट पाहात राही – ते शेजारच्या भव्य
हॉटेलात अनेकदा येत – पण हे राहूनच जाई –
लोक खूप कामात असल्याने हे घडे – घाम काढणारी नव्हे
मने ताणणारी कामे असत – येताजाता लोक पाहात
काय घ्यायचेय ते ठरवून जात ...

एकदा एक म्हातारा त्या दुकानात आला – कुणी येतच नसल्यामुळे
विक्रेता कुणी अर्थात नव्हताच तिथे – तर एक खुर्ची स्वतःच
त्याला म्हणाली, काय हवेय ? तो म्हणाला, एक खुर्ची हवीय ! ती म्हणाली,
ठीक मग, मलाच घेऊन चला – कुणी विचारणार नाही – फुकट आहे –
मग तो तिला त्याच्या घरी घेऊन गेला –

विशेष म्हणजे, त्याला एक नवीनच धंदा मिळाला –
त्या खुर्चीवर आरामात बसलेला तो म्हातारा
पाहायला लोक तिकीट काढून येऊ लागले !
तिकिटे, माणूस, खिडकी – सगळे आले !

त्या म्हाताऱ्याने मधेच स्मित केलेले दिसले
तर लोक आनंदाने चीत्कारत –
त्याच्यावर आणखी पैसे उधळत ...
--- ००० ---

OCTOBER 2

म्यूझियमचा दरवाजाच कुणीतरी उखडला होता
त्यामुळे द्वारपालाची आता गरजच रद्द केली गेली होती
लोक मुक्तपणे आत जात-येत, डबे खात, पाणी पीत
कुणी हटकत नसे – पण एक तलवार मात्र
अधांतरी आपोआप इकडेतिकडे फिरत असे धारदार
ती तेवढी चुकवावी लागे – तसा बाहेर बोर्डही होताच
काहीजण डबा खाताना चिलखत, शिरस्त्राण घालूनच बसत
इतरांना, ती चुकवत राहण्यातच मजा वाटे –
तिने कुणाला ठार करणे तर सोडाच पण साधे
जखमी केल्याचीही आजवर नोंद नव्हती – तरीही लोक घाबरत –
( चोरीचा प्रयत्नही कुणी करत नसे ! )
त्यापुढच्या दालनातल्या वस्तूंसमोरच्या कठड्यातून शॉक बसत
जरा चुरचुरे पण कुणी मरत नसे – त्यापुढच्या
दालनातल्या मिट्ट काळोखात
त्या म्यूझियमचा मालक बसून असे –
तुम्हाला आवडले असले तरच तिकीट घ्या, म्हणे –
माणशी दहा रुपये – लोक आनंदाने देत –
परत जायच्या वेळी मात्र लोक जरा जास्तच घाबरत
थकलेले असत – तलवार मुंडके उडवून जाईल, असे वाटे –
मागच्या मागे बाहेर पडायला दार हवे होते, म्हणत –
ते नसल्याने, कधी कधी, तलवारीच्या भीतीने, तिथेच झोपत –
जागे झाल्यावर घड्याळ पाहून, आता रात्र झालीय, हे त्यांना कळे
काळोख तर तिथे कायमच असे – ते पुन्हा झोपत ...
म्यूझियमचा मालक बसल्या बसल्या नुसत्या डुलक्या घेत राही ...

हे म्यूझियम टिकावे आणि भविष्यकाळ चांगला असावा
यासाठी सगळे यात व्यग्र राहात ...

--- ००० ---

एक नुसते उदाहरण म्हणून बघा -- समजा निकाल असे आले की या पाच महाभागांपैकी एकाच्या नेतृत्वाखाली इतर चारांनी पाठिंबा दिला तरच सरकार स्थापन होईल -- तर पुन्हा तोच वेडेपणा नको आणि निवडणूक खर्चही नको म्हणून समजा हे सगळे एकत्र यायला तयार होतील ( फुटीतून एकात्मता ! ) तर हे सगळे शहाणे समझोता कसा करतील ? खाण्यातला हिस्सा, विकासाचे अग्रक्रम, आपापल्या समूहांचे हित -- कसे ? ( गणिताने अशी शक्यता निर्माण होऊ शकते का, ते जरा उद्यमशील फ्रेंडने सांगावे -- )

आपण म्हणू तशी जनतेत फूट पाडता येत नसेल -- एकमेकांशी शत्रुत्व करणारे समूह तयार करता येत नसतील -- तर लोकशाहीत यश काय फक्त विचारांवर मिळेल ? ज्यांच्या नावांचा रोज जप केला जातो ते जर आज निवडणुकीला उभे राहिले असते, तर निवडून आले असते ?

मी युती / आघाडी तोडली तर बुड घागरी !

OCTOBER 1

त्याच्या अधू स्मरणाचा फायदा घेऊन
आरोप सिद्ध करण्यात आला. सहानुभूतीने
दिलेली बागकामाची शिक्षा आपण का भोगतोय
हेही तो विसरून गेला. सोबत खूप गुन्हेगार होते
ते त्याला संभाळून घेत. आम्हाला गुन्हेगार नको समजूस
म्हणजे तूही शिक्षा भोगत असल्याचे खोटे पडेल --
असे ते म्हणत. त्याने ते मानल्यामुळेच, त्याच्या चांगल्या वागणुकीची
दखल घेतली गेली ! आणि उरलेली शिक्षा माफ झाली !
--- ००० ---

दुसऱ्यांचा दांभिकपणा दाखवताना, दांभिकपणाशिवाय माणूस असू शकतो, असे गृहीत धरलेले असते की जरा प्रमाण कमी असावे, एवढीच अपेक्षा असते ?

पंचरंगी लढतीतले पाचही पक्ष म्हणताहेत की त्यांना निःसंशय निर्विवाद बहुमत मिळणार आहे ! हे अर्थातच अशक्य आहे -- पण नीट शासनयंत्रणा तर हवीच ! विश्वास कुणावर टाकावा, हे ठरवणे अवघड आहे -- आता मतदारांनी एक छुपे राजकारण करावे -- कोण विश्वास ठेवण्यायोग्य वाटत नाही तो एकेक पक्ष वगळत जावा -- शेवटी जो उरेल त्याला विश्वासार्ह समजून चालावे ! त्याचेही शेवटी नाही झाले बहुमत तर फार मनावर घेऊ नये -- हसून सोडून द्यावे !

SEPTEMBER 30

बाहेर येऊन उगीचच असावा सराव म्हणून
कारचे चाक काढले
तर त्यात तीन उंदीर खेळत बागडत होते
प्रसंगी मी घराचीही फिकीर करणारा नव्हतो
यशाचाही मी फारसा भुकेला वगैरे नव्हतो
त्या उंदरांना माझ्याशी काही अनीहवादी
बोलायचे होते -- मीही उत्सुक होतो
तेवढ्यात पाऊस आला
ते टायरमधून म्हणाले, आम्ही भिजत नाहीय
तू कारमध्ये जाऊन बस – मी आत गेलो
गाणी ऐकली – पाऊस थांबल्यावर पुन्हा बाहेर आलो
तर चाक जागच्या जागी बसवलेले होते
उंदरांचा मागमूसही दिसत नव्हता
ऊन पडले होते – निरभ्र होते आकाश
पुन्हा आत जाऊन
गाडी स्टार्ट केली – मस्त लोण्यासारखी गाडी
-- आता आले लक्षात --
आयला !
पाऊस आलाच नव्हता ! ...
--- ००० ---

September 2014

SEPTEMBER 29

कुणीही व्यक्ती माझ्याशी डावपेचाने वागतेय
असे मला वाटत असणे याचा अर्थच मी
कुणाशीही साधे सहज वागायला असमर्थ असणे

माझ्या मानसिक नरकातून सुटायलाही ...

--- ००० --

Champra Deshpande shared Pravin Kamble Mayuri Theaters's photo.

Pravin Kamble Mayuri Theaters's photo.

हजारो वर्षांचे आकाश
येणारच कवितेत
तेच तेच म्हणून कसे चालेल ?
असूच कसे शकेल ते तेच ?
शब्दांचे अर्थ कालक्रमात
बदलत आलेत
आकाशा आकाशात फरक झालेत
कालचे आकाश, आजचे आकाश
याचे आकाश, माझे आकाश
तुझे, त्याचे, त्यांचे, तिचे ...

म्हणजे कोणतेच कुणालाही
कळणारे नाही ...
माझेही सतत बदलत राहणारे
पकडता न येणारे ...
नेमके काहीच पोचवू न शकणारे ...

मग कवितेचे माध्यम

कसे होईल आकाश ?

आकाश हा शब्द्

अर्थाशिवाय

वापरता आला पाहिजे

की काय ?

--- ००० ---

आंद्रे ब्रेटन च्या एका कवितेतल्या ओळी --

The poetic embrace like that of the flesh

While it lasts

Forbids every glimpse of the poverty of the world

SEPTEMBER 28

मानलेल्या सत्यांवर मन थांबून राहात असल्याने आयुष्याच्या प्रवाहाशी ते सतत संघर्षात राहते -- परिणामतः सतत असमाधानी आणि अस्वस्थ राहते.

SEPTEMBER 27

आमच्या बँकेत एक शाखाप्रबंधक होते – त्यांना मी प्रत्यक्ष कधी पाहिले नाही, पण त्यांचे काही मजेदार किस्से मात्र ऐकले होते. पूर्वी एकदा असेच पंतप्रधान पं. नेहरूंचे युनोत भाषण व्हायचे होते. नेहरू मुंबईमार्गे जाणार होते आणि सांताक्रुझ विमानतळावर ते काही काळ थांबणार आहेत, अशी बातमी होती. या आमच्या शाप्रंना देशाची प्रचंड काळजी – खरोखरची – प्रामाणिक ! काश्मीरबद्दल बोलताना नेहरू काही महत्त्वाचे मुद्दे विसरण्याची शक्यता आहे, असे त्यांना वाटले ! यावर त्यांनी काय करावे ? त्या विमानतळाच्या पत्त्यावर त्यांनी स्वखर्चाने नेहरूंना एक मोठी तार पाठवली – खालील सात मुद्दे न विसरता मांडा म्हणून ! असे देशभक्त पाहून नेहरूंनी खूपच हुरुपाने ते भाषण केले असणार, यात शंकाच नाही ! ( त्या तारेने नेहरू कन्फ्यूज झाले नाहीत, हे खरे तर भारतीयांचे भाग्यच म्हणायला हवे ! )

त्याच शाप्रंचा आणखी एक किस्सा आहे. अत्यंत प्रामाणिक ! त्यांचा ' ओम ' या मंत्राचा बराच अभ्यास होता. एकदा तीनचार स्त्रिया त्यांच्या मंडळाचे खाते उघडायला आल्या होत्या. त्यांच्याकडून काही ठेवीही मिळण्याची शक्यता होती. तर त्यांचा मान राखण्यासाठी त्यांचे खाते उघडायला या साहेबांकडे -- त्यांच्या केबिनमध्ये -- त्यांना पाठवण्यात आले होते. तेव्हा बोलता बोलता विषय ‘ ओम ‘ वर आला ! हे म्हणाले, आता गंमत बघा – मी डोळे मिटून ‘ ओ ऽ ऽ म ‘ म्हणतो – तुम्ही लक्षपूर्वक ऐका आणि माझ्या शरीराच्या नेमक्या कोणत्या भागातून तुम्हाला ते ऐकू येतेय, ते सांगा ! त्यांनी डोळे मिटून ते ‘ ओम ‘ सुरू केले – जरा वेळाने त्यांनी डोळे उघडले तर त्या स्त्रिया त्यांना अदृश्य झालेल्या दिसल्या ! ओमची ही अजब जादू त्यांच्या कल्पनेतही नव्हती !

--- ००० ---

यू एनचे महत्त्व तर नाकारायचे नाहीय पण काश्मीरचा मुद्दा इथे आणून काही फायदा होणार नाही, हे तर सांगायचे आहे -- यावर उपाय -- काश्मीरचा मुद्दा इथे उपस्थित करून काय उपयोग होईल, याबाबत अनेकांच्या मनांत शंका आहेत -- अशी वाक्यरचना मोदींनी केली. कोई शक ? या सुझाव ?

खूप हुशार आहेत विश्लेषक ! काय झालेय, त्याचे अर्थ काय आणि आता काय होऊ शकेल -- एवढ्यावरच बोलताहेत ! कुणी काय करायला हवे होते, यावर बोलणे बंद झालेले आहे ! ही, त्यांच्या हुशारीच्या पुढची -- शहाणपणाची स्टेज म्हणायला हरकत नाही !

एखाद्या बातमीचा सनसनाटीपणा एक दिवस टिकतो.
एखाद्या बातमीचा आठ दिवस, तर एखादीचा एक महिना.
कायमच सनसनाटी असलेलीही एखादी बातमी असू शकते.
कोणत्या ना कोणत्या बातमीच्या सनसनाटीपणात सतत
जगणारा मानवी समूह हा प्रगत समजावा !

निवड म्हणजे निराकरण नसून एक प्रयोग असतो. एकाच वेळी अनेक निवडी अंमलात आणता येत नसल्याने केलेली निवड बरोबर की चूक हे नंतर ठरवण्यात अर्थ नसतो. प्रत्येक निवड ही अंतिमच असते. निवडण्यासाठी अनेक पर्याय असतात याचा अर्थच प्रत्येक निवड ही अर्धवटच असते !

SEPTEMBER 25

आता एका फारच घिस्यापिट्या विषयाकडे येऊ ! भूमिका ! राजकारणात वर दाखवायला एक भूमिका लागतेच पण ती कितीही अंशांत वळवता-वाकवता यावी, अशी असावी लागते ! आणि त्याच वेळी मनात चार वेगवेगळ्या भूमिका स्टेपनी म्हणून ठेवाव्या लागतात ! हे सर्व, साध्या -- सामान्य म्हटल्या जाणाऱ्या माणसालाही समजते ! हे न समजणारा एकच भाबडा समूह म्हणजे बराचसा मराठी लेखक ! पावशा पक्षी जसा सदोदित, अथकपणे ' पेर्ते व्हा ' म्हणत गावभर फिरत असतो तसाच मराठी लेखकही सतत, अथकपणे ' भूमिका घ्या ' म्हणत दारोदार, गल्लोगल्ली हिंडत असतो ! अशा अजाणपणामुळे त्याचे सांस्कृतिक मूल्य तर खतम होतेच पण त्याची थोडीफार निर्बुद्धांतच गणना होते ! तरीही, एक आदर्शवादी, मेहनती माणूस म्हणून त्याचा थोडा मान ठेवला जातो !

एकमेकांबद्दल टोकाचा संताप असूनही, आपण इतकी वर्षे एकत्र होतो याची लाज राखत ( आणि एकमेकांची अंडीपिल्ली एकमेकांना माहीत आहेत, हे ओळखूनही ), तूटफूट झाल्यावरही एकमेकांबद्दल फार कटू काही बोलायचे नाही, आणि गरज पडल्यास पुन्हा एकत्र येऊ ही आशा व जाणीवही बाळगायची -- याला राजकारणातली परिपक्वता म्हणावे !

आपले मित्रपक्ष आपल्यावर कुरघोडी करून, आपली स्पेस गिळंकृत करून आपल्याला संपुष्टात आणण्याचे डाव कसे-कोणते खेळू शकतील -- यांचे विचार करणे, आपणही तसे वा वेगळे सुचतील तसे डाव रचत राहणे -- असे करत एकमेकांवर प्रेम करत राहणे -- हा झाला राजकारणाचा एक भाग ! दुसरा भाग म्हणजे शत्रुपक्षाची स्पेस कमी करत असतानाच आपले एकमेकांना सहकार्य कुठे-कसे होऊ शकेल, वेळ पडल्यास मित्रपक्ष होऊन आपल्याला सत्ता मिळवता येईल का -- या विचारांसह त्यांच्याशी सामना करत राहणे -- हा त्याचा दुसरा भाग ! या दोन्हीत प्रावीण्य मिळवत असतानाच अनेक भूमिगत भागही असतातच -- तो तिसरा भाग !

आपण म्हणू त्याच पद्धतीने जनतेचे हित व्हायला हवे, हे सगळ्या पुढाऱ्यांचे नक्की असते. कारण जनता भोळी-भाबडी, वेडी-बागडी आणि रांगडीही असते -- तिची काळजी घ्यावीच लागते. त्यासाठी तिला कदापि कळणार नाही असे राजकारण तर करावे लागतेच -- पण, प्रसंगी तिला पूर्ण फसवावेही लागते !

मतदारांना खूप विचार करायची संधी आहे -- युती-आघाडी तूटफुटी लक्षात ठेवायच्या, निकालांनंतर कशी जुळवाजुळव होऊ शकेल तोही विचार करायचा आणि मुख्य म्हणजे सध्या कुणाकुणाच्या छुप्या मैत्र्या असू शकतील त्याचेही विचार

करायचे !! जाहीरनामे, वचने, आश्वासने हे सगळेही विचारात घ्यायचेच ! आणि या सगळ्यांतून आपला कुठे काय फायदा होऊ शकतो, हेही पाहायचे ! आपली कामे होणेही महत्त्वाचेच की !

या चॅनेलवाल्यांनी एक जाण दाखवायला हवी -- कोणत्याही स्थानिक -- लहान पुढाऱ्यांना या तुटीफुटीबद्दल प्रश्न विचारू नयेत -- ते बिचारे अजून मुरलेले नाहीत -- त्यांच्याच मोठ्या नेत्यांनी हा जनतेचा विश्वासघात केल्यासारखे होतेय, असे त्यांना मनातून वाटतेय, तेच ते बोलतायत ! त्यांना जरा मार्गदर्शन तर मिळू द्या ! असे त्यांना बोलायला लावल्याने त्यांची करिअर बरबाद नाही का होणार ?

कार्यकर्ता १ -- आता याला न्हाई, त्याला शिव्या द्यू --
कार्यकर्ता २ -- गप येड्या, आज कायच नको -- थोडी मारून गप झोपू -- उद्यापोतर क्लियर व्हईल कुनाला शिव्या द्याच्या त्ये --

मनांमध्ये एकमेकांबद्दल कवडीचा सन्मान नसूनही निव्वळ जनतेच्या इच्छेसाठी हे सगळे एकत्र संसार करायला तयार होते, हे आज उघड झाल्यावर जनता सद्गदित झालेली आहे !

आता एक साधा फक्त भाषिक प्रश्न राहिलेला आहे --
युती ' तुटली ' आणि आघाडी ' फुटली ' असे का म्हणतात ?

दोन मजल्यांवर दोन लग्ने असतात तसे झाले !
खालच्या मजल्यावर हे आणि वरच्या ते -- असे बुकिंग होते --
गोंधळ झाला -- सरमिसळ झाली -- इकडचे तिकडे, तिकडचे इकडे, असे झाले !
तेव्हापासून आकड्यांच्या गणितात सगळे सारखे नापासच होताहेत !
आम्ही बाहेर पडू -- असे म्हणताहेत !
तरीही भोजनाची वाट पाहताहेत !
SEPTEMBER 24

शेवटी मानसोपचार-तज्ञाकडे जायचे ठरले. ते म्हणाले, थोडी महत्त्वाकांक्षा ही नॉर्मल असते पण एकमेकांच्या साथीने ती बळावते आणि तिचा मानसिक रोग होतो. त्यावर, ती विकृती कमी करणाऱ्या गोळ्या आहेत. सगळे घ्यायला तयार आहेत का, ते विचारा -- लगेच समझोता होईल !

" तू माझा जिगरी दोस्त आहेस यार ! -- काय पायजे, बोल -- " -- असे संवाद येण्यासाठी चर्चेच्या आधी एकत्र पिण्याचा कार्यक्रम हवा ! हे साले नंतर घरी जाऊन आपापली पितात -- त्यामुळे चाललाय घोळ !

चर्चा रंगात आल्या आहेत.
मधे अडवू नका.
फॉर्म भरायची मुदत वाढवून द्या.

SEPTEMBER 23

सकाळी फिरायला गेलो तेव्हा कानावर आलेला एक बुद्धिमान संवाद --
१ -- ते मिथेन वायूबियू आपल्याला नाही कळणार, पण, आपल्या दृष्टीनं या मंगळयानाची ग्रेट आणि अतिमहत्त्वाची कामगिरी कोणती ?
२ -- सोपं आहे -- एवढ्या कोट्यवधी मैलांवरून त्या यानानं एक महत्त्वाची गोष्ट करून दाखवली -- गेले काही दिवस महाराष्ट्रात सगळ्या वेड्यांच्या बातम्यांनी जो उच्छाद मांडला होता, तो थोडा वेळ तरी बंद पाडला ! -- आता तू सांग --
१ -- सोपं आहे -- या मंगळ मोहिमेला शेवटी आपण मंगल मोहीमच म्हणतोय -- यावरून आपण किती परंपरा जपणारे आहोत, पावित्र्याला किती महत्त्व देतो, तेच अधोरेखित होतंय !

काल कुंडलीशास्त्रतज्ञ दा. कृ. सोमण सांगत होते की पितृपंधरवडा वाईट नसतो – अवश्य निवडणुकीचे फॉर्म भरा. आपण अंधश्रद्धानिर्मूलनाचा कायदा करणारे लोक आहोत – अशा अंधश्रद्धांना बळी पडू नका. मला तर वाटते, तसे काही नसेलच – ही भांडणे आणि ताणाताणी खरीच असणार. हे सगळे रोज फुले-शाहू-आंबेडकरांची नावे घेणारे पुरोगामी लोक आहेत – असे कसे करतील ? आणि या राज्याला वेळेत शासनयंत्रणा द्यायला हे सगळे कटिबद्ध आहेत ! पितृपंधरवडा वाईट असल्यामुळेच कदाचित भांडणे लांबली असतील ! आता होईल सगळे नीट !

एकाच माणसाच्या गधडेपणाचे हुकुमशाही अत्याचार असंख्यांनी सहन करण्यापेक्षा सर्वांच्या गधडेपणाला वाव देणारी लोकशाहीच कधीही अधिक चांगली !

चला, भांडणे मिटली / मिटतील ! आता, मतदान केले की झाले ! मतदानाची टक्केवारी अजून खूप वाढायला हवी !

पं. नेहरू सांस्कृतिक भवन, पुणे -- पहिलाच नाट्यप्रयोग -- ' सामसूम '.

प्रा. शंकर वैद्य यांच्या ' पालखीचे भोई ' या कवितेचा अनेकदा उल्लेख होतो आहे -- ती कविता इथे नेटवर अशी सापडली --

पालखीचे भोई - शंकर वैद्य

पालखीचे भोई आम्ही पालखीचे भोई
पालखीत कोण? आम्हां पुसायाचे नाही!

घराण्याची रीत जुनी पीढीजात धंदा
पोटाबरोबर जगी जन्मा आला खांदा
खांद्याकडे बघूनीच सोयरीक होई ॥

काटंकुटं किडकाची लागे कधी वाट
कधी उतरण, कधी चढणीचा घाट
तरी पाय चालतात, कुरकुर नाही ॥

वाहणारा आला तेव्हा बसणारा आला
मागणारा आला तेव्हा देणाराही आला
देणाऱ्याचं ओझं काय न्यावयाचं नाही? ॥

बायलीचा पडे कधी खांद्यावरती हातं
कडे घेतलेलं पोर तिथं झोपी जातं
पालखीचा दांडा मग लई जड होई ॥

SEPTEMBER 22

प्रा. शंकर वैद्य यांनी लोककवी मनमोहन यांचा कवितासंग्रह संपादित केला होता. मनमोहनांची त्यांनी सांगितलेली एक आठवण --

ते मनमोहनांच्या घरी त्यांच्याशी बोलत बसले असताना मनमोहनांचा एक छोटा मुलगा आला आणि मनमोहनांना म्हणाला, “ बाबा, एक रुपया द्या – “ ते म्हणाले, “ कशाला ? आम्ही जरा महत्त्वाचं बोलतोय – नंतर ये – “ पुन्हा जरा वेळाने तो आला – “ बाबा, एक रुपया द्या – “ “ अरे कशाला हवाय ? “ मनमोहन. “ साबण आणायचाय शर्ट धुवायला – “ “ बरं, जरा वेळानं – आत्ता नाही – “. पुन्हा तो मुलगा आला – “ बाबा, शर्ट घाण असला तर सर रागावतात – द्या ना एक रुपया – “ तो म्हणाला. यावर, मनमोहन, वैद्य सरांना म्हणाले, “ काय कटकट आहे – वैद्य, देऊन टाका हो त्याला एक रुपया – “ !

वैद्य सरांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन !

--- ००० ---

प्रा. शंकर वैद्य सर ! मला सुरुवातीचे प्रोत्साहन त्यांच्याकडूनच मिळाले ! मी शाळेत असल्यापासून कविता लिहीत असे. कॉलेजात गेल्यावर त्यांना माझ्या कविता वाचायला दिल्या. ते फारच खुश झाले. माझ्या कविता अभ्यासून एमए ची एक विद्यार्थिनी त्यांवर बोलेल आणि मग माझे कविता वाचन होईल, असा एक कार्यक्रमच त्यांनी आयोजित केला ! माटुंग्याला आफ्रिका हाऊसमध्ये ते राहात, तेव्हा अनेकदा मी त्यांच्या घरी जात असे. डॉ. सरोजिनी वैद्यांनी मला कविता वाचनासाठी प्रथम आकाशवाणीवर नेले. त्या पुण्यात इथे जोशी इस्पितळात आजारी असताना मी सरांना भेटायला गेलो होतो. तेव्हाही सर तासभर माझ्याशी बोलले होते. त्यांच्या खूप आठवणी आहेत. त्यांनीच मला, त्यांच्या घरी आयोजित केलेल्या तेंडुलकरांच्या ‘ एक हट्टी मुलगी ‘ च्या नाट्यवाचनाला बोलावले होते. तिथेच माझ्या, आरती प्रभू, शांता शेळके, राम पटवर्धन आणि अर्थात तेंडुलकर यांच्याशी ओळखी झाल्या. त्या वेळी मी लिहिलेल्या दोन एकांकिका त्यांनीच तेंडुलकरांना वाचायला दिल्या. इस्माईल युसुफ कॉलेज, जोगेश्वरी ( पूर्व ), मुंबई इथे चार वर्षे सरांबरोबर होतो. सगळे तास संपल्यावर आम्ही काही विद्यार्थिविद्यार्थिनी आणि सर असे मर्ढेकरांचे ‘ सौंदर्य आणि साहित्य ‘ हे वाचून, चर्चा करून एकत्रितपणे समजून घेत असू. सर माझ्या विवाहालाही हजर होते – तेव्हा, त्यांनी संपादित केलेला कुसुमाग्रजांचा कवितासंग्रह त्यांनी भेट दिला होता. माझी पहिली नोकरी किर्लोस्कर प्रेसमधली – ती सरांच्यामुळेच मिळाली होती – त्यांनी तिथे सांगितले होते – हा तुम्हाला हव्या त्या स्टाईलमध्ये – गंभीर, विनोदी, वैचारिक – लिहू शकणारा मुलगा आहे – जरूर विचारात घ्या. माझ्या आयुष्यातल्या अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तींपैकी वैद्य सर एक होते ! त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !

Champra Deshpande shared Gaurav Mhatre's post.

Gaurav Mhatre's photo.

Samsum

SEPTEMBER 21

अशा न मिसळण्याने माणसे दुरावतील

हे कळत असूनही तसेच घडते

आपला स्वभाव दोषी वाटतो

त्यांनाही – आपल्यालाही –

--- ००० ---

SEPTEMBER 20

मी नसणेच

नॉर्मल निरामय

हे समजूनही

विकृतीच हावी होते --

सहज साधे

काही राहातच नाही --

तिची विषमुळे

खोल जात फोफावत

राहतात एकत्र जगण्यात --

आम्ही सर्व

गुंगून जातो

सर्वांनाच माझी

विकृतीच नॉर्मल

वाटत असल्याने

मीही स्वीकारतो

त्यांच्याही विषवल्ली

माझ्याही आयुष्यात --

तेच मला

सुरक्षित वाटणे

हेच माझे

असणे होते

नसण्यापेक्षा

--- ००० ---

SEPTEMBER 19

एक रहस्य होते

तिच्या मनात

संतापासह – जे

दोन व्यक्तींशी होते

संबंधित –

ती व्यक्त झाली असती

तर विध्वंस निश्चित होता

ती गप्पच राहिली

सहत, जळत

एकटी

काळ जात राहिला

वरवर हसत-खेळत

आजार लागले

शेवटी आयुष्य

संपले

त्या दोन व्यक्तीही

गप्पच राहिल्या

कुठेच काहीच झाले नाही

जणू रहस्य नव्हतेच अन

मनही ...

--- ००० ---

Champra Deshpande shared Gaurav Mhatre's photo.

एक सामाजिक काल्पनिका -- ' सामसूम ' --

फ्रेंडस,

ज्यांना जमेल त्यांनी जरूर पाहा -- मी लिहिलेले दोन अंकी नाटक --

प्रतिबिंब, पुणे प्रस्तुत, डॉ. वरदा जाधव निर्मित

एक सामाजिक काल्पनिका --

सामसूम

दिग्दर्शक -- दिलीप वेंगुर्लेकर, नेपथ्य --राजेश प्रधान.

कलाकार -- संजय डोळे, डॉ. वरदा जाधव, सूरज सातव, गौरव म्हात्रे, वंदना गरगटे.

रविवार, दिनांक २१ सप्टेंबर '१४ संध्याकाळी ०५-०० वाजता

पं. नेहरू सांस्कृतिक भवन, घोले रोड, पुणे.

संपर्क --' मनोरंजन ', पुणे -- फोन -- ९८२२६०३८८०.

विशेष -- पुण्यात नव्यानेच सुरू होणाऱ्या या रंगमंचावरचा हा पहिलाच नाट्यप्रयोग आहे !

Champra Deshpande shared Dilip Vengurlekar's photo.

Dilip Vengurlekar's photo.

SEPTEMBER 18

फ्रेंडससाठी वैधानिक इशारा --

माझ्या बऱ्याच कवितांमध्ये मुखार्थ ( दिसणारा -- वरवरचा -- अर्थ --face meaning ) वेगळा असतो आणि मुख्यार्थ ( main or inner meaning ) वेगळाच असतो -- या शक्यतेसह कविता वाचाव्यात. मी सहसा स्वतःच्या भावभावना वा सुखदुःखे व्यक्त करण्यासाठी कविता लिहीत नाही, हेही लक्षात असू द्यावे.

हसमुख संध्याकाळी
जुना बंगला झालाय पाडून
डबर उचलले की झाले !
आता इथे, नवा बांधल्यावर
आपलीच मने
नव्या दिमाखात येतील --
त्यांच्या नव्या स्वप्नांच्या
नव्या गाड्या पार्क होतील –
एक छानसे
नाव असेल बंगल्याला –
आपण कमावलेल्या नावाची
ही स्मृती असेल – की सरळ
बदलावे – नवेच ठेवावे नाव
बंगल्याचे – नकोच ते --
त्याच्या जुन्याच नावाची
स्मृती म्हणून तेच नाव
नव्याने द्यावे –
आणि यस
रातराणी हवीच !
--- ००० ---

SEPTEMBER 17

शौर्य कधी-कुठे दाखवायचे आणि शेपूट कधी-कुठे घालायची हे सगळ्यांना माहीत असते. या महान समजुतीवर आधारितच सामान्यतः माणसे जगतात. वर्चस्वाची हाव ही सगळ्यांतच असते आणि ती या समजुतीच्या कलाकलाने साध्य करणे हेच सगळ्यांचे ध्येय असते. कोणत्याही जाती-धर्म-विचारसरणी वाल्यांकडून, याच ध्येयामुळे इतरांवर अन्याय होत असला तरीही, तिथे जर तंगडे मोडून हातात मिळण्याचा धोका असेल तर माणसे बिचकून राहतात. नुसते बरोबर असण्याला शून्य किंमत असते. वादात जिंकता येणे आणि एखादी सीट निवडून आणता येणे यांचा काहीही संबंध नसतो. माणसांमध्ये सज्जनपणाचे वा न्यायीपणाचे असे दर्जात्मक फरक कोणत्याही जाती-धर्म-विचारसरणीमुळे असू शकत नाहीत. तरीही शौर्य दाखवणे आणि शेपूट घालणे – या साच्यातून माणसे सुटू शकत नाहीत ! सगळेच जमेल तिथे शौर्य दाखवतात पण त्यांनी शेपूट कधी-कुठे घातली हे फक्त ओळखायचे असते !

SEPTEMBER 16

पक्षी आपापले रूटीन चोख पाळताना दिसतात !
' आळसा ' चा शोध माणसानेच लावला असावा !

SEPTEMBER 15

टप्प्याटप्प्याने
मला फूल समजेल
टप्प्याटप्प्यानेच
झाड समजेल –
ढग समजेल
नदी समजेल
पायवाट समजेल
आकाश समजेल
दुःखमुक्ती समजेल

कशासाठी हे ?

किती काय काय
घ्यायचेय समजून ?
संपेल का सगळे ?
संपतील का टप्पे ?

हा उद्योग कंटाळवाणा आहे
निरर्थक काम नुसते
समजणेही समजणे
असेलच असे नाही

ही फालतू मेहनत
न करता
या क्षणात
आहे का सगळे शक्य ?

होतेय की नाही
तेही न समजणाऱ्या माझ्या
प्रगतीत मला इंटरेस्ट नाही

अशी प्रगती करत राहणे
वा झोपून राहणे
एकच
असे मला वाटते ...
--- ००० ---

नुसता भारतीय समाज म्हटला तरी त्यातल्या वेगवेगळ्या समूहांच्या वेगवेगळ्या मान्यताप्राप्त नीतीकल्पना असतील. आणि त्या त्या नीतीकल्पनांप्रमाणे पूर्णपणे वागू शकणारे कोणत्याच समूहात कुणीच असण्याची शक्यता नाही. आदर्श आणि प्रत्यक्ष जगणे-वागणे यांतला आंतरविरोध, हे तर एक सर्वसामान्य सत्य आहे. तरीही, समजा, एक सर्वमान्य नीतीरचना काढली शोधून तर तीबरहुकूम न वागणाऱ्यांबद्दल इतर सगळेच चिडून बोलणार. नवीन संशोधनाप्रमाणे, तुम्हाला हव्या तशा

आठवणी जर तुमच्या मनांत रोपण करून मिळणार असतील तर जगण्या-वागण्याची एक आदर्श अशी समाजमान्य रचना रोपण करून मिळणेही शक्य होईल, अशी कल्पना करायला हरकत नाही. सगळेच हिरीरीने त्या रचनेची भलावण करणारेच असतात. तरीही, उद्भवणारे आंतरविरोध घालवण्यासाठी सर्वांच्या मेंदूंत योग्य ते बदल करणे – आदर्श नीतीरचना फिट करून देणे – हे समजा शक्य झाले – तर समाजातले किती टक्के लोक हे बदल करून घ्यायला तयार होतील ? की आम्ही आदर्शच जगत-वागत आहोत – आम्हाला या बदलांची गरजच नाही, असे म्हणतील ? समजा, हे बदल करून घेणे सक्तीचे केले तर, अशा सर्वमान्य नीतीकल्पनांच्या बाजूने मोठ्या आवाजात जे नेहमीच बोलतात त्यांना या बदल-प्रकल्पातून सवलत द्यावी लागेल का ? समाजाचे हे अनावश्यक प्रॉब्लेम्स यातून नष्ट होतील का ? काही विपरीत घडल्यानंतर एकमेकांना कंडेम करणे वा शिक्षा करणे यापेक्षा हे अहिंसक आणि माणुसकीचे नाही का होणार ?

प्रवाही मन थांबत नाही
कोणत्याही नात्यावर
मालकी समजून ...
त्याचे वाहते पाणी
इतरांना असुरक्षित
वाटल्याने मुरगाळून
ठेचले जाते आपुलकीने
त्याला प्रेमळ करण्यासाठी ...
आता होऊ शकतो
त्याचा अपमान --
ते खूनही करू शकते
प्रेमामुळे ...
--- ००० ---

SEPTEMBER 13

अनुभवांचा पसारा आणि कलानिर्मिती -- हा विषय येतोय समोर.

SEPTEMBER 12

लोकशाहीचा सर्वात मोठा फायदा म्हणजे बहुसंख्य लोक आशावादी राहतात !

त्यामुळे देश उत्साही राहतो !

ना तिचे माझ्यावर ना माझे तिच्यावर

असू शकते प्रेम --

-- फक्त प्रेम असते

जेव्हा असते पूर्णता

एकात्मतेची .....

--- ००० ---

SEPTEMBER 11

सूर्यास्त आवडला म्हणून त्याचे सुख

ओरबाडून खाता येईल ?

– या प्रश्नाने सुखच थांबले !

तो तर अमर्याद खजिना सौंदर्याचा

मनात न मावणारा – न झेपणारा !

तसे तर झाडाचे एखादे पानही न झेपणारे !

परस्पर असू द्यावे सगळे

असेच शेवटी मनाला समजले

तेव्हा

ज्या पानामागे होत होता सूर्यास्त

ते पानच सहज

खाऊन टाकता आले !

--- ००० ---

SEPTEMBER 9

डोके दुखत असेल

मन जखमी असेल

तर शक्यच नाही –

कविता माझी होण्यासाठी

मला बाजूलाच व्हायला हवे ...

--- ००० ---

SEPTEMBER 8

समोर घडणारी एक घटना म्हणजे

पाहणाऱ्या दहांच्या दहा घटना

अशा अब्जावधी क्षणोक्षणी जगात ...

खूपजणांशी संबंधित घटनांचा

होतो इतिहास भावना गोंजारत ...

मनेच घडवतात स्वतःची ओळख ...

नेमके, खरे, निर्विवाद, स्पष्ट

काहीच नसते ... तरीही

अशाच एखाद्या मानसिक

व्यक्तीचे नाव देता येते एखाद्या

इमारतीला वा रस्त्याला

ज्यामुळे आपला विश्वास

जगण्यावरचा होतो घट्ट ...

मनांनीच घडवलेल्या

मानसिक गोष्टींना

दगडासारख्या घट्ट, सत्य

करण्याच्या या प्रवासात

नसल्याचे असणे करण्याच्या

सुरक्षितही वाटते ...

भयही जाणवते ...

थकवाही येतो ...

--- ००० ---

SEPTEMBER 7

कलेत रंजनमूल्य, वेगवेगळ्या प्रकारांनी का असे ना, असावेच लागते.

शिवाय, काहीजण म्हणतात, कलेत ' घेण्यासारखे ' काही असायला हवे. म्हणजे काय ?

कलेचे दर्जात्मक / सांस्कृतिक मूल्य कोणत्या गुणांवर ठरावे ?

( काहीजण म्हणतील, यावर खूप चर्चा झालीय जगभर. असू दे. आपण इथे फ्रेंडस आहोत, आपले आपणही बोलू शकतो. )

SEPTEMBER 6

Sunil Tambe --यांच्या पोस्टवर मी दिलेली एक कॉमेंट -- आणि थोडा अधिक मजकूर --

धर्म मानणारे आणि न मानणारे या विभागणीत फारसा अर्थ नाही -- कारण दोघेही वैचारिक क्षेत्रातलेच बोलत असतात आणि धर्माचा क्षण कोणता हे दोघांनाही समजत नसते. एकात्म मन म्हणजेच देव, असे तुकाराम म्हणतो -- जेके इंटेग्रेटेड माईंड म्हणतात -- ते काहीही न समजून घेता इथे लोक ' देवाला रिटायर करा ' म्हणून भाषणे देत सांस्कृतिक आघाडीवर महत्कार्य करत असल्यासारखे वर्षानुवर्षे चमकत आणि गाजत राहतात ! तुकाराम म्हणतो की देव अंतरे ते पाप -- म्हणजे मन विभक्त / विदीर्ण होणे,म्हणजेच त्याची एकात्मता जाणे -- हेच पाप. अशा मनाने तुम्ही तीर्थयात्रा करा वा सत्यनारायण वा वारी -- ते पापच. ज्ञानेश्वर नऊव्या अध्यायात पापात्मक पाप आणि पुण्यात्मक पाप -- यावर बोलतात -- अर्थ तोच आहे. सारांश, आस्तिक आणि नास्तिक मूलतः सारखेच विदीर्ण, हिंसक आणि विकृत असतात. एकाने दुसऱ्याला वेडे म्हणण्यात फारसा काही अर्थ नसतो.

SEPTEMBER 5

निसर्ग वेडपट असतो

त्याला अक्कल नसते –

जोराचा गार वारा, पाऊस
गारठा आणि सततची संध्याकाळ
यांनी खूप लोक आजारी झालेत
हे त्याला समजत नाही ...
आजारी कंटाळतात
काय हे, सलग तीनतीन चारचार दिवस ?
त्यांना हळूहळू मूळ आजारापेक्षा
निसर्गाच्या या गधडेपणाला मानसिक
प्रतिकार करायचाच त्रास
जास्त व्हायला लागतो --
( निसर्गापुढे आपण किती क्षुद्र
हे समजायला त्यांचे डोके
ठिकाणावर राहिलेले नसते ) –
तरीही त्याच्या डोक्यात प्रकाश पडत नाही
ऊन तर नाहीच आहे सलग चार दिवस –
वाऱ्यामुळे झाडे सगळी वेड्यासारखी
हलत राहतात, कधी डुलत राहतात –
आजारी वैतागतात – निसर्गाविरुद्धचे
हे मानसिक द्वंद्व तरी आता मिटावे
असे त्यांना वाटू लागते ...
( आणि त्याला तरी कंटाळा कसा येत नाही
-- असाही विचार येऊन जातोच -- ) आणि
या सगळ्यावर जणू कळस चढवल्याप्रमाणे
जणू मुद्दाम सूड घेत असल्यासारखी वाटणारी
– वाऱ्याच्या घूं ऽऽ आवाजात – सगळीकडे
बहरलेली हिरवाई !!!
--- ००० ---

Gliding O'er All

By Walt Whitman

Gliding o'er all, through all,
Through Nature, Time, and Space,
As a ship on the waters advancing,
The voyage of the soul—not life alone,
Death, many deaths I'll sing.

--- ००० ---

असा ' शिक्षक ' आज सापडेल ? -- हा हेरंब कुलकर्णी यांचा पुणे मटातला उत्तम लेख -- जे कृष्णमूर्तींच्या दृष्टीने शिक्षक म्हणजे काय, हे सांगणारा. जेकेंची तीन पुस्तके शिक्षकांनी जरूर वाचावीत -- (1) Education and significance of Life (2) Life Ahead (3) This Matter of Culture.

SEPTEMBER 4

आमच्या घराण्याला शिक्षकी पेशाची परंपराच आहे -- आजोबा, वडील, काका, एक चुलत भाऊ -- सगळे शिक्षक होते ! शाळेत वा कॉलेजात ! आम्ही काहीजण जरी शिक्षक होऊ शकलो नाही तरीही एक ब्रीद प्राणपणाने संभाळत आलो -- आपल्याला काही येवो न येवो, दुसऱ्याला शिकवत राहायचे ! त्यामुळे ०५ सप्टेंबर हा खास आमचा दिवस वाटतो आम्हाला ! या शिक्षकदिनानंतर, अधिकच निष्ठेने आम्ही कामाला लागतो !

आजच्या पुणे सकाळमध्ये डॉ. अनिल लचके यांचा ' भूलि हुई यादें ... ' हा एक अत्यंत इंटरेस्टिंग लेख आलेला आहे. त्रासदायक आठवणी मनातून पुसून टाकता येणे, जे घडले नाही अशा आठवणी मनात फिट करून मिळणे, स्वभाव बदलून मिळणे आणि खऱ्या व खोट्या स्मृतींत फरकच नसणे -- असा सगळा अजब मजकूर आहे त्यात ! म्हणजे आपला स्वभाव आणि व्यक्तिमत्व यांची कौतुके जातील आता ढगात ! आणि कटकटच नाही -- ज्या व्यक्तीशी संग व्हायला हवा होता, असे मनात होते, त्या व्यक्तीशी तो झालेला असल्याची आठवणच बसवून मिळेल मनात ! प्रॉब्लेमच नाही ! बोला ! ( थोडी अर्थात कल्पनाही वापरतोय, हे लिहिताना. )

SEPTEMBER 3

नाल्याचे पाणी पुलावरून सुसाट
भयानक म्हणून एस्टी थांबलेली
संध्याकाळ संपून रात्र होतेय
एका बिंदूवरची त्रस्तता
पुन्हा मागे जायला लोक
नको म्हणताहेत – पण काही तास
लागले तर काही नाशकारकही घडेल
-- प्रवासी वेगळ्याही विचारात –
स्त्रियाही आहेत ! – जावे का मागे ?
ओसरेलही पाणी थोड्या वेळात –
मग एका तासात येईल पुढचे गाव --
निर्णय चुकू शकतो – रात्र झालीच आहे
पोचायला उशीर, हे आता दुय्यम झालेय
काहीही घडेल –
लूट, बलात्कार, मृत्यू –
कुणीही कुणालाही सामील असू शकते
असा काळ --
इतकी अनिश्चितता मनाला
मान्य नाही होऊ शकत –
जगावे तर लागणारच ...
आत नुसते दोन निळे दिवे लावलेले –
एखाद्याच्याच बोलण्याचा आवाज ...
बाहेर अंधार ... पाण्याचा आवाज ...
एका स्थिर बिंदूवरची
वरवर शांत त्रस्तता ...

हे असेच नाही राहणार फार वेळ

तरीही ...

--- ००० ---

SEPTEMBER 2

Viral diseases are not treatable with antibiotics, which can only cure bacterial diseases and infections. However, the most common viral diseases, the common cold and the flu, are self-limiting in generally healthy people. This means that the viral infection causes illness for a period of time, then it resolves and symptoms disappear as your immune system attacks the virus and your body recovers. -- ही पूर्ण माहिती नाही पण फ्रेंडसच्या जनरल माहितीसाठी दिले आहे. व्हायरल आजारावर सामान्यतः लक्षणांवर उपचार केले जातात. ( व्हायरसवर ॲटॅक करून त्याला नष्ट करणारे औषध उपलब्ध नाही, असे कळते. )

SEPTEMBER 1

आवडते, नावडते कोणतेही पुस्तक काही ना काही प्रभाव टाकतेच. विचार, भावना, स्वभाव यांत काही ना काही बदल घडतातच. मला ते महत्त्वाचे वाटत नसल्याने मी यावर बोलणार नव्हतो. एखाद्या शिक्क्यासारखा एक स्थितिशील प्रभाव पडणे, हे खरे तर मला काहीसे घातकच वाटते. माझ्या दृष्टीने महत्त्वाची पुस्तके ती की ज्यांनी माझी जगणे समजून घेण्याची प्रक्रिया अर्थपूर्ण केली – त्या प्रक्रियेला ती पुस्तके पूरक ठरली आणि सहज निघून गेली ! आता मला त्यांचे प्रभाव सारखे बरोबर घेऊन फिरायची गरज नाही. ती दहा पुस्तके मी अशी सांगेन –

१. तुकाराम गाथा.

२. ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभव.

३. आत्माराम.

४. First and Last Freedom

आणि – Tradition and Revolution – जेके.

५. A portrait of the Artist as a Young Man – Joyce.

६. काफ्काची ‘ ट्रायल ‘.

७. पिरांदेल्लोचे ‘ सिक्स कॅरॅक्टर्स – ‘

८. बेकेटचे ‘ वेटिंग फॉर गोदो. ‘

९. खानोलकरांचे ‘ एक शून्य बाजीराव ‘

१०. आयनेस्कोचे ‘ ऍमिडी ‘.

AUGUST 31

तिकडे अमिताभ तापाने आजारी, इथे हजारो पुणेकर व्हायरल आजारांनी त्रस्त अशी मोठी बातमीच आहे ! त्यातच आपलेही उरकून घ्यायचे ठरवले ! औषध चालू आहे !

August 2014

AUGUST 31

मनात असले तर वेळ काढता येतो, वगैरेही खरेच आहे थोडेफार, पण वेळ नाहीय, हेही खरेच आहे -- उगीचच अमान्य करू नये ! तर, वेळ नाहीय आणि त्याला स्वतःलाच महत्त्वाच्या वाटणाऱ्या अनेक गोष्टी त्याच्याकडून वेळाची मागणी करताहेत -- हे कधीही घडू शकते -- अशा वेळी माणूस काय करेल ? ( वेडा होणे, हा पर्याय सोडून -- )

काव म्हणणे आणि फूल फुलणे

निमित्त असलेले बरेच ना !

--- ००० ---

AUGUST 30

एखादा श्रीमंत माणूस गरीबांकडे पाहून म्हणतो की कसे जगतात बाबा हे -- पाहवत नाही ! -- तसे आहे का तुकारामाचे ' बुडते हे जन देखवे ना डोळा ' ? अर्थातच नाही. यातून बाहेर पडणे सहजसाध्य, सोपे असूनही हे का भोगताहेत ही दुःखे ? -- असा भाव आहे त्यात ! तुकारामाने आणि इतरही अनेक संतांनी, हे समजणे सोपे असल्याचे वारंवार सांगितलेले आहे. ( मी तुकारामाला त्याच्या आशयासहच ग्रेट कवी मानतो -- नुसता कवी म्हणून ग्रेट -- असे नाही ! ) पण अलिकडे, हजारोंपुढे प्रवचन देणारे आणि टीव्हीवर प्रवचन देणारे काही बाबा -- तुकाराम म्हणत असला तरी अवघड आहे हं हे ! -- दम असावा लागतो ! धाडस लागते ! -- असे सांगताना दिसतात ! त्यांना कुणाचे उदात्तीकरण करायचे असते ? तुकारामाचे ? की स्वतःचे ? -- बघा, मला कसे समजलेय ! -- असे ?

हातांत गुच्छ दिल्याप्रमाणे
शब्दांची निःशब्दता
अनुभवावी

साधी दृष्टी होती
मनाला स्पर्शत
मनहीन असणारी
--- ००० ---

इमारतीचा एक खांब अचानक ढिला
झालेला दिसतो धोक्याचेच करत
तिचे भविष्य – ती सवयीने पाहते
आरशात तर प्रतिबिंब ओळखूच येत नाही
ती एक ढिगारा कशी असेल ? ती
काकुळतीने पाहते ब्यूटी पार्लरकडे
तिथल्या सर्व बाटल्या तोंडे फिरवतात

ती झाली पुन्हा नीट तर पाहू – तोवर
नव्या नवेल्यांनाच नटवू – असे म्हणत
त्यांची मालकीण समजुतदारपणे
बट मागे सारते, ओढणी सावरते
हसते ...

इथे इमारत भीती टाकूनच देते
प्रतिबिंबाकडेही पाहात नाही ...
बाटल्यांचेही तिच्याकडे लक्षच
नसते ...
--- ००० ---

AUGUST 29

गेल्या दोन दिवसांत, २१ व्या शतकातल्या सुमारे १५० चिनी कविता वाचल्या ! खूप रिच वाटले ! कुठेही, ' भूमिके ' चा बडिवार, विचारसरणीच्या टिमक्या वा दुसरे लोक कसे नीच, हलकट आहेत असा आविर्भाव हे काही जाणवले नाही ! साध्या, मानवी जगण्याचे -- भावभावना, विचार, प्रश्न, सौंदर्य -- यांचे भान घेणाऱ्या वाटल्या त्या कविता ! मानवजातीचा मौल्यवान ठेवा ! मला ते सगळे कवी माझे बांधवच वाटले !

सुंदर नटनट्यांच्या झगमगाटी गाण्यांतून
काहीशा उत्तेजक
मिळते लोकांना संपन्न, स्वप्नील झोप सुखाची --
बदल्यात त्यांना मिळतात काही कोटी
त्यांच्या त्या भापक कलेचे – त्यांचा प्रभावच
राहतो करोडो लोकांच्या जगण्यावर
त्यांच्या मनांत घुसूनच राहिल्याने
ज्यामुळे ते होतात ग्लॅमरस
सेलेब्रिटी – ज्या सुखात लोळत ते सतत
आदरणीय असे जगत मोठे होतात

त्यांनाही असते गरज तशीच स्वप्नील गाण्यांची
ज्यासाठी ते असे काही शोधतात ज्याच्या
खरेपणावर त्यांना विश्वास ठेवता यावा --
त्यांचीही मने लोकांसारखीच खिन्न असतात

काहीच सखोल घडत नाही – वरवर, भरभर
इथले उरकून तिकडे आणि खूप पैसे, खूप
ताण, थकवा यांतून मुक्त होत राहणे ब्रँड बदलत
असे लाईफ झाल्याने येत राहतात त्यांच्या मनांत
आत्महत्येचे विचार – कधी कधी त्या घडतातही

लोक त्याचेही भांडवल करतात
नुसत्या पैशांनी समाधान नाही मिळत
अशा आत्मगौरवी चर्चा करत
त्या ग्लॅमरवाल्यांच्या सह्या वा निदान लांबून दर्शन
तरी घेण्यासाठी ते रांगेत उभे राहतात ... तेव्हा त्या
सगळ्यांच्या मनांतून लाळ गळत असते ...
--- ००० ---

नुसता वरचा थर सरकवला की जगच बदलते
खाली खूप आठवणी दिसतात – फक्त इथेच
असणाऱ्या – खरे तर नसणाऱ्याच – तेव्हा
असे नव्हते आणि आताही पुढच्यासारखे नाहीय --
मी का संभाळतोय जे कुणालाच मान्य नाहीय
माझ्याशिवाय – मी तसाच तोच कसा ?
या माझ्या अदृश्य आठवणी अब्जावधी
माणसांपैकी कुणीच स्वीकारणार नाही
झाडांखालच्या, दगडांच्या खडबडीत, कुबट
अंधारातल्या, गरिबीच्या, रोगाच्या ...
त्यांना पंख फुटू शकत नाहीत – खरे तर
त्यांचे जगणे संपलेले आहे – तरीही त्या
माझे जगणे व्यापू शकतात – सडवूही
शकतात – आणि भुलवू शकतात थोड्या
भिकारड्या क्षणांनी ज्यांत धुंदी मिळाली होती
जी मन पुन्हा असत्यपणे जगू शकते --
आत्ताचेही मन त्या आठवणींनीच भरलेले आहे
ज्या खोट्या असल्याने खरे दिसूच देत नाहीत --
माझ्या शरीराला आहेत त्या बाह्य गोष्टी
हानिकारक – अस्वीकार्य – ज्यांनी रोगग्रस्त
होते ते – पण त्यांच्याच प्रभावातून ठरवावे लागते

त्यांचा त्याग करणेही – जो घडूच शकत नाही –

आता खरे तर मला हे जगणे माझे नसून

त्यांचेच चाललेय, असे वाटतेय – त्या तर

खोट्या आहेत – मीही खोटा आहे – हे सगळे

त्यांच्याच खरेपणातून !

कंटाळा आला तरीही !

खरे काही कळतच नाही –

--- ००० ---

AUGUST 28

मुलांना आपण काय सांगू शकतो ?

शाळेचे बूट स्वच्छ ठेवा – हेच ना ?

याहून अधिक अक्कल तरी कुठे आहे ?

ढग फाडणे, जमिनी नापीक करणे

सहवासाचे सुख नष्ट करत जाणे

-- यांबद्दल काय बोलणार आपण ?

-- पाण्यात विष मिसळले जाईल

पोस्टातून विनाशाचे पार्सल येईल

बॉंब पडतील, पूल नष्ट होतील

औषधे मिळणार नाहीत –

स्त्रिया-मुलांसह हजारो

नष्ट वा अपंग होतील –

-- हे सर्व अटळ समजूनच आपण

त्यांना आनंदी राहायला शिकवतोय !

-- आपण काय शिकणार ?

आपण मोठे आहोत –

मुलांना शिकवणे

हे आपले कामच आहे !

--- ००० ---

योग आणि ध्यान या एकूणच मानवजातीला मिळालेल्या अमूल्य देणग्या आहेत. यांचा आरोग्यासाठी, विशेषतः हृदयरोगातून मुक्त होण्यासाठी, होणारा उपयोग आता शास्त्रीयदृष्ट्याही जगन्मान्य आहे. यात आता आपल्या उत्साही कार्यकर्त्यांच्या नव्या योगदानाची भर पडलेली आहे -- ती म्हणजे -- प्रचंड आवाज ! दर्शनाच्या निमित्ताने अशा रोग्यांना इथे आणायचे -- हृदयरोगच काय भवरोगापासूनच त्यांना मुक्ती मिळू शकते ! शिवाय प्रत्येक माणूस या ना त्या प्रकारे कुणाला ना कुणाला विघ्न वाटत असतोच -- तो जाणे म्हणजे विघ्नहरणच ! अशा चांगल्या गोष्टींना दादही देता आली पाहिजे !

नष्ट हॊण्याच्या शक्यता या
शिल्लक राहण्याच्या शक्यतांहून
नुसत्या अकल्पनीयच नव्हे
तर अमर्यादही असतात –
माझ्या शर्टाची बटणे
तू काढणे, हे बाहेरच्या
पावसाइतकेच धुवांधार –
माझ्या कृती तर तुला
बेशुद्धच करणाऱ्या --
हे विचाराने घडते की भावनेने
की स्वप्नाने ? -- एकच होणे ? !
आपण दोघेही आधीचे नष्ट
म्हणजेच आधीच्या आपल्या
असण्याच्या मर्यादाच नष्ट --
तुझ्या कोणत्याही प्रश्नाला
माझे एकच उत्तर असते –
‘ देहांचेही तसेच असते ‘ –
आता सध्या तर तुला
हे सत्यही नको असते !
तुझ्या आधी मी नष्ट व्हायला
तयार असतो, पण त्यालाही

तू तयार होत नाहीस –

--- ००० ---

I have no ambitions nor desires.

To be a poet is not my ambition,

It's simply my way of being alone.

-- Alberto Caeiro, "The Keeper of Herds" --म्हणजे फर्नांडो पेसोआ.

' द अनएक्स्पेक्टेड गेस्ट '

' एक अनपेक्षित पाहुणा '

या नाटकाच्या बोर्डाखाली

लंडनमध्ये

एका नाट्यगृहासमोर उभा असलेला

असा माझा एक फोटो आहे

तो खरे तर

या जगामध्ये उभा असलेलाच आहे

असेच मला वाटते !

--- ००० ---

AUGUST 27

कवितेत स्वतःचे वा दुसऱ्याचे मन

मुरगाळण्याचा क्रूरपणा आहे का ?

त्याशिवाय जगणे अशक्य आहे !

ते नसेल जमत तर कवितेचा

आणि

जगण्याचा संबंधच नाही !

स्वतःचे वा दुसऱ्याचे मन मुरगाळणे

हे अत्यंत कंटाळवाणे आणि वेदनामय

भ्रमिष्ट आणि वेडे करणारे – सुरक्षित

जगण्यासाठी जगणेच थांबवणारे ! त्याचा

आणि

जगण्याचा संबंधच नाही !

--- ००० ---

आवडलेल्या ओळी --

Where are they going these folk

Pride of the cities

Village musicians

The crowd wildly dance

And I'm only this anonymous passer-by,

Or someone else whose name I've forgot

--- Philippe Soupault (1897-1990)

AUGUST 26

" या गॉगलमधून का असे ना, आपल्याकडे एकदा पाहिले तरी जावे, असे वाटते खरे ! " -- एखाद्या सुंदर फोटोखाली द्यायला सुचते असे एखादे वाक्य, पण नाही देत ! कुणाला कितपत विनोद, गंमत चालेल, याचा आपल्याला अंदाज नसतो !

तो पक्षी लांब उडत गेला

त्याची ही कृती मला दिसावी

असा काही त्याचा हेतू नव्हता

मी ते पाहिले असेल हेही

त्याच्या गावीही नव्हते

आता हीच अशीच घटना

पुन्हा कधीच घडणार नाही
त्याचप्रमाणे डोक्यात येऊन गेलेला
नोकरी सोडण्याचा विचार
पुन्हा तसाच्या तसाच
कधीच नाही येणार
-- प्रत्येक क्षण असा अंतिम असूनही
शिळे काय राहते मग सतत ?
एखाद्या क्षणी सगळेच
का नाही होत अंतिम ?
कोणतीही कविता
पुन्हा
तीच तशीच नसते
हीच का नाही होत
अंतिम ?
--- ००० ---

AUGUST 25

मी स्वतःकडे डोळे मिटतो
तेव्हा ते आपोआप
कवितेकडे उघडतात
कविता म्हणजे – जे आहे ते --
जे स्वतःचे नसल्याने ‘ माझे ‘
म्हणून मिरवता येत नाही --
‘ कशाला कविता ? ‘ – म्हणणारा
भ्रमाचा प्रचारक असतो – हे नक्की –
--- ००० ---

पुरुष दोन वेळा

प्रेमासाठी मन मोठे करतो

तिसऱ्या वेळी म्हणतो

उडत गेले –

-- त्रास होतोच --

त्याच वेळी स्त्रीचेही तसेच झाले

तर तुटूही शकते

-- याहून वेगळे काय ? --

-- ही शक्यताच दिसत नसते ? --

भोळेपणा, भावनिकता

अवलंबित्व, उदात्तता

ये सब छोड दो --

-- मग काय प्रेम म्हणजे ? --

पूर्ण सोडता कसे येईल हे ?

थोडा तरी वेडेपणा असणारच --

तो एकमेकांचा अबाधित

ठेवण्याची अक्कल

म्हणजेच प्रेम !!!

( भूलना मत ! )

--- ००० ---

AUGUST 24

एखाद्याच्या हातून चुकून ग्रेट काम होण्याची शक्यता कलाक्षेत्रात सर्वात जास्त असते !

डोंगर पाहून त्याला काही कळते

टॉवर पाहून आणखी काही

मग तो अग्रक्रम ठरवतो

कोणत्या परिस्थितीत

डोंगरतत्त्व जास्त प्रभावी असते
वगैरे ठरल्यावर ते
त्याचे स्वतःचे आकलन ठरते
या सर्वाऐवजी
रस्ते पाहून काही कळलेला
समोर आला
तर तो गोंधळतो वा बावचळतो
त्याच्याकडे प्रतिवाद नसतो
मग तो नियती हा विषयच
त्याज्य असून त्या ऐवजी
झाडाची पाने अधिक प्रभावी
असल्याचे सांगतो

त्याच्या चिंतनाची पुस्तके निघतात
तोंडात बोट घालावे
असे ते विचारधन पाहून
लोक धन्य होतात ...
--- ००० ---

मी खूप केलाय विचार
दुसऱ्या कुणाचेच

मला पटत नाही
त्यांची तंबाखू

चघळत ते बोलणार
माझ्या लहरींचा झालाय

आता समुद्र काळा

माझ्याच प्रचंड

छळ करणारा
पाहतात ते

माझ्याकडे –
घाबरतात ...
--- 000 ---

AUGUST 23

Champra Deshpande shared a link.

Paul Valery Quotes at BrainyQuote
brainyquote.com
A poem is never finished, only abandoned.
-- Paul Valery

तथाकथित सांस्कृतिक-नैतिक सवयी
दारिद्र्य, अतोनात कष्ट, हीन
वागणूक मिळणारे जिणे
अशा गोष्टींमुळे
स्त्री-पुरुष संबंधांचे क्षेत्र
रुक्ष, उजाड, वैराण
झालेले –
खाली वा तिसरीकडेच पाहात
बोलणे – सौंदर्य जाणवणे
हा जणू अपराधच असल्याप्रमाणे
सतत टाळाटाळ करणे

नाजुक भावभावना उद्भवूच नयेत
अशा दडपत राहणे
विभ्रम, हालचाली, नजरा
दिसूच नयेत
अशा हद्दपार करणे
असे करंटे जगणे एकीकडे
आणि
दुसरीकडे असंख्य आकर्षणांचे
ब्रेक-अप्सचे, गुंतागुंतींचे जगणे –
आणि
पतिपत्नी असून शिवाय
प्रियकर-प्रेयसीही आहेत
हे तर अभावानेच घडणारे --

सारांशाने
अंधारात कोंडून घेत
स्वतःला गोंजारणारे
आत्ममैथुनाचे जगणे

नाजुकता, देण्याची भावना
क्षणोक्षणीचे नावीन्य देणारे
' असणे ' -- लुप्त

जगण्यातल्या या एका प्रमुख
ऊर्जा-विभागाचे
वाळवंट घडवत -- वाढवत नेणारा
समाज
मुकत, चुकत जाणारा –

कामे काही ना काही
होत राहतात ... विकासही
होत राहतो ...
हे असे सगळे
असूनही ...
--- ००० ---

तीन पिक्चर्सचे संवाद, म्यूझिक
यांचे अस्पष्ट अजब मिश्रण
ऐकत बसून मल्टिप्लेक्सच्या
लॉबीत प्रतीक्षेत बाहेर
एकच काला
आपल्याही डोक्यातला
आपणच हीरो असलेला
एकच पिक्चर कंटाळा
आणतो वारेमाप --
म्यूझिकचे तुकडे जवळ
ठेवून योग्य ते त्या त्या वेळी
वापरून पाहावे जगताना ...
( त्यामुळे परिणाम वाढून
पिक्चर अधिकच बोअर
व्हायचा धोका आहे ! )

जगण्यात असावे काही
भडक, चटकदार, धोक्याचे
जे ठरावे निराकरणही
सर्व प्रश्नांचे – ( !!! )
--- ००० --

AUGUST 22

सलग दोन चित्रपट चित्रगृहात जाऊन पाहिले ! ' पोश्टर बॉयज ' आणि ' रेगे ' ! आपले काही फ्रेंडस त्यांत असल्यामुळे ! अभिजित झुंजारराव, महेश जोशी, प्रवीण तरडे, हृषिकेष जोशी, विद्याधर जोशी, नेहा जोशी, अदिती देशपांडे, राजू बावडेकर आणि आणखीही असतील ! मस्त वाटले ! मला ' पोश्टर बॉयज ' जास्त आवडला ! हा असा कारनामा खूप वर्षांनी केला ! पूर्वी मी एका मासिकात नाट्यचित्रपट परीक्षणे लिहीत असे तेव्हा दोनतीनदा असे केले होते -- एकदा तर तीन सलग ! मानधन मिळत नसे पण झालेला खर्च मिळे ! तेवढेच बघून तर होतेय, या विचाराने मी ते काम करत असे !

AUGUST 21

एका रिकाम्या योगिक इस्पितळातल्या
एका खोलीत थांबलो होतो एकटा
नुक्ताच मिसरूड फुटलेला --
एका रात्रीचाच तर प्रश्न होता –
बिनफोनांचा काळ होता –
धुवांधार पाऊस रात्रभर --
त्याचबरोबर माझे आजारपण
बॅगेतली औषधे ओलांडून
वाढत चाललेले, जवळपास
कुणी नाही, डॉक्टर सकाळीच येणार –
बंद दारावर आतून
विवेकानंदांचे फाटलेले कॅलेंडर
आणि मी !!!
भयानक रात्र ! फक्त पाऊस असलेली –
माझ्या आजारपणाच्या पूर्ण विरोधातली !
दिवा चालू ठेवून मरणाच्या टोकावर
भयानक हालात बसून होतो –
रात्रभर !!!
कुणीच नव्हते – पाऊस फक्त
जणू मृत्यू बनून ! रात्रभर !

झाली शेवटी सकाळ
माझी अवस्था पाहून त्वरेने
हालचाली झाल्या –
केवढी प्रचंड उशिरा झाली होती ती सकाळ –
तरीही उपकारच – तिचेच –
मनात तिचे आभारही होते – संतापही –

तिला त्याचे काहीच नव्हते !
तिच्यात खरे तर मी सामावून
जायला हवे होते – असेच तिचे
म्हणणे असावे ! जणू !
मीच आडमुठा होतो ! मस्तवाल !
जणू !

भेटून फक्त सल्ला घ्यायचा म्हणून मुद्दाम
वाटेत उतरलो होतो त्या गावात --
" या काळात पेशंट नसतात इथे, पण ठीक आहे
राहा तुम्ही – सकाळी भेटतील डॉक्टर – "
या संवादानंतर राहायचे ठरल्याने
सोबत आलेले शेजारचे शिंदे परतले होते –
तेव्हापासून जणू मी अधिकाधिक हलकट
नीच बनत गेलो होतो !
रात्र, पाऊस, एकटेपणा, भीती
यांच्या विरोधात --
तरीही माझा
तिला राग नव्हता
जणू --
--- ००० ---

धुरकट होती संध्याकाळ
काहीच न कळण्याची जाणीव देणारी.
चालत होतो एका संन्याशाबरोबर
आला अचानक एका बेडकाचा आवाज
जिवाच्या आकांताने.
कडुलिंब खाऊन संन्यासी
हिरवा काळा घोटीव
गेला तिकडे त्या बेडकाकडे
डबक्यातल्या – मीही गेलो पाठोपाठ
तर त्याला एका सापाने पकडल्याचे दिसले.
ते पाहून थोडा खाली उतरला तो संन्यासी
बसून हातांनी त्याने सोडवले बेडकाला
सापाला विलग करत
टाकले त्याने बेडकाला उजवीकडे
साप पळाला डावीकडे.
आश्चर्य असे घडले की पुन्हा त्या बेडकाने
उडी टाकली त्या सापाच्याच दिशेने भिऊन.
संन्यासी हसला.
आता मी सापाच्या बाजूने, म्हणाला.
“ सापाचे अन्न म्हणून एक बेडूक जन्माला घालणे
हा मूर्खपणा नाही ? “ मी विचारले.
तो म्हणाला, असाच आणखी प्रश्न विचारत जा जोडून
पुढे पुढे – मग कळेल – एक तर हे सगळेच
असेल नाही तर काहीच नसेल –
“ माणसानेही खूप काही नष्ट केलेय – तरीही
आहेच ना, हे उरलेले सगळे ! “ मी म्हणालो.
अलग, एकटेच काहीच नसते --

तो म्हणाला.

--- ००० ---

मेंदूने विचारांवर

प्रतिक्रियात्मक द्वेषाची

अनेक रसायने मारली

त्यांना वजनवाढीसाठी

सातत्याने उदात्तीकरणाची

इंजेक्शनेही दिली ...

शेवटी त्या मेंदूला

वैचारिक अंतःस्राव झाला

रक्तहीन ...

खूपजणांची कत्तल

आवश्यक

असल्याची समज

त्याच्यात साकळली

-- यालाच तो

सर्जकता म्हणत राहिला ...

--- ००० ---

AUGUST 20

शारीरिक वा मानसिक

भूतकाळाशी ताडत

एखादे चिन्ह जाणवून

आपण भितो की

आता असे घडेल ...

शरीर कामालाच लागते

संरक्षक ताण घडवते

रक्तात गरजेची
रसायने सोडते
मन निष्कर्ष धरूनच ठेवते ...
हळूहळू
अपेक्षिलेले जे
ते आकार घेऊ लागते ...
अंदाज खरा ठरू लागतो ...
त्यामुळे मन अधिकच
घट्ट होत जाते ...
येतेच मग ते संकट
अनुभवाचे शहाणपण
सिद्ध करत ...

समजा तेच नाही नेमके
तरी दुसरे वा अधिक
भयानक येतेच ...

मन असेच चालणार हो
नॉर्मलच आहे ते -- पण
काळजी घ्यायलाच हवी --
डॉक्टरबिक्टर सगळेच म्हणतात ...
--- ००० ---

' सामसूम ' चा प्रयोग उत्तम झाला -- सुदर्शन फुल होते -- लोकांना नाटक आवडले !

AUGUST 19

खूप कामाच्या तणावात
मधले हे विश्रांतीचे क्षण

वेगळ्याच विचारात वाफेकडे
चहाच्या पाहण्याचे
... सर्व शांत ...
कदाचित आणखी काही वेळाने
आजची तरी कामे पूर्ण होतील
वाफ विरत राहते ...
हा क्षण आणखी किती
लांबू शकेल ?
सगळे त्यागून ?

उलट हा क्षण
वाट पाहतोय
हे, ते प्रश्न मिटण्याची
काही संपण्याची
मीलनाची
सुखांची
काही वर्षांनंतरच्या
शांत, समंजस सुबत्तेची
-- वाफेची विचारनक्षी
न थांबणारी ... या क्षणावर
आपण थांबू शकत नाही ...

काही वर्षांनी कुणी म्हणेल –
लक्ष आहे का तुमचं
चहा गार होतोय ...
--- ००० ---

उत्कलनबिंदू येऊन
टाळ्या पडेपर्यंत
मी थांबत नाही
माझी पुढची कविता
तयार असते

मी लिहितो फ्रेंडससाठी
जे असतील दहा वा दहा कोटी
आज ना उद्या -- जरी
असते तशी कविता
एकाच व्यक्तीसाठी
जी वाचते ती
समजून आवडून
न समजता आवडून वा
न आवडताही

माझ्या कवितांचा पुढचा प्रवास
असल्यास
मला माहीत नसतो
मी अडवतही नाही

शब्दांना माहीत असते
त्यांच्यांत साठलेले जुने अर्थ
सांगण्यासाठी ते इथे नसून
काही सुचवण्यासाठी आहेत
त्यांच्यांत साठूच न शकणारे

अधांतरी राहणाऱ्या
या अनभिषिक्त कविता

शब्दांतून आणतात

अविरत वाहणारे

अर्थझरे – निरर्थझरे

मी खूप खुजा आहे

त्यांच्यापुढे ...

--- ००० ---

AUGUST 18

उद्या बुधवार दिनांक २० ऑगस्ट ' १४ संध्याकाळी ०७-०० वाजता सुदर्शन रंगमंच, शनिवार पेठ, पुणे इथे माझ्या ' सामसूम ' या दोन अंकी नाटकाचा प्रथम प्रयोग !

शक्य झाल्यास जरूर पाहा.

प्रतिबिंब, पुणे प्रस्तुत, डॉ. वरदा जाधव निर्मित, दिलीप वेंगुर्लेकर दिग्दर्शित नाटक.

देणगी प्रवेशिका एक तास आधी हॉलवर उपलब्ध.

जे काही आहे ते

मनाच्या हाताला

लागण्यासारखे नाहीय

हेच तर सांगताहेत जेके

तर तुम्ही म्हणताय

ते जे काही सांगताहेत

त्यात

हाताला झ्याट काही

लागत नाही !

जे कण्हाल तुम्ही

ते खरे !

-- असे म्हणून

जेके पटणारा

निघून गेला !

जेके न पटणारा

जेरीला येऊन

केकटत राहिला ...

--- 000 ---

पानाफुलांना एस्कलेटर

व्हाटसपनी हिणवले

त्या दोघांना गलिच्छ

झोपडपट्टीने हिणवले

सगळ्यांनाच वेगवेगळे

परिवर्तन हवे होते

त्यांतले कोणते श्रेष्ठ

हे ठरवायला न्यायाधीश

रोमँटिक आल्यामुळे

सगळेच बिथरले !

एक वेळ मार्क्सिस्ट किंवा

अस्तित्ववादीही चालला

असता म्हणाले !

तेवढ्यात एक कवी

डोह आणि कालिया

यांनाही न्याय

मागू लागला !

त्याची प्रेयसी

जवळच उभी होती ...

( जणू बिलगण्याच्या बेतात )

--- ००० ---

AUGUST 17

सामान्यतः करमणुकीच्या क्षेत्रात काम करणाऱ्या काही व्यक्तींनाच ग्लॅमर मिळते. ते ग्लॅमर देणाऱ्या असंख्य व्यक्ती ते देतात याचा अर्थच त्या व्यक्ती मानसिक आत्महत्या करतात. आपल्या जगण्यापेक्षा करमणूक महत्त्वाची मानणाऱ्या त्या व्यक्ती असतात !

AUGUST 16

कलावंत ही जमात सामान्यतः संवेदनशीलता या गुणाने युक्त असते. मद्दड, डल कलावंत, असे काही नसते. त्यांतल्या काहींचे आयुष्य सामाजिक दृष्या वादळी वा प्रक्षोभक असते आणि काहींचे आत्मछळयुक्तही असते आणि या दोन्ही शक्यता कमीजास्त प्रमाणात एकत्र असू शकतात. त्यांतल्या काहींचे आयुष्य अशा एका टोकाला येते की तिथे ते आत्महत्या करतात – आयुष्य संपवून टाकतात. असे करणाऱ्यांतले काही ‘ मोठे ‘ वा ‘ मौल्यवान ‘ म्हणून मान्यताप्राप्तही झालेले दिसतात. त्यांचा असा शेवट होणे ही अनेकांच्या दृष्टीने चटका लावणारी – क्लेषकारक घटना असते. या बाबतीत दोन प्रश्न विचारात घ्यावेसे वाटते -- १. आयुष्याला सामोरे जाताना आलेली ही दिङमूढतेची अवस्था असेल तर त्यांच्या जगण्यात त्यांना जगण्याचे आकलन होऊ शकले नाही, असे म्हणावे का ? २. ते काहीही असले तरीही, त्यांची कला मौल्यवान ठरते, ते कशामुळे ? एक प्रकारच्या ‘ मूढ ‘ मनातून सर्जकता अवतरू शकते, असे म्हणावे का की ती कला मौल्यवान ठरण्याची दुसरीच काही कारणे असतात ?

वस्तूंच्या निमित्ताने पुन्हा तुम्हीच बोलाल
तर पुन्हा ती तीच भाषा होईल --
वस्तूंचीच भाषा व्हायला हवी
तरच ती प्रतिमांची कविता होईल –
पटणाऱ्याची अशी टिंगल करा जिने
घाम फुटावा, तो बोलायलाच घाबरावा –
हे प्रतिमांतून असे म्हणा –
खेकड्यांची दुनिया पाखरांना लखलाभ
आमचे टॉवर्स पाडू नका –
आता समजतेय ते करा म्हणजे झाले !
किंवा

तुम्ही अर्थपूर्ण बोलायचा प्रयत्न करूच नका

तुम्ही बोलाल त्याला अर्थ येईल --

फक्त एक करा –

कर्तृत्व वस्तूंकडे नका देऊ

ते द्या न-वस्तूकडे --

--- ००० ---

AUGUST 15

मोदी नवीन काय बोललेत हे जाऊ द्या -- बरेचसे मुद्दे महत्त्वाचे आणि निर्विवाद देशहिताचेच आहेत ! त्यांत काय प्रॉब्लेम आहे ? उलट, ते मुद्दे नीरसतेने मांडण्यापेक्षा देशभक्तीच्या भावनेच्या तीव्रतेतून त्यांनी मांडले आहेत, ही त्यांची देनच आहे ! झाले भले तर चांगलेच आहे ! आता देशाने त्यांच्यावर विश्वास टाकलेला आहे, तर पाहू या ना ! जेव्हा जे पटणार नाही, तेव्हा ते नाही पटत म्हणू !

AUGUST 14

सुखाचा उपभोग घेणे, हे नॉर्मल आहे -- तसेच, सुखाच्या आठवणीचा वा भविष्यातल्या सुखाच्या कल्पनेचा उपभोग घेणे, हेही नॉर्मल आहे का ?

समजा, हे खरे आहे की फेसबुकवरचे लेखन फारच क्षणभंगुर असते ! लाईक वा कॉमेंट दिली की त्या वाचणाऱ्याच्या दृष्टीने त्या लेखनाचे आयुष्य संपते ! -- या निमित्ताने प्रश्न असा येतो की कोणतेही लेखन दीर्घायुषी असणे म्हणजे काय ? तसे ते असण्याचे महत्त्व काय आहे ?

AUGUST 13

खोटे बोलायची सवय नसलेले मन

स्वतःला खरे वाटेल

तेच बोलत राहते

-- तेही कधीकधी लोकांना खोटे वाटते

याने ते खंतावते –

सुटका म्हणून

ते पक्षी व्हायचे ठरवते

नदीकडे जाते

काठावरच्या झाडावर बसते –

परतल्यावर आलेला प्रश्न --

इतका वेळ

कुठे होते ते

यावर खरे वाटणारे काय बोलावे

-- यावर काही न सुचल्याने

ते खोटे बोलते

सवय नसूनही – तरीही

कुणाचा विश्वास बसत नाही

आता मात्र त्याचाच

स्वतःवरचा विश्वास उडतो ...

‘ खऱ्याची दुनिया नाही राहिली

हेच खरे ‘ –

ते स्वतःशीच पुटपुटते ...

--- ००० ---

Champra Deshpande shared Pravin Kamble Mayuri Theaters's photo.

हा एक चांगला ग्रुप आहे.

AUGUST 12

माझे काही मित्र फारच भारी आहेत ! शिवाय ते विचारस्वातंत्र्याचे भोक्तेही आहेत ! कधीकधी शॉकच देतात ! त्यांतलाच एकजण म्हणाला -- पहिल्या लग्नाला वीस वर्षांची एक्सपायरी डेटच द्यायला हवी ! त्याहून जास्त ज्यांची लग्ने टिकतात ते मानसिक अपंग असतात ! दोन मुलांचे शालेय शिक्षण संपले की करार संपायला हवा ! पहिले लग्न हे मूर्ख डोक्याने, भलत्याच गोष्टी महत्त्वाच्या मानून केलेले असते ! वीस वर्षांनंतर थोडी समज येते, अनुभव वाढतो, काय हवेय ते नीट

ठरवता येते -- तेव्हा मात्र आनंदाने पुढे कायम टिकणारे लग्न करायला हरकत नाही ! या दुसऱ्या लग्नाला, गरज पडल्यास घटस्फोटासाठी ती सगळी कायद्याची प्रक्रिया सक्तीची असावी -- पहिल्या लग्नाला मुळीच तशी नसावी ! वीस वर्षांच्या आत, पहिल्या लग्नाच्या बाबतीत, ज्यांना घटस्फोट हवा असेल त्यांनाही ती प्रक्रिया बंधनकारक असावी !

तीन लाखांचा थकबाकीदार म्हणतो -- आधी पंचवीस लाखवाल्यांचे करा वसूल, मग मला विचारा !

' घागर रिकामी रे ... '

आजच्या ' लोकसत्ते ' तला उत्तम अग्रलेख !

काही फ्रेंडससाठी साध्या, सोप्या कविता –

तो आणि ती

समोरासमोर

डिशेस ठेवून

वेटर जातो

मागवलेय हेच

( आता ) हवेय काय

--- ००० ---

उगीच किरकोळ

शंकाकुशंका

१ – कामामुळे जमणारच नव्हते

२ – अजून ? काय झाले असेल

मीटिंग होती हे माहीत होते

संपर्क बंदच होते

२ – आता द्यावा एसेमेस

१ – आता द्यावा एसेमेस

--- ००० ---

मागची भेट

छानच झाली

आता पाहू ...

अरे वा –

बोलला गेलेला

नेमका रंग

आपल्या आवडीचा

... संकोच गेलाय

--- ००० ---

घेण्याइतकेच

देणे महत्त्वाचे

दोन्ही अत्युच्च

दुतर्फी

ते प्रेम !

अधाशी

नसलेले

--- ००० ---

" व्याख्यानमाला चालवून नगरसेवक होता येईल का ? नाही ना ? मग हे सगळे उत्सव, जयंत्या, पुण्यतिथ्या, भोंगे, कर्णे, गाणी, डान्स आणि इतर सर्व, हे लागणारच ! नुसती टीका करू नका -- पर्यायी मार्ग सांगा ! "

AUGUST 10

स्त्रियांचे असणे म्हणजे दगडातून
पाझरलेले लोणी पण असंख्य
प्रश्नांना भेदू शकणारे अमोघ
पर्जन्यास्त्र – फक्त प्रेमाचेच
ऐकणारे – एकमेव सत्तासत्य !
त्यांना सगळे समजते – त्या
दाखवतात भोळी सावली
जीत गुदमरू शकतात
पुरुषांचे हजारो समुदाय --
त्यांचे अज्ञान, त्यांची मागासता
त्यांचे स्थैर्य, अस्थैर्य, अवलंबिता
यांपलिकडे असते त्यांच्याकडे
एक प्रवाही हिरवेपण
जे बोलता बोलता
भरकटवू शकते गृहीत धरलेले
विश्वाचे समतोलपण
-- त्या दाखवतात
एक असमर्थता मानभावी
तीही पोटात घेणारी
सर्व अद्वातद्वा गुर्मी –
त्या गाफील आहेत तोवर
जागे होणेच हिताचे आहे
सर्व पिढ्यांच्या – त्यांनी
जर का मान झटकली अन पाहिले
त्यांच्या प्रेमळपणा ऐवजी
नाराज नजरेने
जमिनीकडे -- तर मग खैर नाही

उन्मळूनच पडतील सर्व
साम्राज्ये अजिंक्य
समजली गेलेली –
त्यांना थोडे गाफीलच राहू द्या
अजाणपणा दाखवत – आपणही
अजाण आहोत – चुका करतो आहोत
असेच दाखवत राहा – यातला
खोटेपणा त्यांना कळत असला तरीही
कारण काहीही
नष्ट करणे
हे त्यांच्या गर्भाशयांतच नाहीय
-- जे – अर्थातच –
त्यांनाही माहीत आहे –
( समानता कसली ? खरे तर
त्यांच्या वेगळेपणाच्या सन्मानानेच
-- मुख्यतः त्याही पलिकडच्या
‘ अर्थहीन ‘ समजुतीनेच
हिरव्या त्यांच्याशी
एकोपा होऊ शकेल ! )
--- ००० ---

जगण्याचे सार्थक म्हणजे काय
या विचारात मी
माझ्या एकाकी खिडकीतून बाहेर
पाहात होतो वाऱ्याने हलती झाडे
म्हणत – आदल्या रात्रीचे स्वप्न
मी का विसरावे ? किंवा हा माझा
आवडता शर्ट – का नसावा माझा ?
वीज गेल्यावर होणारा अंधार

मला आवडतो – निदान तो

असह्य होईस्तोवर – असणारच मी

अशा सगळ्यांनी युक्त – मग

असे काय शोधायचेय मला

जे हे नाहीय ? – रक्त साकळून

सडून असह्य दुखेल

तेव्हा शोधता येईल बाहेरच्या

वाऱ्याची फुंकर – नाही तरी

नाहीयत दारे खिडकीला

पूर्ण बंद नाहीच होत ती –

पाहिले जातेच बाहेर --

एवढेच का असू नये सार्थक ?

-- हाच प्रश्न असावा त्या माझ्या

मूळ प्रश्नात माझ्या

एकाकीपणाइतक्या इंटरेस्टिंग

नसलेल्या !

--- ००० ---

AUGUST 9

नावे पोलादी थोडीच असतात

मेंदूत पिळून घट्ट बसवायला !

आधी पाण्याचे रसायन झाले

तेव्हा कुठे नाकासारखे नाक झाले

याला भ्या, त्याला मोठा म्हणा

खोटे खोटे

आतून मेंदूच्या मातीचा त्याग करत राहा ...

--- 000 ---

AUGUST 8

आपले मित्र अवधूत परळकर यांनी लिहिलेले आजच्या लोकसत्तेतले पुस्तक-परीक्षण जरूर वाचा. एका विवाद्य विषयाचे भान येण्यासाठी चांगला लेख.

फेसबुकवर बसल्या बसल्या लिहिली कविता
म्हणून एक शहाणे तिला पाडलेली म्हणाले
त्यांचे म्हणणे होते खूप वेळ, खूप विचार
लागायला हवा, खूप मेहनत हवी --
त्यांना वाटत होते कविता म्हणजे एक
वैचारिक गुंता, एक भावनांचे खूप कलात्मक
प्रदर्शन वा एखाद्या अपवादात्मक प्रतिक्रियेचे
अत्यंत तपशीलवार वर्णन –
त्यांना हवी होती कविता
आधीच माहीत असलेली पण सजवून अतर्क्य केलेली
चारसहा महिन्यांतून क्वचित जन्म घेणारी
हजारदा दुरुस्त केलेली, इस्पितळातूनच आणलेली जणू
-- कविता म्हणजे क्षणोक्षणी घडणाऱ्या अनपेक्षित
स्फोटांपैकी कधीही, कोणतेही साठवलेले शब्दांत –
हे नव्हते माहीत त्यांना – ते पाहण्यासाठी स्वतःच्या
अस्तित्वासह असलेली -- क्षणोक्षणी परिपक्व होणारी
एक न-नजर लागते – हे नव्हते माहीत त्यांना --
कवितेला ते एक संभोग-प्रॉडक्ट समजत होते –
--- ००० ---

AUGUST 7

तिकडच्या परिस्थितीशी जुळवत
इकडचे नाते टिकवणे ठरलेले

आवड-निवड, गैरसमज

यांचा सामना करत

कधी सिग्नलही तोडत

कधी फारच मवाळपणे

-- शिवाय हे जमण्यासाठी

टिकवणे मनाचा ताबा

या सगळ्यावर

-- थकते बिचारे

-- सोडूनच देते ताबा कधीकधी

अशा वेळी

इकडचे नाते

हातात नाही राहात

-- आपोआप व्हावे लागते

समोरचे मन समजुतदार ...

अन्यथा हतबलपणे पाहणे

होणारा नाश ...

अशा अनेकच काय

असंख्य हालचालींचे

मानसिक जगणे ...

--- ००० ---

AUGUST 6

समजा हजारो, लाखो प्रश्न आहेत -- माणसाला असेच भंगार जगावे लागेल असे -- तरीही निराश न होता, या सगळ्याचे मूळ कुठे सापडू शकेल का, हे विचारायलाच हवे --

AUGUST 5

मागे फिरणे अशक्य

पुढे जाणे धोक्याचे

या स्थितीला मी

स्वेच्छेने आलो

हे तरी खरे कसे ?

त्या स्वेच्छेलाही

हजारो कारणे !

इथून सुटका होणे

न होणे

यालाही असणार

तसेच हजारोंनी

घडणे न घडणे

-- क्षणभर --

स्वस्थ थांबणे

हेच पाहावे ...

--- ००० ---

AUGUST 3

जगातली सगळी माणसे एकत्र जमली. काय हे, किती हे प्रॉब्लेम्स ! असे नको जगायला आपण. काय करू या ? या प्रश्नाकडे सर्वांनी प्रेमाने पाहायचे ठरले. शांतता हवी, सगळ्यांना हवे ते पुरेसे मिळेल याची संसाधने आणि पुरवठा आहे – कशाला शांतताभंग ? ! उगीचच ? ! मग कोणते करू या बदल ? – हा प्रश्न आला चर्चेला. आपण सगळे धर्म वैचारिक केल्यामुळे त्यांच्या अस्मिता झाल्या आहेत. माणसे चांगली कशी जगतील याभोवती आपण विचारसरण्या बांधल्यामुळे त्यांच्याही अस्मिता झाल्या आहेत. आणि आपला मानबिंदू असा राष्ट्रवाद ! त्यामुळेच आपल्यांत फूट पडलेली आहे. सध्या, हे प्रश्न तरी नष्ट करायचे, असे ठरले. सगळ्यांनी टाळ्या वाजवल्या. मग ते आपापल्या ठिकाणी परतले. परतल्यावर, " येडझवे आहेत सगळे – आहे तसे सगळे चालू ठेवू या " – असेच सगळ्यांनी जिकडेतिकडे ठरवले. " बुद्ध, तुकाराम, जेके यांचा काही उपयोग नसतो हो ! ते इतके बोंबलून गेले – काय फरक पडलाय, कुठेही ? " – असे जगभर सगळेच म्हणत राहिले ! मुख्य म्हणजे असल्या अशक्य कारणासाठी यापुढे कधीही एकत्र जमून वेळ घालवायची गरज नाही – हे सगळ्यांनीच ठरवले ! तशा त्या प्रयत्नात सगळेच सामील होते, या वस्तुस्थितीमुळे, कुणीच कुणाला, निदान या बाबतीत तरी, वेडे म्हणायचे नाही, असे ठरले ! आणि मुख्य म्हणजे, ते विसरूनच जायचे, असे ठरले !

--- ००० ---

निवडक पन्नास वाईट अनुभव एकत्र केले

प्रत्येकी एक आत्मसंरक्षणात्मक प्रतिक्रिया ठरवली

असा स्वभाव घडवला

डॉक्टर म्हणाले तुमची लाईफस्टाईल अत्यंत

अनैसर्गिक आणि आरोग्यविघातक आहे

अशाने बंद पडेल हार्ट आणि मराल

थोडे धोके पत्करलेत तरच जगू शकाल

जगण्यासाठी मरणाची दिशा नका धरू

--- ००० ---

AUGUST 2

उद्याच्या जागतिक मैत्री दिनानिमित्त आजच्या लोकसत्तेत डॉ. अरुणा ढेरे यांचे तीन लेख आहेत. त्यांतला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरचा लेख मला फारच महत्त्वाचा वाटला. त्यांच्या आयुष्यात ज्या नात्याचे फूल नीट उमलायला हवे होते ते त्यांना समाजमनाच्या विचारामुळे त्यागावे लागले, यावरून, त्यांची ध्येयनिष्ठा तर दिसतेच पण समाजानेही, आपल्या चांगले जगण्याच्या कल्पना फार हेकट ठेवू नयेत, हेही अधोरेखित होते, असे मला वाटले.

AUGUST 1

लेखक म्हणूनच जगणे

आणि

जगण्यातला काही भाग लेखक असणे.

--- ००० ---

मन म्हणजे मशीनगन

एककेंद्री मतांचा मारा

करणारी कोणतेही

आव्हान येऊच नये

स्वतःच्या रचनेला, म्हणून !

धर्मासाठी, युद्धासाठी, क्रांतीसाठी
माणसे घडवायलाच हवीत !
-- हा पाया असून वेगळे काहीही
वैचारिक चालेल -- मूळ रचनाच
संशायास्पद करू पाहणारे
काहीच नको !
संघर्ष असणारच --
अत्याचार,
खोटेपणा, डावपेच,
छळ, मृत्यू, दुःख
-- हे सर्व मान्यच
असायला हवे -- एवढेच
माफक मागते ती
मशीनगन !
--- ००० ---

July 2014

JULY 31

" बारा बारा तास सराव, शिस्तशीर आहार असे सगळे करत स्वतःचे मशीनमध्ये रूपांतर करून घेणारे खेळाडू मानवी जगण्याला मुकतात आणि मानवी जगण्याची नासाडीही करतात, असे नाही वाटत ? " -- सध्या चाललेल्या कॉमनवेल्थ स्पर्धांमधले जिम्नॅस्टिकचे प्रकार पाहून एकाने विचारले ! " मला हे खेळाडू आणि प्रेक्षक वेडे वाटतात ! " असेही तो म्हणाला ! मी विचारात पडलोय !

JULY 30

आपल्याला वाटणे
आणि
प्रत्यक्ष घडणे

यांतले अंतर

काल्पनिक असते

की

वाटणे खोटेच असते ?

आणि

घटनांचा तर

मागमूस नाही --

फक्त आठवणी !

घटना

खऱ्या असतात ?

--- ००० ---

JULY 29

विश्वातल्या प्रत्येक गोष्टीला / घटनेला हेतू असतो, असे म्हणावे की हे सगळे निर्हेतुकपणे ( पण बरोबर ) चालू आहे, असे म्हणावे ? कारण, मानवी बुद्धीच फक्त हेतू असण्या-नसण्याचा विचार करते, असे वाटते !

JULY 28

पाच सत्यकविता

१

महत्प्रयासाने इथवर

पोचल्यावर आता धोका

नको कोणताच

असे म्हणता येणार नाही.

इच्छा असो नसो

परिस्थितीच वळवेल

वाकवेल कसाही

घडवेल माणूस

मोठ्या जबाबदारीचे थ्रिल
-- शेकडो सह्या
शेकडो निर्णय अन खूप
कामे होत राहणे – हेच

आरोप येणे, चौकशी होणे
काळे फासले जाणे
काहीही घडू शकते इथे
कसेही, कधीही

हे नकोच म्हणणारा
इथे येऊच शकत नाही
महत्प्रयासाने तो रूटीन
रटाळपणातच टिकून राहतो ...
--- ooo ---
२

जगण्याचे आधार –
कम्युनिझम वा हिंदुत्ववाद
श्रेष्ठ म्हणणे
एकाची टिंगल एकाची टवाळी
करणे, एकाला ग्रेट
एकाला फालतू म्हणणे
करमणुकीचा गौरव, पराक्रमाला
टाळ्या, चमत्कृतीला
वाहवा देणे
चिडून, प्रेमाने, आक्रमक

वा न्यायाचे बोलणे
निषेध करणे, फाशीची शिक्षा
योग्य म्हणणे
अमुक मताविरुद्ध बोलणारे
किती मूर्ख हे दाखवणे
मोठ्यांचे दोष दाखवत
लहानांना शहाणपण
शिकवणे – स्वतःला सत्य
समजत -- इतरांना
उपरोध वा दया दाखवणे
मला सगळे सहज
समजत असताना इतरांना
का एवढे अवघड जावे
या आश्चर्यात राहणे –
--- ००० ---
३

आपापल्या कामचलाऊ
असंख्य ग्रेट सत्यांसाठी
एकमेकांच्या उरांवर बसून
बुकलत राहतात भाऊबंद
शहाणे एकमेकांना !
जग कसे चालावे
हे माहीत असलेले !
--- ००० ---
४

इथल्या हवेत
गारठा किती आहे !

आणि जंतू !

-- पाहुणे म्हणतात

पण ही हवा खूपच

कंटाळवाणी आहे

मुंबईत हवा याहून खूपच

घाणेरडी आहे

पण कंटाळा नाही येत !

तुमचे जग लहान

रस्ते लहान पण

तुम्ही तरी काय करणार ?

पोटापाण्याचे प्रश्न नसते

तर तुम्हीही येऊन राहिला असतात

मुंबईत !

तिथे सगळे काही आहे

आणि सगळेच मोठे आहे

सर्वोत्तम इस्पितळेही आहेत

त्या हवेने काहीही होवो

सेफ आणि शक्तिमय

वाटते सगळे !

--- ००० ---

५

मरणाची कोवळीक लाभलेला तरुण

धरणावर बसून वरणभात खातो आणि

कारण नसताना पराभव पत्करतो !

त्याच वेळी सरणावरची पुरणपोळी खाऊन

एक तरुणी जारण-मारण विद्येत पारंगत होते !

रणातून पळणाऱ्यामागे पळत रणरणत्या उन्हातून

ती तरल तरुणी करुण अवतार धारण करते !

जनांचे भरण-पोषण करत अंतिम
चरणी पोचते आणि तिथून पावन होऊन
परतताना किरण किरण अलग करत
वरकरणी करणीच करत जणू
पाचारणाविनाच प्रवेश करते
आवरण हरवलेल्या वस्त्रप्रावरणाच्या
दुकानात ! आता मात्र पर्वतप्राय लाटांचे
सत्कारणी लागणारे आत्मरमणी दिवे आणि
माशा वारणारे झुबकेदार मिशांचे वारकरी
मिळून उचलतात वरांचे फर्मास मेणे !
होतात करकर करणाऱ्या दारुण मरणाचे दीवाणे !
वरणारे वारुणीला मारत सवयीचे झुरके !
एका अविरत वर्गीकरणात झुरणे म्हणतात
ते हेच !
यातूनच घडते घरघर लागणे
वर्चस्व संपणे आणि
आयुष्यभर पुरणारे
मरणे !
--- ००० ---

JULY 26

तू वस्तू बघत नाहीस
बारकाईने – त्यामुळे
ताबाच नाही येत तुझा
तुझ्या जगण्यावर

पुस्तके आणि स्मृती
एकत्र नाहीत तुझ्याकडे

डूख धरणे नसल्याने
मानहानीही फिकटलेली

फर्निचरची आवड नाही
समारंभ, सहली, यशाचे प्रसंगही
फिकटलेले – फक्त एक पेन
प्रेमयुक्त तू जपलेले

निसर्ग, इमारती, चित्रे, ध्येये
नृत्ये, गालिचे, उपकरणे
रस्ते, गल्ल्या – काहीच नाही --
जगलास कशाला या जगात ?
--- ००० ---

मानवी मनाची सर्वाधिक सर्जकता समस्यानिर्मितीत असते -- उदाहरणार्थ -- हे हवे पण याच्याचबरोबर अविभाज्यपणे येणारे ते नको ! उत्तरे सापडूच नयेत, अशा समस्या, ही तर त्याची खासीयतच असते !

JULY 19

न्यूनगंड वा अहंगंड माणसाला टवाळखोर, कुत्सित वा चिडचिडा बनवत असावा !

काही हायकू वाचनात आले. हा फॉर्म आपले आकलन व्यक्त करायलाही चांगला आहे, असे वाटले. हायकूचे महत्त्वाचे वाटलेले वैशिष्ट्य घेऊन पण इतर बंधने फारशी न पाळता अशा काही कविता लिहिल्या. हायकू नव्हे पण तत्सम काही --- ( प्रत्येक कडवे म्हणजे एक स्वतंत्र कविता आहे. )

रस्त्यावरून वाहणारे पावसाचे पाणी
संध्याकाळ – दिवे लागलेले
घरातले, बाहेरचे

मी उभा खिडकीतून रहदारी पाहात
त्याच वेळी घरातल्या कुकरची
शिट्टीही ऐकत

निवांत जेवून वॉचमन दुपारी
बसलेला – मागच्या
भिंतीवर पाल स्थिर

स्टेडियम खचाखच
भरलेला – ओरडा
हळूच उगवते चंद्रकोर

ऑफिसात वेळ ओलांडून
चाललेले काम – बाहेर
अंधारात वाहने उभी

चॅटिंगच्या प्रतीक्षेत प्रेयसी
लावते लिपस्टिक – तिच्या
पर्सवर चमचमती चांदणी

हँग झालेला संगणक
समोर – आतबाहेर
एकटेपणा

तो सत्काराच्या हाराने
भारावून उभा – बाहेर
मुसळधार पाऊस ...

बातम्याविचारवाले वाचून झालेले

वर्तमानपत्र – जवळच मुंग्यांची रांग

त्यांच्या कामात असलेल्या

वाऱ्याचा आवाज

हलती झाडे –

त्यांवर ऊन

--- ००० ---

JULY 18

सारखे बदलू नका

एकच मत

बाळगा – सांगा

यावर सगळे

हटून बसतात –

तशा मताच्या

लोकांबरोबर राहा

म्हणतात --

तुमच्यावर हल्ला झाला

कोणत्याही

मतधारकाकडून

तर एकाच मताने

वागाल ना –

असे विचारतात

--- ००० ---

काही ना काही मानसिक

टिकवण्यासाठी मृत्यू ?

मग जगण्यासाठी का नको ?

( की तेही मानसिक काही
टिकवण्यासाठीच ? )

--- ००० ---

कितीही प्रयत्न केला
तास, दिवस, महिने
तरीही अंधार सरत नाही
अंतर अजून
किती बाकी आहे
तेही कळत नाही
तेव्हा मात्र हळूहळू
संघर्ष नकोसाच होऊ लागतो
भीती साठू लागते
आता
दिसणारच नाही उजेड
असे मानले जाऊ लागते
आता
मृत्यूच फक्त
असे दिसू लागते

हे सगळे निव्वळ फक्त
मनामुळे घडते ...

--- ००० ---

JULY 16

प्रेम महत्त्वाचे
गैरसमजांना थारा नाही
असे ठरले तेव्हा

विचार, बौद्धिक-भावनिक आडाखे
रद्द झाले – आश्चर्य म्हणजे
प्रेमही उरले नाही !
--- ००० ---

अडथळे असणारच
वीज जाणार, नेट जाणार
काही बाबतींत
एकमेकांचे पटणार नाही

हवेच आहोत ना पण
आपण एकमेकांना –
वीज येईल, नेट येईल
न पटणारे सगळे
बिनमहत्त्वाचे ठरेल ...
--- ००० ---

झाडाला फळांसारखे
पक्षी लागतात
बहुसंख्य लोक
ते कच्चे असतानाच
फलाहार सुरू करतात

पक्ष्यांवर काही रसायने
फवारलेली असल्याने त्यांवर
ध्येयासक्तीचे बहारदार
रंग आलेले असतात
चव मस्तच झालेली असते

त्यांचे पंख विशिष्ट रीतीने
कापलेले असल्याने आता ते
ठरवलेल्या दिशेनेच फक्त
उडू शकतात – ते पाहून
बहुसंख्य धन्य होतात

अशा पक्ष्यांचे जगणे
बहुसंख्यांचे आयुष्य
खूपच चवदार
सनसनाटी, रंजक
करणारे झालेले असते

त्यांचे आयुष्य पिकण्यापूर्वीच
सार्थकी लागणारे ठरत जाते ...
--- ००० ----

JULY 14

आटोपशीर, जमवून घेणारा
निरुपद्रवी, पाळणारा
संयमी, सभ्य
असा राहू शकलो मी
सुरक्षिततेसाठी
त्यांच्या आणि माझ्या
जिवंत कधीच राहिलो नाही
मी – माझ्या ऐवजी
दबावानेच उपभोगले
माझे आयुष्य ...
--- ००० ---

तुमच्याबरोबर सात कुत्री असतात
त्यामुळे तुम्ही बोलता ते सत्यच असते
याची तुम्हाला खात्रीच असते
आम्हाला त्या कुत्र्यांची भयानकता जाणवतेच
आमच्या हातांत पिशवी, पार्सल वा ऑफीसबॅग असे काही असते
तुम्ही कोणत्याही फलाटावरच काय विमानतळावरही जाता
तुम्हाला कुणी हटकत नाही -- यात विशेष काही नाही
असेच तुम्हाला वाटते
तुमचा दरारा, अधिकार
हे नैसर्गिकच वाटतात तुम्हाला
आम्हाला तुम्ही त्रास देता मुद्दाम, असेही नाही
उलट आमच्यावर उपकार करावेत
आम्हाला संकटांतून सोडवावे
असेच तुम्हाला वाटते
आम्हाला कामाने थकवा वा कंटाळा आलेला असतो
सूर्यास्तापूर्वी आम्हाला घरमार्गी व्हायचे असते
घेतले तुमचे काही उपकार, म्हटले तुम्हाला मोठे
तरी काय बिघडणार आहे
असेच आम्हाला वाटते
( असे नाही वाटले तर काय होईल, हे आम्ही जाणून असतो )
तुम्ही मोठे, आम्ही लहान असे एकूणच सहजच
पक्के करत जातो आपण – आता
कुणातच काहीही नवीन, ताजे काही येऊच शकत नाही
असे होत होत सर्वजण आपण जुने जुने होत जातो
( नाही तरी आपण मर्त्यच असतो )
तुमचा वा आमचा तरी हा दोष कसा म्हणावा
दोष कुत्र्यांचा असतो
असेच आपणा सर्वांना वाटते
--- ००० ---

कवितेतला ' मी ' म्हणजे प्रत्येक वेळी खुद्द तो कवीच असला पाहिजे, असे काही नाही. ते एक पात्र, एक प्रतिमा वा कुणी एक, असे कुणीही असू शकते.

JULY 13

आता जनरल नकोत विचार
नीट स्वतःकडे पाहावे
असे म्हटले मी तेव्हा मी
शहराकडे पाहात होतो
“ काय करायचेत इतके दिवे ?
मार्केटिंग करतात भोसडीचे ! “
असे मन म्हणत होते
ही इमारत इथल्या ऐवजी
तिकडे असायला हवी होती
ही नदी गावाबाहेरून
जाण्या ऐवजी
गावातून जायला हवी होती
शिवाय हो
बटाटेवड्यात कांदा आणि आले
थोडे अजून जरा जास्त
हवे होते
हे माझे नेहमीचेच होते
तसेच माणसांबद्दलही
हे असे आणि ते तसे
हवे असणे – असे होतेच
एकदा तर कहर म्हणजे
मी स्वतःच असा नसून
तसा असायला हवा होतो

असे वाटले – म्हणजे

काहीच पटत नाहीय

मला

-- हे जनरलच झाले

पुन्हा !

--- ००० ---

JULY 12

दुसऱ्यांच्या मतांचा आदरबिंदर करा हो, पण सत्तेत आपणच आलो पाहिजे, हे बघा ! त्यासाठी जमेल ते सगळे करा ! एकदा सत्तेत आल्यावर स्वतःच्या मतांचाही आदरबिंदर फारसा करायची गरज नसते !

JULY 11

समोरच्या डोंगरावरून

समजा फुसांडत आल्या लाटा

तर आपला निभाव

लागणे अशक्य

आपणच

सादर केलेली आपली प्रतिमा

भंग पावेल असे वागूनही

ती सुरक्षित राहायलाच हवी

याची ताणमय काळजी

असेल मन खात

तर करणार काय

डोंगर तरी ?

लाटा कुठूनही येतील

हे भय आणि त्यासह

शांतता प्रस्थापनेचे प्रयत्न --

शक्ती वाया नये जाऊ
विकास, समता, शांततेला
लागावी -- जरी असले
अस्तित्वच आंतर्विरोधी
अटळपणे –
प्रामाणिक प्रयत्न आणतील
शांततेच्या लाटा ज्या
भय घालवून आणतील
समृद्धी आणि आनंद
यांचे डोंगर – या विचारात
चालू राहिले सगळे
वर्षानुवर्षे तसेच
भययुक्त ------
--- ००० ---

JULY 10

घटनांच्या राज्यात
अनिश्चिततेचे वारे
असणारच
तरीही असंख्यांचे
असंख्य हेतूंचे डावपेच
वा
प्रेमिकांचे प्रेम प्राप्तीचे प्रयत्न
होत राहणारच
भय वा धोका असो वा नसो
आकाशात न झेपावता
पक्ष्याने का मरावे ?
संपायचे तिथे संपो आयुष्य –

शेवटी घटनाही संपतातच

त्या तरी कुठे अमर असतात ?

--- ००० ---

JULY 8

अट्टहासाचे जगणे आणि सहज जगणे, असे फरक असतात का माणसाच्या जगण्यात ? त्यांतले कोणते अधिक सुखकारक, असे काही सांगता येईल का ? कोणत्या कारणांमुळे ?

JULY 5

अवलंबून असतानाच

द्वेषही असावा

यासारखे आडनिडे डोंगरावरून

कडमडत जाणे

असू शकत नाही

ठेचा खात – इथेच -- याच

दगडांना प्रेमाने गोंजारले

होते सर्वच

मार्गांचे नकाशे ठरवले

इथूनच

कुठे धारण करणार आता

ही पाय भाजणारी माती

नाही नाही ते मनात आणणारी

कडेलोट सुचवणारी

जगण्यालाच हिंसारूप

करणारी ही

करकचलेली अवस्था

नाकारावी कशी

काहीही बदल

कुणालाही न समजता

-- हा प्रश्न उत्तरहीन असला

तरीही

नवा आणि अर्थपूर्ण

वाटतो प्रथमच दिसलेला हा

एक खुला किरण !

--- ००० ---

JULY 4

ओबामा, पाऊस आणि उपग्रह

‘ हाताबाहेरचे ‘ विभागात टाकले

‘ हातातले ‘ विभागात बळेच काही

टाकायचे प्रयत्न केले

नकोत ती उद्गारचिन्हे म्हणून

साधे पूर्णविरामच वापरले

सत्याचे कशाला हवेय अवडंबर

असे म्हणताना आपोआप

साधेपणा येत गेला --

समजत असल्यामुळे

आपली ही अवस्था आहे

हा काही निःस्पृहपणा नव्हे

हे मनात समजत होते

अर्थातच.

--- ००० ---

भीतीयुक्त प्रेम की

प्रेमयुक्त आदर की

आदरयुक्त भीती

हेच नीट ठरत नव्हते

तर नेमके वागावे कसे ?

आकाशाला गवसणी घालून

नकळत स्मूथ वागायचे होते

धरता येईल असा

किनारा नव्हताच

म्हणजेच सगळे

तिच्याच हातात होते

तरीही एक विश्वास होता

ती समजुतदार असणार !

गूढच एक स्वतःच स्वीकारलेले !

--- ००० ---

इतकी खेडवळ वीजयंत्रणा असलेले पुण्याएवढे मोठे शहर जगात कुठेच नसेल ! चार थेंब जरी पाऊस पडला तरी कुठूनतरी ‘ ढाम ‘ कन आवाज येतो आणि वीज जाते ! “ उडाला ट्रान्स्फॉर्मर ! गेली वीज ! “ लोक म्हणतात ! अंगवळणीच पडलेले ! त्यामुळे, पाऊस आला याच्या आनंदात असले तरी इथले लोक ‘ ढाम ‘ कन आवाज येण्याच्या हतबल प्रतीक्षेत असतात ! आणि घडतेच तसे !

JULY 3

स्वतःच्या तब्येतीपासून ते आपण वापरत असलेल्या उपकरणांच्या-वाहनांच्या तब्येतींपर्यंत आणि घरच्या कामांपासून ते सरकारी ऑफिसांतल्या कामांपर्यंत आणि स्वतःच्या सर्वच कर्तव्यांबाबतही -- गळ्यापर्यंत आल्याशिवाय, जिवावर बेतल्याशिवाय लक्ष द्यायचेच नाही -- अशी एक खास जीवनशैली विकसित होत आहे ! तरीही, जगणे चालू राहील ! चिंता नसावी !

JULY 2

रंग़ांसारखे शब्द
अर्थांशिवाय सापडण्यासाठी
एक मोठ्ठे खोडरब्बर
अर्थ पुसत जाणारे –
अंधारात न दिसणारे
जंजाळात सगळेच अदृश्य
जखमांच्या सुसह्य
अन्यथा वेडच असते
लागले सेक्ससस्वप्नांचे
पलायनवादी
आंतर्राष्ट्रीय विमानमार्ग
ड्यूटीफ्री बाटल्या
आकर्षक चेहरे आपापल्या
दर्जेदार मर्यादेत
गढलेले – कुठेही इतरत्र
लक्ष नसलेले
बातम्यांचे शिल्पकार
सगळे कळत न कळत
जगण्यातली अनिश्चितता
भोगणारे सतत

सर्कसचा रंगीत तंबू
रोषणाईची उत्फुल्लता
यांबरोबरच
पंक्चर टायरचे दुःख
कुरवाळत
काळजीत निमग्न

एक एकलकोंडा कवी !

--- ००० ---

8:25pm

वळचणींपासून

मोकळ्या आकाशापर्यंत

असंख्य जागा मी जाणतो

त्यांतल्या

पाली, फुलपाखरे, साप

यांसह

मला माहीत असलेले

सुखदुःखांच्या प्रतिक्रियांचे

सगळेच मला मृत वाटते

म्हणून मी

तोफगोळ्यांच्या चपात्या

रक्ताचा सूर्य

पोतेभर काढलेले दात

कल्पितो

तत्क्षणी तेही मला

माहीत होतात ...

खरे तर हे असे

सगळे सामावून घेणारे

कंटाळवाणे मनच मला

नाकारता यायला हवे आहे ...

माझे मर्यादित मूडसही

बास झाले

ते जुने ...

जायचे थोडेच आहे कुठे

-- बाहेर पडायचेय ...

अमुक एका

माहीत होऊ शकणाऱ्या

जागेशिवाय ...

--- ००० ---

JULY 1

आधुनिक, उत्तराधुनिक आणि पराधुनिक ( meta-modern ) या विशिष्ट काळाशी संबंधित अशा प्रणाली नसून कोणत्याही काळात असू शकणारे असे हे तीन दृष्टिकोण आहेत -- असे वाचनात आले.

नकोतच मानसिक कटकटी

म्हणून असंख्य खेळांत

इंटरेस्ट घेत तासंतास घालवले

तरीही घोटाळा झालाच

त्यांतले बारकावे समजायला लागले

ताण आणि सनसनाटीपणा

भिनायला लागले

मोक्याच्या क्षणी खेळाडूंना मन

कसे शांत ठेवावे लागते

त्यासाठी ट्रेनिंग आणि योग

कसे उपयुक्त असतात

ते कळू लागले ( गैर डाव

गैर मार्ग सोडून )

प्रेक्षकांनाही खरे तर

असे ट्रेनिंग गरजेचे असल्याचेही

दिसू लागले – पण

प्रेक्षकही शांत राहू लागले

तर खेळात मजा काय राहील
हाही प्रश्न पडला --
या सगळ्याचा एक फायदा होताच –
आपण शारीरिकमध्येच खूप
रमतो आहोत म्हणजेच आपण
खूपच कॉमन आहोत -- हे दाखवत
बहुसंख्यांशी जवळीक राहात होती --

कालांतराने त्याचा कंटाळा आला
मन म्हणजे शरीराचाच एक भाग
हे वाचनात आले -- वाटले
काय वाईट आहे ?
असू देत मनाच्या कटकटी
शारीरिकच तर आहेत !

हे मनातले बदल
कुठे दिसू नाही दिले
म्हणजे झाले !
-- दिलासा वाटला !
--- ००० ---

JUNE 30

भरारा वाऱ्याच्या
सुसाट आवाजाला
कधी आव्हान दिले नाही
शहरातली सर्व
सफाईदार दृश्ये
गृहीत धरली --

यांना तात्पुरती सत्ये

वा बदलातले टप्पे

न मानता

आविष्कारच मानले

हे अंतिम सत्याचे

तरीही समाधान होईना

मनाला

पूर्णत्वाचा अनुभव येईना –

आपल्यातच खोट असावी

असाच सतत

मनाचा ग्रह होऊ लागला –

--- ००० ---

June 2014

JUNE 30

वाजतगाजत

कान समजून

दोन्ही डोळ्यांनी

पाणी ऐकले

उन्हातल्या कोलाहलात

धरणाच्या भिंतीवर

त्याच वेळी एक

पाखरू येऊन बसले

त्याच्या हातून

असले ( अटळ ) साहस

नसते घडले

उघडाल तेवढ्याच

दरवाज्यांतून पाणी येईल

हेच खरे होते

-- आणि बरेही !

--- ००० ---

उत्कंठावर्धक

पेय पिऊन

इच्छा दिली वाऱ्याहाती

जो नव्हता समजुतदार

पडला तो

अडेलतट्टू

तरीही त्यावर स्वार होऊन

केले पार

उरलेले सर्वच मनोदय

सूर्याआधी

उमटले

उजेडाचे डाग

अंधारावर ...

--- ००० ---

JUNE 29

ऑफीस, घर, रस्ता, इस्पितळ

कुठेकुठे कायकाय घडले

ते वर्षानुवर्षांचे मेंदूत

कोरलेले ठळक आणि अस्पष्ट

आता काहीच नसलेले अस्तित्वात

घटना आणि स्मृतींचा

थकवा साठत जात

होतो
होऊन गेलेल्याची सूज

खडबडत वा स्मूथ जाणे
त्यांच्यांतून हे तर
त्या घटनांचेच जगणे
कुठे काय आहे ?
घडले तरी का हे ?

आता मीच एक घटना !
प्रत्येक बिंदूवर
थांबण्याची सवय जडलेला !
--- ००० ---

ही घ्या एक सोप्पी कविता --------------

प्रत्येक इच्छापूर्तीला
अनेक पर्याय उपलब्ध
-- नशीबवान माणसाचा
सीरियस प्रश्न

सगळे पर्याय स्वीकारणे
अशक्य -- रूटीनसह
चोवीस तासांच्या अन
महिन्यावर्षांच्या मर्यादेत

नशीबवान माणूस एकच
निवडतो पर्याय प्रत्येक वेळी
रमतो तिथेच परमोच्च

बाकीचे रद्दच होतात

प्रत्येक वेळी नवा
विचार करूनही
एका वेळी एकच
पूर्ती जमते

नशीबवान माणूस जरा
नाराजच राहतो –
दुर्दैवी माणसाला तो
समदुःखी वाटतो !
--- ००० ---

JUNE 28

बालपणी आजारपणात
पडून असताना मी
मैं रंगीला प्यार का राही
माँग के साथ तुम्हारा
चली चली रे पत्तंग मेरी चली रे
( गजाचा मांजा फेमस होता
तो काचेची पूड लावून बनवायचा )
ऐ मेरी टोपी पलट के आ
ऐकत असे सतत धार्मिक कण्यींवर.
कसे काय हे लोक
गाणी म्हणतात, असे वाटे.
इतर सगळी माणसे आणि गाणी
मला चिडवण्यासाठीच होती !
दुसऱ्या कोणत्या तरी जगात

केलेल्या पापामुळे मला
या जगाच्या नरकात टाकले आहे
असे वाटे.

आधीच्या त्या जगातच मी
चांगले वागायला हवे होते
म्हणजे मीही
गाणी म्हणणारा झालो असतो
असे वाटे.

हे असले विचार नंतर
कमी कमी होत गेल्यानेच
तसा तसा मी बरा होत गेलो
असे आता वाटते.
--- ००० ---

JUNE 27

निरर्थक होती नुसती आस
कृती अटळच होती
भयहीन
दिसणारी खचितच
बहुमतविरोधी

वापरातही काही ब्रँडेड नाही
बहुमतातही सामील नाही
मोर्च्यात नाही
कोणत्याही
खेळाला भाषणाला

टाळ्याही नाहीत
मग हा कोण एवढा

असे झाले असते
हातात सापडलो असतो तर
निघाला असता सगळा संताप
समाजविघातकच
ठरवून
--- ००० ---

लाखो अँटेनांचे पुंजके होऊन
क्लॅरिटी घालवून बसलो
भराभर मेसेजेस पाठवले
आता मी
ओळखू येणारा न राहिल्याचे
नंतर सर्व साधने
गहाण टाकून
शेवटचा जुगार खेळायचे ठरवले
फक्त आकाशच आहे अस्तित्वात
अशी कल्पना करत
तिचेच
सत्यात रूपांतर करण्याचा –
--- ००० ---

JUNE 26

झाडांचे अवशेष
हाडांसह सापडले
कालगतीत वठलेल्या

निर्दयी मनांच्या

--- ००० ---

चाललाच आहे गोंधळ तर अजून कुठेही न दिसलेला हा एक मुद्दा --

सगळ्याच जातींतल्या स्त्रिया अनुसूचित यादीत असायला नकोत का ?

( सबलीकरण हेच तत्त्व पायाभूत धरून ).

जिंकणे महत्त्वाचे होते

चांगल्या खेळावर नुसते नव्हते

खेळबाह्यही खूप डाव होते

( न्यायालयांप्रमाणेच हो ! )

पूर्वी देव सिद्धी, चमत्कार वापरत

तरीही

विजय लागतच ना त्यांच्या नावांवर ?

तुम्ही काय आहात

ते वेगळे

तुमची नोंद कशी झाली

हे महत्त्वाचे !

तुम्ही मराल

तुमची नोंद राहील !

--- ००० ---

पर्वतावरून दिसणारे हे शहर

बारीक बारीक

यातच गेले माझे बरेचसे आयुष्य

राग, लोभ, मान, अपमान, डाव,

पेच, प्रेमपाश, प्रेमनाश, इत्यादी

इतक्या नव्हत्या इमारती तेव्हा

इतके काहीच नव्हते

खूप सोकावत आता हे

क्षितिजापलिकडेही पसरलेय !

त्या वेळचे ते शहर

याच्यापुढे अगदीच नगण्य !

मला या शहराचा अभिमान आहे !

जाज्वल्य !

--- ००० ---

JUNE 24

अनेक प्रकारे जगाकडे, मानवी जगण्याकडे पाहणारी माणसे, अगणित विषय, हलक्याफुलक्यापासून अतिगंभीरपर्यंतचे सर्व प्रकार, संक्षिप्त आणि सविस्तर, भाषेचे अनेक प्रकार -- हे सगळे एका ठिकाणी मिळण्याची जागा आहे फेसबुक म्हणजे ! आपल्या मेंदूतली भाषेची आणि विचारांची केंद्रे इथे जागृत राहतात. मतभेद, छोटेमोठे मानापमान यांबद्दल समजुतदारपणा येतो. त्यामुळे, फेसबुकवर वेळ फुकट जातो, असे मला वाटत नाही. हा एक सराव आहे, व्यायाम आहे -- जगण्याच्या मुख्य खेळात याचा नक्कीच उपयोग होत असणार. पण, नुसतेच फेसबुक आणि जगण्याचा मुख्य खेळ स्थगित -- असे होऊ नये, म्हणजे झाले !

JUNE 23

एक आनंदवार्ता --

भारतात एकूण वीस कोटी इंटरनेट वापरणाऱ्या व्यक्ती आहेत -- त्यात फक्त तीस टक्के स्त्रिया आहेत -- स्त्रियांचे प्रमाण वाढवण्याचे प्रयत्न महाकाय कंपन्या करत आहेत ! म्हणजे ते प्रमाण वाढणारच !

एकजण मला म्हणाला की तू धडाधड पोस्ट देत राहिलास तर एकही नीट पाहिली जाणार नाही -- रोज एखादी पोस्ट ठीक -- मग मी काय हे सगळे संभाळत बसू ? या बाबतीत उधळपट्टीच होणार ! जे पाहतील ते पाहतील ! कवितेच्या बाबतीत मात्र मी संयमी राहणार आहे -- माझ्याजवळ लिहून ठेवीन पण इथे सबुरीने देत जाईन --

कुणाला साहित्याचे, कुणाला चित्रकलेचे, कुणाला नाटकाचे वा सिनेमाचे वेड ! हे असे काहीच ज्यांना नाही, यांपैकी कोणत्याच क्षेत्रातले काहीच माहिती नाही आणि कोणत्याही सर्जक कलेच्या संपर्कात जे आलेले नाहीत वा येत नाहीत -- त्यांना सांस्कृतिक दरिद्री म्हणावे का ?

JUNE 22

डब्ल्यूबी चॅनेल -- चित्रपट ' **सेक्स अँड द सिटी** ' . एक जोडपे बेडवर. स्त्रीच्या हातात एक पुस्तक. ते तिला खूप आवडते, असे ती सांगते. ते असते अनेक मोठ्या माणसांच्या प्रेमपत्रांचे संकलन. पुरुष तिला काही विचारतो -- ती स्त्री नेपोलियनने त्याची प्रेयसी जोसेफाईन हिला लिहिलेले प्रेमपत्र वाचून दाखवते. उत्तम प्रेमपत्र ! विचार आला, आपल्याकडच्या कोणकोणत्या ' मोठ्या ' माणसांनी प्रेमपत्रे लिहिली असतील ? त्यांचे असे पाचेकशे पानांचे संकलन व्हावे, एवढी असतील ? इतिहास आणि मोठ्यांची चरित्रे यांची मला खरेच कमी माहिती आहे. एक उत्सुकता वाटली. की, मोठ्यांनीच अशी प्रेमपत्रे लिहिली असती तर पुढच्या पिढ्यांवर किती वाईट परिणाम झाले असते -- असेच म्हणावे ?

माणसाची प्रत्येक मनोवस्था, भाव-भावना, मानसिक ताण, संघर्ष, प्रश्न, स्वप्न, भ्रम आणि प्रत्येक मानसिक प्रतिक्रिया -- हे सर्वच कवितेचे विषय असतात. त्यांची रचना पाहात गेल्यास क्षणोक्षणी कविता दिसू शकते. कविता नुसती दिसण्याचे वा ती लिहिली जाण्याचे महत्त्व नसते. जगणे समजून घेण्याच्या प्रक्रियेचे ते फक्त एक निमित्त असायला हवे.

JUNE 21

किशोरी अमोणकर -- एक ग्रेट तपस्विनी, चिंतनशील गायिका ! त्यांचा आजच्या लोकसत्तेतला लेख वाचनीय आहे. त्यातली दोन वाक्ये -- (१) अभिजात म्हणजे साधा अर्थ सांगते -- सर्वोच्च. ज्याच्या पुढे-पलिकडे काही असू शकत नाही, ते ! (२) आपल्याला कुठे जायचे आहे, कुठे थांबायचे आहे, हे माहीत असणारे माणूस म्हणजे व्रतस्थ.

कविता म्हणजे, सर्व भुसकट आणि फोलपटे टाकून दिल्यावर उरणारा जगण्याच्या आकलनाचा गाभा !

मुस्कटदाबी त्याला
आवडे म्हणजे सवयच
होती दुसरे काही
माहीतच कुठे
होते काही त्याला
कळे पटे खात्री
होई स्वतःची शर्टावर
लोगो लावून त्याला
इतरही ओळखू
येत मजा वाटे त्या
ताणाची दुःखाची
जिंकल्यावर त्याची
द्वाही फिरे लोक
टाळ्या वाजवत

फारच वाजे
थंडी तेव्हा तो
किंचित जागा होऊन
किलकिल्या डोळ्यांनी
मोजे त्याचे लोगो
त्याने ठिकठिकाणी
प्रेझेंट केलेले

तसेच करत तो
भांग पाडे डॊळा मारे
तिने स्वीकारले असे
समजून पुन्हा मरे
करत स्वतःची
अविरत मुस्कटदाबी

त्याच्या पाचवीला
पुजलेली त्याच्या
पूर्वपिढ्यांनी

अनभिषिक्त

--- ००० ---

माझ्या तक्रारींना तक्रारी
म्हणताच येत नाही
-- त्या नोंदवून घेण्याची
सोयच उपलब्ध नाही –
मला होणारा त्रास
कुणाला कळूच नये
अशी व्यवस्था आहे –
मी बोललो तर
होणाऱ्या स्फोटात
माझी माणसे, माझ्या वस्तू
नष्ट होतील –
शिवाय अपमान होतील
गुप्तपणे !
माझे दप्तर सगळे
गोपनीय बाबींनी
परिप्लुत आहे !

मला तर वाटते
कधीकधी
हे काही नाहीच आहे
नुसत्याच
कल्पना आहेत या

माझ्याच !

--- ००० ---

JUNE 20

आकाशाला जिथे जिथे

झाले मनुष्यस्पर्श

तिथे तिथे उमटले

डागांचे ढग

मला दिसणारे सहज

मी म्हणेन तेव्हा

पडतो पाऊस

कवितांचा

ज्या मी

वेचतो फक्त --

हरेक ढगाची एकेक

आंतर्रचना ...

--- 000 ---

मानसिक उकिरड्यांमुळेच

खरे तर

बाहेरचे उकिरडे होते --

एकमेकांना मदत करू लागताच

गोंधळ, हिंसा

यांनी मने अधिकच

बरबटू लागली –

कुणालाच काही

कळत नव्हते –

तेव्हापासून ठरले

फक्त बाहेरचेच उकिरडे
साफ करायचे
प्रयत्न करत राहायचे --
--- ००० ---

JUNE 19

स्त्री-पुरुष भेदामुळे साहित्याच्या आवडी-निवडीत फरक पडतात का ? उदाहरणार्थ स्त्रियांना रोमँटिक, स्वप्नील, हळव्या, रूटीन भावभावनांत खेळणाऱ्या कविता अधिक आवडतात, असे असते का ? त्यांना आवडणाऱ्या साहित्यकृती या मुख्यतः स्त्रीविश्व चितारणाऱ्या असाव्या लागतात का ? लिंगभेदनिरपेक्ष स्वतःच्या हिंमतीने जगणाऱ्या स्त्रियांचेही असेच असते का ? असे जर बऱ्याच प्रमाणात घडत असेल तर कोणती असतील याची कारणे ? हे असे असणे हे स्त्रियांनी स्वतःला एका मर्यादेत जखडून घेणे वाटते का ?

' आपले वाङ्मय वृत्त ' च्या जून २०१४ च्या अंकात सुखदेव ढाणके यांच्या कविता आलेल्या आहेत. त्यांपैकी एका कवितेतल्या या चार ओळी -- मन ढवळून काढणाऱ्या -- भडभडून आणणाऱ्या --

तान्हे पुढ्यात वासरू
तिच्या डोळ्यात करुणा
काटे खाऊन गायीला
सांगा फुटेल का पान्हा

हा एक खूपच संवेदनशील कवी दिसतोय !

खून, छळ, आसक्ती, प्रेम
दिसतात
त्यांचे मूळ प्रवाह असतात
मनांचे ( सदेह )

बाकी सगळे वगळून

फक्त मनेच ठेवली

तर

ना रक्ताचे सडे दिसतील

ना प्रेमाचे अश्रू

मनांचे मनांना

कधीच काहीच

कळणार नाही

सदेह जगणेच चांगले –

निदान कळते तरी !

--- ००० ---

JUNE 18

आनंद, दुःख, निराशा, हिंसा -- हे सर्व व्यक्त करणे एवढेच साहित्याचे कार्य असते का ? की मानवी श्रेयसाचा शोध घेणे, हेही एक महत्त्वाचे कार्य असते ? काही गडद निराशावादी लेखकांना आणि सर्वच उत्तरआधुनिक लेखकांना ' श्रेयस ' हा शब्दच मागासलेपणाचा वाटतो, असे दिसते !

JUNE 17

सतत विचारग्रस्त मन रोगट बनते.
--- मारुती शिवरामपंत कांबळी.

मी एक मिनी अँग्री मध्यवयीन बघितला ! बोंबलायला एकाही खऱ्या व्हिलनविरुद्ध त्याची कवडीची कृती नाही ! ते येडं निरुपद्रवी लेखक, कवी यांना राग दाखवत फिरत असतं ! बाकी सगळा पोकळ अँग्री ! अरे बाळा, असा घाबरत असतो तर कधीच माझा निकाल लागला असता ! माझे ग्रेस आयुष्य चालू आहे मित्रा ! मला फरक पडत नाही !

JUNE 16

' कवितेतील प्रतिमा ' या विषयावरील चर्चा -- भाग ३.

-- हा भाग झाला की ही चर्चा संपेल. जरा अधिक प्रतिमांची एक कविता पाहायचे ठरले होते. मी इथे देत असलेल्या कवितेवर सध्या तरी, मला फारसे सुचत नाहीय, हे आधीच सांगतो. अर्थात त्यामुळे या कवितेवर मी मुळीच संतापणार नाही. मला सगळेच कळायला हवे, अशी सक्ती करून उपयोग काय ? तरीही, आपल्या फ्रेंडसच्या आकलनांबद्दल मी नक्कीच उत्सुक राहीन आणि मला काही समजू लागले तर मांडेनच. दिलीप चित्रे यांची कविता देतोय --

चंद्र आणि खेचर

चरतात एका फाळलेल्या माळावर
अंधार समजून गवत प्राणिमात्र ...
रात्रींत विरघळते माझे ढेकूळ
आसमंत गढूळ करीत. पण मग स्वच्छ
होतात माझे डोळे पाहून उजळ
चंद्र आणि एक मुग्ध झालेले खेचर
स्वतःच्या सावलीवर ...
पाण्यात चांदण्याने रडलेलं अक्षर
मासोळीची लाटभर ओळ होऊन
पोहतंय माझ्या गळक्या ढेकळाच्या
गढूळ आसमंतात ... अशी वेळ.
आणि गवत समजून स्वतःच्या सावलीचं
खेचर चांदणं चरतंय ...
माझी माती बसते जाऊन रात्रीच्या तळाला
मासोळीच्या सुळकांडीची लाट पकडतो
प्रत्यक्ष अवकाशाचा गळ

चंद्र समजून मी पाहिलं

त्या मुग्ध खेचराचं चरणारं चांदणं.

--- ००० ---

JUNE 15

चीत्कार आनंदाचेही होते
वैफल्याचेही --
रेसचे स्वार, प्रेक्षक
रेसचे भागच झाले होते --

--- ००० ---

आपणहून ओढवून घेतलेले प्रश्न
आक्रमक नाही झालेले अजून
तोवरच दे सोडून
असा स्वसाह्य सल्ला ऐकून
तंदूरमार्गी कोंबडी
म्हणाली
मी आता पोटात घुसेन तुझ्या
( तू भुकेला आहेस )
मग भोसकून बाहेर येईन
तेव्हा हेच सांग पुन्हा सगळे –
प्रत्यक्षात तसे झाले
तेव्हा मात्र मी म्हणालो
थँक्स !
आपण बळी पडतोच !

--- ००० ---

पैसा मिळवणे, प्रसिद्धी मिळवणे, आदर्शांचा प्रचार करणे, असेही असते जगणे -- हे दाखवणे, स्वतःचा मूड वाचकात प्रक्षेपित करणे, स्वतःचा अनुभव सांगणे, कोणती राजकीय भूमिका बरोबर त्याची समज पसरवणे, सामाजिक वा राजकीय

परिवर्तनासाठी प्रयत्न करणे, करमणूक करणे, सौंदर्यनिर्मिती करून वाचकाला खुश करणे, स्वतः कीर्तीरूपे उरण्यासाठी ---- आणखी कोणकोणते असतात लेखकाचे लिहिण्यामागचे हेतू ?

JUNE 13

' कवितेतील प्रतिमा ' या विषयावरील चर्चा -- भाग २.

या भागात प्रत्यक्ष कवितांवर बोलू. सुरुवातीला जरा कमी प्रतिमा असलेली आणि घटनाक्रमाला सलगता असलेली अरुण कोलटकरांची ' दिवे ' ही कविता घेऊ. यानंतर प्रतिमागच्च असलेल्या आणि घटनाक्रमाची सलगता नसलेल्या कवितेवर बोलू.

दिवे

काहीतरी कुजल्याचा वास याय लागला
अन मी खिशातनं रुमाल काढणार
तोच माझी करंगळी खाली पडली
ती मी दुसऱ्या हातानं उचलून घेतली
अन रुमाल नाकावर धरणार
तर नाकच निसटून रुमालात आलं
ते रुमालात गुंडाळून मी खिशात टाकलं

काहीतरी कुजल्याचा वास येतच होता
म्हणून खिशातल्या खिशात नाक मुरडलं
अन करंगळीत आळ्या पडल्यात की काय
ते बघणार ः पण तेवढ्यात दिवेच गेले

कवी -- अरुण कोलटकर.

टोकाचे मतभेद असूनही मस्त मैत्री राहणे याला खेळकरपणा म्हणावे की समजुतदारपणा की निर्लज्ज पण हुशार धूर्तपणा ? उदाहरणार्थ, खरोखरच, हिंदुत्ववादी आणि कम्युनिस्ट दोन्ही प्रकारांत माझे चांगले मित्र आहेत ! की माणसाच्या एकूण जगण्याशी मला काही देणेघेणेच नाही, असा याचा अर्थ होतो ?

माझी कविता समजवावी म्हणून
खडू आणले, फळा आणला
ट्रॅफिकचे नियम पाठ केले
ओरिगामी शिकलो ...
हे तर सगळे
असलेले सांगणे
कल्पिलेले रचणे होते ...
नष्ट होण्याचा आनंद
पटवावा कसा
हे मलाच समजेना ...
त्यापेक्षा
जशी आहे तशी
‘ न समजणारी ‘
कविता लिहिणेच बरे
हेच उलट
मलाच समजले !
--- ००० ---

JUNE 12

आळसामुळे माझ्या
स्टेशनवरचे सगळे स्टॉल्स
शाबूत राहतात --
मी खूप काम करतो
पक्का धूर्त, अनुभवी होतो

चहा पितो, स्त्रिया पाहतो
पुस्तके मनात कोरून घेतो
स्टेशन न सोडता
खूप प्रवासही करतो
सगळ्यांबरोबरच
जग मलाही
टिकाऊ, खरे वाटत राहते ...
--- ००० ---

फ्रेंडस, इथे काही खूप समृद्ध चर्चा घडतात -- त्यांबाबत एक कायदा हवा -- ज्याने पोस्ट दिलेली असेल त्याला ती पूर्ण चर्चा, सहभागी व्यक्तींच्या नावांसह प्रसिद्ध करायचा अधिकार हवा -- अन्यथा बरेचसे वाया जाण्याचा धोका दिसतो --

फ्रेंडस, एका विषयावर आपली मोकळी चर्चा व्हावी, असे वाटते -- कवितेत प्रतिमांची फार गर्दी झाली तर, ती दुर्बोध होणे तर पुढची गोष्ट, पण संपर्कप्रक्रियाच ब्लॉक होते -- थांबते -- असे वाटते का ? अशा वेळी कधी कधी फसवणुकीचा संशय येतो का ?

भेट जिथे ठरली होती
तिथेच ते घुबड येऊन बसले.
ना मी ना ती
दोघेही धीट नव्हतो.
त्याला हाकलताना
त्याने हल्ला केला असता तर ?
जवळ शस्त्रही नव्हते !
मने तर त्याच जागेशी बांधली गेलेली !
ती सुंदर असून
आमचे प्रेम सखोल असून
वाट पाहणे आले ...
माझ्याहून उलट तीच जास्त
अधीर होती ...

तरीही वर्षे जात राहिली ...

ते घुबडही आता

आमच्या आयुष्याचा भागच झाले ...

--- ००० ---

JUNE 11

When men ask me how I know so much about men, they get a simple answer -- everything I know about men, I learned from me.
- Anton Chekhov

१. -- मला बाकी काही घेणे नाही -- समाजस्वास्थ्यासाठी जे कायदे आहेत त्यांवर आधारितच अपरिहार्यपणे निर्णय होतील !

२. -- अहो, मग संस्कृतीच्या प्रवाहित्वाचे काय ?

१. -- त्यासाठी जे धोके पत्करू इच्छितात, त्यांचे ते काम आहे !

मी क्षच्या मला आवडणाऱ्या प्रतिमेशी तद्रूप झालेलो आहे -- तिच्या बाबतीत कुणीही कोणतीही आगळीक केली तर तो साहजिकच माझ्या जगण्यालाच धोका असणार ! समजा, हा माझा एक तीव्र, अटळ असा मानसिक प्रश्न आहे ! ( समजा, मी वेडा आहे, पण मग वेडा नाही कोण ? ) -- माझी हिंसक प्रतिक्रिया येणारच आत्मरक्षणार्थ ! आणि तुम्ही मला तर्काने, बौद्धिक विवादाने, बाजू मांडून, योग्य काय ते पटवून देऊ पाहताय ! तुम्ही वेडे आहात का ? तुम्हाला प्रश्न तरी कळला आहे का ?

तुका म्हणे तुम्ही

थांबू नका येथे

प्रवाही व्हा जैसा

विठू आहे

ज्ञानदेव म्हणे
मी नाही देह
माझा शब्द भेव
न निर्मी

दोहोंचा आशय
किनारा सोडणे
डबके न होणे
कदापीही

आशयापारखे
जन जे होतील
विठूचे पाईक
होणे नाही

बैसल्या ठिकाणी
सडत होईल
कुंभीपाक त्यांचा
अहंगंड
--- ००० ---

JUNE 10

विभूतिपूजा ठेवा पण सेन्सॉर नको -- हे होणे अवघड आहे ! विभूतिपूजा, इतिहास-पुराण पूजा, निरनिराळ्या अस्मिता, हे सगळेच बंद व्हावे -- हे मान्य असेल तरच सेन्सॉरविरुद्ध बोलण्यात अर्थ आहे ! लोक त्यांच्या आवडत्या विभूतीच्या त्यांना आदर्श वाटणाऱ्या प्रतिमेशी तद्रूप ( आयडेंटिफाय ) होत असतात. त्या प्रतिमेला धक्का लागणे वा तीत बदल केला जाणे हे त्यांना मृत्यूसारखेच वाटते -- त्यांना तो स्वतःवरच झालेला खुनी हल्ला वाटतो ! त्याला तशाच प्रतिक्रिया येणार ! जो समाज असल्या भ्रमिष्टपणातून बाहेर पडू इच्छित नाही, उलट त्यात अधिकाधिक रुतत जाऊ इच्छितो, तिथे कसले असणार अभिव्यक्ति-स्वातंत्र्य ?

टीव्हीवरची एखादी मुलाखत अशी असू शकते की कोणते प्रश्न विचारले, काय उत्तरे दिली याला शून्य महत्त्व असते ! तरीही प्रेक्षकसंख्या प्रचंड वाढू शकते ! आयबीएन लोकमतवर थोड्या वेळापूर्वी अशी एक हिंदीतली मुलाखत पाहिली. ती मुळात अर्थातच त्यांच्या दुसऱ्या एखाद्या चॅनेलसाठी घेतलेली असणार. पण भाषा ओलांडून ती इथेही उपयोगी पडणारच, हे ओळखून ती इथेही दाखवली गेली ! मुलाखत घेणाऱ्याचे नाव नाही माहीत पण मुलाखत देणारी होती सनी लिऑन ! या निमित्ताने तिच्या डान्सचे काही तुकडेही अर्थातच दाखवता आले ! तिचे डान्स पाहता, तिने उत्तेजकतेची कला तीव्रतेने आत्मसात केलेली आहे हे निश्चितच पण तिचे बोलणे पाहता ती अनेकींप्रमाणे एक साधी, सरळ स्त्री वाटली. तरीही, तिलाही माहीत असणारच की बोंबलायला हे काही आपले काही महान विचार ऐकण्यासाठी आपली मुलाखत घेत नाही आहेत. पण तो तिच्या कलाजीवनाचा भाग आहे. चॅनेलवाल्यांनी मधेच खाली एक नक्षीची पट्टी दाखवणे आणि मधेच ती काढून पूर्ण चित्र दाखवणे, असे सुरू ठेवले होते. पण एकूणात मला लिऑन निष्पाप आणि चॅनेलवालेच बनेल, लुटारू वाटले !

खळाळत्या पाण्यात
डोळे मिटून
एक रुपया टाका
पंधरा सेकंदांत
वर्षातून एकदाच

हवे ते मागा
अशा त्या ठिकाणी
हेतू मात्र हवा
न्याय्य, समर्थनीय, स्वच्छ
अशी अट होती

बेसिक गरजा भागूनही
मनात अजून खूप होते
हवेहवेसे, अतृप्तीचे,
वासनेचे, दडपलेले
सडत चाललेले

एक रुपया टाकला
नेमका हेतू दिसेना
अस्वच्छ वाटून निघून आलो
पुन्हा जाणार नाही –
आपापली हिंमतच शेवटी खरी !
--- ००० ---
( काही फ्रेंडससाठी सांगावेसे वाटते -- माझ्या कवितेत उपदेश वा बोध कधीही नसतो -- उपरोधाला कृपया प्रचार समजू नये ! )

JUNE 8

मन म्हणजेच प्रश्न
एक क्षण तरी
प्रश्नहीन जगावे --
--- ००० ---

मला
जिवंत ठेवून वा ठार मारून
माझा मर्डर करावासा वाटला
कुणाला
तर ते माझेच जगणे ! --
मी निळा शर्ट घातला काय,
मी गप्प बसलो काय --
माझ्या मनाचे गोंधळ मी
पाहू लागलो याचा अर्थच
माझे बोलणे, वागणे
हे गुन्हेच असणार --
--- ००० ---

मी उच्चारलेले शब्द

ऐकले जाईपर्यंत बदलून गेले

पाण्याऐवजी झाड झाले

प्रदूषणाऐवजी पक्षी झाले

-- या स्थितीत पुन्हा

स्पष्टीकरणासाठी

दगड आणि बॅक्टेरिया

घेतले --

बाप रे !

आता तर शस्त्रेच

निघाली !

--- ००० ---

JUNE 7

कीबोर्डावर यू आणि आय जवळजवळ ठेवण्यात संस्कृतिसंवर्धनाचा हेतू तर नसेल ?

सहज इंग्लिश पिक्चरची चॅनेल्स पाहात होतो तर एमजीएम वर ' **हार्ड प्रॉमिसेस** ' हा पिक्चर चाललेला दिसला. एक तरुण, एक तरुणी रस्त्याने बोलत चाललेले होते. निवांत. म्हटले, एवढे निवांत ? पाहात राहिलो. तिचे घर आले. दोनतीन चुंबने घेऊन निरोप दिला-घेतला गेला. तिने दार लावून घेतले. तो अजून उभा होता. तिने दार उघडून, काही बोलून त्याला आत घेतले. त्यानंतरच्या तीन मिनिटांत त्यांनी सुमारे पन्नास चुंबने घेतली ! --- या सहजतेपुढे आपले नायक-नायिका खूपच बिचारे आणि गरीब वाटतात ! – हा आपल्या उच्च संस्कृतीचा परिणाम की महाढोंगी संस्कृतीचा ?

दखल घेणे

हाच तिला

अडथळा होतो

ती यावी

असे तर

वाटतेच

नुसतेच शब्द

तिच्याशिवाय

कंगाल राहतात

--- ००० ---

चूक झालीच तर

घेताना होते

देताना माझ्याकडे

काही राहीलच कसे ?

द्यायचे नसलेले बेभानपणे

घेतले गेले की काय

हा विचार मनात असेल तर

माफी मागणेही घेणेच होते !

--- ००० ---

JUNE 5

सामाजिक प्रश्नांवर कारले

आर्थिक प्रश्नांवर वांगे

परराष्ट्रीय प्रश्नांवर फणस आणि

व्यक्तिगत सबंधांच्या प्रश्नांवर

पाटणा मिरचीचा चटका

हे हमखास उपाय

काहींना माहीत आहेत पण

इतर खूप माणसे मूर्ख आहेत
कुणी कारल्या ऐवजी दोडका म्हणतात
कुणी वाणाबाबत वाद घालतात
कुणी अग्रक्रमावर भांडत बसतात
काही वेळा मिरचीचा चटका
जोरात बसल्याने
कारल्याकडे दुर्लक्ष होते
कधी अचानक वांग्यांचा वापर वाढल्याने
फणसाला न्यूनगंड येतो
काही सश्रद्ध अतिरेकी होतात
काही नेभळट निराश होतात
बरेचसे स्वतःला गांडू म्हणत
अभिमानाने जगत राहतात
यात नेमके काय हवे हे
माहीत असलेले सतत
सात्त्विक संतापात धुमसत राहतात

तरीही प्रगती होते, बदल होतात
प्रयत्नांमुळे, परिस्थितीच्या रेट्यामुळे,
निसर्गामुळेही
माणूस हा गोंधळणारा प्राणी असला
तरी तो सर्जक असतो
याचा तो पुरावा मानला जातो ...

आजही तोच आशावाद कायम आहे –
उद्याचा सूर्य नवा असेल !
--- ००० ---

एक हास्य ...

केवढा हा उद्युक्तता

बहरवणारा

पाऊस !!!

--- ००० ---

प्रेमच असे की दिलजमाई

होताच पाण्यासारखे एक झाले

संघर्षाच्या काळात झालेल्या इजांचे

खुणा म्हणूनही असणे गेले ...

--- ००० ---

JUNE 4

चॅटिंग चालणारच नाही -- अशा कडक सूचना देणाऱ्या स्त्रियाही माझ्याशी चॅटिंग करतात ! अर्थात, मीही त्यांना त्रास वाटेल असे काही बोलत नाही ! ( मनात काहीही असले तरी ! ) मी किती भाग्यवान !

स्वप्नातही थोडा

मृत्यू स्वीकारावा

तसे तिला संध्याकाळी

भेटणे बंद केले

स्वप्नातही संध्याकाळी

मला टाळत तिचे

आत्ममग्न राहणे

मला असह्य झाले

स्वप्नातही थोडा

मृत्यू स्वीकारावा

तसे तिला संध्याकाळी

भेटणे बंद केले

--- ००० ---

JUNE 3

मला हे झाड

मौल्यवान – तरीही

हे माझ्या निकषांप्रमाणे जगेल ?

वेगळे होणारच खूपसे

झाड

मला ओलांडून

जाऊ लागेल

मी निकष बदलेन

सवयीने आता मी

त्याच्यावर अवलंबून असेन ...

--- ००० ---

JUNE 2

" तुम्ही स्वतः हे जगला आहात का ? "

" मी निर्माण केलेली शंभर पात्रे ? मुळीच नाही ! "

" मग स्वतःचा अनुभव नसलेले तुम्ही लिहिताच का ? "

" माझा स्वतःचा अनुभव असलेलेही मला समजत नाही -- म्हणून ! "

" तत्त्वज्ञान नका सांगू -- खोटेपणा नाही होत ? "

" माझ्या संपर्कात खूप माणसे येतात -- स्त्रिया, पुरुष -- "

" ते ठीक, पण त्यांचे तुम्हाला डायरेक्ट काय समजणार ? "

" माझे डायरेक्ट असूनही मला समजत नाही -- "

" मग, लिहू नये -- "

" लिहिणे आणि न लिहिणे -- दोन्ही एकच ! काळजी नको -- "

दुष्काळी प्रदेशातून
सुकाळात आलो –
आता ठीक –
आपलाच समजलो हा काळ
वाटले, आता फक्त समृद्धी !
कुणाला काही वाटण्यावर
जग थोडेच चालते ?
कुठेतरी ढकलला गेलो
-- भ्रम आहे -- असे जगू, पण
( मनातून ) नो ! – असे ठरवले !
गरज पडल्यास फक्त
जे ठरवले तेवढ्यालाच
सामोरे जायचे
असे ठरवले –

गरज पडणारच
हे माहीतच होते –
--- ००० ---

JUNE 1

प्रत्येक क्षण धोका म्हणजे
धोका नाहीच –
त्याने शिक्षण मधेच सोडले
नंतर चांगली नोकरी सोडून

दुसरी मिळेल ती घेतली
पहिल्या पसंतीला लग्न केले
मुलांना शाळेत घालून
वर्षभर निघूनच गेला –
परत येण्याचाही प्रसंग
भोगला – मुख्य म्हणजे
लफडे केले – छीःथू झाली
त्यातून जुगाराकडे गेला
माहीतही नसलेली
व्यसने केली – भांडणे केली
मार खाल्ला
लोक त्याला टाळू लागले
शेवटी
नको ते रोग लागले
माणसे नाहीत
पैसे नाहीत
अंघोळ नाही
जुने घाण कपडे
जेवणही कधीमधी

वेदना मात्र भयानक
तीही नंतर जाणवेनाशी झाली .....
खिशात कागद सापडला –
“ याहून काय ? “
--- ००० ---

वेळीच सावध व्हा ---------

फ्रेंडस, चार वर्षे मी चुकीच्या बैठक पद्धतीने संगणक वापरत होतो -- त्यामुळे मला ही पाठदुखी सुरू झाली आहे -- सर्वांनी आपापली बैठक-पद्धत योग्य आहे का ते पाहून घ्यावे -- अन्यथा आज ना उद्या हा त्रास होऊ शकतो -- नेटवर याची माहिती उपलब्ध आहे -- sit-at-computor किंवा pc and chair असे काही देऊन पाहावे.

MAY 31

सर्वांना ती
एकच नाही दिसत
-- स्वप्नच असावी –
गोड, मृदू, मादक, भेदक
अशी असंख्य तिची रूपे
त्यांतलीच एक असावी अशी
धारेवरून चालणारी
रक्तहीन विध्वंस करणारी
स्वतःसह सारेच अदृश्य करणारी ...
तिची सत्यता
कुणीच दाखवू शकत नाही –
‘ वाहवा ‘ तर तिला चालतच नाही –

तरीही म्हणालाच कुणी
‘ वाहवा ! ‘
तर किंचित हसून
ती निघून जाते ...
यावर तो तिचा शोध घेत राहतो
खूप आणि नेटाने –
तरीही
... ती सापडतच नाही ...
--- ००० ---

May 2014

MAY 30

झाडे, इमारती, डोंगर,

माणसे – जिवलगही –

थोडे किलकिले – बाकी बंद –

मला हवे आहे काहीतरी

पूर्ण माझे –

माझे मनही – नेहमीच –

थोडे किलकिले – बाकी बंद !

--- 000 ---

ना उघड होऊ शकणारा

ना टाकताही येणारा

हा अग्नी

जाळत राहतो हा संबंध

मूकपणे –

वर्षे येतात जातात

आयुष्य सरत येते

वाटते आता

शेवटचा एकच पाऊस

राहिला आहे –

त्यात तरी भिजणे व्हावे ...

--- ००० ---

ढगाला मनासारखा आकार

आला नाही आणि माणसेही

वेडीवाकडी होत गेली –

इतके सगळे बदल अनुकूल

कोण कसे करणार

-- माझ्याच या सगळ्या भागांत --

या प्रश्नावर हजार पक्षी

कलकलाट करत फडफडले –

एकेक एकेक करत हे सगळे

टाकणार तरी कसे –

या प्रश्नानंतर मात्र

स्वतःलाच

टाकता यावे असे वाटले –

--- ००० ---

MAY 29

फ्रेंडस, इथे एफबीवर माझ्यासह इतर अनेक व्यक्ती पोस्ट म्हणून कविता देत असतात. मला असे दिसते की अनेकांना आशयनिरपेक्ष अशी कवितेची ॲलर्जीच आहे ! असू शकते, हरकत नाही ! पण कवितेचा आणि कवीचा सूड घेण्याची इच्छा बाळगून -- कुणी इथे कविता देऊच नये असे उपरोधिक बोलणे वा टिंगल-टवाळ्या करणे, हे टाळावे असे मला वाटते. ज्यांना कविता नको असेल, त्यांनी ती ओलांडून जरूर पुढे जावे -- पण ज्याला जसे वाटेल तसे होऊ द्या ना व्यक्त ! तसे म्हटले तर गद्य पोस्टच्याही टवाळ्या होणे सहज शक्य आहे ! परखड मते देणे वेगळे आणि कुणाचीही अभिव्यक्ती बंदच पाडायचा प्रयत्न करणे वेगळे ! मला काळाच्या ओघात, ' इतके ग्रेट मराठीत काही लिहिलेच गेलेले नाही ' इथपासून ते ' इतके भंगार लिहिण्यापेक्षा तुम्ही समजून गप्प का बसत नाही ? ' इथपर्यंत सगळे ऐकणे जमून जाते -- पण, सगळ्यांचे तसे नसते ! मोकळेपणाने सर्वांना व्यक्त होऊ द्यावे, असे वाटते !

अनेकदा गेलो होतो सहजच

इथून तिथे – आता

शांततेची कबुतरेच

अडथळा झाली –

मनावर चोची मारून

घायाळ केली त्यांनी

प्रेमेच्छाच –

उपलब्ध सर्व वाहने
ब्रेकबंद होती
तरीही घायाळ मनाची
निष्फळ धावाधाव
हवालदिल होत होती –
नुसतेच हे सगळे
सोडून शांत
होता यायला हवे होते –
--- ००० ---

एखादी पायरी निखळण्याचा
धोका होताच
जुना जिना उतरताना
दिशा झाल्या असत्या छिन्न
कायमच्या
मनात उठले असते
मस्तकभेदी प्रवाह
जायबंदीचे

घाबरून आधार चाचपडले
झाडे दूर गेली
भिंती धसतीलसे दिसले
माणसांना काही
समजेनासे झाले

एक वेदना
बाकी नुसती
मनःस्थिती – भयाण दोन्ही
मिळून झाले

एक मृत्युयंत्र

-- एक न हलणारा डोंगरच

मानसिक –

--- ००० ---

MAY 27

आकाशाच्या अधोगामी

पावसाला धुवांधार

प्रतिसाद धरतीच्या

सुगंधाचा ऊर्ध्वगामी ...

--- ००० ---

MAY 26

पाठदुखीमुळे काही दिवस संगणक-सुट्टी घेत आहे.

MAY 24

आज पुण्यात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक रंगमंदिरात ः --
दुपारी १ वाजता -- त्या चार योनींची गोष्ट -- आणि --
सायंकाळी ६ वाजता -- गुपीत योनीच्या गुप्तगोष्टी.
या विषयाच्या वर्ज्यतेचा मराठीतला खडक प्रथम फोडणाऱ्या आपल्या फ्रेंड वंदना खरे यांचे ' योनीमनीच्या गुजगोष्टी ' हे नाटक मी पाहिलेले आहे. ते नक्कीच एक धाडस होते ! या निमित्ताने मराठीतला एक लेखक या नात्याने त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करावी, असे वाटते ! -- Vandana Khare.

दुसऱ्यांच्या कृती आणि स्वतःच्या नजरेच्या टप्प्यात येणाऱ्या घटना यांवर सतत प्रतिक्रिया देत राहण्याचे महत्त्व का वाटत असेल एखाद्याला ?

ही घ्या एक साधीशी कविता --

मुद्दाम कुणीच काही करत नाही
कितीही माघार घ्या
कपडे फाटतील, लुटले जाल

जगण्याचे एक साधे तत्त्व --
किडूकमिडूकही पुरेल,
तुमच्याकडे पाहणारही नाही

एवढ्याने नाही भागत
राजे,
सर्वांचीच तयारी लागते

लढायची, मरायची,
सुखी-दुःखी व्हायची --
मग जमवून घ्यायची –
--- ००० ---
MAY 23

अनभिषिक्त रस्त्यांची कोळीण ती
स्वतः उन्मादक असूनही कंटाळलेली
वर्षानुवर्षे आंबून

प्रत्येक रस्ता केंद्रवर्ती
उष्णताही थंडावलेली
मन फक्त सक्षोभ –
--- ००० ---

चंद्रकांत पाटील यांनी सांगितलेली अस्सल कवितेची लक्षणे --

“ कविता जगण्यातील सूक्ष्म आणि गुंतागुंतीच्या अनुभवांवर आधारित पाहिजे. तिचा गाभा भावात्मक आणि ज्ञानात्मकही पाहिजे. कविता अतःप्रेरणेतून आली पाहिजे. कवितेने व्यक्तीकडून समष्टीकडे, खाजगीपणातून सार्वजनिकतेकडे, जगण्यातून जीवनाकडे जाताना विचार, चिंतन, आधिभौतिकता, तात्त्विकता यांचा आश्रय घेतला पाहिजे. कवितेने माणूस आणि अचेतन, माणूस आणि निसर्ग, माणूस आणि जीवसृष्टी, माणूस आणि माणूस यांच्यांतील व्यामिश्र नात्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कवितेने भाषेच्या अतःस्तराचा वेध घेतला पाहिजे. कवितेच्या भाषेने विस्मित केले पाहिजे. कवितेतील शब्द संघटन व रचना अकल्पनीय असली पाहिजे. कवितेतील सूचकतेने आणि संदिग्धतेने वाचकांच्या कल्पनाशक्तीला आवाहन केले पाहिजे. कवितेचा सुरुवातीपासून शेवटपर्यंतचा प्रवास अनुमान करता येण्यासारखा असू नये. “ – ‘ प्रिय रसिक ‘ – मे २०१४.

आमचे तत्त्वज्ञान-तर्कशास्त्राचे प्राध्यापक जेकेंवर फार खवळत, त्यांना अद्वातद्वा शिव्या घालत ! ' इथे हे सगळे आधीच सांगून झालेले आहे -- हा काय सांगतो ****** ' वगैरे तोंडाला येईल ते बोलत ! मला वाटे, जेके त्यांच्या आकलन-प्रक्रियेप्रमाणे सांगताहेत तर सांगू देत ना -- यांना एवढे जीव खाऊन संतापायचे काय कारण आहे ? की ' माझे जे सत्य ठरलेले आहे त्याला जगात कोणतेही, कसेही, कधीही आव्हानच असता कामा नये ', असे काहींना वाटते ? काय संभाळण्यासाठी असतो हा आक्रमक आणि आक्रस्ताळी भित्रेपणा ?

MAY 22

त्यालाही कुणी
स्वामी असल्याचे पाहून
त्याचे शत्रूही कनवाळू झाले –
सगळा मार, अपमान
विसरून हलके झाले –

त्यांना वाटले होते त्याची
बुद्धीच फक्त होती त्याला अंतिम,
तो होता निर्भय, आत्मनिर्भर –
त्याचा बेमुर्वत अहंकार

त्यांनी हजारदा साहला होता –

त्याचा एकट्याने रडण्याचा कोपरा
पाहून ते सुखावले –
खरेच माणसाचे जगणे
शोकात्म असते – जणू पक्कपणे
ते एकमेकांत कुजबुजले –
--- ००० ---

MAY 21

कळणे इतके सरळ असून लोकांना
कळत का नाही, हेच त्याला कळत नसे.
तो सदोदित विद्ध आणि कसावीस असे.
अन्यायाबाबत सात्त्विक संताप,
खोटेपणाबाबत जहरी क्रोध,
अज्ञानाबाबत सहानुभूतीयुक्त राग –
असा तो जगे ...
माणसाला खरे तर नीट जगणे
इतके सोपे असताना, का लोक
सगळा असा विचका करतात –
असा त्याला प्रश्न पडे ...
खूप माणसे एक तर मूर्ख किंवा
आपमतलबी असल्याचे भाव
सतत त्याच्या चेहऱ्यावर असत –

त्याच्या स्टॉकमध्ये सगळी उत्तरे असत ...

तरीही -- देशात काय – जगात काय

करोडो लोक त्याच्याकडे दुर्लक्ष करत

जगत राहात ...

शेवटी त्याला त्यांची दया येई ...

आता मात्र तो

पुरता थकून

कंटाळला आहे ...

--- ००० ---

काही जुगारी माणसे क्षणात

एसी टॉवरमधून अब्जावधींची गुंतवणूक

इकडची तिकडे तिकडची इकडे करतात

अवाढव्य कंपन्या ठरवतात

जगाचे जगणे – यंत्रणाच घडलेली

अशी की आता सुटका नाही

तीच राबवत वागवत राहतेय

माणसांना ...

पक्ष, विचारसरण्या, धर्म, कला

सगळ्यांची ती एकच बांधिलकी...

भेदाभेद राहणार नाहीत

सर्वांसाठी एकच असेल वरवंटा ...

विचार आणि बुद्धी आता

कायमच बंदिवान ...

हेच जगणे की ..........

--- ००० ---

MAY 20

सन्मुख असणे

फक्त हवेय
नकोय वाटणेबिटणे
खाऊनच टाकते ती
तुम्हाला संपर्कात
तेच असते

कविता कळणे

--- ००० ---

अनुभवांचे भांडार, माहितीचे कोठार
-- त्यातून नेमका तुकडा काढणारी स्मृती !
लोक चकित होत, आदराने पाहात !
त्यालाही सुखदुःखे होत, तेव्हा अनुभव वाढे !
तो उपाय सांगे, सल्लेही देई – लोक
अधिकच नम्र होत !
शिवाय -- भ्रष्टाचार नाही, परस्त्रीकडे पाहणे नाही,
टॅक्सेस नीट वेळेत भरे ! व्यायाम, आहार योग्य ठेवे !
मुलेबाळे, कुटुंब, नातेवाईक, मित्रमंडळी
हे सारे त्याने नीट संभाळले !
नोकरी पूर्ण करून निवृत्तीनंतरच तो गेला – तरीही,
लोक म्हणाले, अकाली गेला ! त्यालाही जाताना
आपण अकाली चाललो आहोत, असेच वाटले !
आणखी काही दिवस आदर उपभोगायला हवा होता !
जाता जाता, ‘ थोडे परस्त्रीकडे पाहिले असते तरी
चालले असते ‘, असा विचार त्याच्या मनाला चाटून गेला !
कुणाला काही कळले नाही, हे महत्त्वाचे !

समाजाच्या आदराला तो कायमच पात्र राहिला – कारण

समाजात तसा दुसरा कुणीच नव्हता !

--- ००० ---

MAY 19

" सर्वांच्या पोटापाण्याचा प्रश्न मिटेपर्यंत अभिव्यक्तिस्वातंत्र्याची गरज नाही !

राजकारणाचे जोरात चालू आहे तोपर्यंत कला, तत्त्वज्ञान, संशोधन बंद ! "

-- असे होत नसते -- माणूस हा सर्वयुक्त जगत असतो !

तुम्हाला राजकारणातल्या घडामोडी फार महत्त्वाच्या वाटतात म्हणून शास्त्रज्ञाने संशोधन थांबवून बसावे, असे मुळीच होत नसते -- होऊ नयेही !

" हल्लीच्या लेखकांत पूर्वीसारखी मजाच नाही राहिली ! "

" ही घे पार्ले-जी -- पूर्वीसारखीच मजा ! "

लेखक या जमातीचा जाहिरातीसाठी उपयोग व्हावा हे अचंबित करणारे आहे !

आपल्याला कळो न कळो, बिनधास्त शेरेबाजी करायची, हा रोग मराठीतच असावा असे वाटत होते -- हा तर अखिल भारतीय रोग दिसतोय !

नसण्यात सहजच

नष्ट होतात

त्या जखमा

हा चमत्कार

नसल्याचे कळले

मीच आहे

त्या जखमा ...

--- ००० ---

MAY 18

विशिष्ट वा व्यक्तिगत अनुभव व्यक्त करणाऱ्या कविता घिस्यापिट्या वाटतात --
जनरल बोलणाऱ्या ( सामान्यीकरण करणाऱ्या ) कंटाळवाण्या वाटतात --
-- मग कवितेतले नावीन्य म्हणजे काय ?

काही पारंपरिक मूल्यांच्या प्रत्यक्ष जगण्यात चिंधड्या उडत आहेत -- पण याकडे दुर्लक्ष करून, तीच मूल्ये प्रमोट करणारे ( ती छान अस्तित्वात आहेत असे दाखवत, ती कशी हितकारक आहेत, हेही सांगत ) लिहा, असे दडपण आले तर लेखकांना सक्तीने ' दांभिक व्हा ' असे म्हटल्यासारखे होईल -- असे झाल्यास सर्जक कला, साहित्य हे सगळे रद्दच होईल ! इतके असे तालिबानी निर्णय नवे सरकार घेईल, असे वाटत नाही !

MAY 17

भाजपाचा जाहीरनामा अंमलात आणण्यासाठीच हा जनादेश आहे, असा या दणदणीत आणि निर्विवाद निकालाचा अर्थ नाही होत ?

त्या ब्रेथलेस गाण्यापेक्षा हा शंखनाद फारच प्रचंड भारी, चकित करणारा आहे !

MAY 16

मला एकजण म्हणाला -- हे जरा कमी भ्रष्ट, जरा अधिक कार्यक्षम आणि जरा अधिक लोकहिताचे असे काँग्रेसचेच सरकार असेल ! फक्त हे लोक परराष्ट्र धोरण आणि डावपेच यांत कमी पडतील, कच्चे ठरतील आणि चुका करतील ! -- यावर बोलण्याची माझी योग्यता नाही !

यश मिळालेल्यांना बोध आणि रट्टा खाल्लेल्यांना धडा ः --
यापुढे इथे जाती-धर्मांची गणिते मांडून केले जाणारे फोडाफोडीचे राजकारण नको आहे !

MAY 15

समजा सगळे अंदाज उलटेपालटे होऊन, उद्या -- और एक बार काँग्रेसी सरकार -- अशी स्थिती समोर आली -- तर काय काय घडू शकेल ?

ऊन
हिरवी झाडे
वाहतोय वारा
छान

मन जाऊ
देतेय हरेक
जुने पाने
पान

MAY 14

आता त्याच्यापुढचा कहर सांगतो ! गेलो त्या नाटकाला -- हाऊसफुल ! ‘ नांदी ‘ ! आमच्या सीटस होत्या, तो प्रश्न नव्हता. तर नाटकाची तिसरी घंटा देण्यासाठी डॉ. लागू आलेले होते -- कारण नव्या नाट्यगृहातला पहिला नाट्यप्रयोग होता. सुरुवातीला काही सत्कार, स्वागत होणार होते. तेव्हा बोलताना ऋषिकेष म्हणाला, यात समाविष्ट असणाऱ्या एका नाटकाचे लेखक चं. प्र. देशपांडे हेही या प्रयोगाला उपस्थित आहेत ! -- फ्रेंडस, आले का लक्षात ? हे नवे नाट्यगृह सुरू होताना त्यात पहिले नाव कोणते उच्चारले गेले ? ! आपोआप, असंख्य योगायोगांनी घडून आलेली गोष्ट ! क्षणभर खूप मजा वाटली !

MAY 13

आमच्या घराजवळ झालेले ' लोकशाहीर अण्णाभाऊ साठे ' रंगमंदिर आजपासून सुरू होत आहे. दुपारी १२-३० ला तिथे ' नांदी ' या नाटकाचा प्रयोग आहे. योगायोग म्हणजे त्यात माझ्या एका नाटकातला एक सीन असून तो प्रसाद ओक आणि तेजस्विनी पंडित सादर करतात. सपत्निक जाणार आहे.

( नाट्यमाध्यमातून स्त्री-पुरुष संबंध कसे हाताळले गेले -- यावर हे नाटक असून कालिदासापासून आजपर्यंतच्या निवडक दहा नाटकांतले सीन्स, विवरणासह, या नाटकात आहेत. माझ्या ' बुद्धिबळ आणि झब्बू ' या नाटकातला एक सीन आहे ).

मानवी नात्यात गंभीर समस्या आल्यास -- चूक-बरोबर कुणाचे वा उपाय काय -- यांचा विचार करून उपयोग होत नाही -- समस्याच टाकून दिली जाणे, हेच जगणे होऊ शकते !

MAY 12

मूक व्हायला
तयार नव्हते शब्द
त्यांचे घणाघाती अस्तित्व
अपूर्ण अर्थांचे
अपूर्ण तत्त्वांचे
हिंसक असूनही
सुखप्रेमळ असूनही
गोंधळलेले, विस्कटलेले
असूनही सडणारे
विकृत वेडे होणारे
-- त्यांना टिकवायचे होते –
त्यांना
मृत्यूबाबत भीती आणि शौर्य
दोन्ही वागवायचे होते ...
--- 000 ---

अरे बुद्दू माणसा, त्या बाई काय म्हणाल्या तुला ? -- पाच मिनिटे बसा -- हेच ना ? मग तू अजून कौंटरवरच का उभा आहेस ? तू आलास की बाकी सगळे बाजूला टाकून तुझेच सगळे आधी घ्यायचे, असे नाही होणार रे कुठे -- आणखी खूप माणसे असतात, त्यांचीही कामे असतात, काही तुझ्या आधी आलेली असतात -- समजून घे -- तुझ्या चेहऱ्यावर किती ती

अधीर हाव दिसतेय, तुझेच काम आधी व्हावे म्हणून ! -- अरे, अशा मनःस्थितीसाठी शरीरात एक ताण निर्माण करावा लागतो -- रक्तपुरवठा जास्त लागतो, तुझेच बीपी वाढू शकते ! -- आणि हेही बघ ना -- त्या बाईनाही तू उगीचच डिस्टर्ब करतोयस -- तुझ्या आधी आलेले तुझ्याकडे चिडून पाहताहेत -- सगळ्यांनाच त्रास होतो रे ! -- स्वस्थ बस ना पाच मिनिटे ! ( जरा शांत राहिलास तर काय मरशील का भडव्या ? -- उलट असा वागून मरशील लौकर, वेड्या ! )

MAY 11

उलट इतर सगळ्या
मत्सरी न होता
तिला पूर्ण वाव देतात –
ती स्पर्धक नसतेच त्यांची

येते ती फक्त तिच्या मर्जीने
टोकाच्या तीव्र आचेने
खोटेपणाच्या उष्णतेत
खरेपणाची धार लेवून

वृक्षवल्ली नम्र होतात
नरमाद्या उत्फुल्ल
एकाच क्षणात फुटते
खऱ्याखोट्याचे उपरेपण

तिचे अंग वासनेचे असते
जगणे जणू काहीच नसणे
शब्दांसारखे शब्द दिसतात
आतच असते तिचे असणे ...
--- ००० ---

फ्रेंडस, आजच्या माझ्या वाढदिवसानिमित्त, आपल्या सर्वांच्या भरभरून शुभेच्छा पोचल्या ! त्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार ! माझ्यातर्फेही सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

MAY 10

आपल्या फ्रेंड प्रज्ञा दया पवार यांची आजच्या ' सकाळ ' च्या ' सप्तरंग ' पुरवणीत मुलाखत आलेली आहे. जरूर वाचावी, अशी ही मुलाखत आहे. त्या मुलाखतीतले एक वाक्य ः--
" आम्ही जेव्हा मनुवादाबद्दल बोलतो तेव्हा त्याचं कौतुक होतं; पण चळवळीतील पुरुषसत्ताक व्यवस्थेविरुद्ध किंवा चळवळीबद्दल बोलायला लागलं, की ते चळवळींमधील मंडळींनाही सहन होत नाही, याचा अनुभव मी बऱ्याच वेळा घेतला. "

त्याने आत्मसातच केली आहे
उपाय सांगण्याची कला
लिहीत राहतो तो भिंतीवर जाहीर
लोक वाचत उभे राहतात
पायांना मुंग्या चावत असल्या तरी ...
अक्षरांचे रंग आणि आकार बदलतो तो
अक्षर आणि शैली न बदलता
त्याची खात्री असते हे सत्य
विजयी होईल ...
अशा उपायबहाद्दरांची
अशी अनेक सत्ये आणि भिंती यांनी
लोकांचे पाय रक्ताळतात
कोणते सत्य विजयी होईल
हे कधीच सांगता येत नाही ...
साधी तहान लागल्याचे निमित्त करून
लोक घरी जातात –
आराम करतात ...
--- ००० ---

मी मालिका नाही पाहात -- एक नुसती माहिती म्हणून सांगतोय, याला कुठलाही रंग नको. पण मला एक प्रचंड उत्सुकता आहे -- मालिका आवडीने पाहणाऱ्या ज्या असंख्य व्यक्ती असतात त्यांनाही काही मालिका आवडत नाहीत -- ते का ? काही मालिका आवडीने पाहणाऱ्या प्रेक्षकांना दुसऱ्या काही मालिका न आवडण्याची कारणे ! -- कोणकोणती आहेत ? हा विषय फारच उद्बोधक होईल, असे वाटते -- मी अर्थातच यावर काही बोलू शकणार नाही ! पण, जे बोलले जाईल ते इंटरेस्टिंग असेल, हे नक्की !

( पुन्हा कवितालेखनाची यंत्रणा सुरू झाली आहे -- क्षमस्व -- )

जगात येताना जगाचा अर्थ कळत नव्हता –
मग तो सोडूनच दिला.
दुकानात जाताना दुकानाचा अर्थ कळत होता --
किराणा.
अर्थ, कारणे, साधकबाधक --
हे कळणे झाले.
एका दुःखाच्या झटक्यावर डोळे उघडले.
सखोल होताना कवितेचा स्पर्श झाला !
आला प्रश्न तिच्या अर्थाचा !
तिने तर जगाचेच दरवाजे उघडले !
जगाचेच अर्थ कवितेला आले !
( न कळणारे ) !
--- ००० ---

MAY 9

माझ्या मुक्त प्रेयसीला
आणेन मी पृथ्वीवर
बांधून उत्तेजक

तिच्या डोळ्यांनी पाहायला लावेन

मी मलाही माझे लोलुप रंग

ती अगाध, अनुभवी

मला म्हणेल,

घे हवे ते --

मी काहीच घेणार नाही --

सर्व घेऊनही --

--- ००० ---

MAY 8

माझ्या दुपारच्या जेवण्याच्या वेळी बऱ्याच वेळा पत्नीने पुणे केंद्रावरचा महिलांचा कार्यक्रम लावलेला असतो. एरवीही माझी ना नसते -- हा तर महिलांचा कार्यक्रम ! ऐकतो ! तर एका उच्च विद्या विभूषित बाईंची मुलाखत थोडी ऐकली गेली. विवाहानंतर १२-१३ वर्षांनी त्यांनी १२ वीच्या पुढचे शिक्षण पुन्हा सुरू केले ! शेवटी एमए झाल्या -- सुवर्णपदकासह ! -- हे सगळे उत्तमच -- स्त्रियांना जिद्दीला प्रोत्साहन देणारे, वगैरे ! तर त्या बाई म्हणाल्या की त्यांना घरचे स्वयंपाक-पाणी, मुलांची देखभाल, त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणात येणे-जाणे असणारे पाहुणे-रावळे, त्यांचे अगत्य, कुळाचार -- हे सगळे करायला आवडते ! हे सगळे करत त्यांनी हे यश संपादन केले ! मला असा प्रश्न पडला, नाही तरी बोंबलायला हे सगळे करावेच लागणार, नाही तर घरचे लोक म्हणणार, काही नको ते शिक्षण-बिक्षण ! त्यामुळे त्या बाई, स्वतःसह इतरांनाही एक भ्रम देऊ करत होत्या का ? की त्यांना हे सगळे आवडते ? आश्चर्य म्हणजे त्यांनी घरच्यांची खूप स्तुती केली ! त्यांच्या पाठिंब्यामुळेच हे होऊ शकले, असे त्या कृतज्ञतेने म्हणाल्या !

MAY 7

" मी तुला इतका त्रास देऊनही तू माझ्याशी इतका चांगला वागतोस ! " ( किंवा ' वागतेस ' ! ) -- हे हवेय आपल्याला प्रत्येक नात्यात ! ( जातायेता सीरियलमधला एक संवाद कानावर आला ! ) -- आपल्या वडिलांनी घडवलेय हे जग ! चला, आता आपणही असेच जगू या -- कुणीही कसेही वागो, आपण चांगले वागू या !

MAY 6

" प्रेम म्हणजे आसक्ती -- वासना -- "

" मला वाटले होते -- तू थोडा तरी रोमँटिक असशील -- "

" आहेच मी रोमँटिक -- आसक्ती -- वासना -- या भावनाच तर आहेत !

तू हवीच आहेस मला -- तुझ्यासाठी मी चंद्र, तारे तोडून आणेन -- "

" अय्या ! कित्ती रोमँटिक ! यू आर ग्रेट ! "

MAY 5

बाहेरून -- पाहिल्यामुळे

आतून -- सामील असल्यामुळे

मन सोलले जात राहणे

बलात्कारांमुळे

रक्त नाही येत, कष्टही नाही घेत

नुसतेच असते हे

जागच्या जागी

जखमी होत राहणे --

MAY 4

कोल्हापूरचा माझा एक कवी मित्र अनिल द्रविड याचे काल निधन झाल्याची बातमी वाचली. तो एक अत्यंत संवेदनशील कवी होता. त्याची एक कविता ः --

चौकाचौकात लावलेली पत्रके वाचून

आपण घरी परतलो.

रात्र झाल्यावर

आपण झोपी गेलो.

मध्यरात्री शहरात
बरीच पळापळ झाली.
नंतर मी जागाच राहिलो
तू उठली नाहीस.

सकाळी मी तुला हे बोललो.
पाखरू उडून गेलेल्या फांदीसारखी
तू दिसत होतीस.

कुंडीतली वाळून गेलेली
वेल उपटून तू म्हणालीसः
संध्याकाळी नवी पत्रके वाचायला
जायला हवे.
--- ००० ---
-- या मित्राच्या स्मृतीस अभिवादन !

आधी येतो हिरवा
एक भिजणे पाहून
मग मनाच्या ढगात
साऱ्याच रंगांची धून ...

MAY 3

माझ्या जगण्यातले थर
अभिव्यक्त करण्यासाठी
वापरतो मी निसर्ग – अथर

थरच नाहीत
म्हणजे तर
काहीच नाही

मी कवटाळतो निसर्ग
लाथाडतो, टाळतोही
त्याचे जगणे

दिसते, चटका बसतो,
दुःख होते – बास !
याने मी सुखावतो --

जगण्याच्या ओघात अशा शेकडो पोस्ट दिसतात -- किती देणार ?! आणि अशा अनेक पोस्टांमुळे फ्रेंडस वैतागले तर उपयोग काय ?

संबंधित व्यक्तीला जर वाटले की तुमची अमुक एक चूक, ही, पुढचे तुमचे सगळे आयुष्य उध्वस्त करावे, इतकी महत्त्वाची नाहीय, तर, चूक कितीही मोठी असो, तुम्हाला माफी मिळू शकते ! त्यामुळे तुमच्यात खूप ' सुधारणा ' होईल असे नाही -- पण, कृतज्ञ राहणे तर नक्कीच शक्य आहे !

" अनुभवातून खूप शिकलो ", असे म्हणणाऱ्यालासुद्धा रोज नवीन काहीतरी शिकावेच लागते !

MAY 2

मन चालवत असो की पिस्तूल चालवत असो -- अहिंसक जगणे महत्त्वाचे मानत राहू !

काही, म्हटले तर चावट पण म्हटले तर संशोधनाधारित, अशा गोष्टी माझ्या समोर येतात, पण मी त्या इथे सांगत नाही -- आपल्या फ्रेंडसमध्ये, याने दुखावले जाणारे वा अशा बाबतीत व्यक्तिगत आक्रमणाची गरज वाटणारे, आणि एकूणच, त्यांची मते म्हणजे सत्यच, असे वाटणारे, असे बरेच आहेत -- याची जाण ठेवून मी गप्प बसतो ! मी तरी कुठे सर्वज्ञ आहे ?

सामाजिक, राजकीय, नैतिक क्षेत्रांत सगळ्यांनी कसे वागायला हवे, कसे निर्णय घ्यायला हवेत आणि वेळोवेळी स्वार्थावर आणि स्वसुखावर कसे नियंत्रण ठेवायला हवे -- हे समजा, वेगवेगळे का असे ना, आपल्याला पूर्णपणे समजते ! यांतल्या आपण अधिकारी व्यक्ती आहोत ! तरीही, प्रत्येकाकडे वेगवेगळी आणि अर्थपूर्ण आणि बिनतोड समर्थने आहेत ! तर मग, माझी अधिकारवाणी घेऊन, माझ्याशिवाय कोण चाटेल ?

MAY 1

अपमान, बदनामी, चारित्र्यहनन यांत दगड, सुरा, पिस्तूलाची गोळी, असे काहीच नसते -- पण, माणूस देशोधडीला लागू शकतो, आयुष्यातून उठू शकतो -- या आणि अशा मानसिक गोष्टींचे जगण्यात इतके महत्त्व आहे तर मनाच्या घडामोडींकडे आपण लक्ष का देत नाही ? चालेल तसे चालेल, आपोआप -- असे का वागतो ?

April 2014

APRIL 30

व्यक्तिगत, सामाजिक, आर्थिक, राजकीय -- असे बरेच प्रश्न माणसाला दिसतात आणि देशोदेशी -- समूहागणिक त्यांची रूपे वेगवेगळी असतात. पण या सगळ्या प्रश्नांची मुळे माणसाच्या मानसिक प्रक्रियांमध्ये असतात, ज्या सगळीकडे एकसारख्याच असतात. या मानसिक प्रक्रियांचे भान घेणाऱ्या कलाकृती या पूर्ण मानवजातीलाच प्रस्तुत ( relevant ) असतात. त्या श्रेष्ठ कलाकृती !

आपली प्रतिमा आपण सादर करतोय तशी नसून खरे तर खालच्या दर्जाची वा कमी प्रतीची आहे -- असे जर दुसरी एक तशीच प्रतिमायुक्त व्यक्ती म्हणाली तर आपली प्रतिमा जखमी होऊ शकते. यालाच आपण, अपमान मनाला लावून घेणे, असे म्हणतो. अशा वेळी आपल्या स्वप्रतिमेच्या प्रयत्नांनी ते जखमेचे दुःख कमी होत नाही -- उलट वाढते. स्वप्रतिमा काही मिनिटे टाकूनच देता आली तर सगळे नॉर्मल होऊ शकते. हे अध्यात्मिक वगैरे म्हणून सोडून देण्यासारखे नाही.

APRIL 28

मी एक लेखक आहे याचा अर्थच, मानवी जगण्याबाबत समजूत घेत मी चाललो आहे -- माझे आकलन तुमच्या मान्यताप्राप्त विचारांप्रमाणे असले पाहिजे, हे बंधन मी मानणार नाही -- मग काय, मला खलास करणे, हाच मार्ग ?
( माझ्या आगामी कादंबरीच्या संदर्भात ).

एखाद्या पुरुषाबद्दल, हवेत गोळीबार या स्वरूपात, काही वाईट बोलायचे असेल वा त्याची टिंगल-टवाळी करायची असेल तर ते काम स्त्रियांच्या संदर्भात करायचे -- हा निव्वळ अक्कलशून्यपणा आहे ! अशा वेळी तुम्ही नाहकच त्या स्त्रियांबद्दलही वाईट बोलत असता, एवढे समजायलाच हवे !

APRIL 27

बऱ्याच वर्षांपूर्वी लिहिलेली एक साधी कविता ः --

झाडाचा चिवचिवाट -- चिमण्यांचं झाड
व्हावा जसा देही रोमांचकिरणांनी
सूर्योदय त्यांच्या -- झाडाच्या पानी
हिरव्यागार हिरव्या
किरणांचा मंजुळ स्फोट ...
--- ००० ---

शारीरिक पोटदुखीची कारणे डॉक्टरांना तपासण्यांनी कळतात व त्यांवर उपायही आहेत.
मानसिक पोटदुखी कोणत्या प्रकारच्या माणसाला होते ? कोणकोणत्या कारणांनी ?
त्या रोगावरचा उपाय कोणता ?

**खूप दिवसांनी लिहिली गेलेली एक कविता ः --**

ती ना हवेतून येत
ना पाण्यातून ना जमिनीवरून
पहारेकऱ्यांसमोरून मुक्त संचार
करत सहज भिडते ती अत्यंत

धोक्याच्या आकाशाला
तिच्या मनाने इच्छाही करण्यापूर्वी

तो स्पर्श पटीपटींनी वाढवत नेतो
किलबिलत्या पानांचे स्फोट
होतात जंगले, समुद्र अपरंपार
मस्तीत घुमणारे मोर

त्या स्पर्शाने नंतर
तिचे सर्व सर्जक पदर
उलगडतात आकाशावर
सर्व साखळदंड जसेच्या तसे
असून .....
--- ००० ---

APRIL 26

मानवी संबंधांतले ताणेबाणे असले म्हणजे ती जर राजकीय कलाकृती होत असेल तर ' राजकीय ' या स्वतंत्र दालनाची काय गरज आहे ? सगळ्याच कलाकृती राजकीय !

April 2014
Today 26th April

होय -- आहोत आम्ही संकुचित !
होय -- मला फक्त व. पु. काळेच आवडतात !
होय -- पाहतो मी सगळ्या सीरियल्स !
मी ठरवणार चांगले-वाईट, बरोबर-चूक !
कुणालाच काही समजत नसते !

' मला प्रभावित करणारी पुस्तके ' -- हा रवींद्र लाखे यांचा लेख आत्ताच वाचला ! अत्युत्तम असा मूलभूत विचाराचा लेख आहे ! धन्यवाद मित्रवर्य रवींद्र !

निराश, उदास, तिरसट, कडवट आणि हेकट म्हणजे ग्रेट आणि ताशेरे म्हणजे प्रबोधन !

आपण देत असलेले स्टेटस वा लिहीत असलेले वाक्य हे पूर्ण सत्य आहे, अशा भ्रमात असलेले खूप असतात पण तसे पूर्ण सत्य असणारे स्टेटस वा वाक्य असू शकत नाही !

स्त्रियांचे मन संभाळणे ही एक कला आहे -- कितीही संपत्ती कमावणारा पुरुष असो -- या कलेत जर तो अनभिज्ञ असेल तर तो करंटा भिकारी आहे !

April 23

बोलण्यात एखादी चूक होते -- तुम्ही सॉरी म्हणणे वा माफी मागणे, हे करायला जाल तर चुकीला मोठे रूप दिल्यासारखे होते -- गप्प बसावे तर आपल्या चुकीबद्दल आपल्याला वाईट वाटते आहे, हे संबंधित व्यक्तीला कळू शकत नाही -- ते तर कळले पाहिजे, असे वाटत राहते ! -- मानवी संबंधांतल्या जगभरच्या अशा असंख्य ताणतणावांचा काहीतरी एकत्रित परिणाम घडत असेलच ना ! मोठमोठ्या ताणांबरोबरच हेही केवढे प्रचंड क्षेत्र आहे ! कुणाचाच कंट्रोल नसलेले ! की असू शकतो यावर कंट्रोल ? उपाय ?

April 22

प्रत्येक व्यक्तीला प्रत्येक नात्यात दुरुस्तीची गरज वाटते -- ( हे बदलणे शक्य नाही, हे कळते ! ) -- याचे उदात्तीकरण कसे करता येईल ?

April 19

कधी वर्तमानपत्रात
वाचनीय मजकूर फारसा नाही -- ही तक्रार, तर

कधी वाचनीय मजकूर फार आहे -- ही तक्रार !
-- यांतली दुसरी परवडली -- बराच मजकूर न वाचता सोडून तरी देता येतो !

एका मुलीच्या बाजूने ब्रेक-अप होण्याचे वा मुलाला नाकारण्याचे कारण -- तो मुलगा, आम्ही भेटतो तेव्हाही, सारखा मोबाईलमध्ये गुंतलेला असतो ! -- हे कारण हास्यास्पद म्हणावे की गंभीर ? का ?

April 17

आपल्या आकलनातून एखादे काम करण्याची निकड असणे, हेच मूल्य असेल तर इतरांनी त्या कामाचे मूल्य काय केले, ही बाब महत्त्वाची राहात नाही.

April 16

IISER मधून पास आऊट झालेले वा त्याबद्दल माहिती असलेले आपल्यापैकी कुणी आहे का ? काही माहिती हवी आहे.

मला आवडणारी माणसे आणि मला न आवडणारी माणसे यांच्याबद्दल मी जे जे लिहितो त्यावरून माझ्या मनाची रचना / स्वभाव / प्रोग्रॅमिंग व्यक्त होत असते. एक तर मी ' अशी चांगली माणसेही आहेत जगात ' या चालीवर लिहितो -- किंवा -- अशी दांभिक माणसे, दुटप्पी, खोटारडी माणसे, यांना मी फाट्यावर मारतो, त्यांची मी अजिबात फिकीर करत नाही किंवा मैत्री तुटायच्याच लायकीची ही माणसे असतात -- असे काही लिहितो. या सगळ्यातून खरे तर मीच फक्त उघडा पडून दिसत असतो -- ती ती माणसे तशी तशी असतीलच, असे मुळीच नसते ! तो फक्त माझ्या आवडत्या नीती-रचनेचा प्रचार असतो -- आणि मुख्य म्हणजे, मीही त्या रचनेप्रमाणे असेनच, असेही मुळीच नसते ! ( आणि नेहमीच असे असेल, असेही नसते ! )

April 15

अमुक यांचे गाणे -- वा ! स्वर्गसुख !
तमुक ठिकाणचा निसर्ग -- पाहिल्याशिवाय मरू नये !
अबक पुस्तक -- आयुष्यभरच्या वाचनाचे सार्थक !
क्ष माणूस -- निव्वळ अजब !

' चटक ' मधला बटाटेवडा -- अप्रतिम आणि लाजवाब !
----- हं ! सगळे ठीक आहे !
यांतले काहीही नको, असा एक क्षण तरी असू द्यायचा आहे !

April 14

भक्तिमार्गी श्रद्धावानापेक्षा बौद्धिक श्रद्धावान हा जास्त वेडा असतो ! अधिक हिंसक असतो !

April 13

अलगतावाद मान्य, वैचारिक चिरफळ्या उडणे मान्य, आपापल्या पद्धतीने विदीर्ण झालेली मने मान्य -- पण विषमता, अन्यायच काय, कोणती गुन्हेगारीही नको !!! शक्य आहे हे ???

एक खरा प्रश्न -- समजा मला काही समजते, माझ्या मित्रांना काही समजते आणि माझ्या मैत्रिणींनाही काही समजते. मी मित्रांशी तासंतास गप्पा मारल्या, देवघेव केली तर काही प्रश्न येत नाही पण मैत्रिणींशी तशीच तासंतास देवघेव ? अवघड काम ! न जाणो त्यांच्यात आकर्षण निर्माण झाले तर ? -- ही असते का नैतिक भीती यामागे ? आता साधे बघा -- इथे मला एक हजार तरी मैत्रिणी आहेत -- भेटणे बोलणे शक्यच नसते -- पण साधे त्यांचे फोटो पाहून आपल्याला त्यांच्या सौंदर्यामुळे छान वाटले याला अभिव्यक्ती द्यावी तरीही, ' किती हे प्रयत्न ' असे दिसू शकते ! हे नुसते आपल्या मनाचे खेळ नसतात -- तशी मते व्यक्त होताना दिसतात ! एकूणात स्त्री-पुरुष नात्यांत अडचणी खूप आहेत ! बरे, आकर्षणाचा मुद्दा खोटा असतो, असे नाही, पण काय मग वागण्याची सर्वमान्य, आदर्श पद्धत ? बघू नका, बोलू नका, गप्प बसा ?

" सत्य इतके सरळ स्पष्ट दिसत असून लोकांना का कळत नाहीय ? " -- असे प्रत्येक व्यक्तीलाच वाटत असल्याने, ' सत्य ' असे काही नसतेच, हेच सत्य होते !
( थोडा खुलासा करतो -- चांगले-वाईट, बरोबर-चूक, नैतिक-अनैतिक, न्याय्य-अन्याय्य -- अशा गोष्टींबद्दल ही पोस्ट आहे.)

April 11
Champra Deshpande shared a link.

http://www.champralekhan.com/

champralekhan.com

www.champralekhan.com ही माझी वेबसाईट दोनतीन दिवस बंद होती -- आता पुन्हा सुरू झाली आहे --

औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागातल्या विद्यार्थ्यांनी माझे ' बुद्धिबळ आणि झब्बू ' हे नाटक तिथे सादर केले. सुमारे साताठशे प्रेक्षक होते. प्रयोग झाल्या झाल्या, तो उत्तम झाल्याचे मला कळवण्यसाठी आत्ताच विभागप्रमुख डॉ. बऱ्हाणपूरकर सर आणि नाटकाची दिग्दर्शिका कल्पना जगताप यांचा फोन आला होता. नाटक बसवण्यापूर्वी कल्पनाने फोनवर माझ्याशी चर्चा केली होती. तेव्हाच माझ्या लक्षात आले होते की ही एक बुद्धिमान मुलगी आहे ! आज बोलताना ती खूपच खुश होती -- आनंदाने हसतच बोलत होती ! प्रेक्षकांना नाटक खूप आवडल्याचे तिने सांगितले. त्यात काहीसे फ्लर्टिंग करणाऱ्या स्त्रीची भूमिका तिने स्वतःच केली होती ! हे सगळे ऐकून मला खूप आनंद वाटला ! तो इथे शेयर केलाय !

April 10

इतिहासाची फारशी आवड मलाही नाहीय -- पण माहीत नसले तरी ' हाण ' -- याचीही फारशी आवड नाहीय ! अर्थात, बिगर-इतिहासवाला एक प्रचंड समूह असणारच म्हणा -- त्याला काय फरक पडणार आहे ? कुणी एखादा दडपून हाणत असला तरी ?

स्वप्नील आणि आदर्शवादी बोलून उपयोग काय ? बोलणारे आणि ऐकणारे सगळेच खोटारडे असल्यावर ?

नुसते नेते हलकट आहेत, हे म्हणणे खोटे आहे -- आपण सगळे म्हणजे जनताच हलकट आहे -- अशा जनतेची ही लोकशाही ! घडेल ते घडेल ! कोणत्या आधारावर तुम्ही म्हणता की हिताचे तेच घडेल ?

जात, धर्म, भाषा या विषयांवरून जनतेलाच जर स्वतःची गांड मारून घेणे आवडत असेल तर तथाकथित पुरोगामी, त्या जनतेच्या सुखाच्या आड कसे येऊ शकतील ?

लोक जमवायचे, त्यांना उन्हातान्हातून राबवायचे आणि संबंधित उमेदवारानेही तहान-भूक विसरून जनतेसाठी फिरायचे आणि सगळे स्किल वापरून गावोगावी भाषणे करत फिरायचे -- यापेक्षा, सगळे हाय-टेक करावे -- घरबसल्या लोकांना हवे ते भाषण ऐकता यावे ! नाही तरी सभेतल्या गर्दीवर मते अवलंबून नसतातच ! यातून उरलेला पैसा जनतेलाच त्यांच्या दैनंदिन अडचणींसाठी दिला तर ?

रिक्षा, टेंपो, कार्स आणि लाऊडस्पीकर्स घेऊन दर पाच मिनिटांनी -- ' याच्यावर शिक्का मारा, त्याच्यावर शिक्का मारा ' किंवा ' येऊन येऊन येणार कोण ' किंवा ' आले रे आले -- ' वगैरे बोंबलत येणारे लोक, या निवडणूकीत गायब झालेले दिसताहेत ! ते आता काय करत असतील ? त्यांचा रोजगार गेला म्हणावे की बदलला असेल ? की असा खर्च करून जनतेची डोकी उठवण्यापेक्षा दुसरे काही अधिक चांगले आणि उपयुक्त असे प्रचाराचे मार्ग हाताळले जात असतील ? बदल दिसताहेत खरे ! काय असतील कारणे ?

" तुम्ही जो निवडणुकीत एवढा प्रचंड खर्च करताहात, तो पैसा आला कुठून ? "
-- हा प्रश्न आपण दर निवडणुकीत ऐकत आलेलो आहोत.
या आधी, हा प्रश्न, बीजेपी काँग्रेसला विचारत असे.
आज, हाच प्रश्न, काँग्रेस बीजेपीला विचारत आहे !
--- हे परिवर्तन नाही ?
कुणाला द्यावे या परिवर्तनाचे श्रेय ?

April 9

स्वतःच्या मनातले आंतरविरोध वाढले की कशातच काही तथ्य नाही, असे वाटू लागते !

April 8

फेसबुक माध्यमातला माझ्या लक्षात आलेला एक दोष सांगतो -- मी दिलेली एखादी पोस्ट मी अधिकाधिक करेक्ट, पॉलिश करत जातो -- एडिट करताना एखादा शब्द बदलणे, कमीजास्त करणे, हेही करतो -- पण या दरम्यानचे लाईक्स, कॉमेंटस तसेच राहतात ! एखाद्या लाईकवाल्या व्यक्तीला हे बदल मान्य नसू शकतात !

मानवी जगण्यातले -- स्वतःच्या जगण्यातले भयानक प्रश्न दिसले तरी -- हे असे होणारच -- असे तर असणारच -- असे पटापट आहे ते गृहीत धरत न जाणारी काही मने असतात -- ती निष्कर्षांची घाई न करता प्रश्न विचारतात, स्वतः पाहण्याचा प्रयत्न करतात -- अशी ही गंभीर प्रक्रियाच असणार -- आव्हान-प्रतिआव्हान आणि वादात जिंकणे असली पोरकट प्रक्रिया नसणार -- मला या बावळट पद्धती वाटतात -- ( नेट प्रॉब्लेम -- फक्त ही कॉमेंट सेव्ह करण्यासाठी इथे घेतोय -- )

April 7

सामान्यतः, जाहीरनामा प्रकाशित करताना चेहरे आनंदी ठेवण्याची प्रथा आहे. बीजेपीचा जाहीरनामा प्रकाशित करताना सगळे मंचस्थ मोठे, नाराज वा चिंतेत असल्यासारखे का दिसत होते ? मुरली मनोहरांच्या भाषणातही त्यांना कुणाला फारसा रस नव्हता, असे दिसले ! का घडले असावे असे ?

April 4

अ आणि ब एकमेकांचे भूतकाळ आपापल्या पद्धतीने मनात बाळगतात आणि त्यामुळे त्यांच्यांत तेढ आहे. क म्हणतो, अशी तेढ देशविघातक आहे. त्या दोघांचे तेच भूतकाळ उगाळून क हा विशेषतः ब च्या रोज कानीकपाळी ओरडत राहतो की भूतकाळ विसरू नकोस, अ पासून सावध राहा, मीच आहे तुझा रक्षणकर्ता ! म्हणजेच क सुद्धा त्याच भूतकाळी घटना सतत जिवंत ठेवत अ आणि ब यांच्यांतली तेढ पक्की करत राहतो ! यात अ ला शहाणे होण्याची संधी कायमची नाकारली जाते आणि तेढ अटळ असल्याचे ठाम केले जाते ! तर, हे समजून, वेगळे काय बोलता-करता येईल बाबा, असा प्रश्नही कुणाला पडत नाही !

April 3

कोण यावे याबाबत हेकट, आग्रही असणाऱ्या लोकांपेक्षा गोंधळलेले ( कन्फ्यूज्ड ) लोकच जास्त दिसताहेत का या वेळी ? कशामुळे ?

April 1

बँकिंगचे चाललेच आहे, त्यालाच जोडून एक गंमत सांगतो. ते जर घडले असते तर या राज्यातला, कोणत्याही जातीचा असे ना का, आख्खा जातीयवादी सेक्शन बेशुद्ध पडला असता ! झाले असे -- मी एका खेड्यात शाखाप्रबंधक होतो. एक दिवशी एक माणूस मला भेटायला आला. मी अमुक, तमुक यांचा मुलगा -- त्याने स्वतःची ओळख करून दिली. तो आमच्या एका मागासवर्गीय कर्जदाराचा मुलगा होता. माझे तुमच्याकडे काही काम नाही, म्हणाला, पण तुम्हाला भेटावेसे वाटले ! कारण सांगतो, म्हणाला. या गावातल्या आणि आजूबाजूच्या बऱ्याच गावांतल्या आमच्या लोकांसाठी तुम्ही खूप काम केलेले आहे, तर आता मला तुमच्यासाठी काही करायची इच्छा आहे, म्हणाला. मी ऐकत राहिलो. तो मुंबईच्या एका उपनगरातला एक दादा होता, हे त्याने सांगितले. त्या उपनगरातला एक भूखंड तो मला देऊ इच्छित होता. मी सांगेन तिथे

सध्या एक टेंपररी स्ट्रक्चर उभे करा, म्हणाला, काही दिवसांनी ती जागा तुमच्या नावावर करून देईन, म्हणाला. कुणीही तुमच्या नादी लागणार नाही, म्हणाला. मी मनात विचार केला, हा काही सरकारी अधिकारी वा पोलीस यांच्याहून पॉवरफुल असू शकत नाही -- काही लफडे झाले आणि आत जावे लागले तर बँकेचा नियम सांगतो की अठ्ठेचाळीस तास आत राहिला की आधी नोकरी जाणार ! -- त्याला म्हटले, मला ही मीठभाकर देणारी नोकरीच महत्त्वाची वाटते -- शिवाय अशीच लोकांची कामे करावीत, त्याचा आनंद मिळवावा, हेच ठीक वाटते. त्यामुळे, ते काही नको, पण प्रेमाबद्दल धन्यवाद ! तुमची मर्जी, असे म्हणून तो निघून गेला. आता सांगा, बामणाला मुंबईत भूखंड मिळाला असता तर झालेच असते ना मी वर म्हटल्याप्रमाणे -- सगळा जातीयवादी सेक्शन बेशुद्ध पडणे ? -- आता कुणी याला वेडेपणा वा करंटेपणा वा शहाणपणा म्हणेल -- त्याला इलाज नाही ! मुळात, खरेच तो देऊ शकला असता का असा भूखंड, कोण जाणे !

मी बँकेत नोकरी केली -- संगणक नव्हते ! -- ढोर मेहनत म्हणजे काय, हे आज नाही कळणार ! गेल्या आठवड्यात आणि अजूनही पुढे काही दिवस मी आसुरी आनंदात असेन ! मुक्त ! निवृत्त ! -- हे वर्ष-अखेरच्या कामांचे दिवस हो !

March 31

एखादी संघटना -- प्राणप्रिय असणे -- कालांतराने तीच खतम करायला उभे राहणे !
संघटना वा व्यक्ती यांच्या बाबतीतल्या अशा आणखी कोणत्या प्रसिद्ध घटना आठवतात ?
अशा घटना माणसाला सवयीच्या जगण्यातून जागे होण्याचे आवाहन करतात !
( ही पोस्ट, तशा घटनांमधले बरोबर-चूक, अशा मतप्रदर्शनासाठी नाही ! )

March 2014
March 30

घरकामे विभागून करावीत आणि दोघांचेही करियर महत्त्वाचे -- यांव्यतिरिक्त, स्त्री-पुरुष समता या विषयावर महत्त्वाचे मुद्दे कोणते ?

March 29

"Truth has no opinions." ~ A.D. Williams

March 23

आता चार दिवस इकडे सुट्टी ! त्यानंतर भेटू !

चारोळी, हायकू यांप्रमाणेच फेसबुक स्टेटस ( बीजमुद्दा, मूळ मुद्दा, आरंभशब्द किंवा स्थितिशब्द ) हाही एक नवा वाङ्मयप्रकार म्हणून मान्यता पावू शकेल !

March 22

आज मी अमुक सिनेमा पाहिला.
आज बावीस तारीख आहे.
राजकारणातले खरेच मला काही कळत नाही.
माझ्या कविता माझ्या काही मित्रांना तरी आवडतात.
आमच्या सोसायटीत एक मृत्यू घडल्याने रंगपंचमी झाली नाही.
-- वरील प्रत्येक वाक्य स्टेटस म्हणून दिले जाऊ शकेल -- त्यांनी कुणी दुखावणार नाही --
वाद, भांडणे होणार नाहीत ( असे वाटते ).
-- अशी छान, मनमिळावू, निरुपद्रवी स्टेटस आणखी कोणती सुचतात ?
-- की देऊच नयेत असली सपक स्टेटस ?

March 21

एक परिचित ः -- तुम्ही कशासाठी लिहीतबिहीत बसता ? कितीही लिहिलेत तरी तुम्ही काय तुकाराम किंवा काफ्का थोडेच होणार आहात ?
मी ः -- मी त्यांच्यापेक्षा महत्त्वाचे काम करतोय -- तुम्हाला आमचे तिघांचेही काही कळत नाही, ही जगातली सर्वात क्षुद्र गोष्ट आहे !
( माझे असे काहीच म्हणणे नसते, तरी मी असे बोलतो ! )

March 18

पटणारी विचारसरणी, उमेदवार सज्जन, चांगला, देशभक्त असणे -- या गोष्टींचे विचार आता मागे पडत चाललेले आहेत -- शिवाय बंडखोर उभे राहणे, याला पाडायला तो उभा कर, त्याला निवडून आणण्यासाठी याची मदत घे, आणि ऐन वेळी अशी खेळी कर की ती परतवायला वेळच राहू नये -- आणि शिवाय सगळ्यांनीच इतरही सगळे मार्ग वापरणे -- हे सगळे विचारात घेता नेमकी कुणाची सत्ता येईल, हे सांगणे अवघड आहे ! अफाट खर्च आहे -- बाजारात करोडोंची गंगा आल्याने महागाईही वाढू शकेल ! आणि मुख्य म्हणजे, सर्वानुमते देशहिताचे काही घडवण्यासाठी हे चालले आहे का -- हा प्रश्नच आहे ! -- हे एकूण विचारात घेता प्रत्येक ठिकाणी चिठ्ठ्या टाकून उमेदवार निवडला आणि त्यातून कुणाची सत्ता येते, ते पाहिले तरी चालेल, असे वाटते. पण, यात त्या त्या पक्षाची ताकद दुर्लक्षिली जाईल, हा धोका मात्र आहे ! पण खर्च आणि आटापिटा किती वाचेल ! आता आपली लोकशाही इतकी परिपक्व झालेली आहे की कोणते तरी सोपे मार्ग चालू शकतील !
( उगीच आपले, लोकशाही एंजॉय करत लिहिलेला निरर्थक मजकूर आहे, झाले ! )

फेसबुक खातीही हॅक होऊ शकतात, असे कळते.
काय असू शकतात याचे हेतू ?
हॅक करून दुरुपयोग काय होऊ शकतात ?
हे उपद्रव टाळण्यासाठी कोणती काळजी घेणे आवश्यक आहे ?

March 15

संजय पवार यांचे रविवारच्या लोकसत्तेत ' तिरकी रेघ ' हे सदर असते. आजच्या त्यांच्या लेखातले मला आवडलेले --
" शेवटची सरळ रेघ -- हिंदी चित्रपटातील प्रसिद्ध खलनायक अजित, विशिष्ट शैलीमुळे मिमिक्री आयटममधले एक अनिवार्य पात्र झाले. त्यांच्या नावावरचे खास त्यांच्या स्टाईलमधले संवाद प्रसिद्ध झाले. परवा राज ठाकरेंनी नरेंद्र मोदींना पाठिंबा देत महायुतीविरोधातही उमेदवार उभे केले. ते वाचून वाटले, राज ठाकरे महायुतीच्या पांडवांना अजित स्टाईलमध्ये म्हणताहेत ः-- मै तुम्हें लिक्विड ऑक्सिजनमें डाल दूँगा ... लिक्विड तुम्हे जीने नही देगा, ऑक्सिजन तुम्हें मरने नही देगा ! " --- हे वाचून आजचा रविवार सार्थकी लागला, असे वाटले !

' बघू-पाहू-करू ' -- हा मंत्र आता इतक्या जणांना आणि इतक्या बाबतींत वापरावा लागतो की याला एकूण जगण्याचाच मूलमंत्र म्हणावे ! या मंत्राने गिळंकृत केलेल्या कृतींचा विचार केला तर, त्यांच्या पूर्ततेसाठी, जगाच्या हयात लोकसंख्येला आणखी चार आयुष्ये जगावे लागेल ! म्हणजे मानवी जगणे हे जगण्यापेक्षा, जगायला मुकणेच जास्त आहे की काय ?

आणि मुकलेलेही महत्त्वाचे असणार, हे लक्षात घेतले, तर काय अर्थ राहिला या जगण्याला ? न जाणो, हे जगणेही त्या मुकण्याचा भाग होऊ शकले असते !

March 12

समजा
अत्यंत वाईट दुःखातूनच सर्वोत्तम कलाकृती जन्म पावते.
असे दुःख अस्तित्वात असणे हे नीच संस्कृतीचे निदर्शक असते.
उत्तम कलेमुळे सांस्कृतिक विकास होतो आणि दुःखाचे वातावरण कमी होते.
त्यामुळे, अर्थातच, उत्तम कलाकृती जन्म पावणे अशक्य होत जाते.
म्हणजेच, उत्तम कलाकृती ही स्वतःची आवश्यकता आणि शक्यताच नष्ट करणारी असते.
बरोबर ?

March 11

संतांचे देव हे पापराशी नाहीशा करणारे, दयाळू, क्षमाशील असतात.
लोकप्रिय फिल्मी देव हे अपमान झाला म्हणून सूड घेणारे -- भंगार असतात !
-- आणि देव म्हणजे काय हे आपल्याला माहीतच नसते !

March 10

विश्व ही एक महाविलक्षण फँटसी ( कल्पना ) आहे.
माणसाची फँटसी, आधी उपलब्ध असलेल्या माहितीवर-अनुभवावर आधारित असते.
तसे काहीच उपलब्ध नसताना झालेली ही निर्मिती !!!

फ्रेंडस, आपसात कसले डावपेच ? माझा चावटपणा म्हणा की धूर्तपणा म्हणा ( योग्य शब्द, खरे तर, जिनियसपणा आहे ) हा आहे की मी पोस्टच अशी देतो की -- मी जरी ' अमुक ' असे म्हटले नाही तरी तीवर होणाऱ्या चर्चेचे आकलन ' अमुक ' हेच व्हावे !

स्वतःच्या मनाप्रमाणे बिनधास्त जगा, नंतर हळहळण्यात अर्थ नाही !

आपल्या समाजाच्या अपेक्षांप्रमाणे जगा, नाही तर छीः थूः होईल !

कायदा पाळा, आत जायची वेळ आली तर संपलात समजा !

निर्भयपणे जगा !

भीती बाळगून जगा !

-- ही समजा सुभाषिते आहेत ! -- तर काय ?

March 9

कालौघात नष्ट होणाऱ्या निरनिराळ्या मतांना

' कालसापेक्ष मूल्ये ' म्हटले की माणसाला जरा बरे वाटते !

March 7

निवडक समता शक्य नसते --

एकूण असण्यातच समता येवो !

मिंधेपणाने, धाकाने, दहशतीने, व्यक्तिगत संबंधाने वा काही आमिषे स्वीकारून लोक मतदान करतात तेच बरे आहे -- निदान डोकी तरी ठिकाणावर राहतात ! -- सगळ्यांचीच भाषणे पूर्णपणे, मनोमन ' पटणारी ' असतात -- ती ऐकून निवड करायची म्हणजे डोकी भंजाळून गेली असती !

March 6

अमिताभ बच्चन गुन्हेगार झाला असेल तर त्या बिचाऱ्याचे बालपण कसे वाईट गेले, ते दाखवायचे -- पण अमजद खान गुन्हेगार असेल तर त्याचे बालपण दाखवायचे नाही ! तो मात्र जातिवंत गुन्हेगार !

माझ्यात कोणतीही मानसिक विकृती नाही, हे सिद्ध करत राहण्याचा सोपा मार्ग कोणता ? --
-- दुसऱ्यांतल्या निरनिराळ्या मानसिक विकृतींवर राग व्यक्त करत राहणे !
( मानसिक विकृती म्हणजे काय, हे आपणच ठरवून ! )

" फेसबुकवर घालवलेला काळ म्हणजे भाकड काळ ! "
" हो का ? ठीक -- मग भाकड नसलेला काळ कोणता ? का ? "

March 5

कोणती असतील कारणे, मानवी संबंध ' अतर्क्य ' असण्याची ?

March 4

आमच्या बिल्डिंगसमोर एक शाळा आहे. मधे रस्ता आणि अलिकडे ही आमची बिल्डिंग. इथली काही दुकाने अजून सुरू झालेली नाहीत, त्यामुळे, त्या दुकानांसमोरचे कट्टे मोकळे असतात. सध्या त्या कट्ट्यांचा उपयोग काही प्रेमिक त्यांच्या भेटी-गप्पांसाठी करतात. परवा सकाळी सुमारे साडे-अकराची वेळ. मी त्या रस्त्याने येत असताना दोन पोलीस एका प्रेमिक जोडप्याला दरडावताना दिसले. आजूबाजूला थोडे बघे होतेच. त्यांतल्या एकाला त्या प्रकाराबद्दल विचारले. तो म्हणाला की ती दोघे त्या शाळेसमोरच्या कट्ट्यावर प्रेम करत बसली होती म्हणून कुणीतरी फोन करून पोलिसांकडे तक्रार केली आणि लगेच पोलिसांनी इथे येऊन, त्यांना बाजूला घेऊन त्यांची चौकशी सुरू केलेली आहे. पोलीस दरडावून नाव, पत्ता वगैरे विचारत होते. प्रश्न अवघड वाटला. घरी न सांगता ते प्रेमिक भेटत असणार, हे तर उघडच होते. हॉटेलात वा सिनेमाघरात भेटावे तर प्रत्येक वेळी दोनचारशे रुपये ! शहरापासून फार लांब जावे तर बलात्काराचे धोके ! खूप रहदारी असेल तिथे शक्यच नाही ! आणि बोंबलायला सगळीकडे शाळा ! जावे कुठे यांनी ? बरे, प्रौढ आहेत, एकमेकांच्या इच्छेने भेटू इच्छित आहेत !
अशांसाठी सरकारतर्फे अधिकृत प्रेम-उद्यानांची ( लव्ह-गार्डन्स ) निर्मिती करावी काय ?

March 3

टीव्ही मालिका ------

ठराविक स्वभाव, वरवरच्या क्रियाप्रतिक्रिया आणि उत्सुकता निर्माण करणारी घटनांची साखळी --- हे या मालिकांचे भांडवल असते. इंटरेस्टिंग होण्यासाठी या गोष्टी थोड्या तीव्र ठेवाव्या लागतात. पाहून पाहून याच सवयी अधिक तीव्र होत गेल्या की मानसिक विकृती येऊ शकते. क्रियाप्रतिक्रियांचे जगणे हेच फक्त शक्य असते, ही समज पक्की करून --- जगणे समजून घेण्याची शक्यताच नष्ट करण्याचे काम यातून होते. कोणतीही स्थितिशीलता गृहीत धरून, जगणे समजून घेण्याची प्रक्रिया अस्तित्वात येऊ शकत नाही. ' डिस्टर्ब न होता सवयीतले पाहात राहावेसे वाटणे ' म्हणजे हलकीफुलकी करमणूक. हे माणसाचा प्राण घेणारे विष असते ! कारण जगणे समजून घेण्याची उत्सुकता निर्माण करणारे प्रश्न पडणेच बंद व्हावे, असे हे सगळे असते. माणसाची संवेदनशीलता नष्ट करून त्याला हे मद्दड बनवते. मनाला अधिकाधिक कोते करून निर्बल करण्याचे असे हे अव्याहत चालणारे काम असते ! लोक सहकुटुंब बसून या विषाचे एकत्रितपणे प्राशन करत राहू इच्छितात -- यावरून या विषाची भूल किती प्रचंड खिचाववाली आहे, ते कळते ! थोडक्यात, हे कायद्यात बसणारे, समाजमान्य इच्छामरण असते !

March 2

ठीक -- चालेल -- हो हो -- हरकत नाही -- फारच छान -- जरूर -- डोंट वरी -- नेव्हर माइंड -- नाही तरी काय असते हो एवढे महत्त्वाचे !

March 1

आजच्या सकाळच्या सप्तरंग पुरवणीतला यशवंत मनोहर यांचा ' आत्मसंग्राम ' हा लेख मला आवडला. सामाजिक प्रश्न पाहता पाहता सखोल चिंतनात्मकतेकडे जाणारा वेगळा लेख !

आपली इथली एक संगीतक्षेत्रातली कर्तृत्ववान मैत्रीण प्राची दुबळे हिला आयबीएन लोकमतचा ' प्रेरणा ' पुरस्कार प्रदान झालेला आताच पाहिला ! खूप आनंद वाटला ! तिचे मनःपूर्वक अभिनंदन आणि तिच्या पुढील वाटचालीसाठी तिला भरपूर शुभेच्छा !

February 28

ग्रामीण बुद्धिमत्तेचा एक उत्तुंग नमूना

आईन्स्टीनबाबतच्या एका कार्यक्रमात एका वक्त्याने सांगितलेला किस्सा –
एका ग्रामीण शाळेतल्या मुलांना एक प्रश्न विचारला – प्रकाश सरळ रेषेत का जातो ?
एका मुलाने असे उत्तर दिले की अचंबित होऊन सगळी बोटे तोंडात घालावीत !
तो म्हणाला – बैल जेव्हा कुरणात आरामात चरत असतो तेव्हा तो इकडेतिकडे कसाही जात असतो
पण तो जेव्हा मुसंडी मारून वेगात धावत येतो तेव्हा तो सरळ रेषेतच येतो !
प्रकाशाचा वेग फार असल्याने तो सरळ रेषेत जातो !

मित्रामित्रांत इथे मतभेद होतात, चर्चा होतात, वाद झडतात, भांडणेही होतात -- तसे मैत्रिणीमैत्रिणींत फारसे घडताना दिसत नाही. आणि एकूणातच स्त्रिया वैचारिक संघर्ष टाळतात, असे दिसते. स्त्रियांना मतस्वातंत्र्यापेक्षा सामंजस्य टिकणेच अधिक महत्त्वाचे वाटते, असे म्हणावे का ?

February 2014
February 28

फेसबुकवर, एखाद्या दिवशी, कोणत्याच पोस्टवर मतभेद मांडणे वा वेगळे विचार मांडणे, हे करायचे नाही -- जमेल तेवढे नुसते लाईक करायचे -- असे केले तर, हे माध्यम माणसाची अध्यात्मिक समजही विकसित करू शकेल !

February 27

एखाद्या दिवशी आपल्याला वाटते की आपले सगळ्यांशीच भांडण आहे -- पण तसे कसे असेल -- मेंदूतले एखादे रसायन वाढल्यामुळे असे होत असणार, दुसरे काय ! -- शांत राहणे, हाच एकमेव मार्ग ! -- मग एखाद्याशी आपले कायमचे वाकडे आहे, असे आपल्याला वाटणे, हेही असेच रासायनिकच असेल का ?

१. मराठी शिक्षणाचे माध्यम म्हणून टिकणे अवघड आहे.
२. मराठी ज्ञानभाषा होणे अवघड आहे.

३. पैसे मिळवण्यासाठी वा उपजीविकेसाठी मराठीचा फारसा उपयोग नाही, असणारही नाही.
४. मराठीला फारशी सामाजिक प्रतिष्ठा असणार नाही.
-- हे सगळे बहुसंख्यांना मान्य दिसते. मग यापुढच्या पिढ्या मराठीचा अभ्यास कशासाठी करतील ? ज्ञानेश्वर, तुकाराम समजून घेण्यासाठी ? अभिव्यक्तीच्या क्षेत्रात मराठीने पादाक्रांत केलेला प्रदेश हातून निसटत चाललेला आहे कारण तशा अभ्यासातले इंटरेस्ट टिकेल असे वातावरणच नाही. नवीन पिढ्या जर या भाषेचा सखोल अभ्यास करणार नसतील तर असा नवा प्रदेश निर्माण होण्याची शक्यताही कमीच म्हणावी लागेल.
-- मग मराठीबाबतचा आशावाद कोणत्या आधारावर जोपासावा, हा प्रश्न येतो.

February 26

आजच्या लोकसत्तेतला डॉ. प्रकाश परब यांचा मराठी भाषेबाबतचा लेख जरूर वाचलाच पाहिजे, असा आहे ! प्रत्यक्ष वास्तवाचे भान देऊन, भ्रम जोपासणे फेकून देणारा लेख !

February 25

आंतरिक दुःखाने कडवटपणा आलेले काही लोक -- दुसरे कसे थिल्लर आणि मी कसा शहाणा -- या चालीवर, सतत कुणालातरी कंडेम करत राहतात ( हीन लेखत राहतात ) -- याला प्रतिक्रिया म्हणून इतरांनी त्यांना कंडेम करणे चालू होते -- या दुष्टचक्राचा त्रास सगळ्यांनाच होत राहतो !

February 24

मित्रमैत्रिणी आहात तर मनातले विचार शेयर व्हायला हवेत ! इथे अनेक मैत्रिणींचे फोटो येतात -- तोडीस तोड सुंदर आणि स्वतःच्या वेगळ्या गुणवैशिष्ट्यांनी युक्त अशा या मैत्रिणी आहेत ! मला त्यांच्या फोटोमुळे जे जाणवते ते लिहिले तर, स्त्रीच्या सौंदर्याला असा प्रतिसाद देणे तुम्हाला सदुसष्टाव्या वर्षी बरे दिसत नाही -- असे मत कानावर येते. परलिंगी आकर्षण हे मेंदू काम करत असेपर्यंत चालू असते, हे यांना माहीत नसते. निदान शास्त्रीय सत्ये न डावलता मते व्यक्त व्हावीत. काहीजणांना वाटते, मी वडीलधारेपणाने बोलतो -- मला हा सुटकेचा मार्ग नको आहे. त्यांच्या सौंदर्याची मला असलेल्या माहितीप्रमाणे स्तुती करणे -- यात कोणता गुन्हा आहे ? तरीही उगीच कटकट नको म्हणून मी ते बंद करत आणलेले आहे ! आणि नकोच ते -- असे वाटते आहे !

February 22

तुमच्या हातात सत्ता यायला काही लोकांची मदत झालेली असते -- तुम्हाला कृतज्ञता नको ? -- त्यांना अग्रक्रम देणे, त्यांचे हित पाहणे, हे करायला नको ? -- की फक्त न्यायाचा विचार करत बसणार ?

" कोणत्याही माणसाची गुणवत्ता ठरवताना मतभेदांना वाव असतोच. याचाच फायदा घेऊन मी क्षला डावलून माझ्या माणसाला घुसवले, तर काय बिघडले ? एवढे तर होणारच ! बरे, हे काही मी पैसे घेऊन करत नाहीय -- म्हणजे करप्शन नाहीय ! "

February 21

The separate, clinging to their separateness, try to establish a relationship with others who are also self-enclosed; but such attempts invariably breed conflict and pain. To avoid this pain, the clever ones invent tolerance, each looking over his self-enclosing barrier and attempting to be kind and generous.

--- J. Krishnamurti.

February 19

कोणत्याही व्यक्तीच्या संतापात ( अंदाजे ) नव्वद टक्क्यांपासून ते एक टक्क्यापर्यंत ( का असे ना ) तथ्य असतेच ! संताप ही मानवी संबंधातली दिसणारी / जाणवणारी कृती असते ! तिचा प्रभाव आणि दबाव संबंधितांवर असतोच असतो ! संबंधांमधली शिल्पकारी करण्याचे ते एक प्रमुख हत्यार असते !

February 18

माणसाला फक्त मतच असू शकते का -- की आकलनही असू शकते ? की आकलन असे काही नसतेच ? फक्त मतमतांतरांचेच जगणे जर भाग असेल तर नरक मान्य करणेच ना ते !

February 17

**फँड्री**

‘ फँड्री ‘ पाहिला. ‘ श्वास ‘ आणि ‘ वळू ‘ यांच्यापेक्षा तो खूपच चांगला वाटला. कारण तो सरळ, साधा आणि खरा आहे. पडद्यावर दिसणारे जगणे बनावट वाटत नाही. फँड्री म्हणजे डुक्कर – वळचणीतले, घाणीतले, तिरस्कृत जगणे. तसे जगताना ‘ पिसाळणे ‘ झाले तर नष्ट करायच्या लायकीचे. जब्या या कैकाडी समाजातल्या मुलाचे शालू या उच्चवर्णीय मुलीवर प्रेम असणे आणि ते सफल न होणे. यात जातवास्तवाचा एक बिकट आणि लांछनास्पद प्रश्न आहेच – हे वास्तव असेच राहू नये, असे कोणाही संवेदनशील माणसाला वाटेलच. हा प्रकार जरा व्यापक मानवी संदर्भात पाहावा की पाहू नये, हा प्रश्न आहे. तसा तो पाहिला तर कसा दिसेल ? कोणत्या ना कोणत्या कारणाने ‘ पहुँचके बाहर ‘ असलेली गोष्ट प्राप्त न होणे. जात, धर्म, गरिबी, व्यंग, वर्ण, आरक्षण, परदेशात जाता न येणे, अमुक शिक्षणासाठी प्रवेश न मिळणे, अशी असंख्य कारणे असू शकतात की ज्यांमुळे साध्या, न्याय्य मानवी अपेक्षा अप्राप्य राहू शकतात. त्यामुळे एखाद्या परिस्थितीत उद्रेकही होऊ शकतो – हिंसक प्रतिक्रियाही येऊ शकते. आणि हे कोणत्याही व्यक्तीच्या जगण्यात या ना त्या कारणाने घडू शकते. कोणतीच विषमता वा भेदभाव नाही, समान संधी आहे आणि सर्वांच्या सर्व न्याय्य अपेक्षा पूर्ण होत आहेत, असे मानवी जीवन कल्पनेतही शक्य दिसत नाही. तर काय ? – हा खरा प्रश्न आहे. या प्रश्नाला सामोरा जाण्याचा आवाका इथे घेतलेला नाही -- तसा हेतूही नसावा. त्यामुळे, जातवास्तवातला अन्याय दर्शवणे, एवढेच घडते. बाकी सगळे अत्युत्तम असूनही या एका मर्यादेत हे सगळे सिमटते. त्या जातवास्तवाला बळी पडत नसलेल्यांनाही तो आपल्या जगण्यातला प्रश्न वाटावा, असे घडत नाही. फक्त सहानुभूती दाखवणे वा हे अयोग्य आहे, असे म्हणणे – एवढेच घडते. स्वतःचे जगणे समजून घेण्याचे आव्हान हा चित्रपट प्रेक्षकांपुढे आणू शकत नाही.

तरीही मराठी सिनेमा, माणसाच्या प्रत्यक्ष जगण्याच्या खूप जवळ आणल्याबद्दल नागराज मंजुळे यांचे अभिनंदन करायला हवे. खोटे भावनिक किंवा विनोदी करायचे हे ठरवून पोरकटपणा करणारे चित्रपट सतत निर्माण करणाऱ्या मराठीत ही एक वेगळी घटना घडलेली आहे, हे निश्चित !

February 13

एक प्रेम असते
देवाणघेवाणीचे --
अधिकाधिक घट्ट होण्याचे
गोंधळून वेडे होण्याचे --

दुसरे असते विलीनतेचे
एकाच्याच दोन रूपांचे
पूर्ण नष्ट होण्याचे –
-- मी दोन्हींचा भक्त --
त्यांतल्या
धडपडण्या -- ठेचकाळण्यासह --

आधुनिक आरोग्यशास्त्र असे म्हणते की माणसाच्या ८० टक्के रोगांचे मूळ हे मनाच्या अवस्थेत असते. ( मन हाही शरीराचाच एक भाग आहे, हे गृहीत धरून. ) आता एका ठिकाणी स्वामी विवेकानंद काय म्हणताहेत पाहा --
" बाबूराम आणि योगेन एवढे आजारी का पडतात ? याचे कारण हे आहे की ते स्वतःला दुर्बल, दीन लेखतात. मानसिक बलाच्या जोरावर त्यांना आजार हटविण्यास सांगा, आणि एका तासाच्या आत त्यांचा आजार नाहीसा होईल ! आत्म्याला का कधी रोग होत असतो ! कधीही नाही. "
-- स्वामी विवेकानंद, पृ. २६१, स्वामी विवेकानंदांची पत्रे.
तुकाराम आरोग्यसंपन्न झाला, अशा अर्थाचा त्याचा एक अभंग वाचल्याचे स्मरते. ( कुणाला माहीत असेल तर तो अभंग इथे द्यावा. )
-- हे सगळे एकमेकांशी संबंधित असेल, असे वाटते.
हृदयरोग्यांना ध्यानाचा उपचार महत्त्वाचा ठरणे, हेही इथे अर्थपूर्ण म्हणावे का ?

February 10

फ्रेंडस, खरे मत सांगा -- २०० पानांच्या वर कादंबरी, २५ पानांच्या वर कथा, ३० ओळींच्या वर कविता आणि दीर्घांकाच्या वर नाटक -- यांचा काळ संपलाय का ?

February 9

खूप कंटाळलो -- स्वतःचा, जगाचा भूतकाळ नगण्य वाटला -- समोरचे, समजतेय तेवढे, किरकोळ राजकारण, निरर्थक झाले -- कलाव्यवहार फक्त करमणुकींच्या गटारांत लडबडताना दिसले -- सगळे मानवी संबंध हे ' दिल्याघेतल्याचे ' आहेत, हे स्पष्ट समजले -- मरू दे, म्हणून झोपायला जातोय ! गाढ झोप लागली तर हे सगळे गायब होऊ शकते !
शुभरात्र !

February 8

तुझीमाझी एकात्मता होते
माझ्या मनाची एकात्मता ...
ते असतात उपभोगाचे अत्युच्च स्फोट
तुझ्यामाझ्यासह परस्पर ...

भराभर प्रपोज करत सुटाल
वाटेल, लौकरच सुटाबुटात नटाल
तीन होकार आले तर पळत सुटाल
शून्य होकाराला आतून फुटाल ...

February 7

निरनिराळ्या विषयांवर आणि माणसांबाबत मते बनवणे ही मनाची सवयच असते. पण रोजच्या रोज आणि सारखेच कुणालातरी कंडेम करावे -- कुणाचातरी तिरस्कार करावा -- कोणत्यातरी विषयावर कडवटपणे बोलावे -- अशी सवय लागणे -- हे मानसिक रोग बळावल्याचे लक्षण नाही का ? की नुसताच, जगून जगून, ' आपण फार शहाणे आहोत ' असा भ्रम बळावलाय, असे म्हणावे ?

February 6

माझ्या घरापासून चालत अवघ्या सात मिनिटांवर ' लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक ' हे रंगमंदिर सुरू होते आहे. आज त्याचे पहिले उदघाटन चालू आहे. पुढल्या आठवड्यात आणखी एक उदघाटन होईल, असे म्हणताहेत. आपली रंगभूमी काही उदघाटनांनी थकून जाणारी नाही, त्यामुळे, लौकरच इथे नाट्यप्रयोग चालू होतील, याची खात्री वाटते. त्या आनंदात मी आहे !

आपण स्वतः सदगुणी आहोत, याबद्दल आपल्याला शंकाच नसते.
( त्यातले, जमवलेले ढोंग हे आपले आपल्याला माहीत असते. )
सदगुणी मन म्हणजे काय, ते आपले ठरलेले असते.
तर ते जे ठरलेले असते, ते काय असते ?
काय -- ' सदगुणी मन ' म्हणजे ?

February 5

आता खूप वर्षे होऊन गेली -- त्यातली नाराजी, विखार समाप्त झालेला आहे. एखादी घटना / प्रसंग, गंमत म्हणून तुमच्याशी शेयर करायला आता हरकत नाही, असे वाटते. तर असाच एक प्रकार -- खानोलकर आणि मी तेंडुलकरांच्या घरी चाललो होतो. सारखी रिक्षा करायची पद्धत नव्हती ( खरे तर परवडलेही नसते ). त्यामुळे विलेपारले स्टेशनला उतरून पूर्वेला यायचे आणि मग पार एका टोकाला असलेल्या तेंडुलकरांच्या ' कुमार ' बिल्डिंगपर्यंत चालत  जायचे, असा प्रकार होता. तेंडुलकरांच्या व्यक्तिमत्वात व्यावहारिक प्रभावी असणे, वजन असणे -- हेही होते जे खानोलकरांकडे फारच कमी होते. त्यामुळे तसे दोघेही किमान सारख्याच महत्त्वाचे लेखक असूनही खानोलकरांना जरा दुय्यम वागणूक मिळे. याची नाराजी खानोलकरांच्या मनात असे. याचे आणखीही काही किस्से आहेत, पण ते पूर्ण निर्विष नाहीत, म्हणून सांगणार नाही. तर आम्ही निघालो चालत -- ' कुमार ' च्या दिशेने. वाटेत अर्थात निरनिराळ्या विषयांवर टिवल्याबावल्या आणि गप्पा चालू होत्या. कोणतेही काही बोलून झाले की खानोलकर चालीवर म्हणत -- " वाहवा वाहवा तेंडू हा ! " दर दोनचार मिनिटांनी ते हे गाणे म्हणत -- " वाहवा वाहवा तेंडू हा ! " हे त्यांच्या घरी पोचेपर्यंत चालू होते !

मला माहीत असलेली एक सर्वोत्तम शाब्दिक कोटी सांगतो. हॅरॉल्ड पिंटरचे ' दि लव्हर ' नामक एक नाटक आहे. माझा लेखक-दिग्दर्शक मित्र प्रकाश बुद्धिसागर याने त्याचा मराठीत अनुवाद केला. त्याच्याच दिग्दर्शनाखाली तो सादरही झाला. अनुवादित नाटकाचे नाव होते -- ' दिलवर ' ! -- नावातले एक अक्षरही न बदलता नावाचा चपखल अनुवाद !

February 4

धर्म आणि विचारसरणी हीच अजूनही माणसाची श्रद्धास्थाने आहेत !

February 3

मौजेच्या ऑफीसमध्ये आम्ही काहीजण बसलेलो असताना ' सत्यकथे ' कडे आलेली एका ग्रामीण कवीची कविता राम पटवर्धनांनी आम्हाला वाचून दाखवली होती -- सारांश असा होता -- यवडं काय तिच्या मायला, नवीन बाईल करायची ! -- ४-६ ओळींत त्याने आख्खे महाभारत च्यूत्यात काढले होते !

दोन मित्र बोलत होते --

" काय मानसिक विकृती आहे माझ्यात, कोण जाणे -- तिकीट-तपासनीस दिसला की आपल्याकडे तिकीट नाहीय, अशीच भावना येते माझ्या डोक्यात -- तिकीट असूनही -- "

" ते एक वेळ ठीक -- माझी वेगळीच आहे विकृती -- फेसबुकवर -- ही माणसे अशी, ती तशी -- असे कुठल्याही माणसांबद्दल वाईट स्टेटस आले की ते माझ्याबद्दलच आहे, असे मला वाटते -- "

February 2

आजच्या प्रश्नांचा अंधार सरेल
उद्याच्या प्रश्नांची नवी पहाट येईल
चला झटू या
नवे नवे प्रश्न तयार करू या --

February 1

आपले मित्र रवी लाखे यांच्या मातोश्री गेले काही दिवस गंभीर आजारी होत्या. आज पहाटे त्यांचे निधन झाले. आपण या प्रसंगी अर्थातच लाख्यांबरोबर आहोत. त्यांच्या मातोश्रींच्या स्मृतीस अत्यादरपूर्वक अभिवादन !

सर्जकता म्हणजे मुख्यतः, आत्मसात झालेल्या नैतिक, वैचारिक, सांस्कृतिक सवयींतून बाहेर पडण्याचा धोका पत्करणे. नाटकाचा धंदा करणारे क्वचितच या वाटेला जातात. त्यामुळे, बाह्य रूपात बदल दिसले तरी आतला रटाळपणा तोच असतो. म्हणूनच, मराठीत नाटकधंदा करणारे मराठीतल्या आंतरिक रटाळतेचे प्रतिनिधी असतात, मराठीतल्या सर्जकतेचे नव्हे !

January 2014

January 31

पंढरपूर नाट्यसंमेलनासाठी निमंत्रण देणारे नाट्यपरिषदेचे ३० डिसेंबरचे पत्र मला ०९ जानेवारीला मिळाले. अरे ! आपल्याला कसे काय बोलावले ? कदाचित काकडेकाका अध्यक्ष असल्यामुळे असेल ! – हे विचार डोक्यात येऊन गेले. त्यात म्हटले होते की प्रवास, निवास व भोजन व्यवस्था करण्यासाठी आणि ' अधिक चांगल्या सोयी उपलब्ध करून देता याव्यात म्हणून ' -- उपस्थित राहणार असल्याचे १० जानेवारीपर्यंत कळवा. म्हणजे एक दिवस होता शिल्लक ! म्हटले, हरकत नाही, कळवावे. १० जानेवारीला ईमेलने, मी येणार असल्याचे कळवले. पुढे सगळे शांत. काकडेकाकांनाही फोनवर, मी येणार असल्याचे सांगितले. तेही म्हणाले, अवश्य ये आणि तिथल्या कार्यक्रमांत सहभागीही हो. मी होय म्हटले. ( मी येणार आहे हे माहीत असूनही, अमुक एका कार्यक्रमात मी सहभागी व्हावे, असे कुणीच मला अद्याप कळवलेले नाही. ) चारपाच दिवसांपूर्वी फोन आला की ३१ ला रात्री नाट्यपरिषदेच्या ऑफीससमोरून गाडी सुटणार आहे, तिथे तुम्ही या. म्हटले, म्हणजे, टिळक स्मारक मंदिर ना ? तर म्हणाले, नाही नाही, मी तुम्हाला मुंबईचे सांगत होतो – अच्छा, तुम्ही पुण्यावरून येणार काय ? मी होय म्हटले. मग, ते म्हणाले, मी क्षला कळवतो, तो तुम्हाला फोन करेल. मी ठीक, म्हटले. मला काही फोन आला नाही. म्हटले, क्ष आपला मित्रच आहे, त्याला विचारावे, म्हणून त्याला फोन केला आणि मुंबईहून त्याला काही फोन आला होता का, हे विचारले. तो, नाही, म्हणाला. मग त्याला घडलेले सांगितले. अच्छा, तुम्ही येणार आहात का संमेलनाला – मग, अबकची कार जाणार आहे, त्यातून ज्ञ जाणार आहेत, त्यांच्याबरोबर तुम्ही जा, त्यालाही काळवतो, तो तुम्हाला फोन करेल, क्ष म्हणाला. म्हटले, ठीक आहे. फक्त ३१ची रात्र की ०१ ची पहाट – कधी निघणार, हे तो कळवेल, म्हणाला. मी चालेल, म्हटले. मला काही फोन आला नाही, म्हणून मी पुन्हा क्षला फोन केला. तो म्हणाला की ठरल्यावर करेलच अबक फोन. मी बरे, म्हणालो. काल क्षचा फोन आला की आपली मोठी गाडी दुपारी २ ला सुटणार आहे, त्यातले अमुक म्हणताहेत की चंप्रंना गाडीतून येऊ द्या. मी म्हणालो, चालेल, पण म्हटले, ते कारचे काय झाले ? तर तो म्हणाला की ज्ञच्या पत्नीही जायचे ठरल्याने तिथे जमत नाहीय. मी ठीक, म्हणालो. त्या मोठ्या गाडीचे बघणारा तमुक आहे, तो तुम्हाला फोन करेल, असे क्षने सांगितले. काल फोन आलाच नाही. मग मात्र माझा पारा जरा चढायला लागला. आज सकाळी १२ वाजता त्या तमुकचा फोन आला. दुपारी दीड वाजता अमुक ठिकाणी या, तिथून गाडी सुटेल, म्हणाला. तोवर माझा पारा टॉपला पोचलेला होता. अहो, म्हटले, अधिक चांगल्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठी मला तुम्ही १० जानेवारीच्या आत लेखी कळवायला सागितलेत आणि फक्त दीड तास आधी मला सांगताय ? आधी, म्हटले, एका कारचे ठरले होते, तिथे कुणाची तरी पत्नी येणार म्हणून माझे रद्द झाले – आता मला वाटले, आणखी कुणाची तरी पत्नी यायची ठरली असेल, म्हणून आपले हेही रद्द झाले असावे ! तो तमुक म्हणाला, ऐकून घ्या – माझ्याकडून चूक झालेली आहे – तिथे माझी एकांकिका होणार आहे, तिच्या तालमीत मी गुंतलो होतो. म्हटले, मग ही जबाबदारी आपण घेऊ नये, हे तुम्हाला

समजायला हवे होते – आणि ही जबाबदारी तुमच्यावर टाकणाऱ्यांनाही समजायला हवे होते. तो अजून काही सांगू लागला तेव्हा त्याला थांबवून म्हटले, “ तुमचे नाट्यसंमेलन गेले खड्ड्यात ! मी येणार नाहीय ! “ आणि फोन ठेवून दिला.

माझी काही नाटके व्यावसायिक रंगभूमीवर येऊन गेलेली असली तरी मुख्यतः माझे काम प्रायोगिक म्हटल्या जाणाऱ्या रंगभूमीवरचेच आहे. या नाट्यसंमेलनाच्या दृष्टीने आपण नगण्य नव्हे तर क्षुद्र कचरा आहोत, याची मला जाणीव असते. कचराही असा की ज्यातून काही वस्तू वगैरेही बनू शकणार नाहीत, असा ! त्यामुळे, तेही मला कधी बोलवत नाहीत, मीही कधी तिकडे जातही नाही, बघतही नाही आणि फिरकतही नाही. यंदा कधी नव्हे ते त्यांनी बोलवले, शिवाय आपले काकडेकाका आहेत अध्यक्ष, अशा विचाराने मी जायचे ठरवले. पण मी कचरा असल्याची त्यांनी मला, मला आधीच असलेली, जाणीव पुन्हा एकदा करून दिली. पण एका दृष्टीने हे बरेच झाले. तिथे गेलो असतो तर आणखी अनेकदा ही जाणीव करून देण्याची संधी त्यांना मिळाली असती ! त्यातून बचावलो, हेच या वाईटातले चांगले म्हणायचे !

January 30
Champra Deshpande shared Smita Gaanu Joglekar's status update.

एक महत्त्वाचे स्टेटस --

आज शुक्रवार दिनांक ३१ जानेवारी २०१४. आजच्या पुणे मटा मध्ये पान २ वर ' विचार ' या जागेत --

अगदी सरळमार्गी असणे हे एक प्रकारचे पापच आहे. हे पाप कालांतराने मनुष्याच्या दुर्बलतेचे कारण बनते.
-- स्वामी विवेकानंद.

-- हे आले आहे. आजच्या आजच मला याचा प्रत्यय येणार, असे दिसतेय ! पाहू. आज एवढेच.

ताठर ( rigid ) मनाच्या व्यक्तीला बोलण्यावागण्याजगण्याच्या शक्यता दिसतातच कमी !
ती स्वरचित तुरुंगात जगत असते !

January 29

' पाठीत खंजिर खुपसणे ' हा निर्घृण विश्वासघातासाठी वापरला जाणारा एक वाक्प्रचार आहे. विशेषतः राजकीय क्षेत्रातल्या एखाद्याच्या कृतीच्या बाबतीत तो वापरला जातो. काही लोक म्हणतात, असले भावनिक बोलून उपयोग नसतो, राजकारण आहे शेवटी, वेगवेगळे फासे त्या त्या वेळी पडणारच ! राजकारणात आणि व्यक्तिगत जगण्यात तेच मानवी मन कार्यरत असते. म्हणजे तिथेही असेच समर्थन चालू शकेल का ? दर्जेदार राजकारण वा दर्जेदार जगणे -- या वाक्प्रचाराच्या संदर्भात -- कसे असते ? आहे का ते उपलब्ध ?

January 27

वाचन, माहिती, अभ्यास हे सगळे एक वेळ इकडून तिकडे देता येईल पण एखाद्या विषयाचे आकलन स्वतःला असल्याशिवाय तो दुसऱ्याला समजेल असा मांडणे अशक्य आहे !

प्रतीक आणि प्रतिमा यांतला फरक -- या क्षणी सुचेल तसा सांगतोय -- प्रतीक मर्यादित असते -- त्याला निश्चित अर्थ असतो -- ते कशाचे तरी प्रतिनिधित्व करते -- तिरंगी झेंडा, ओम, स्वस्तिक, क्रॉस, विळाकोयता -- ही प्रतीके आहेत. प्रतिमा ही विस्तृत अभिव्यकतीसाठी असते, फक्त एखादा मर्यादित अर्थ सांगण्यासाठी नसते. प्रतिमा ही बहुतेकदा इंद्रियगम्य असते आणि ती साहचर्याने, परंपरेने, त्याबाबतच्या जाणीवांनी जागृत होणाऱ्या अनेक गोष्टींच्या सूचकतेसह असते. अनेक प्रतिमांची गुंफणही एक प्रतिमा होऊ शकते. जसे ------ ' शंभर कँडल पॉवरची तंग खच्ची फळे ' -- अरुण कोलटकर. याबाबत मला असे दिसते की इंग्रजीतले symbol आणि image हे शब्द आपल्या प्रतीक आणि प्रतिमा या शब्दांना फिट बसत नाहीत. की तिथे वेगळेच आहेत अर्थ ? काय आहेत नेमके फरक ? की मी वर दिलेले अर्थ अधिक नेटके करायची गरज आहे ? तज्ज्ञांनी कृपया यावर प्रकाश टाकावा.

January 26

" वेश्यांच्या मुलांचे शिक्षण व्हायला हवेच ना ? बलात्काराचा कायदा कडक व्हायला नको ? वनवासी कल्याण नको व्हायला ? आणि अपंगांना संधी तयार करायलाच हव्यात ना ? आता हे पेटिशन पाहा – आहे ना महत्त्वाचे ? महागाई आटोक्यात राहायला नको ? ठराविक मुदतीत खुनांचे शोध नको लागायला ? १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी – दोनच तर दिवस असतात – झेंडावंदनाला उपस्थिती नको ? या देशात समता यायलाच हवी, हे पटतेय ना तुम्हाला ? आणि इथे एक

सही हवीय तुमची – पटतेय ना ? मग नुसते ‘ हो ‘ म्हणून काय साध्य होणार आहे ? मी घेतोय ना पुढाकार – तुम्ही सामील होण्याचे कर्तव्य बजावा ! तुम्ही विचारी आहात ! आमच्या बरोबर आहातच, हे गृहीत धरतोय ! धन्यवाद ! "
( हे स्टेटस अवतरण चिन्हांत घेण्याचे कारण, ही वाक्ये माझी नाहीत, दुसऱ्याची आहेत -- )

January 25

काल संध्याकाळपासून आज संध्याकाळपर्यंत आमच्या भागात वीज नव्हती. काहीतरी मेजर फॉल्ट होता. पण बॅक-अप असल्याने आमच्याकडे लिफ्ट, पाणीपुरवठा चालू होता. बॅक-अपसाठी डीझेल मिळत होते कारण पेट्रोल पंपावरची वीज चालू होती. विचार असा आला की पूर्ण शहराचा वीजपुरवठा ३-४ दिवस थांबला तर ? कल्पना लढवली तर शहर रिकामे करायचीच वेळ येईल, असे वाटले. मागे एकदा निम्मा जुलै संपला तरी मुंबईत पाऊस नव्हता, तेव्हा तिथे असे विचार, ज्यांना शक्य असेल त्यांनी मुंबई सोडण्याचे, सुरू झाले होते, ते आठवले. एक तर निसर्गाला आपण गृहीत धरतो आणि त्याचबरोबर, मानवनिर्मितही अनेक गोष्टी नीट चालणारच, असे गृहीत धरतो – त्यामुळे आपले ‘ नॉर्मल ‘ आयुष्य आत्मविश्वासाने चालू असते. आपल्या लोकांनी अणुचाचण्या यापुढे चंद्रावर कराव्यात, असे ठरवले आणि त्यामुळे ( वा इतर कोणत्याही कारणाने ) चंद्र नुसता जरा हलला तरी आपली वाट लागेल, असे वाटते. मी एक आत्मविश्वास असलेला माणूस आहे, असे वाटताना, हे आपल्या डोक्यात नसते !

January 23

माझ्याकडे जर ' समजून घेण्याच्या प्रक्रियेची ' ( मालमत्तेची नव्हे ) समृद्धी असेल तर मी ज्यात काम करीन त्या माध्यमाला ती मिळेल. ती नसेलच तर मी कुठेही काहीही केले तरी ते निरर्थकच असेल. माझ्या एका जुन्या मित्राने अत्यंत प्रेमाने मला सांगितले की मी फेसबुकवर वेळ न घालवता नाटकच लिहावे. त्याला मी माझे म्हणणे असे कळवले ---

नाट्यक्षेत्राची एकूण अवस्था पाहून मी नाटक लिहिणे बंद केले आहे. सादर करणारे, त्याचे प्रयोग करू शकणारे लोक नाहीत. कुणी सादर केलेच तर पाहायला येणारे नाहीत. भव्य गप्पांचा काही उपयोग नाही. सध्या मी कादंबरी लिहितो आहे. माझा फेसबुकचा वापर पाहिलास तर गंमतीजंमतींपासून अति-गंभीर चर्चा घडवून आणण्यापर्यंत आहे. माझे फेसबुकवरचे लेखन काही दर्जेदार नियतकालिकांनी प्रसिद्धही केलेले आहे. मी कलेतून जे साधतो, तेच बऱ्याच प्रमाणात या माध्यमातूनही साधत असतो. असो.

फेसबुक ढाचा बदललेला दिसतोय ना ? पहिलाच अधिक बरा होता, असे वाटतेय का ? हा सदर ढाचा कंपल्सरी आहे की आधीचा निवडता येतो ?

January 22

चांगलं वागणं आणि वाईट वागणं !

January 21

आज गंमतीचाच दिसतोय दिवस ! ही आणखी एक मजेदार ( पण जरा ब्लॅकच ! ) पोस्ट --
एका मित्राबरोबर बोलत होतो -- आपल्याच राज्यात मराठीची अवस्था, हा विषय होता. त्या बोलण्यात तो म्हणाला --
" मराठी घेऊन पदवी मिळवणे म्हणजे बालवर्ग नापास ! आणि मराठी घेऊन एमए होणे म्हणजे बालवर्ग दोनदा नापास !! "
विषयच संपला !!!

एक छोटी मुलगी ः ( खालून -- ) आई, मी खेळून येईपर्यंत, नेटवर बघून झाशीच्या राणीवर पाच वाक्यं लिहून ठेव --
आई ः ( स्वयंपाकघराच्या खिडकीतून -- ) आत्ता मला वेळ नाहीय -- तू आल्यावर बघू --

January 19

लक्ष द्यावे असे कुठूनही येऊ द्या ना काही -- लहान मुलाकडून, शेतमजुराकडून, क्रिकेटवीराकडून, डान्सरकडून वा एखाद्या गोऱ्याकडून ! शहाणपणाच्या बाबतीत तरी या भेदभावांना काही अर्थ नाही !

" तुमचा वेळ मर्यादित आहे, तेव्हा दुसऱ्याचे जीवन जगण्यात तो वाया घालवू नका. इतरांच्या वैचारिक सापळ्यांत सापडू नका. इतरांच्या मतांच्या कोलाहलात तुमचा आतला आवाज बुडू देऊ नका। " -- आजच्या पुणे लोकसत्तेच्या पुरवणीत आलेल्या स्टीव्ह जॉब्ज ( ऍपलवाले ) यांच्या ' स्टे हंग्री, स्टे फूलिश ' -- या भाषणातून.

अमुक अमुक यांचे सुविद्य पती -- किंवा -- अमुक अमुक यांचे सुविद्य ( किंवा नुसते साधे ) प्रियकर -- अशी ओळख करून देण्याचासुद्धा काळ यायला नको ?

" मी कुणालाही त्रास देऊ इच्छित नाही -- माझे मला जगू द्या -- "
-- एक आम आदमी.

January 16

इतिहासाचे नीट भान असल्याशिवाय दर्जेदार लेखन होतच नाही, असे वाचनात आले. मला तर इतिहासाचे फारसे भानही नाही आणि त्याची आवडही नाही -- उलट त्याची ऍलर्जी आहे. ( पुराणांच्या बाबतीतही तेच ! ) पण या सगळ्यांच्या सातत्ययुक्त परिणामांतून जर आत्ताचे जगणे चालू असेल तर त्याचे थोडे भान आहे, असे म्हणता येईल. इंटरला असताना मला जगाचा इतिहास होता ! शॉर्टकटस काढून, धोके पत्करून त्यातून कसाबसा सुटलो ! अशा एकूण परिस्थितीत, दर्जेदार लेखक होणे, आता मला शक्य नाही -- आहे तसाच राहून काही लिहीत राहीन ! हे सगळे, फ्रेंडस म्हणून बोलणे झाले. पण काय हो, इतिहासाचे भान म्हणजे ?

My past means memories of some events remaining in some concerned persons' minds, in different forms and with different importance ! The past is as good as nothing !

January 11

लेखक-लेखिकांना आपण बोल्ड / धाडसी कधी म्हणतो ? स्त्री-पुरुष संबंध, पूर्वक्रीडा, संभोग, त्यातले परमोच्च बिंदू यांची वर्णने त्यांच्या लेखनात आली तर ! ( किंवा कुणाच्या ना कुणाच्या भावना दुखवणारे परखड लेखन असेल तर ! ) -- खरे तर हे सगळे माणसाचे जगणे आहे ! म्हणजे जास्तीत जास्त संकोची आणि लाजऱ्या आणि भित्र्या आणि ढोंगी समाजात लेखकांना बोल्ड होण्याची भरपूर संधी असते, हे स्पष्ट आहे !

January 10

काल ' बावनकशी ' निर्मित, प्रफुल्ल मोरे यांनी सादर केलेले, समीर मोनेलिखित
आणि अजित भगत दिग्दर्शित **' द डेथ ओफ ए कांकरर '** हे नाटक पाहिले. ज़बरदस्त
आणि सर्वांगपरिपूर्ण बिनचूक प्रयोग ! जर्मनीचा क्रूरकर्मा हिटलर याच्या शेवटच्या दिवसांवर हे नाटक आहे.अजित भगत यांनी खूप विचारपूर्वक आणि अनेक दृश्यात्मक तपशील भरून हे नाटक बसवलेले आहे.अनेक ठिकाणी बऱ्यापैकी मोठे विराम ( पॉजेस ) आहेत. त्यांतले खूप बारकावे दाद द्यावी, असे आहेत. ध्वनी आणि प्रकाश यांचा मेळ तर अप्रतिमच आहे.

पूर्ण टीमची कामगिरी खास जमून आलेली आहे .निव्वळ, सुशील इनामदार यांनी अभिनीत केलेला हिटलर पाहण्यासाठीसुद्धा हे नाटक जरूर पाहावे. म्हटले तर स्टार कलाकार कुणीही नाही, पण प्रयोग अत्यंत सफाईदार होतो, यात वादच नाही. असे गंभीर नाटक मराठी रंगभूमीवर आणण्याचे धाडस केल्याबद्दल प्रफुल्ल मोरे यांचे खास अभिनंदन करायला हवे. Do see this play ! ( My PC with Devanagari is under repairs -- somehow I have managed -- please pardon the errors. )

January 5

अजूनही लेखक / लेखिका लिहायला बिचकतात वा जनमानसातली आपली प्रतिमा बिघडेल, या भीतीने लिहायचे टाळतात, असे काही विषय / अनुभव / वर्णने आहेत, असे वाटते का ? अभिव्यक्तिस्वातंत्र्य खरेच परिपूर्णतेने कृतीत येतेय, असे वाटते का ?

January 3

विकसित संपर्कमाध्यमांच्या आताच्या काळात लेखकांनी आपला वेळ अशा स्वरूपाच्या ' साहित्य संमेलन ' नामक उत्सवात घालवावा का ? कशासाठी ?

January 2

" अहो, नोबेलमध्ये तरी काय -- हेच चालते ! " - असे काहीजण म्हणताना दिसतात. चार ठिकाणांहून चार ' महत्त्वाच्या ' लेखकांच्या शिफारशी आलेल्या असतील तर त्यांतून कोण निवडावा, यात होतही असेल इकडे तिकडे, पण म्हणून नोबेल हे एक नगण्य पारितोषिक समजावे ?

January 1

काहीजण फेसबुकला नावे ठेवताना दिसतात -- हे व्यसन आहे, वेळ फुकट जातो, वगैरे. पण तो फेसबुकचा नसून आपला दोष असतो. हे माध्यम नसते तर आपण इतके फ्रेंडस रोजच्या रोज एकमेकांच्या संपर्कात राहू शकलो असतो का ? काही त्रासाचे, काही वादांचे वा मानापमानांचेही प्रसंग इथे घडत असतील, तरीही, याचे सकारात्मक पारडेच जड राहते ! यासाठी, मार्क झुकेरबर्ग आणि त्याची पूर्ण फेसबुक टीम यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करावी, असे मला वाटते ! आणि त्या सर्वांना

नववर्षासाठी भरभरून शुभेच्छाही देणे महत्त्वाचे वाटते ! ( आता हे मराठीतले त्यांच्यापर्यंत जाईल न जाईल, पण हे व्हायलाच हवे, असे वाटल्याने, हे स्टेटस ! )

-- ००० ---